नं)७३
म. ग्रं. सं. ठाणें
१७३
विषय इतिहास
लेखक नारायण भवानराव पावगी
सन १८९८
संग्रहालय क्रमांक ८
पुस्तकाचें नांव भारतीय साम्राज्य


१७३
इति.

श्री

## सद्गुरु चरणारविंदीं

नमन करून

ही

ग्रंथरूपी

यथाशक्ति व यथामति केलेली

अत्यल्प

# देशसेवा

## नारायण भवानराव पावगी

यानें

आपल्या दयितआर्यभूमीच्या ठिकाणीं

असलेल्या अत्युत्कट

## प्रीत्यर्थ

सकल

आर्यभगिनींस व आर्यबांधवांस

प्रीतिपूर्वक

अत्यादरानें समर्पिली असे.

ग्रंथ संग्रहालय

# भारतीय साम्राज्य.

## पुस्तक आठवें

### प्रस्तावना.

[१]चातुर्वर्ण्यंमयासृष्टंगुणकर्मविभागशः
तस्यकर्तारमपिमांविध्यकर्तारमव्ययम् ॥
* * * *

[२]स्वेस्वेकर्मण्यभिरतःसंसिद्धिंलभतेनरः।
स्वकर्मनिरतःसिद्धिंयथाविंदतितच्छृणु ॥

भारतीय साम्राज्य मालिकेपैकीं, उत्तरार्धांतील हें सांप्रतचें आठवें पुस्तक होय.

सदरहू मालिकेच्या पूर्वार्धांत, १ आर्यदेश व तत्संबंधीं वृत्तांत, २ आर्यलोक व त्यांचें बुद्धिवैभव, ३ आर्येतिहास व भूगोल, ४ आर्यशास्त्र व कला, ५ आर्य शासनपद्धति व संस्था, आणि ६ आर्यगृहस्थिति, नीति, शौर्य, व उन्नति, या बद्दलचाच पृथक् पृथक् तपशील सहा पुस्तकांत देऊन, उत्तरा-

१. श्रीमद्भगवद्गीता अ. ४. १३.

२. श्रीमद्भगवद्गीता अ. १८. ४५.

र्धाच्या सातव्या पुस्तकांत, ७ भरतखंडांतील नाना-विध धर्मांचें साद्यन्त व यथावकाश विवेचन करण्यांत आलें.

ह्या चालू पुस्तकांत, या विस्तीर्ण भरतखंडांतील भिन्न भिन्न जातींची इत्थंभूत हकीकत देण्याचा विचार आहे. येवढेंच नव्हें तर, तदंगभूत असणारे जे कित्येक महत्वाचे प्रश्न आहेत, त्यांचाही ह्याच भागांत समावेश करण्याचें मनांत आणिलें आहे. कारण, जातिवैचित्र्यासंबंधीं विचार करितांना, एकंदर सर्व गोष्टींचा यच्यावत् तपशील देऊन, त्याबरोबरच जातिभेद, जातिविभाग, श्रमविभाग, जीवनसाधन, व भिन्नभिन्न जातींची विद्याभिरुचि, यां-विषयींचीही अवश्य ती माहिती वाचकांपुढें सादर केली तर बरें, असें समजून तसें करण्याचें योजिलें आहे.

आतां, आमच्या वर्णव्यवस्थेसंबंधीं कित्येक पौरस्त्य

---

1. "It is fortunate that the Hindu religion, both in *ideal* and *practice* is *sufficiently cosmopolitan* and *progressive*, to admit *of all further improvements*. It is *no exclusive nor aggressive religion*, *named* after *any particular individual*, and binding its votaries to any particular dogma."

( A paper read by Mr. Ratnaswamy Iyer, B. A. in the *Oren Court* of Chicago. "on Hinduism." )

( पुढें चालू. )

व पाश्चात्यांचे सानुकूल अभिप्राय असून कित्येकांचें त्याच बाबतींत अगदीं प्रतिकूल मत आहे. सबब, तद्विषयक खण्डन मण्डन क्रियेचें प्रसंगानुसार अवलंबन

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

2. Mr. H. J. S. Cotton in his "New India" says:—

(अ) "The old *Hindu* polytheism is a *present basis of moral order*, and rests upon foundations *so plastic* that it can be *moulded* into the most *diverse* forms, *adapting itself equally to the intellect of the subtle metaphysician and to the emotions of the unlettered peasant.*" * *

"*The system of caste, far from being the source of all the troubles* which can be traced in Hindu Society, *has rendered the most important services in the past, and still continues to sustain order and* solidarity. The *admirable order of Hinduism is too valuable to be rashly sacrificed* before any Moloch of Progress. Better is order without progress, if that were possible, than progress with disorder." * "Those reformers who are in the habit of describing *caste* as the root of all evils in the Hindu Society ..... forget that the *attempt to abolish caste if successful, would be attended with the most dangerous consequences*, unless some powerful religious influence were brought to bear upon the people in its place."

( पुढें चालू. )

करून, मी आपल्या अल्प समजुतीप्रमाणें केवळ समदृष्टी-नेंच विचार केला आहे.

ज्यांचे अभिप्राय प्रतिकूल आहेत, त्यांपैकीं कित्येकांनीं **आम्हां हिंदूंवर**, आणि विशेषतः **ब्राह्मणांवर**, अगदींच निष्कारण आरोप करून बरेंच तोंडसुख घेतलें आहे. इतकेंच नव्हे तर, हीं **वर्णव्यवस्था** आम्हीं आपल्या मतलबासाठीं, व केवळ आपल्याच पोळीवर

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

( आ ) August Compte observes:—" *No institution has ever shown itself more adapted to honor ability of various kinds than this polytheistic organisation.* ......In a *social* view the *virtues of the system are not less conspicuous*; as to the influence *on morals, this system was favourable to personal morality, and yet more to domestic; for the spirit of caste was a mere extension of the family spirit.* "

( इ ) Sir Monier William remarks:—In India, *caste has been useful in promoting self-sacrifice, in securing* subordination of the individual to *an organized body in restraining from vice, in preventing pauperism.* "

( ई ) Sir W. W. Hunter says:—The "*plasticity*" of caste " *has enabled it to adapt itself to widely separated stages of social progress,* and to *incorporate* the various ethnical elements *which make up the Indian* people. "

३०८ २८८
१७६३



तूप ओढण्याच्या हेतूनें केली असल्याविषयीं, त्यांचें म्हणणें आहे. सबब, ह्या भ्रांतिमूलक समजुतीचें निरसन सांप्रतच्या पुस्तकांत, यथावकाश व योग्यस्थळीं करून, तत्संबंधीं साधक बाधक कारणेंही आधारसहित दाखविण्यांत आलीं आहेत. तथापि, ह्या त्यांच्या निरर्गल प्रलापाबद्दल आश्चर्य वाटल्यावांचून राहवत नाहीं.

कारण, **जगाच्या कल्याणा संताच्या विभूती**, हेंच आपलें खरें ब्रीद मानून, ज्या आमच्या **आर्यपूर्वजांनीं** आपली कालक्रमणा केली; प्रजेचें **सौख्य तीच खरी शांति**, असें वाटून ज्यांनीं आपला देह आनंदानें कष्टविला; **विद्यामृतपान हेंच शरीराचें पोषण**, असें कल्पून ज्यांनीं केवळ विद्याभ्यासंगांतच आपल्या हाडाचीं काडें केलीं; आणि **परोपकार हीच इतिकर्तव्यता**, असें समजून ज्यांनीं स्वसंतोषानें स्वार्थत्याग केला, इतकेंच नव्हे तर, अहोरात्र वनवासाही स्वीकारला; त्यांच्यावरच स्वार्थपरायणतेचा आरोप लादल्यावर, दुसरें काय म्हणावयाचें!

त्याचप्रमाणें, **वर्णव्यवस्थेंत**ही आपल्या जातीची विशेष तरफदारी केल्याबद्दल, त्यानीं **ब्राम्हणांवर** पुष्कळ प्रकारचे आक्षेप आणिले आहेत. परंतु, ह्यासंबंधानें सविनय आणि आदरपूर्वक मजला इतकेंच कळविणें आहे कीं, या बाबतींत ते जरी दोषास पात्र असले तरी,

त्यांची तरफदारी सांगूनसवरून व राजरोस होती; आणि तिच्यांत कोणत्याही प्रकारचा लपंडाव म्हणून तिळभर देखील नव्हता. त्यामुळें, **मनस्येकंवचस्येकं** आणि **हृदयेनु हलाहलम्**, अथवा **गोगल गाय पोटांत पाय**, अशा मासल्याच्या वर्तनापेक्षां त्यांची निर्मलता व स्पष्ट-वक्तृत्व हीं खरोखरच वरच्या कोटीचीं समजलीं पाहिजेत. तसेंच, जिव्हाग्रीं साखर पेरून पोटांत कालकूट साठ-विण्यापेक्षां, प्रथम कडु आणि शेवटीं गोड खचितच चांगलें. अथवा, समाजसमता, निःपक्षपात, व न्याय, यांचे कागदीं घोडे मोठ्या डामडौलानें यथेष्ट नाचवून, त्याप्रमाणें काडीमात्रही अमलांत न आणितां अन्यायानें वर्तण्यापेक्षां, दर्शनीं दाखविलेली असमता निःसंशय गर्हणीय नाहीं, ही गोष्ट कोणीही कबूल करील.

असो. प्रस्तुत पुस्तकांतला विषय **भरतखंडांतील जातिवैचित्र्य** असून, ह्याचे एकंदर सहा भाग केले आहेत. ह्यांचाही चढताच अनुक्रम असून, त्यांचा तपशील खालीं लिहिल्याप्रमाणें देण्यांत येत आहे.

**भाग ४५ आर्यजाति. ४६ अनार्यजाति. ४७ इतरजाति. ४८ जातिविभाग. ४९ भिन्नभिन्न जातींतील श्रमविभाग व जीवन साधन.** आणि ५० **भिन्नभिन्न जातींची विद्याभिरुचि.**

अस्तु. शेवटीं, एकामागूनएक अशा एक सारख्या अनेक अडचणी आल्या असतांही, ज्या **श्रीमंगलमूर्तीच्या** केवळ सतत **कृपाकटाक्षामुळेंच** हें पुस्तक पुरें होऊन छापून बाहेर पडलें, त्या **श्रीसद्गुरुचे** अत्यन्त व सदैव उपकार मानून, ही प्रस्तावना पुरी करतों.

मुक्काम ठाणें, मंगळवार, **विजयादशमी**, हेमलंब-नामसवत्सरे. शके १८१९. — **नारायण भवानराव पावगी.**

... ग्रंथ संग्रहालय ...
नं. ......
....
था.
वा. ५. ८६

# भारतीय साम्राज्य.

## उत्तरार्ध.

## पुस्तक आठवें.

### भरतखंडांतील जातिवैचित्र्य.

## भाग ४५ वा.

### आर्यजाति.

५१८०

हिंदुस्थानांतील जातिवैचित्र्य.

प्रस्तुत ग्रंथाच्या सातव्या पुस्तकांत, हिंदुस्थानांतील मुख्य धर्माविषयींचें यथावकाश विवेचन केलें. सबब, आतां, या विस्तीर्ण खंडांतील जातिवैचित्र्यासंबंधीं, हल्लींच्या पुस्तकांत थोडक्यांत विचार करून, तदनंतर त्यांत ज्या, ज्या नानाविध देशीभाषा सांप्रतकाळीं प्रचारांत आहेत, त्यांची थोडीबहुत हकीकत देण्यासाठीं, कांहीं उपयुक्त माहिती मिळाली तर पाहूं.

ह्या खंडाचीं प्राचीन व सांप्रतचीं नांवें, आणि तीं पडण्याचीं कारणें.

हा प्रचंड देश भारतांचा म्हणजे भरताच्या वंशजांचा असल्या कारणानें, ह्याला भरतखंड अशी संज्ञा आहे. त्याचप्रमाणें, आम्ही हिंदूलोक येथेंच राहत असल्याकारणानें, ह्या भूमीला हिंदुस्थानही म्हणतात. पण, आमचे मूळ पूर्वज जे आर्य, ते देखील येथेंच राहत असत; व त्यामुळें त्याला आर्यावर्तही म्हणत. तेव्हां, आर्यावर्त किंवा भरतखंड असें प्राचीन नांव, अथवा हिंदुस्थान हें अर्वाचीन नांव घेतल्याबरोबरच, हा देश हिंदूंचा असल्याविषयींचा तर्क सहजीं मनांत येतो. सबब, आम्हीं कोण, व हा देश आमच्याच असल्याबद्दल जी नेहमीं स्वयमेव कल्पना उत्पन्न होते, ती किती अंशानें शोभण्यासारखी आहे, याविषयीं थोडेसें विवेचन करूं; आणि तदनंतर, ह्या देशांत हिंदूंशिवाय इतर कोणत्या लोकांची किंवा जातींची वस्ती आहे; हे लोक कसकसे विभागले गेले आहेत; विद्यार्जनाविषयीं कोणत्या जातींत गुरुतर प्रीति आहे; कोणत्या जाती या कामांत विशेष मागासलेल्या आहेत; व जातिवैचित्र्यामुळें भाषावैचित्र्य कसें झालें आहे; एतद्विषयक तपशिलवार हकीकत क्रमशः देऊं.

आम्हांस हिंदू हें नांव कसें पडलें, याबद्दल तपशिल-

वार वर्णन, आणि **पौरस्त्य** व **पाश्चात्य** लोकांचे अभिप्राय, पहिल्या[1] पुस्तकांत थोडक्यांत दिले आहेत. त्यावरून वाचकांच्या लक्षांत इतिवृत्तान्त सहजीं येईल.

हिंदू हे भरत खंडातले मुळचे रहिवाशी.

आमची अशी समज आहे कीं, आम्ही **हिंदूलोक** या **भरतखंडांतलेच**[2] मूळचे राहणारे असून, आम्ही इतर ठिकाणाहून आलों असल्याबद्दल अगदीं पुराणतम वेदग्रंथांत, किंवा अन्यत्र, कोठेंही बिलकुल दाखला मिळत नाहीं. आणि त्याच कारणानें, **उत्तर हिंदुस्थान** व त्याच्या आसमंतांतील **वायव्यदिशेकडील** प्रांत, यांशिवाय आमचें दुसरें एखादें निवासस्थान असल्याचें संभवतच नाहीं.

नवीन शोधांप्रमाणें त्यांचे मध्यआशियांत असलेलें निवासस्थान.

आतां, नूतन शोधांप्रमाणें, अनेकभाषाकोविदांचें[3] असें मत आहे कीं, **आर्यहिंदू हे मध्यआशियांतूनच** प्रथमतः **भरतखंडांत** गेले, आणि तदनंतर त्यांनीं येथें कायमची वस्ती केली. परंतु, **वेदांत**, ह्या **मध्यआशियांतील** पठारांचा किंवा माळरानांचा उल्लेख केला असल्याचें कोठेंही आढळून येत नाहीं.

---

१ भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक पहिलें, पान ४-५-६ पहा.
२ भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक दुसरें, पान १-२-३ पहा.
३ भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक दुसरें, पान ४ ते ९ पहा.

ह्या खंडाचीं प्राचीन व सांप्रतचीं नांवें, आणि तीं पडण्याचीं कारणें.

हा प्रचंड देश भारतांचा म्हणजे भरताच्या वंशजांचा असल्या कारणानें, ह्याला **भरतखंड** अशी संज्ञा आहे. त्याचप्रमाणें, आम्ही हिंदूलोक येथेंच राहत असल्याकारणानें, ह्या भूमीला **हिंदुस्थान**ही म्हणतात. पण, आमचे मूळ पूर्वज जे **आर्य**, ते देखील येथेंच राहत असत; व त्यामुळें त्याला **आर्यावर्त**ही म्हणत. तेव्हां, **आर्यावर्त** किंवा **भरतखंड** असें प्राचीन नांव, अथवा **हिंदुस्थान** हें अर्वाचीन नांव घेतल्याबरोबरच, हा देश हिंदूंचा असल्याविषयींचा तर्क सहजीं मनांत येतो. सबब, आम्हीं कोण, व हा देश आमचाच असल्याबद्दल जी नेहमीं स्वयमेव कल्पना उत्पन्न होते, ती किती अंशानें शोभण्यासारखी आहे, याविषयीं थोडेंसें विवेचन करूं; आणि तदनंतर, ह्या देशांत हिंदूंशिवाय इतर कोणत्या लोकांची किंवा जातींची वस्ती आहे; हे लोक कसकसे विभागले गेले आहेत; विद्यार्जनाविषयीं कोणत्या जातींत गुरुतर प्रीति आहे; कोणत्या जाती या कामांत विशेष मागासलेल्या आहेत; व जातिवैचित्र्यामुळें भाषावैचित्र्य कसें झालें आहे; एतद्विषयक तपशिलवार हकीकत क्रमशः देऊं.

आम्हांस हिंदू हें नांव कसें पडलें, याबद्दल तपशिल-

वार वर्णन, आणि **पौरस्त्य** व **पाश्चात्य** लोकांचे अभिप्राय, पहिल्या[1] पुस्तकांत थोडक्यांत दिले आहेत. त्यावरून वाचकांच्या लक्षांत इतिवृत्तान्त सहजीं येईल.

हिंदू हे भरत खंडातले मुळचे रहिवाशी.

आमची अशी समज आहे कीं, आम्ही **हिंदूलोक** या **भरतखंडांतलेच**[2] मूळचे राहणारे असून, आम्ही इतर ठिकाणाहून आलों असल्याबद्दल अगदीं पुरातनतम **वेदग्रंथांत**, किंवा अन्यत्र, कोठेंही बिलकुल दाखला मिळत नाहीं. आणि त्याच कारणानें, **उत्तर हिंदुस्थान** व त्याच्या आसमंतांतील **वायव्यदिशेकडील** प्रांत, यांशिवाय आमचें दुसरें एखादें निवासस्थान असल्याचें संभवतच नाहीं.

नवीन शोधांप्रमाणें त्यांचे मध्यआशियांत असलेलें निवासस्थान.

आतां, **नूतन शोधांप्रमाणें**, अनेक[3] भाषाकोविदांचें असें मत आहे कीं, **आर्यहिंदू** हे **मध्यआशियांतूनच** प्रथमतः **भरतखंडांत** गेले, आणि तदनंतर त्यांनीं येथें कायमची वस्ती केली. परंतु, **वेदांत**, ह्या **मध्यआशियांतील** पठारांचा किंवा माळरानांचा उल्लेख केला असल्याचें कोठेंही आढळून येत नाहीं.

---

१ भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक पहिलें, पान ३ ४-५ ६ पहा.

२ भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक दुसरें, पान १ २-३ पहा.

३ भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक दुसरें, पान ८ ते ९ पहा.

त्यावरून, तेथें आमच्या पुराण आर्यपूर्वजांची वस्ती असेल, असें वाटत नाहीं.[1]

तद्विषयक ऋग्वेदातील उल्लेख, व

ऋग्वेदांत, कुभा अथवा काबूल नदीचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणें कुरुम, गोमल, शुतुद्री[2], विपाशा[3], परूष्णी[4], असिक्नी[5], वितस्ता[6], प्रचंड गंगा नदी, विस्तीर्ण सिंधुनद, गंभीर यमुना सरित्, आणि अत्युच्च व श्रीमान् असा हिमालय पर्वत, इत्यादि ठळक ठळक यच्चावत् सर्व ठिकाणांचा उल्लेख असून, मध्यआशियांतील पठारांचें, अथवा त्यांच्या आसमंतांतील प्रदेशांचें, किंवा त्यांच्या आसपासच्या नद्यांचें, त्यांत बिलकूल दिग्दर्शनही नाहीं. ह्यावरून, आमचे आर्य तिकडे नव्हते, असें वाटतें. कारण जर ते असते तर, त्यांनीं तिकडील स्थलविशेषांचा ऋग्वेदांत केव्हांना केव्हां तरी, खचितच उल्लेख केला असता.

---

१ एतद्विषयक, साधकबाधक कारणांचा साद्यन्त विचार, आम्हीं **भारतीय साम्राज्या**च्या सोळाव्या पुस्तकांत करण्याचें योजिलें आहे. व ह्या संबंधानें आमचें जें मत झालें आहे, त्याला अनुकूल असाच मिस्तर **कर्झन्**चा आणि अन्य पाश्चात्य पंडितांचाही अभिप्राय आहे. ) रॉयल एशियाटिक सोसायटीचें सोळावें पुस्तक. पान १७२-२०० पहा. )

२ सतलज. ३ बिजार, ह्मणजे सतलज नदीचा वायव्येकडील फांटा ४ रावनी किंवा हल्लीं रावी असें म्हणतात. ५ चन्द्रभागा किंवा चीनाब ६ जेलम.

यावरून, हिंदुस्थानच आमची मूलजन्मभूमि आहे,[1] असें मानण्यास आम्हांला बलवत्तर कारण मिळतें. आणि निदान, आमच्या श्रुतिस्मृत्यादि ग्रंथावरून, किंवा ऐतिहासिक पुराणावरून तरी, ती अन्य ठिकाणीं असल्याचें वाटत नाहीं.

अन्य ग्रंथांतील दाखले.

असो. कसेंही असलें तरी, इतकी गोष्ट अगदीं निर्विवाद आहे कीं, हा समग्र विस्तीर्ण प्रदेश आम्हींच आपल्या बाहुबलानें जिंकिला. इतकेंच नव्हे तर, हिमांचलापासून तों तहत कन्याकुमारीपर्यंत, आणि काबूलकन्दहारपासून तों थेट ब्रह्मपुत्रानदीपर्यंत, हिंदूंनींच हा सर्व देश वसविला; आणि त्याच्याही पलीकडे कालान्तरानें अगदीं पूर्वसमुद्रापर्यंत, म्हणजे थेट पॅसिफिक महासागरांत, त्यांनीं आपल्या वसाहती पाठवून ठिकठिकाणीं आपलीं ठाणीं बसविलीं,[2] व पादाक्रान्त केलेल्या प्रजेस सुशिक्षित करून ज्ञानामृत पाजिलें.

आर्यजेते, व यांचा दिग्विजय.

---

१ एका प्रसिद्ध फ्रेंच पंडिताचें असेंच ह्मणणें असून, तो शिवाय असेंही कबूल करतो कीं, हिंदुस्थान हेंच सकल मानवी कुटुंबांच्या उन्नतीचें अधिष्ठान आहे.

" The cradle of the human race, or at least the scene of a primitive Civilization. " ( Cruiser ).

२ भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक दुसरें, पान ६३ ते ६७, व पुस्तक सहावें भाग ३७ पहा.

यांप्रमाणें आमच्यामतें, आमची वस्ती ह्या भरतभूमींत अनादि काळापासून असून, नवीन शोधाअन्वयें अनेक भाषाकोविदांच्या मतास अनुसरलें तथापि, ह्या आर्यावर्तांत आमची वस्ती फारच जुनी, म्हणजे आज आठ दहा हजार वर्षांवर असल्याचें दिसतें. तेव्हां, हें आर्यावर्त, अथवा भरतखंड, किंवा हिंदुस्थान, केवळ हिंदूंचेंच आहे असें आम्हांला अगदीं सहजीं वाटावें, किंवा अशाविषयीं इतरांची स्वभावतःच कल्पना व्हावी, यांत कांहींच नवल नाहीं.

आमची हिंदुस्थानांतली पुराणवस्ती.

आतां. आम्हां हिंदूंची मुख्य आणि ध्यानांत ठेवण्यासारखी व कायमची निशाणी म्हटली म्हणजे, आमची वर्णव्यवस्था होय. ही अतिपुराण असल्याचें चांगल्या आधारावरून कळून येतें. कारण, ऋग्वेदासारख्या पुराणतम ग्रंथांत देखील ह्या वर्णव्यवस्थेचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

वर्णव्यवस्था हीच हिंदूंची अजरामर निशाणी.

१ भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक दुसरें, पान १६ पहा.

२ " Very high authorities have described Caste as the ' express badge of Hinduism, ' and M. Barth considers that this institution is not merely the symbol of Hinduism, but its stronghold, and a religious actor of the very highest order. "

( Baines' Census Report. 1893 ).

ब्राह्मणोस्य मुखमासीद् बाहू राजन्यः कृतः ।
ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रोऽजायत ॥

( ऋ. अ. ८ मं. १० अ. ७ ).

वर्णव्यवस्थेच्या मुळाचें दिग्दर्शन.

ह्या ऋचेवरून असा अर्थ बोधित होतो कीं, **ब्राह्मण** हे **ब्रह्मदेवाच्या** मुखापासून झाले. क्षत्रिय हे त्याच्या बाहूपासून झाले. वैश्य त्याच्या मांडीपासून झाले. आणि शूद्र हे त्याच्या पायांपासून जन्मले. परंतु वास्तविक पाहिलें तर, ह्याचा खरा इंगितार्थ असा आहे कीं, मुख किंवा शिरःकमल हें आपल्या एकंदर शरीराचें एक अति महत्वाचें अंग असल्याकारणानें, आणि त्या द्वारानेंच पठण, अध्ययन, व मननक्रिया होत असल्यामुळें, सदहू कामें विशेष महत्वाचीं आणि जोखमीचीं समजूनच, तीं **ब्राह्मणांकडे** सोंपलीं. त्यासचप्रमाणें, प्रसंग पडेल तेव्हां शत्रूवर चाल करून संरक्षण व यशसंपादन व्हावें एतदर्थ, बाहुपराक्रमाचें काम क्षत्रियांकडे दिलें. तसेंच, उदरनिर्वाहाचीं साधनें तयार करण्यासाठीं, त्या कामाची सोंप वैश्यांकडे केली. आणि ह्या सर्वांची सेवा कोणी तरी केली पाहिजे, सबब राहिलेल्या चवथ्या वर्गाचें फक्त मानसिक दौर्बल्यच मनांत आणून, हा सेवाधर्म बजाविण्याविषयीं शूद्रांस आज्ञा झाली.

आतां, कोणी असा आक्षेप घेईल कीं, ही सर्व व्यवस्था ब्राह्मणांनीं केवळ आपल्या पोळीवरच तूप ओढण्यासाठीं, किंवा आपलें प्रभुत्व चालविण्याकरितां, अथवा आपली सर्वांवर छाप बसावी एतदर्थ, अगर निव्वळ पक्षपातबुद्धीनेंच, केली होती. परंतु तसें बिलकूल नसून, सदहू समाजव्यवस्था ज्या त्या वर्गाचें तेज, त्याचें सामर्थ्य, व त्याची कार्यक्षमता, इत्यादि गोष्टींवर दूरवर नजर देऊनच अमलांत आणिलेली होती.

वर्णव्यवस्थेचें इंगित.

वर जी पुरुषसूक्तांतली ऋचा लिहिली आहे, त्याशिवाय आणखी एका ऋचेंतही ब्राह्मण आणि क्षत्रिय, यांचा उल्लेख केलेला असल्याचें दृष्टीस पडतें.

दुसऱ्या एके ठिकाणीं पंचजनांचा देखील उल्लेख केलेला आहे.

पंचजन.

**विश्वे देवा अदितिः पंचजनाः ।**

( ऋ. अ. १ अ. ६ व १६ मं. १ अ. १४ सू. ८९ ).

त्यावरून, त्यांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, आणि

---

१ यदिंद्राग्नीमदथःस्वेदुरोणेयद्ब्रह्मणिराजनिवायजत्रा ७

( ऋ. अ. १ अ. ७ व २७. मं. १ अ. १६ सू. १०८ ).

हे इन्द्राग्नीहो, तुह्मी जरी आपल्या घरीं आनंद करीत असला, किंवा ब्राह्मण अथवा राजे यांच्या येथेंही आनंदांत असला, तथापि तिकडून या, आणि हा सिद्ध केलेला सोमरस प्या.

निषाद, यांचा समावेश होत असल्याविषयीं, कांहीं विद्वानांचें म्हणणें आहे.

आर्य ह्मणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र, हे चार वर्ण असून, अनार्यांत कर्महीन किंवा अव्रत लोकांचा समावेश होतो, असें समजावयाचें. ह्या कर्महीन लोकांस आमचे आर्यपूर्वज दस्यु ह्मणत, आणि ते स्वतः धार्मिक वृत्तीचे असल्याकारणानें, आपणांस बर्हिष्मत्, सुन्वत्, देवयु, यज्वन्, ( म्हणजे यज्ञ करणारे, सोम काढणारे, देवांची इच्छा धरणारे, यजन करणारे, ) इत्यादि [२] उपपदें लावून घेत.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र.

ह्या दस्यु किंवा अनार्य लोकांचा आमच्या आर्यपूर्वजांनीं अनेक वेळा पराभव केला असल्याविषयींचीं उदाहरणें, ऋग्वेदांत ठायीं ठायीं दृष्टिगोचर होतात.

दस्यु अथवा अनार्य.

ज्याप्रमाणें, आमच्या आर्यावर्तांत सेवकवर्ग उत्पन्न

१ वेदार्थयत्न, पुस्तक २ रें, अंक १२ वा, मासिक भाग २६ पहा. ( मे १८७८ चा अंक, पान ७२५ ).

२ विजानीह्यार्यान्ये च दस्यवो बर्हिष्मते रंधया शासदव्रतान् ॥ ८ ॥ ( मं. १ अ. १० सू. ५१ ).

हे इन्द्रा, आर्य आणि दस्यु यांत तूं भेद कर आणि कर्महीन दस्यूचें तूं शासन कर.

झाला, (अथवा विशेष उक्त म्हटलें म्हणजे, त्यांच्या स्थितिगतीस अनुसरून तो आम्हींच उत्पन्न केला, असेंही ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.) त्याचप्रमाणें, **पाश्चात्य** देशांत प्राचीनकाळीं जीं मोठमोठीं सुधारलेलीं राष्ट्रें म्हणून उदयास येऊन गेलीं, त्यांच्यांतही अशाच तऱ्हेचा मासला असल्याचें दिसतें. किंबहुना, **आर्यहिंदूंच्या** अतिपुराण **वर्णसंस्थेचें** हें एक अवशिष्टच होय, असेंही ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

प्रौरस्त्यदेशाप्रमाणें पाश्चात्य देशांतील सेवक वर्ग.

जसा आम्हीं **सेवकवर्ग** बनविला, तसा **ग्रीक** आणि **रोमन्** लोकांत देखील होता, व प्रथमारंभीं तर तो अगदीं ज्यारीनें अमलांत असे, अशाविषयींची हकीकत इतिहासप्रसिद्ध आहे.

**ग्रीस** देशांतल्या समाजस्थितीचे एकंदर तीन वर्ग[१] होते. १ **सभ्यलोक**,[२] २ **स्वतंत्रलोक**,[३] आणि ३ **दास**.[४] पहिल्या वर्गांतले लोक श्रीमान्, सुखी, आणि शौर्यादिगुणांनीं मंडित असत. ह्यांतच, स्थूलमानानें, आर्यसमाजाच्या पहिल्या दोन वर्णांचा अंतर्भाव होई, असेंही म्हटल्यास विशेष बाध येईल,

तद्विषयक ग्रीसदेशांतला थोडासा वृत्तांत.

१ Vide History of Greece. By William Smith L. L. D. P. 27. २ Nobles ३ Freemen. ४ Slaves.

असें वाटत नाहीं. असो. दुसऱ्या वर्गांतील लोक केवळ शेतीभातीवरच आपला उदरनिर्वाह चालवीत. तथापि, कारागीर लोक, आणि इतर गुणिजन, व धंदेवाले, यांचाही यांत समावेश होई. आतां, राहिलेला जो तिसरा वर्ग, तो गुलाम किंवा दास यांचा असून, ते इतर वर्गांची नोकरी करीत, व केवळ सेवाधर्मानेंच आपला चरितार्थ चालवीत.

ह्या दोन्ही समाजरचना पाहून, आम्हांस असें खात्रीपूर्वक वाटतें कीं, पौरस्त्यसमाजव्यवस्थेचें पाश्चात्यसमाजघटनेंत, हें एक हुबेहुब प्रतिबिंबच आहे; आणि ही गोष्ट ग्रीक लोकांच्या चालीरीतीवरून चांगली व्यक्त होते.

सेव्यसेवकांचें परस्पर प्रेम.

अस्तु. ग्रीक लोकांमध्यें विक्रमयुगांत[2] जरी दास्यवृत्ती होती तरी, धनी आणि नोकर यांच्यांत परस्पर बराच प्रेमभाव असे, यांत शंका नाहीं. इतकेंच नव्हे तर, हा धनी आपल्या सेवकवर्गास केवळ जनावरांप्रमाणें न वागवितां, तो त्यांच्याशीं चांगलें वर्तन ठेवी, आणि त्यांचें योग्य रीतीनें संगोपन करी. परंतु प्रजाप्रभुत्वकालांत[3], हें सगळेंच पारडें फिरलें, व दासभावाचें पहिलें सोज्ज्वल स्वरूप बदलून जाऊन त्यांची बरीच अवनीत झाली, असेंही म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

१ Vide Vicissitudes of Aryan Civilization By M. M. Kunte. Esqr. B. A. २ Heroic Age ३ Republican age. ४ Vide History of Greece.

इताली देशांतील **रोम**राज्यांतही असाच वर्णभेद केला असल्याचें दृष्टिगोचर होतें. **रोमन्** लोकांनीं आपणांस **पाट्रिशियन** ह्मणून सर्व प्रकारचे पौराधिकार घेतले. आणि **आल्बन्** लोकांस **प्लीबियन्** समजून, त्यांस पौरजनांचे काडीमात्रही हक्क न देतां, उलट **रोमन्** लोकांनीं त्यांजला आपले दास मात्र बनविले.

दासत्वासंबंधीं इताली देशांतली हकीकत.

ह्या **प्लीबियन्** लोकांची स्थिति खरोखरच शोचनीय होती. कारण, **रोमन्** लोक त्यांस अतिक्रूरतेनें वागवीत, व त्यांचा फार छलही करीत. उठतां लाथ, आणि बसतां बुक्की, अशा प्रकारची त्यांची अहर्निशी अवस्था असल्याकारणानें, त्या बिचाऱ्यांना स्वस्थता ह्मणून कोणत्याच प्रकारची बिलकूल नसे.

फार तर काय सांगावें पण, त्या निःसत्व झालेल्या **प्लीबियन्** प्रजेस, धड वस्त्र, व पोटभर अन्न, हीं देखील मिळण्याची मारामारच. व्यवहारांतल्या ज्या कित्येक सवलतीच्या गोष्टी अगदीं सहजीं मिळण्यासारख्या असतात, किंवा जीं उपभोगाचीं साधनें केवळ साधारणतःच उपलब्ध होतात, त्यांजला मुद्धां हे बिचारे अभागी केवळ आंचवलेलेच होते. मग राजकीय हक्क तर त्यांच्या स्वप्नीं देखील नसतील, यांत कांहींच नवल नाहीं!

प्लीबियन लोकांची दीनावस्था.

आपल्या पदरचें खाऊन ते धन्याची नोकरी फुकट

करीत; प्रसंगविशेषीं शिपाईगिरी पण बजावीत; आणि जें पडेल तें काम बिन् तक्रार उठवीत. परंतु इतक्यांचाही कांहींच उपयोग होत नसे. त्यामुळें ते वारंवार आपल्या धन्यांजवळ रडगाणें गात. तथापि, त्याचा काडीमात्र देखील परिणाम न होतां, उपड्या घागरीवर पाणी, याप्रमाणेंच एकंदर सर्वत्र व्यवहार चालला असल्याचें भासे.

रोमन लोकांनीं त्यांचा चालविलेला छल.

ऋणको आणि धनकोचा कायदा इतका कांहीं कडक, किंबहुना अतिक्रूर असे कीं, तो ऐकून किंवा वाचूनही अंगावर शहारे व रोमांच उभे राहतात. प्लीबियन् लोकांस रोमक प्रभूंची निव्वळ पोट बांधूनच नोकरी करावी लागत असल्याकारणानें, त्यांजला वारंवार आपल्या धन्यांकडून, केवळ उदरनिमित्तच कर्ज काढावें लागत असे. आतां, त्यांजला निर्वहाचें अन्य कोणतेंही साधन नसल्याकारणानें, घेतलेल्या कर्जाची फेड नियमित वेळीं होण्याला मोठी मुष्कील पडे; किंबहुना ती होतही नसे. अशा प्रसंगीं, रोमन् धनको हा प्लीबियन् ऋणकोस पकडून त्याचे मनसोक्त हाल करी; त्याला तो केवळ गुलामाप्रमाणें वागवी; आणि त्याला वाटलें तर तो बेलाशक त्यास ठार देखील मारी; व कर्मधर्मसंयोगानें, जर त्या बिचा-

ऱ्यास एकापेक्षां जास्त धनको असले तर, ते त्या हत-भाग्य ऋणकोचे तुकडे तुकडे करून वांटून घेत.

त्यांची बेदाद.

परंतु इतकें होत असे तरी देखील, त्यांची दाद ना फिर्याद. कारण, ज्यांच्याकडे दाद मागावयाची, ते प्रभुवर्गापैकींच असल्यामुळें, **गुळाचाच गणपति, आणि गुळाचाच नैवेद्य,** अशी स्थिति होई. त्या कारणानें त्यांची विटंबना होऊन, त्यांचे हाल कुत्रेंही खात नसे. खरोखर, अशी स्थिति ज्या देशांत आहे, त्याला सुधारलेला म्हणून कोण ह्मणेल?

पौरस्त्य व पाश्चात्य दासत्वाची तुलना.

अशा प्रकारची बेबन्दनगरी आणि झोटिंग पादशाही आमच्या आर्यावर्तांत नव्हती. आतां, आर्यहिंदूंच्या समाजरचनेंत जरी सेवकवर्ग होता तरी, सेवाधर्माच्या पलीकडे त्यांच्यावर कोणत्याही तऱ्हेचा जुलूम नव्हता. यामुळें, **पाश्चात्य** देशांतील दासत्वाची आणि लपंडावाची जिकीर, इकडे कोणाच्याही अनुभवास आली नव्हती.

पाश्चात्यांचीबाहेर बढाई व आंत लढाई.

**आम्हा भारतीयाची वर्णव्यवस्था** अतिप्राचीन काळापासूनची असून, तींत सेव्यसेवकभाव विशेष रीतीनें व्यक्त होतो, ह्मणून कित्येक **पाश्चात्य** हे आमच्यांतलें

---

१ ह्या दुःसह स्थितीचें यथार्थ दिग्दर्शन होण्यासाठीं, मूळ इतिहासांतला समग्र लेख वाचावा.

एक मोठें गौणत्व दाखवितात, आणि अतएव आमचा मनःपूर्वक धिक्कार करितात. इतकेंच नव्हे तर, ते मोठ्या डौलानें व दांभिकपणानें असेंही प्रतिपादन करतात कीं, अशा प्रकारचा भेदाभेद इष्ट नसून **समाजसमताच** वस्तुतः खऱ्या अवश्यकतेची आहे. परंतु "**लोकां सांगे ब्रह्मज्ञान** आणि **आपण कोरडे पाषाण,**" अथवा "**दिव्याखालीं अंधेर,**" अशी ह्यांची नेहमींचीच खरी स्थिति आहे. ह्यांचे दाखविण्याचे दांत एक असून, खाण्याचे दुसरेच असतात. ह्यांचें करणें एक, व बोलणें एक, याप्रमाणें नेहेमींच दृष्टीस पडतें. एकप्रकारें बोलावें, व अन्य प्रकारें चालावें, असें ह्यांच्या नेहेमींच्या व्यवहारावरूनच सहजीं व्यक्त होतें. आणि जेथें आपल्या स्वतःच्या पदरास खार लागत नाहीं, अशा वेळीं मात्र हलवायाच्या घरांतली सर्व मिठाई नैवेद्यार्थ समर्पण करून, परभारें पाहुणचार करण्यास ते कधींही मागें सरत नाहीत. पण, तीच गोष्ट स्वतःवर येऊन बितली कीं, "**उपड्या घागरीवर पाणी,**" या म्हणीप्रमाणें, मागील सर्व प्रतिपादन एके बाजूला राहून, आपण बोललों कसें, आणि करतों काय, ह्याचें त्यांस कांहींच भान राहत नाहीं. आणि म्हणूनच ते केवळ उपहास्यतेस मात्र पात्र होतात.

ह्याचें प्रत्यक्ष उदाहरण पाहणें असल्यास, त्यासाठीं आपणांस फारसें दूर जावयास नलगे. इंग्लंड देशांत जाति-

भेदाचा प्रकार मुळींच नसतांही, केवळ आम्हीं जित व तद्देशीय जते येवढ्याच कारणावरून, हिंदुस्थानांत ते आमचा किती उपमद आणि कशी पायमल्ली करतात, याचा आबालवृद्धांस प्रत्यहींच अनुभव येत आहे. परंतु,

त्याचा हिंदुस्थानांतील माज्ञा.

---

१. भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक पहिलें, पान ७ ते १४ पहा.

आमच्या दयाळू आंग्ल प्रभूंस, अपरिमित गर्वानें, आकाश पाताळ जणूं काय एकच होऊन गेल्यामुळें, आम्ही प्रजाजन ( म्हणजे आखिल **हिन्दी** प्रजा ) त्यांच्या खिजगणतींतच नाहीं, यांत फारसें नवल नाहीं. परंतु, जे आपणांस **राजे** म्हणून म्हणवितात, आणि ज्यांचा अमल ह्या **भरतखंडांत** लक्षावधि प्रजेवर आहे, त्या राजांस देखील ते ( आणि खुद्द **गव्हरनर जनरल** सारख्या अति मोठ्या हुद्यावर असलेले सद्धां ), अगदीं तुच्छवत मानतात इतकेंच नव्हे तर, ते त्यांस पायांतलें खेटर, अथवा आपल्या पायपुसाची निव्वळ धुळच समजतात. एके ठिकाणीं मिस्तर जॉन् ब्राइट् असे म्हणतात कीं,

" Only think of a Governor General of India writing to an Indian Prince, the ruler over many millions of men in the heart of India, '*Remember, you are but as the dust of my feet.*' Passages like these are left out of despatches, when laid on the table of the House of Commons;—It would not do for the Parliament or the Crown, or the people of England to know that their officer addressed language like this to a Native Prince. " P. 24.

( Speeches of Mr. John Bright, M. P. Edited by J. E. T. Rogers 1892 )

सदरहू अवतरणांतील इटालीक वर्ण आमचे आहेत.

ज्या ठिकाणीं हा राजकीय संबंध नाहीं, व जेथें त्याचा काडीमात्र देखील गंध नाहीं, तेथें सुद्धां ते आम्हांस निव्वळ पाण्यांत पाहतात; आणि फक्त आम्हीं त्यांच्या सारखे शुभ्रवर्णाचे नाहीं म्हणून, अथवा प्रखर सूर्यकिरणांनीं आमचीं कातडीं जराशीं कृष्णवर्णाचीं झालीं आहेत येवढ्याच कारणानें, ते आमची मनमानेल तशी निर्भर्त्सना करितात, व पश्वादिकांप्रमाणें आम्हांस आपल्या पायाखालींही तुडवितात! हर! हर! ह्याला म्हणावें तरी काय?

आफ्रिकेंतील मासला.

सांप्रतकाळीं, **आफ्रिका**खंडाच्या दक्षिणेकडील संस्थानांत, **भारतीयां**ची म्हणजे हिंदुस्थानवासी जनांची जी स्थिति झाली आहे, ती सांगतां पुरवत नाहीं! खरोखर, तिचें वर्णन करावयास लागलें म्हणजे सर्व अंगावर रोमांचच उभे राहतात; आणि अत्यन्त उद्वेगानें आपलें मन अगदीं खिन्न होऊन, एकोणीसाव्या शतकांतल्या सुधारलेल्या म्हणून म्हणविणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रांच्या प्रकृतिसौजन्याची धन्यता वाटते!!!

पाश्चात्यवर्णभेदानें, श्रमास मोबदल्याचा वानवा.

**आफ्रिकें**तील दक्षिणेकडील वसाहती भरभराटीस आणण्यास **हिंदुस्थानां**तील काळे लोकच विशेष कारणीभूत झाले असूनही, आतां फायद्याच्या वेळीं मात्र, आम्हीं केवळ **काळे** म्हणूनच आम्हांस आम-

च्या श्रमाचें फळ न घेऊं देतां, आम्हांस अजिबात दूर करण्याचाच तद्देशीयांनां विचार केला आहे. आतां, हा विचार व ही गोष्ट फारच स्तुत्य समजली पाहिजे! कारण, शिपाई म्हणून आम्हींच लढाईंत मरावें. राजनिष्ठ म्हणून आम्हींच जिवावरही उदार व्हावें. भिकारी म्हणून अहर्निशीं आम्हींच परद्वीपांत रावावें. आणि चाकर म्हणून रात्रंदिवस सेवाधर्मांत आम्ही काळ्यांनींच खपावें. तथापि शेवटीं, " **खानेकु हं और लढनेकु मेरा बडा भाई,** " असें होऊन, **चालत्या बैलावर दुष्ट गोणी, आणि कामानंतर लाथा पाणी,** याप्रमाणें आमची अवस्था झाली आहे. आणि ही केवळ आम्ही काळे, आणि आमचे जेते गोरे, म्हणून! आम्ही वर्णानें काळे, यासाठीं आगगाडींत आम्ही पहिल्या वर्गाच्या डब्यांतही बसण्यास योग्य नाहीं! आमचीं चामडीं काळीं, सबब व्यापार करणें तोही आम्हीं परवाना घेऊनच केला पाहिजे! अशीं एक कां दोन उदाहरणें म्हणून सांगूं? फार तर काय सांगावें पण, कित्येक संस्थानांत तर, आम्हांला परवान्याशिवाय जाऊंच देत नाहींत. घरीं आई खाऊं घालीना, आणि बाहेर बाप भिक्षा मागूं देईना! याप्रमाणें आमची जी दीनावस्था झाली आहे, तिची हकीकत लिहितां पुरवत नाहीं. असो. ह्याचें नांव **समाजसमता!** याचेंच

१ ट्रान्सव्हाल, फ्रीऑरेंज, चार्टरल्यांड, वगैरे.

नांव समदृष्टि ! हीच काय ती खरी **वर्णभेदशून्यता !** आणि ह्याचेंच नांव **परोत्कर्षसहिष्णुता !** आणि इतकेंही असून, आम्ही न्यायी; आमच्यांत जातिभेद नाहीं; वर्णभेदाचें बंड आम्हाला आवडत नाहीं; इत्यादि लांबलचक गप्पा मारून, आपली निरर्थक शेखी मिरविण्यांत कित्येक **पाश्चात्यांचें** पाऊल पुढेंच. किंबहुना, आपल्या निष्कारण मोठेपणाची इतस्ततः टिमकी वाजविण्यास, ते मोठ्या ऐटीनें अगदीं एका पायावरच उभे असतात, असेंही म्हणण्यास हरकत नाहीं.

पाश्चात्य पक्षपाताची कमाल.

आतां, कदाचित्, सदरचें लिहिणें कोणाला अतिशयोक्तीचें दिसेल, अथवा तें अलंकारिक वाटेल. परंतु, तसें बिलकुल नसून, त्याबद्दलचा खालीं लिहिलेला लेख, केवळ खात्री होण्यासाठीं वाचकांपुढें सादर करतोंः—

" But the Indian question in the other South African States and Colonies is just as, if not more, *unsatisfactory*. In the Transvaal, Indians are *excluded from the first class carriages of the Railways*. In the Orange Free State, *they have to pay an exceedingly heavy license-fee to be allowed to trade. In both, they cannot enter without a " Pass "* × × × In Charterland, as well as other terri-

tories, *they are not allowed admittance!* ××× Finally, as if *to cap the whole*, there has just been started an *agitation* among the working and artizan classes of Natal, which is spreading every where, *against allowing any* Indians *whatever* — × × × *to enter into* South Africa in *future*, thus *reserving it wholly for the "white man"*—

( South Africa Notes. The Indian question. *T. I.* 7/10/96. )

ह्यांतील इटालीक वर्ण आमचे आहेत.

मनस्येकं वचस्येकम्.

अस्तु. तात्पर्य इतकेंच कीं, सांगणें सोपें परंतु करणें कठीण, म्हणून जी आमच्यांत म्हण आहे, ती अक्षरशः खरी आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

गोरकायांची तरफदारी, व काळ्या कातड्यांचा नाइलाज.

आतां, नेटल वगैरे ठिकाणीं राज्य करणारे इंग्रज असून, तेच हिंदुस्थानावरही आपलें प्रभुत्व चालवितात. आणि ज्याप्रमाणें इकडील मुलखांतली त्यांची प्रजा हिंदी आहे, तशी तिकडीलही आहे. इतकेंच नव्हे. तर, ह्या दोन्ही ठिकाणचे लोक आपणांस इंग्रजांचीच प्रजा म्हणवितात, व तेयथातापरी

त्यांच्याच आश्रयानें राहतात. परंतु, असें असूनही आश्चर्याची गोष्ट ही कीं, वेळ आली म्हणजे आमचे आंग्लप्रभू सुद्धां आम्हां हिंदी प्रजेचा कैवार न घेतां, मोठ्या प्रसंगांत देखील ते आम्हांला सोडून देऊन केवळ बाजूलाच ढकलतात. इतकेंच नव्हें तर, ते आपल्या स्वजातीयांची आणि बंधुवर्गाची अन्यायानें तरफदारी करून, मनांत कांहीं एक किंतु न बाळगितां, न्यायदेवतेस यथेष्ट स्थानभ्रष्ट करतात, आणि तिला कानाकोपऱ्याला मनसोक्त झुगारून देतात.

तत्संबंधीं सरकारी दाखला.

तारीख ४ फब्रुआरी १८९७ च्या मुंबई सरकारी ग्याझिटांत असा मजकूर आहे कीं, हिंदुस्थानांतून नेटलास जाणाऱ्या हिंदी लोकांनीं तिकडे पाऊल ठेविल्यावर, त्या देशांतल्या लोकांच्या मनाचा संक्षोभ होऊन, दंग्याधोप्यापासून त्यांचा बचाव करण्यास अडचण पडेल सबब, ही गोष्ट त्यांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध केली असल्यामुळें, त्यांनीं विशेष लक्षांत ठेवावी.

वर्णभेदाचा पाश्चात्य देशांतला दुःसह परिणाम.

ह्यावरून रंगाला रंग, आणि कातडीला कातडी कशी ओढते, हें सहजीं लक्षांत येऊन, वर्णभेदाचा असा दुःसह परिणाम आमच्या भरतखंडांत केव्हांही उद्भवला नव्हता, असें कोणालाही तेव्हांच कळेल.

हिंदूंचे मुख्य वर्ण, व त्यांचे पोटभेद.

असो. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, हे फक्त आर्यांचे किंवा आम्हां हिंदूंचेच वर्णविभाग झाले. तथापि, ह्या चार वर्णांतही आणखी अनेक पोटभेद आहेत. सबब त्यांचें प्रथमतः विवेचन करून, तदनंतर हिंदूशिवाय पारशी, मुसलमान ख्रिस्ती, इत्यादि ज्या इतर अनेक जाती आहेत, त्यांविषयींची सविस्तर हकीकत देऊं.

ब्राह्मणांचें बुद्धिवैभव.

सर्व वर्णांत ब्राह्मण हे बुद्धीनें तर सर्वतोपरीच श्रेष्ठ असल्याविषयीं, त्यांची अखिल भूमंडलावर कीर्ति आहे. पण बुद्धिप्रभावाप्रमाणेंच बल आणि पराक्रम यांत देखील ते कोणांसही हार जाणारे नाहींत, असें सर्व समजतात. कारण, शूर म्हणून म्हणविणाऱ्या अखिल प्राच्य व पाश्चात्य राष्ट्रांस सुद्धां त्यांनीं दोन हात दाखविले असून, अणीबाणीच्या प्रसंगीं तर त्यांचा त्यांनीं खरपूस समाचार घेतला असल्याचें सर्वांस महशूर आहे.

त्यांची कार्यक्षमता.

प्रसंगविशेषीं, ब्राह्मण हे स्वयमेव सिंहासनारूढ होऊन, स्वतःच सर्व राज्यकारभार चालवितात. कारणपरत्वें, ह्याच सार्वभौमपदावर ते हवें त्याजला बसवितात. जरूर तर ते ह्यांचे मंत्रीही होतात. अवश्यकता असल्यास, ते ह्यांजला हवें त्या प्रकारचें सहाय्य करतात. कारण

पडेल त्यावेळीं, केवळ प्रभुकार्यासाठीं ते एकनिष्ठेनें लढा-याही मारतात. हाडाचीं काडें करून, ते हवें तें काम करण्यास तयार असतात. महत् कार्यासाठीं, ते आपल्या जिवापाड मेहनत करतात. आणि योग्य संधी साधून, शत्रूंस दातीं तृणही धरावयास लावितात.

ब्राह्मण व इतर वर्णांचा मतिप्रकर्ष.

आतां, ब्राह्मणांचा व इतर वर्णांचा मतिप्रकर्ष व वैभव, पौरुष आणि साहस, बुद्धि व तेज, हीं केवळ आजकालचींच नाहींत. तर, तीं अतिप्राचीन कालापासूनच असल्याविषयीं जगजाहीर आहे. सबब त्यासंबंधानें येथें विशेष प्रकारें उल्लेख न करितां, त्याबद्दल त्रयस्थ अशा पाश्चात्यांचाच निरभिमानाचा व प्रांजळ लेख वाचकांपुढें ठेवितों.

"From time immemorial India has been noted for her speculations in metaphysics. * * * The earlier philosophers and metaphysicians were men of the subtlest intellects. And it is to them that Professor Max Muller refers, when he commands them to the attention even of " those who have studied Plato and Kant " But the Hindus were not simply excellent mataphysicians; they were excellent poets, excellent dramatists, and ex-

cellent fable-writers. * * * However, as time went on, this nation that produced the *Upanishads*, and the *Yoga*, and the *Vedanta*, also clothed the world with its wearing stuffs, fed the world with its food stuffs, and supplied it even with the luxuries in the shape of spices and condiments This latter achievement must presuppose a considerable industrial aptitude; and that they had it, is further borne out by the fact, that not only was that marvellous construction of Indraprastha we read of in the Maha Bharat, brought into being by Hindu Engineers, but it was the Hindus who supplied the rest of the world with the elements of Arithmetic, and Algebra, and even Trigonometry, as Doctor Colenso tells us. They also anticipated our Newton in the discovery of the law of gravitation, predicted eclipses, with great accuracy, and explained other celestial phenomena. The trade-guilds which they formed —which, later on, when the environment was changed, developed into the abnoxious caste system—were at first designed to serve

industrial purposes. Its good fruits we could mark in the hereditry manual skill which alone could have achieved the wonders of a Taj Mahal in architecture, or could have produced that Dacca Muslin as a fabric—a whole web being so fine in texture, as to be capable of being passed through a finger-ring !—or could have produced that miniature painting as that of Delhi—that painting on ivory, the subtlety and clearness of which *we do not yet know how to account for*, as the result of mere "unaided handiwork." * * * The system that had produced some of the *finest* warriors in the world—the Rajputs—was a system which had much to commend it." * * *

" Its ( India's ) *vitality* has been every where *acknowledged. The very defiance of decay is its proof.*"

( The Times of India
Dated 11 July 1896 ).

याप्रमाणें, आर्य हिंदूंच्या प्राचीन मतिप्रकर्षाविषयीं वर्णन करून, त्यांच्या आधुनिक कल्पकतेच्या संबंधानें हेंच वर्तमानपत्रकार असें लिहितात कीं,—

" There are already writers in India, whose peculiarly Hindu intellect enables them to wield the English language, as Englishmen themselves would be proud to wield. There have already been Keshav Chandra Sen, and Joru Datt, and Sunbhoo Chander, Mookerjee—a great religious thinker and orator, a great poetess, and a great journalist. There have already been archaeologists like Rajendra Lál Mitra, historians like Romesh Chander Datt, novelists like Bunkim Chander Chatterji, essayists like Ishwara Chandra Vidyá Ságar—all of them men of Europeon standing. In the domain of science however, the Hindu intellect was held to be peculiarly unsuitable. And yet, strange to say, even in the domain of science, the Hindu intellect has already been achieving admirable results. That Lord Kolvin himself should have read with " wonder and admiration " Dr. Bose's researches in physics, and that the Royal Society is going to publish them in their philosophical Transactions, must be admitted as more than a

sufficient testimony to their high merit. Dr. P. C. Ray's researches in chemistry have also found much favour in the scientific circles of Germany. Upto the time that Mr. Telang contributed to the Sacred Books of the East, and as recently as Dr. Bhandarkar was elected a corresponding member of the French Institute, the Hindoo intellect was believed to have achieved results which were thought to essentially belong to its genius. The achievements in science—on the original lines of investigation too—point to a new element in the Hindu intellect, which hitherto has remained unsuspected. Perhaps the suitable environment has now definitely stimulated it *It is, at any rate, undeniable* that the ( Hindu ) race must possess in its brainmaterial, elements to make *scientists* possible—no amount of mere training could achieve that result. . The Hindu intellect is not simply *speculative* and *assimilative*, as it has been *acknowledged to be, but it is inventive too.* It is in fact an intellect whose quality we should have jndged by the tone of its civilization, Hindoo civiliza-

tion has been the most adaptive of ancient civilization—for it has endured till now—and the Hindu intellect is, therefore, perhaps *the most adaptive one in the world*"

( The Times of India. 11 th July 1896 ).

असो. खानपानादि नियमाच्या योगानें, आणि आचार, विचार, व पवित्रता, इत्यादि कारणानें, ब्राह्मणांस सर्व वर्णांत श्रेष्ठ मानिलें आहे. तथापि, क्षत्रियादि इतर वर्णांनीं त्यांच्यासारखें वर्तन व शुचिर्भूतपणा ठेविल्यास, ते देखील त्यांच्या योग्यतेस चढण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. कारण, विश्वामित्रासारखे राजर्षि असूनही ब्रह्मर्षि बनले; आणि वाल्हाकोळ्यासारखे सुद्धां वाल्मीकी ऋषि झाले. ह्यावरून, प्रत्येकाच्या आचरणानुरूप, कालान्तरानें वर्णान्तरही होतें, असें मागील भागांत दाखवल्यावरून सहजीं ध्यानांत येण्यासारखें आहे.

आतां, आह्मां आर्यांचा, किंबहुना अखिल मानवी जातीचा मूळ पुरुष मनु असून, तो तसा असल्याविषयीं ऋग्वेदकालीं देखील ठाम समजूत होती, असें दिसतें.

---

१. भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक २ रें, भाग ११ वा, पान ४९।५० पहा.

२ त्वमग्ने मनवे द्यामवाशयः पुरूरवसे सुकृते सुकृत्तरः ।
श्वात्रेण यत्पित्रोर्मुच्यसे पर्या त्वा पूर्वमनयन्नापरं पुनः ॥४॥
(अ १ अ २ व ३२ मं. १ अ. ७ सू. ३१).

( पुढें चालू. )

कारण; एका ऋचेंत असें ह्मटलें आहे कीं, " हे अग्नि, तूं मनूसाठीं आकाशांतून गर्जना करविता झालास. " तसेंच, दुसऱ्या एके ठिकाणीं आमच्या आर्यऋषींनीं अशी प्रार्थना केली आहे कीं,

मानवी जातीचा मुख्य अथवा मुळ पुरुष, व त्याचा ऋग्वेदांत उल्लेख.

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू )

भावार्थः—हे अग्नि, तूं मनूसाठीं आकाशांतून गर्जना करविलीस. सुकृत्यें करणारा असा जो पुरूरवस, त्याच्यासाठीं तूं विशेष सुकर्मा झालास. तूं आईबापांच्या ( ह्मणजे आकाश, आणि पृथ्वी, यांच्या ) संघर्षणापासून उत्पन्न झालास. आणि तेव्हांच तुझी उपासना करणाऱ्यांनीं तला प्रथम पूर्वेकडील बाजूला आणिलें; आणि तदनंतर त्यांनींच तला पुनश्च पश्चिमेकडे नेलें

**मनुष्वदग्नेअंगिरस्वदंगिरोययातिवत्सदनेपूर्ववच्छुचे ।**

**अच्छयाह्यावहादैव्यंजनमासादयबर्हिषियक्षिचप्रियम् १७**

( ऋ. अ. १ अ. २ व ३५ मं. १ अ. ७ सू. ३१ ).

भावार्थः—हे पवित्र अग्नि व अंगिरा, ज्याप्रमाणें तूं **मनु, अंगिरा, ययाति** व आमचे **पूर्वज**, इत्यादींच्या घरीं येत होतास, त्याचप्रमाणें सर्व देवांस घेऊन तूं आमच्याही घरीं ये. आणि त्यांस दर्भासनीं बसवून हविर्भाग अर्पण कर.

ह्याच ऋचेवरील भाष्यांत, सुप्रसिद्ध टीककार **सायणाचार्य** असें ह्मणतात कीं, " मनुष्वत् = मनुर्नाम मनुष्याणामादि पुरुषस्यसदने यथा आयाः तद्वत्. " ह्यावरून मनुष्यमात्राचा **आदिपुरुष** किंवा मूल जनयिता **मनुच** होता, अशी आम्हा सर्व **भारतीयांची** समज असल्याचें सिद्ध होतें. आमच्या ह्याच **आदिमनूचा आदम** असा अपभ्रंश **भारतेतर** जनांनीं केला, आणि **यहुदी, ख्रिस्ती,** व **मुसलमान,** यांनीं त्यालाच आपला मूळपुरुष बनविला.

" हे अग्नि, तूं ज्याप्रमाणें मनूच्या घरीं येत होतास, त्याचप्रमाणें आमच्याही घरीं ये, व सर्व देवांस प्रिय हविर्भाग अर्पण कर "

असो. ह्या आदिमनूपासूनच अनेक कुटुंबें झालीं असून, त्यांत अंगिरस, नवग्व, भृगु, अथर्वण, अत्रि, विश्वामित्र, काश्यप, वसिष्ठ, आणि अगस्ति, इत्यादि मुख्य व अति प्राचीन होत. तथापि, हीं कुटुंब-परंपरा व तिची संख्या, यासंबंधानें थोडा बहुत मतभेद असल्याचें दिसतें. कारण, आश्वलायन सूत्रांत यांपैकीं फक्त भृगु, अंगिरस (यांत गोतम आणि भारद्वाज गोत्रांचा समावेश होतो), अत्रि, विश्वामित्र, काश्यप, वसिष्ठ, आणि अगस्ति, इतक्याच कुटुंबांचा समावेश केला आहे. आणि कमलाकरभट्टकृत निर्णयसिंधूंत तर, दुसरेही अनेक पोटभेद दिलेले असल्याचें दृष्टिगोचर होतें. आतां, हे दोन्हीही मोठेच प्रमाणग्रंथ आहेत. सबब, त्या दोहोंच्या आधारें उपलब्ध असलेली समग्र माहिती येथें देतों.

आदिमनूपासून झालेलीं कुटुंबें.

### १ काश्यप.

ह्याचे पांच पोटभेद आहेत.

| गोत्र. | प्रवर. |
|---|---|
| १ निध्रुव. | काश्यप. आवत्सार. नैध्रुव. |

२ काश्यप. काश्यप. आवत्सार. असित.
३ शांडिल. काश्यप. शांडिल. आसित. दैवल.
४ रेभ. काश्यप. आवत्सार. रैभ्य.
५ लौगाक्ष्य. काश्यप. आवत्सार. वशिष्ठ.

## २ वशिष्ठ.

ह्याचे पांच पोटभेद आहेत.

१ वशिष्ठ. वशिष्ठ. इन्द्रप्रमदा. आभरद्वसु.
२ कुंडिन. वशिष्ठ. मैत्रावरुण. कौंडिन्य.
३ उपमन्यव. वशिष्ठ. इन्द्रप्रमदा. आभरद्वसु.
४ पराशर. वशिष्ठ. शाक्य. पाराशर्य.
५ जातुकर्ण्य. वशिष्ठ. अत्रि. जातुकर्ण्य.

## ३ अगस्ति.

ह्याचे सहा पोटभेद आहेत.

१ इध्मवाह. आगस्त्य. धार्ध्यच्युत. इध्मवाह, अथवा अगस्ति.
२ सांभवाह. आगस्त्य. धार्ध्यच्युत. सांभवाह.
३ सोमवाह. आगस्त्य. धार्ध्यच्युत. सोमवाह.
४ यज्ञवाह. आगस्त्य. धार्ध्यच्युत. यज्ञवाह.
५ सारवाह. आगस्त्य. धार्ध्यच्युत. सारवाह.
६ दर्भवाह. आगस्त्य. धार्ध्यच्युत. दर्भवाह.

## ४ भृगु.

ह्याचे सात पोटभेद आहेत.

१ जामदग्नि.( वत्स ): भार्गव. च्यावन. आप्नवान. और्व. जामदग्नि.

२ बिड. भार्गव. च्यावन.आप्नवान.और्व. बैड.

३ आर्ष्टिषेण. भार्गव. च्यावन. आप्नवान. आर्ष्टिषेण. अनूप.

४ यस्क. भार्गव. वैतहव्य. सावेतस.

५ मित्रयुव. भार्गव. वाध्र्यश्व. दिवोदास. च्यावन.

६ वैण्य. भार्गव. वैण्य. पार्थ.

७ शुनक. शुनक, अथवा गार्त्समद. भार्गव,किंवा गार्त्समद. शौनहोत्र, अगर भार्गव. गार्त्समद.

## ५ अंगिरस.

ह्यांत १ गौतम, २ भारद्वाज, व ३ केवल आंगिरस, असे तीन पोटभेद असून, त्या सर्वांमिळून एकंदर वीस शाखा आहेत.

### १ गौतम गोत्रांतील शाखा आणि प्रवर.

१ आयास्य. अंगिरस. आयस्य. गौतम.

२ शरद्वन्त. आंगिरस. गौतम. शारद्वन्त.

३ कौमंड. आंगिरस. औतथ्य. काक्षिवत्. गौतम. कौमांड. आयास्य. औशिज.

| | | |
|---|---|---|
| ४ | दीर्घतमस. | आंगिरस. औतथ्य. काक्षिवत्. गौतम. दीर्घतमस. |
| ५ | औशनस. | आंगिरस. गौतम. औशनस. |
| ६ | करेणुपल. | आंगिरस. गौतम. करेणुपाल. |
| ७ | रहूगण. | आंगिरस. रहूगण. गौतम. |
| ८ | सोमराजक. | आंगिरस. सोमराजक. गौतम. |
| ९ | वामदेव. | आंगिरस. वामदेव्य. गौतम. |
| १० | बृहदुक्थ. | आंगिरस. बार्हदुक्थ. गौतम. |

### २ भारद्वाज गोत्रांतील शाखा व प्रवर.

| | | |
|---|---|---|
| ११ | भारद्वाज. | आंगिरस. बार्हस्पत्य. भारद्वाज. |
| १२ | गर्ग. | आंगिरस. बार्हस्पत्य. भारद्वाज. सैत्य. गार्ग्य. |
| १३ | ऋक्ष. | आंगिरस. बार्हस्पत्य. भारद्वाज. वांदन. मातवचस. |
| १४ | कपय. | आंगिरस. महीयव. रक्षयस. |

### ३ केवल आंगिरस गोत्रांतील शाखा आणि प्रवर.

| | | |
|---|---|---|
| १५ | हरित. | आंगिरस. आंबरीष. यौवनाश्व. |
| १६ | कुत्स. | आंगिरस. मांधात्रि. कौत्स. |
| १७ | कण्व. | आंगिरस. अजमीध. काण्व. |
| १८ | रथीतर. | आंगिरस. वैरूप. राथीतर. |
| १९ | मुद्गल. | आंगिरस. भार्म्य. अश्वमौद्गल्य. |
| २० | विष्णुवृध. | आंगिरस. पौरुकुत्स. त्रासदस्यव. |

## ६ अत्रि.

ह्याचे पांच पोटभेद आहेत.

| | |
|---|---|
| १ अत्रेय. | आत्रेय. अर्चनानश. स्यावाश्व. |
| २ वाद्भुतक. | आत्रेय. अर्चनानश. वाद्भुतक. |
| ३ गविष्ठिर. | आत्रेय. अर्चनानश. गविष्ठिर. |
| ४ मुद्गल. | आत्रेय. अर्चनानश. पौर्वाथिथ. |
| ५ धनंजय. | आत्रेय. अर्चनानश. धानंजय. |

## ७ विश्वामित्र.

ह्याचे दहा पोटभेद आहेत.

| | |
|---|---|
| १ कुशिक. | वैश्वामित्र. देवरात. उदल. |
| २ लौहित. | वैश्वामित्र. अष्टक. लौहित. |
| ३ रौक्षक. | वैश्वामित्र. गाथिन. रैवण. |
| ४ कामकायन. | वैश्वामित्र. देवश्रवस. दैवतरस. |
| ५ कताह. | वैश्वामित्र. कात्यात्कल. |
| ६ धनंजय. | वैश्वामित्र. माधुच्छन्दस. धानंजय |
| ७ अघमर्षण. | वैश्वामित्र. अघमर्षण. कौशिक. |
| ८ पूरण. | वैश्वामित्र पौरण. देवरात. पूरण. |
| ९ इन्द्रकौशिक. | वैश्वामित्र. इन्द्रकौशिक. |
| १० अज | वैश्वामित्र. माधुच्छन्दस. अज. अश्मरथ. वाधूल. |

*विशिष्ट प्रजोत्पत्तीचें तत्व, व गोत्रजांशीं संबंधाभाव.*

**ब्राह्मणांत** एकाच **गोत्रांतल्या,** किंवा **प्रवरांतल्या,** अथवा सपिंडांतल्या बंधुवर्गाबरोबर, केव्हांही शरीरसंबंध म्हणून होतच नाहीं. आणि तसा करणें देखील आम्ही कोणीही इष्टच मानीत नाहीं. कारण, तो केल्यानें, **विशिष्टप्रजोत्पत्ती**च्या तत्वाला खरोखरीच धक्का पोहों-चतो; व भावी प्रजेच्या वाढीस किंवा बीजास, आणि अवश्य त्या जोमास अथवा हरएक प्रकारच्या उन्नतीस, सर्व तऱ्हेनें गौणत्व येतें. इतकेंच नव्हे तर, कालांतरानें अशा भेळसेळीनें उत्कृष्ट बीजाचीही हानि होते.

आतां, **विशिष्टप्रजोत्पत्ती**चें हें तत्व तें कोणतें, व तत्संबंधीं विशेष काळजी घेणें किती महत्वाचें आहे, याबद्दल ह्या भागाच्या शेवटीं योग्यस्थळीं तपशीलवार विवेचन केलें आहे, त्यावरून एकंदर प्रकार सहजीं ध्यानांत येईल सबब, त्याबद्दलचें जास्त विवेचन येथें न करतां, पुढील विषयाकडे एकदम वळतों.

*ब्राह्मण जातीचा भूगोल विषयक विभाग.*

**भरतखंडांतील** जाति वैचित्र्यांत, **ब्राह्मण** वर्णाचा विभाग भूगोलविषयक आहे. म्हणजे तो पृथक् पृथक् प्रांतांस अनुसरून आहे; असें म्हणण्यास हरकत नाहीं. उदाहरणार्थ, **विंध्याचल** हा विवक्षित प्रदेश समजून, त्याच्या उत्तरेकडील राहणाऱ्या **ब्राह्मणांस पंचगौड**

अशी संज्ञा दिली; आणि त्याच्याच दक्षिणेकडील ब्राह्मणांस पंचद्राविड असें म्हणूं लागले. हे पंचगौड व पंचद्राविड ब्राह्मण खालीं लिहिल्याप्रमाणें होत.

> महाराष्ट्रान्ध्र द्राविडाः कर्णाटाश्चैव गुर्जराः ।
> द्राविडाः पंचच प्रोक्ता विंध्य-दक्षिण-वासिनः ॥
> सारस्वताः कान्यकुब्जा गौडोत्कलाश्चमैथिला ।
> गौडाः पंचविधाः प्रोक्ता विंध्यादुत्तरवासिनः ॥

पंचगौड.

१ सारस्वत, २ कान्यकुब्ज, ३ गौड, ४ उत्कल आणि ५ मैथिल, असे विंध्याद्रीच्या उत्तरेकडील पंचगौड होत; व हीं नांवें ज्या त्या प्रांतांची द्योतक आहेत, असें समजावयाचें.

१ सारस्वत म्हणजे, वायव्येकडील सरस्वती नदीच्या आसपासचा प्रदेश होय. हिचा उल्लेख ऋग्वेदांत (पांचव्या अष्टकांत) केला असून, ती ठाणेश्वरा (स्थानेश्वरा) नजीकच आहे. तथापि, ती पुढें राजस्थानच्या वालुकामय प्रदेशांत अन्तर्धान पावल्याचें सांगतात.

२ कान्यकुब्ज हा कनोज प्रांत समजावयाचा.

३ गौड हें नामधेय त्या नांवाच्या देशावरूनच पडलेलें असून, हा खालच्या गंगा नदीच्या तीरावरील प्रांत होय. ह्याची व्याख्या खालीं लिहिल्याप्रमाणें दिलेली आढळते.

वंगदेशंसमारभ्य भुवनेशांतगःशिवे ।
गौडदेशः समाख्यातः सर्वविद्याविशारदः ॥

४ उत्कल म्हणजे प्राचीनचा ओड्रदेश, किंवा सांप्रतचा ओरिसा प्रांत होय; व हा जगन्नाथाच्या आसपासच असल्याविषयीं एके ठिकाणीं वर्णन आहे.

"जगन्नाथ प्रांतदेश उत्कलः परिकीर्तितः ॥"

५ आणि मैथिल हे मिथिल देशांतले राहणारे होत.

याप्रमाणें, पंचगौडांच्या संबंधानें थोडेसें दिग्दर्शन झालें. सबब, आतां पंचद्राविडाविषयींची सर्वसाधारण हकीकत देऊन, तदनंतर त्या सर्वांचें तपशीलवार विवेचन करूं.

पंचद्राविड.

१ महाराष्ट्र (किंवा मराठे) हे महाराष्ट्र देशांतील असून, ते मराठी भाषा बोलतात;

२ गुर्जर हे गुजराथ प्रांतांतले होत;

३ कर्णाट म्हणजे कर्नाटक देशांतले कानडी भाषा बोलणारे समजावयाचे;

४ द्राविड हे द्राविड देशांतले असून, ते तामिल भाषा बोलतात; आणि

५ आन्ध्र अथवा तैलंग हे तैलंगण देशांतले तेलगू भाषा बोलणारे होत.

पंचगौड आणि पंच द्राविड, यांत अंतर.

सदरहू विवेचनावरून, वांचकांच्या लक्षांत साधारणपणें इतकें सहजीं येऊन चुकेल कीं, स्थूलमानानें, भारतखंडाचे विंध्या-

चत्राच्या योगानें दोन विभाग झालेले आहेत. ह्यांपैकीं, उत्तरेकडील भागांत, किंवा उत्तर हिंदुस्थानांत, पंचगौड असल्याचें दिसतें; आणि दक्षिणार्ध अथवा दक्षिण हिंदुस्थान, हें पंचद्राविडांनीं व्याप्त झाल्याचें भासमान होतें. ह्याशिवाय, पंच गौड व पंचद्राविड यांच्यासंबंधानें, आणखीही दुसरी एक महत्वाची गोष्ट विशेष रीतीनें ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, विंध्याद्रीच्या उत्तरेस एकंदर वर्णाश्रम धर्माचें जरी भरपूर अवलंबन आहे, तरी तेथें फारसा आचार विचार नाहीं. किंबहुना तेथें त्याचा वानवाच आहे, असें ही म्हटल्यास विशेष बाध येईलसें वाटत नाहीं. परंतु विंध्यपर्वताच्या दक्षिणेस तसें नाहीं. येथें वर्णाश्रमाचें बळकटतर बंधन असूनही, शिवाय आचारविचाराकडेसुद्धां ज्यास्त लक्ष्य पुरविलें असल्याचें दिसतें.

यासंबंधानें, आमची जशी सांप्रतकाळीं समजूत आहे, तशीच पूर्वीं देखील होती, असें वाटतें.

तद्भिन्न प्राचीन व अर्वाचीन समज.

कारण, तद्विषयक आधार प्राचीन स्मृतींतही उपलब्ध होत असल्याचें खालीं लिहिलेल्या आधारावरून चांगलें व्यक्त होतें.

संप्राप्ते तु कलौकाले विंध्याद्रेरुत्तरे स्थिताः ।
ब्राह्मणा यज्ञरहिता ज्योतिःशास्त्र पराङ्मुखाः ॥

( व्यास. )

विन्ध्यस्य दक्षिणे भागे यत्र गोदावरी स्थिता ।
तत्र वेदाश्च यज्ञाश्च भविष्यन्ति कलौ युगे ॥

( धर्मशास्त्र. )

पंचगौड, व पंच द्राविड, यांत आचार-विचाराच्या संबंधानें फेरफारहोण्याचें कारण.

आतां, याबद्दलच्या कारणांचा विचार केला तर, आपल्याला असें कळून येईल कीं, **उत्तरहिंदुस्थान** हें परकीयांच्या मार्गांत असल्याकारणानें, ही उदीचीन क्षिति कांहीं कालपर्यंत केवळ **मृगयाभूमिच** बनून राहिली होती. त्यामुळें, येथें अनेक प्रकारच्या विदेशीयांनीं भिन्नभिन्न काळीं पृथक् पृथक् स्वाऱ्या करून, ह्या प्रांतांतल्या लोकांस अगदीं संत्रस्त करून सोडिलें. तेणेंकरून, एकंदर समाजस्थितींत बरीच गडबड उडून, तिची पहिली घडी अजिबात मोडली; आणि तिच्या सर्वसाधारण व्यवस्थेंतही कालान्तरानें फेरबदल झाला.

असो. येथपर्यंत, **पंचगौड** व **पंचद्रविड** मिळून **ब्राह्मणांच्या** एकंदर दहा शाखा सदरीं लिहिल्याप्रमाणें देऊन, तत्संबंधीं फक्त स्थूलविचार मात्र सांगितला. सबब, आतां तद्विषयक सूक्ष्मविचाराकडे आपण जरासे वळूं, आणि त्या प्रत्येक शाखेचें तपशीलवार विवेचन करूं.

## सारस्वत ब्राह्मण.

**सारस्वत** हें नामधेय **सरस्वती** नदीवरून पडलें

असून, ही सरित् वायव्येकडील प्रांतांत आहे. हिलाच कोणी सगर[1] म्हणतात. कोणी हिचा प्रवाह[2] शिवालिक पाहाडांतून निघून, हांसी आणि हिसार परगण्यांतून भातनेर शहराजवळून जातो, असें समजतात. आणि कित्येक[3] तर ठाणेश्वर ( स्थानेश्वर ) नांवाच्या पुराण प्रसिद्ध स्थलानजीक असलेलीच ही नदी मानतात. ऋग्वेदांत[4] हिच्या नांवाचा उल्लेख केलेला आढळतो. त्याचप्रमाणें, महाभारतांत[5] देखील ही नदी वालुकामय प्रदेशांत अन्तर्धान पावली असल्याविषयीं वर्णन आहे[6]. ही गडप होण्याचें कारण असें सांगतात कीं, निषाद वगैरे ज्या रानटी लोकांची वस्ती नजीक आसपास होती, तिला कंटाळून अथवा त्यांची अपवित्रता असह्य होऊन, ती तेथल्या तेथेंच नाहींशी झाली.

सारस्वत असें नांव पडण्याचें कारण.

असो. ह्याच नदीच्या कांठाकांठानें सारस्वत ब्राह्मणांची विशेषेंकरून वस्ती असून, शिवाय ते पंचनद प्रदेशांत, म्हणजे पंजाबांत, आणि सिंध, राजपु-

सारस्वत ब्राह्मणांची वस्ती, व त्यांचा मुख्य वसति-प्रदेश.

---

१ प्रोफेसर विल्सननें छापलेलें विष्णु पुराण, पान १८१. २ टॉडकृत राजस्थानचा इतिहास, भाग दुसरा, पान २९५. ३ जॉन विल्सनकृत भरतखंडांतील जातिविभाग. ४ अष्टक पांचवें. ५ महाभारत. ३, ( ५०७४।१०५३८ ). ६ राजपुतान्याच्या उत्तरेकडे जो वाळवंटी प्रदेश आहे, त्यांत हिचा प्रवाह मुरला असावा, असें वाटतें.

ताना, गुजराथ, वायव्यप्रांत, व दक्षिण हिंदुस्थान, येथेंही असल्याचें दृष्टीस पडतें. तथापि, त्यांची वस्ती पंजाब आणि नजीकचा आसपासचा प्रदेश, यांतच मुख्यत्वेंकरून आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सारस्वत ब्राम्हणांत चार पोटभेद.

सारस्वत ब्राम्हणांत एकंदर चार वर्ग आहेत. परंतु हे सर्व पंजाब प्रांतासच अनुलक्षून असल्याचें दिसतें. कारण, ते केवळ तद्देशीय असून, ज्या त्या भागापुरतेंच अंशतः पृथक् पृथक् झाल्याचें सहजीं अनुमान होतें. हे जातिभेद खालीं लिहिल्याप्रमाणें तपशीलवार येथें देतों.

## १ पहिला वर्ग.

पहिला वर्ग, व त्याचे पोटभेद.

ह्या वर्गांतले सारस्वत ब्राह्मण, लाहोर, अमृतसर, बटाला, गुरुदासपूर, जालंदर, मुलतान, जंग, आणि शाहपूर, या परगण्यांतले आहेत. तथापि, यांत देखील उच्च व नीच असे दोन पोटभेद असून, शिवाय क्वचित् ठिकाणीं मध्यम वर्गही मानला जातो.

### उच्चमत,

| | | |
|---|---|---|
| १ नवले. | ६ तिखे. | ११ तिखे-आण्डे. |
| २ चुनी. | ७ झिंगन. | १२ झिंगन-पिंगन. |
| ३ रावडे. | ८ कुमडीये. | १३ जेटली पेटली. |
| ४ सनोडिये. | ९ जेटले. [मोले. | १४ कुमडीये-लुमडीये. |
| ५ पांडेत. | १० मोहले, किंवा | |

१५ मोहले-बोहले.
१६ नागे.
१७ कपूरीये.
१८ भटूरीये.
१९ मालीये.
२० कालीये.
२१ सान्द.
२२ पाठक.
२३ कुरल.
२४ भारद्वाजी.
२५ जोशी.
२६ शोरी.
२७ तिवाडी.
२८ मल्ड.
२९ दत्त.
३० मुझाल.
३१ वाली.
३२ मोहन
३३ लव.
३४ वैद्य.
३५ प्रभाकर.
३६ शामे-पोत्रे.
३७ भोज-पोत्रे.
३८ सिंधे-पोत्रे.
३९ छिब्बर.
४० वट्टे-पोते.
४१ धन्नन-पोते.
४२ दुवडे.
४३ गैन्धर.
४४ तखत-ललंडी.
४५ शामदासी.
४६ सेतपाल, अथवा शेतपाल.
४७ पुश्रत.
४८ भारद्वाजी.
४९ काटपाले.
५० घोटके.
५१ पुकर्गे.

कनिष्ठमत.

५२ तिक्की.
५३ श्रीवर.
५४ विनायक.
५५ मज्जू.
५६ झिंदरीये.
५७ हरड.
५८ प्रभाकर.
५९ वासुदेव.
६० पराशर.
६१ मोहन.
६२ पंजन.
६३ तिव्वार.
६४ कपाल.
६५ भारखरी.
६६ सोधी.
६७ कैजर.
६८ सनगड.
६९ भारद्वाजी.
७० नागे.
७१ मकावर.
७२ वशिष्ठ.
७३ दंगवल.
७४ जालप.
७५ त्रिपागे.

| | | |
|---|---|---|
| ७६ मारथे. | ९७ पुंज. | ११८ कुसरीत. |
| ७७ हांतले. | ९८ संघी. | ११९ रमताल. |
| ७८ गंगाहर. | ९९ होये. | १२० कपाले. |
| ७९ ज्योतिषी. | १०० विरड. | १२१ मसोदरे. |
| ८० रिखी, किंवा ऋषी. | १०१ कलंद्र. | १२२ रतनीये. |
| | १०२ सूरन. | १२३ चंदन. |
| ८१ मंदार. | १०३ सूदन. | १२४ चुरावण. |
| ८२ ब्रह्मी. | १०४ ओझे. | १२५ मंदहर. |
| ८३ तेजपाल. | १०५ ब्रह्ममुकल. | १२६ मंधरे. |
| ८४ पाल. | १०६ हरीये. | १२७ ऐरे. |
| ८५ रुपाल. | १०७ गजेमु. | १२८ लकरफार. |
| ८६ लखनपाल. | १०८ भगोत. | १२९ कण्ड. |
| ८७ रतनपाल. | १०९ तिनूनी. | १३० कर्दम. |
| ८८ शतपाल. | ११० जह्नी. | १३१ धंदे. |
| ८९ भिंडे. | १११ जांलप. | १३२ सहजपाल. |
| ९० घमी. | ११२ तोले. | १३३ पमी. |
| ९१ चनन. | ११३ चिच्चोड. | १३४ राति. |
| ९२ रणदेह. | ११४ पाध्दे, अथवा पांडे. | १३५ जैत्के. |
| ९३ भूत. | | १३६ द्विद्रीये. |
| ९४ राति. | ११५ मरूड. | १३७ भटार. |
| ९५ कुंडि. | ११६ ललडीये. | १३८ कालि. |
| ९६ हसधीर. | ११७ तोटे. | १३९ जालपोत. |

१४० मैत्र.
१४१ संखेत्र.
१४२ लुद्र.
१४३ व्यास.
१४४ पलु.
१४५ किरार.
१४६ पूने.
१४७ इसर.
१४८ लट्टू.
१४९ घामी.
१५० कल्हण.
१५१ मदरखंब.
१५२ दाबेसर.
१५३ शालिवाहन.
१५४ घांडे.
१५५ मरुड.
१५६ बतूरे.
१५७ जोती.
१५८ सोयरी.
१५९ तेजपाल.
१६० कुरालपाल.
१६१ कळस
१६२ जलन.
१६३ तीननगी.
१६४ तंगनिवडे.
१६५ जालपोत.
१६६ पतु.
१६७ जसरव.
१६८ जयचंद्र.
१६९ सगवळ.
१७० अग्रकक्ष.
१७१ अग्निहोत्री.
१७२ रुडडे.
१७३ भाजो.
१७४ कुकछी.
१७५ सैजो.
१७६ भंबी.
१७७ मेदु.
१७८ गेहड.
१७९ यग्गे.
१८० संगर.
१८१ सांग
१८२ नाहर.
१८३ घाकपालीये
१८४ त्रिनराय.
१८५ नारद.
१८६ कुम्पाळ.
१८७ कोटपाळ.
१८८ नाद.
१८९ नाम.
१९० परंजे.
१९१ खेटी.
१९२ औरी.
१९३ चछोहे.
१९४ बिवडे.
१९५ बंदू.
१९६ मचळ.
१९७ सुंदर.
१९८ कारडगे.
१९९ चिळवे.
२०० सद्दी.
२०१ तडुग.
२०२ कर्दम.
२०३ झगान.
२०४ रांगडे.
२०५ भोग.

| | | |
|---|---|---|
| २०६ पंडे. | २१२ दगाले. | २१८ महे. |
| २०७ गंडे. | २१३ लाहड. | २१९ सैली. |
| २०८ पंटे. | २१४ टाद. | २२० भागी. |
| २०९ गांधे. | २१५ कायी. | २२१ पांडे. |
| २१० धिंडे. | २१६ लुध. | २२२ पिपर. |
| २११ तगाले. | २१७ गांद्र. | २२३ जठरे. |

## २ दुसरा वर्ग.

दुसरा वर्ग व त्याचे पोटभेद.

ह्यांत कांगडा, आणि तत्सन्निध असलेला डोंगराऊ प्रदेश, या ठिकाणीं राहणाऱ्या सारस्वत ब्राम्हणांचा समावेश होत असून, त्यांचे खालीं लिहिल्याप्रमाणें पोटभेद आहेत.

### उच्च प्रत.

| | | |
|---|---|---|
| १ ओसदी. | ५ नाग. | ९ पंचकर्ण. |
| २ पंडित(काश्मीरी). | ६ दीक्षित. | १० राइणे. |
| ३ सोती. | ७ मिश्रीकाश्मीरी | ११ कुरुड्डु. |
| ४ वेद्वे. | ८ मदिहातु. | १२ आचारीये. |

### कनिष्ठ प्रत.

| | | |
|---|---|---|
| १३ चिथु. | १६ डेहैडु. | १९ गुत्रे. |
| १४ पन्यालु. | १७ रुखे. | २० द्याभुंडु. |
| १५ डुंबू. | १८ पंब्बर. | २१ मैते. |

२२ प्रोत, अथवा पुरोहित किंवा जत्तोत्रोतिये.
२३ विष्टप्रोत.
२४ पाद्धेसरोज.
२५ पाद्धे खजुरे.
२६ पाद्धे माहिते.
२७ खजुरे,
२८ च्छुतवन.
२९ भनवाल.
३० रैने.
३१ मग्नुडीये.
३२ खुरवध.
३३ गलवध.
३४ डांगमार.
३५ चलिवाले.

## ३ तिसरा वर्ग.

तिसरा वर्ग, व त्याचे पोटभेद.

ह्यांत दत्तापूर, होशयारपूर, आणि दुसरा आसपासचा प्रदेश, येथील **सारस्वत ब्राम्हणांचा** समावेश होतो.

### उच्च प्रत.

१ दोग्रे.
२ सरमायी.
३ दुत्रे.
४ लखनपाल.
५ पाद्धे-धोलत्र-लवैये.
६ पाद्धे-धोहसनीये.
७ पाद्धे दर्दीये.
८ पाद्धे-खिद-डीये.
९ खजूरीये.

### कनिष्टप्रत.

१० कपाहतीये.
११ भरधीयाल.
१२ चप्रोहीये.
१३ मकडे.
१४ कुतल्हेडीये.
१५ सारद.
१६ दगडू.
१७ वंतडे.
१८ मुत्रले.
१९ समणोल.
२० धोसे.
२१ भटोल.
२२ रजहोड.
२३ थनीक.
२४ पन्याल.
२५ चिढ्वे.
२६ मडोते.
२७ मिसर.

| | | |
|---|---|---|
| २८ च्छकोतर. | ३८ गडोत्तरे. | ४८ भडोए. |
| २९ जलेरइये. | ३९ चिरणोळ. | ४९ टान्दी. |
| ३० लाहद. | ४० वादले. | ५० मुम्मुतियार. |
| ३१ सेल. | ४१ अधिर. | ५१ आल. |
| ३२ भसूल. | ४२ पटडू. | ५२ मिरत. |
| ३३ पंडित. | ४३ झुगल. | ५३ मुकाती. |
| ३४ चंधिअल. | ४४ मैते. | ५४ दलोहलीहा. |
| ३५ लठ. | ४५ काकरीये. | ५५ भनोचये. |
| ३६ संड. | ४६ टाक. | ५६ त्याहाये. |
| ३७ लई. | ४७ झोल. | ५७ भतरे. |

## ४ चवथा वर्ग.

चवथा वर्ग, व त्याचे पोटभेद.

ह्यांत जम्मू, जसरोट, व जवळ आसपासचा पाहाडी प्रदेश, यांतील **सारस्वत ब्राम्हणांचा** अन्तर्भाव होतो.

### उच्चवृत.

| | | |
|---|---|---|
| १ अमगोत्रे | ६ केसर. | ११ लत. |
| २ थप्पे. | ७ नाथ. | १२ लव. |
| ३ दुवे. | ८ खजूरे प्रहोत. | १३ चिबर. |
| ४ सपोलीये पाद्धे. | ९ जमवल-पंडित. | १४ बलीये. |
| ५ बदीयाल. | १० वैद्य. | १५ मोहन. |
| | | १६ बंमबल. |

## मध्यम मत.

| | | |
|---|---|---|
| १७ रेगै. | २४ पंढोत्रे. | ३२ पुरोच. |
| १८ सटोत्रे. | २५ त्रिरङ्गनोव. | ३३ अत्रोत्रे. |
| १९ कटोत्रे. | २६ बट्टू. | ३४ मिश्र. |
| २० ललोत्रे. | २७ केरगाये पंडित | ३५ पराशर. |
| २१ रुंवोत्रे. | २८ बनल पाद्धे. | ३६ बवगोत्रे. |
| २२ समनोत्रे. | २९ महिते. | ३७ मनतोत्रे. |
| २३ काश्मीरी -पं-डीत. | ३० मुत्रलीये. | ३८ मुद्राधिये. |
| | ३१ भतियाड. | |

## कनिष्टमत.

| | | |
|---|---|---|
| ३८ मुडन. | ५१ मुंडे. | ६३ कलान्दरी. |
| ३९ सुवे. | ५२ सरनवाल. | ६४ जराड. |
| ४० भुरे. | ५३ लाडगजन. | ६५ उडिहल. |
| ४२ चन्दन. | ५४ जत्रोत्रे. | ६६ घोडे. |
| ४३ जलोत्रे. | ५५ लखनपाल. | ६७ बसनोत्रे. |
| ४४ नभोत्रे. | ५६ गोड.पुरोहित. | ६८ बरात. |
| ४५ खडोत्रे. | ५७ शशगोत्रे. | ६९ चरगाट. |
| ४६ सगडोल. | ५८ खगोत्रे. | ७० लत्रंठे. |
| ४७ भूरीये. | ५९ गरोच. | ७१ भरंगोल. |
| ४८ बगनाच्छाल. | ६० मरोत्रे. | ७२ जरंघाल. |
| ४९ रजूलीये. | ६१ उगाद्धे. | ७३ गुहलीये. |
| ५० सांगडे. | ६२ खिडाईये-पाद्धे | ७४ घरीओच. |

७५ पिंधाड.
७६ रजूनीये.
७७ बडकूलीये.
७८ सिरखंडीये.
७९ तिरपाड.
८० बाह्ली.
८१ सलून.
८२ रतनपाल.
८३ बनोत्रे.
८४ यंत्रधारी.
८५ डडोरिच.
८६ भलोच.
८७ छछिआले.
८८ झंगोत्रे.
८९ मगडोल.
९० फौनफण.
९१ सरोच.
९२ गुड्डे.
९३ किर्ले.
९४ मनसोत्रे.
९५ थमनोत्रे.
९६ थन्मथ.
९७ ब्रमीये.
९८ कुन्दन.
९९ गोकुलीये-गोसाई.
१०० चकोत्रे.
१०१ बरगोत्रे.
१०२ धमानीये.
१०३ कवडे.
१०४ मगदीयलीये.
१०५ माथर.
१०६ महिजीये.
१०७ थकुरे-पुरोहित.
१०८ गलहल.
१०९ त्रम.
११० रोद्.
१११ लभोत्रे.
११२ रेडाथीये.
११३ पतल.
११४ कमनीये.
११५ गंधरगाल.
११६ पृथ्वीपाल.
११७ मधोत्रे.
११८ कंत्रो.
११९ सरमाथी.
१२० बच्छल.
१२१ मखोत्रे.
१२२ जड.
१२३ बटियालीये.
१२४ कुडिदब.
१२५ जंबे.
१२६ करनाथिये.
१२७ सुथाडे.
१२८ सिगाड.
१२९ गराडीये.
१३० मच्छर.
१३१ बघोत्रे.
१३२ सैनहसन.
१३३ उत्रीयाल.
१३४ सुहन्दीये.
१३५ झिंधाड.
१३६ बट्टल.
१३७ भैंखरे.
१३८ बिसगोत्रे.

| | | |
|---|---|---|
| १३९ झलु. | १४५ जखोत्रे. | १५१ बंडो. |
| १४० दुब्ब. | १४६ पंगे. | १५२ कानुंगो. |
| १४१ भूत. | १४७ सोल्हे. | १५३ झावडु. |
| १४२ कठियालु. | १४८ सागुणिये. | १५४ झाफाडु. |
| १४३ बुधार. | १४९ सणहोच. | १५५ कलीये. |
| १४४ पलाढु. | १५० दुहाल. | १५६ खफणखो. [1] |

प्रभाकर नांवाचे शूर आणि पराक्रमी ब्राह्मण.

सदरहू पोटभेदांपैकीं **प्रभाकर**[2] नांवाच्या जातिवर्गांतील **सारस्वत ब्राह्मणांची** गणना चांगल्या श्रेष्ठ अशा लढवय्ये योद्ध्यांतच होत असे. त्यामुळें, त्यांजला भिक्षुकवर्गांतल्या ब्राह्मणांप्रमाणें धर्मादाय नेमणुका असल्याचें दिसत नाहीं. तथापि, त्यांच्या पराक्रमशीलतेमुळें, **मुसलमानी** राज्यांत त्यांजला "**खान**" असा किताब मिळत असल्याविषयीं इतिहासावरून स्पष्ट दिसून येतें.

बाराजातींच्या ब्राह्मणांचें कथानक.

दुसऱ्या[3] वर्गातील **सारस्वत ब्राह्मणांचे** जे सदरीं बारा पोटभेद दाखविले आहेत, त्यासंबंधाचें असें एक कथानक आहे कीं, **संसारचंद** नामक राजाचा

१ सदरहू पोटभेदांसंबंधीं माहिती, डाक्तर जॉन विल्सन्‌कृत "हिंदुस्थानांतील जाती" नामक पुस्तकांतून, मी फार कृतज्ञतापूर्वक घेतली आहे. ग्रंथकर्ता.

२ पहिल्या वर्गातील पोटभेदांपैकीं, शेज ३५ पहा. (पान ४२)

३ पान ४५ पहा. भारतीय साम्राज्य, उत्तरार्ध पुस्तक आठवें.

कोणी एक पुराण पूर्वज राज्य करीत असतां, त्याचें आणि त्याच्या राज्यांतील ब्राह्मणांचें एकाएकीं वितुष्ट पडून, त्यांचें आपापसांतील वैमनस्य वाढत चाललें. त्यावेळीं, त्यांची खोड मोडावी ह्मणून, राजानें सदरहू बाराजातीच्या ब्राह्मणवर्गास मोठें आश्वासन दिलें, आणि आपल्या राज्यांत येऊन कायमची वस्ती करण्यास त्यांस सांगितलें. इतकेंच नव्हे तर, त्यानें त्यांचा मोठा मानमरातबही राखला. त्यामुळें, ते अर्थातूच चढले; आणि तेव्हांपासून आपणांस श्रेष्ठ मानून, ते स्वतः अन्य ब्राह्मणांच्या हातचेंही खातनासे झाले.

त्यांचा परस्पर रोटीव्यवहार.

सदरहू पोटभेदांवरून, आणि त्या प्रांतांतल्या मिळालेल्या सर्वसाधारण माहितीवरून, असें खात्रीपूर्वक अनुमान होतें कीं, वर सांगितलेला व फक्त क्वचित् प्रसंगींच दृष्टिगोचर होणारा अपवाद खेरीज करून, बाकी राहिलेल्या एकंदर वर्गांत परस्परं रोटीव्यवहार होण्यास, कोणीही कसली देखील अडचण मानित नाहीं. मात्र, त्यांचा आपापसांत बेटीव्यवहार होण्याबद्दलची कित्येकवेळीं, किंबहुना सर्वसाधारणतःच, मोठी पंचाईत पडते. आणि त्यासंबंधानें, कुलाचार व देशाचार, रीतभात आणि संप्रदाय, व व्यवहार आणि पारंपर्य, यांजवर नजर देऊनच त्यांजला योग्य तें करावें लागतें. उदाहरणार्थ,

नागांचा ( नाग जातीचा ) फक्त बारा कुटुंबांशींच बेटी-व्यवहार होत असून, दब्यांचा ( दबे जातीचा ) शरीर-संबंध बावन गोत्रांशीं केला तरी चालण्यासारखें असतें.

पंजाब ब्राम्हणांतले अन्य पोटभेद.

**पंजाबच्या सारस्वत ब्राम्हणांत** आणखीही दुसरे लहानसान पोटभेद आहेत. सबब, त्यांच्या संबंधानें सुद्धां वाचकांस निदान थोडीबहुत तरी माहिती कळविणें अगदीं जरूर आहे. यासाठीं तीही येथें अल्पस्वल्प देतों.

ह्या पोटभेदांत १ **भोजक**; २ **मोयल** अथवा **मवल**; ३ **देशान्तराधिवासीकाश्मीरी**; ४ **तगे**; ५ **हुसेनी**; ६ **दत्त**; ७ **दग्वंत**; आणि ८ **आचारीये** किंवा **आचार्य**; असे आठ प्रकार आहेत.

भोजक.

१ **भोजक** हे देवीचे उपासक असून, त्यांची वस्ती **ज्वालामुखी**जवळ पुष्कळ आहे. तथापि, ह्यांस देखील तेथील ब्राह्मण जरा कमीच मानतात; कारण, हे त्यांजला दासीपुत्र समजतात. किंबहुना, **महाराष्ट्र** देशांतील **गोळकां**प्रमाणेंच तिकडील देशांत ह्यांची गणना होत असावी, असें वाटतें.

मोयल किंवा मवल.

२ **मोयल** किंवा **मवल** हें नांव **मव** नामक खेड्यापासून प्राप्त झालें असल्याचें दिसून येतें. ह्यांची वस्ती **पंजाबांत** बरीच

आहे. तथापि, त्यांतही **अमृतसरच्या** नजीक आसपास ते विशेषेंकरून आहेत, असें म्हणतात. ह्यांच्यांत मुलींच्या लग्नासाठीं फारच खर्च येत असल्या कारणानें, तो वांचविण्यासाठीं ते स्त्रीबालहत्या करतात, असें तद्देशीय आणि कित्येक पाश्चात्य, यांचें मत आहे.

देशान्तराधिवासी.

३ **देशान्तराधिवासी** हे **काश्मीर** सोडून **पंजाबांत** आलेले **ब्राम्हण** होत; व ह्यांपैकींच **राजादीनानाथ दिवाण** आणि **पंडित शंकरनाथ**, इत्यादि असल्याचें कळतें.

तगे.

४ **तगे** नामक **ब्राम्हणांची** वस्ती बहुतकरून **ठाणेश्वरा**नजीक, आणि विशेषतः **सरस्वती** नदीच्या कांठीं आहे. हे सर्व कृषिकर्म करणारे असून, ते **गौड ब्राह्मणांशीं** निकट साम्य पावतात. मात्र, ह्या दोहोंत भेद ह्मणून इतकाच कीं, **गौड ब्राम्हणां**प्रमाणें ते मद्यमांसादि सेवन करीत नाहींत. तथापि, आचारविचारासंबंधीं बारकाईनें तपास केला तर, **तगे ब्राम्हण** विशेष अमंगल दिसतात. इतकेंच

---

१ Cave Brown's Female Infanticide.

२ पंडित राधाकृष्ण. "पंजाबचे सरदार" नांवाचे जें ग्रिफिन्कृत पुस्तक आहे, त्यांत ह्याच्या एकंदर कुटुंबाचें सविस्तर वर्णन आहे. पंडित राधाकृष्ण हा विद्वान असून, देशसुधारणेच्या कामांत पुढारी होता.

( vide. Panjab Chiefs P. 263 ).

नव्हे तर, विधवा स्त्रियांस ते केवळ वेश्यांप्रमाणेंच बाळगून, त्यांच्यांशीं तसा व्यवहार करितात.

हुसेनी ब्राह्मण.

५ **हुसेनी ब्राम्हण** हे मूळचे ब्राह्मण कुळांतलेच होत. परंतु **इस्लाम**शाहीच्या धामधूमींत त्यांचें केवळ जबरीनेंच धर्मांतर झाल्या कारणानें, ते अंशतः **मुसलमान** बनले, आणि त्यांजला **हुसेन** हे उपपद प्राप्त झालें. तथापि, त्यांचे पुष्कळ आचारविचार अजूनही **ब्राह्मणां**सारखेच आहेत.

दत्त ब्राह्मण.

६ **दत्त** नांवाच्या **ब्राह्मणां**ची वस्ती बरीच पसरलेली आहे. **तगे ब्राह्मणां**प्रमाणें हे देखील कृषिकर्म करणारेच आहेत. तथापि, हे शूर असल्यामुळें, ह्यांची लढवय्यांतच गणना होते.

दग्वंत.

७ **दग्वंत** हे मांसाहार करीत नसल्या कारणानें, आपणांस **ब्राह्मण**च म्हणवितात, आणि भिक्षावृत्तीनें आपला उदरनिर्वाह करतात.

आचार्य ब्राह्मण.

८ **आचार्य**[1] **ब्राह्मण** हे और्ध्वदेहिकविधि, म्हणजे मरणोत्तर क्रिया चालवितात. त्यामुळें, त्यांस अमंगल समजून हीन मानतात.

**पंजाबचे सारस्वत ब्राम्हग यजुर्वेदी** असून, ते **मा**-

---

१ हेच आचारिये नांवाचे ब्राह्मण असावेत, असें वाटतें.

ध्यंदिन[1] शाखेंतील आहेत. ह्यांत कित्येक पुरोहित आहेत. कांहीं उपाध्येपणाचा धंदा करतात. कित्येक शकून व प्रश्न सांगतात. आणि राहिलेसाहिले केवळ भिक्षावृत्तीनेंच आपला चरितार्थ चालवितात.

सिंध शारस्वत ब्राह्मणांचे प्रकार.

**सिंध** प्रांतांतल्या **सारस्वत ब्राह्मणांचे** सहा प्रकार आहेत. १ **श्रीकार**; २ **बारी**; ३ **रावणजाही**; ४ **शेतपाल**; ५ **कुवचन्द**; आणि ६ **पोखर्ण**.

श्रीकार ब्राह्मण.

**१ श्रीकार** ब्राम्हणांस कित्येक **शिकारपुरी** असेंही म्हणतात. हे **वल्लभाचार्यांच्या** पंथांतले **वैष्णव** आहेत. तथापि, ते **वाण्यांच्या** हातचें खातात. इतकेंच नव्हें तर, ते मांसाहार सुद्धां करतात. त्यामुळें, मच्छी न खाणारे, किंवा मांसाला न शिवणारे, अथवा खानपानादिसंबंधीं विधिनिषेध बाळगणारे, त्यांच्यांत मुळींच सांपडत नाहींत. आणि क्वचित् कोणी सांपडलाच, तर तो एकादा विरळाच समजावयाचा.

बारी ब्राह्मण.

**२ बारी** ब्राम्हणांस **बरोवी** म्हणण्याचा देखील संप्रदाय आहे. ते सुद्धां **वल्लभाचार्य** पंथांतलेच **वैष्णव** आहेत. परंतु ते यथेष्ट मांस सेवन करितात.

---

१ ही शाखा शुक्लयजुर्वेदाची होय.

३ रावणजाही हे देवीचे[1] उपासक असून, शाक्त आहेत. हे मांस खातात आणि दारूही पितात. त्यामुळें, तत्संबंधीं त्यांजला कोणताच विधिनिषेध वाटत नाहीं.

रावणजाही.

४ शेतपाल नांवाच्या ब्राम्हणांत कित्येक वैष्णव असून, कांहीं शाक्त ही आहेत. त्यामुळें, ते मद्यमांस सेवन करतात, हें विशेष रीतीनें सांगावयास नको. मात्र जे वैष्णव आहेत, ते दारूपासून अलिप्त राहतात, हें आपणांला नेहेमींच ध्यानांत ठेविलें पाहिजे. हे बहुतकरून कृषिकर्मोपजीवीच आहेत, असें त्यांच्या नामधेयावरून उघड दिसतें.

शेतपाल.

५ कुवचन्द ब्राह्मणांची रीतभात मुसलमानाप्रमाणेंच असल्याचें दृष्टिगोचर होतें. मात्र, ते ह्यांच्या हातचें खात नाहींत.

कुवचन्द.

६ पोखर्ण जातीचे ब्राम्हण सिंध प्रांतांत विशेष

१ ही देवी कालिका होय. परंतु सिंध प्रांतांत हिलाच सिंहवाहिनी अशी संज्ञा आहे. ज्याप्रमाणें बंगाल्यांत कालिका देवीचें जबरदस्त माहात्म्य आहे. त्याचप्रमाणें सिंध प्रांतांत ह्या सिंहवाहिनीचें विशेष प्राबल्य आहे. हिंगलाज, थथ। जवळील माक्ली नांवाचा शैल-पार, आणि स्थान नजीकचें धारा, इत्यादि सर्व तीर्थें ह्याच देवीला वाहिलेलीं आहेत.

( Bombay Sindh Selections. P. 649/50 )

असल्याचें दिसत नाहीं. कारण, त्या प्रदेशांतील एकंदर हिंदूंच्या संख्येपैकीं, ते फक्त विसाव्या हिश्शानेंच आहेत, असें वाटतें. हे ब्राम्हण मांस खात नसल्या कारणानें आपणांस सारस्वतांपेक्षां ज्यास्त श्रेष्ठ मानतात; आणि म्हणूनच ते ह्यांच्या हातचें मुळींच खात नाहींत. ह्यांना मात्र त्यांच्या हातचें चालतें. त्यांजला साधारण लिहितां वाचतां येत असून, ते जन्मपत्रिका करतात; आणि कोणास जरूर असल्यास त्याला धर्मशास्त्र अगर इतर षट्कर्में शिकवितात. हे भाटयांचे मूळ गुरु होत. हे मांसादि व्यवहार करीत नाहींत, व व त्याला शिवीत देखील नाहींत. त्यामुळें त्यांजला नीच वर्ण, व कनिष्ट प्रतीचे ब्राह्मण, आणि नानक पंथांतले शीक लोक, हे सर्व मान देऊन, त्यांची मोठी प्रतिष्ठा राखतात. ते आपल्या नांवापुढें दास, राम, चन्द, राय, मल्ल, इत्यादि उपपदें लावितात; व कित्येकजण तर मिश्र हेंच उपपद, नांवाच्या अगोदर किंवा नंतर, म्हणजे आदीं अथवा अंतीं जोडतात. उदाहरणार्थ, दयाराम जेठमल्ल, तारोमिश्र, मिश्रसुखदेवजी, वगैरे.

पोखर्ण.

हे सर्व ब्राह्मण शुक्ल यजुर्वेदी आहेत. परंतु ह्यांपैकीं, पोखर्ण जातीचे ब्राह्मण खेरीजकरून, बाकीचे सर्व मांसाहारीच अस-

ह्यांची रीतभात.

१ Indian Caste, By John Wilson.

त्याचें मागील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत सहजीं आलें असेल. मात्र, त्यांतल्या त्यांत भेद म्हणून इतकाच कीं, ते जरी मासमासकण खातात तरी, गाय आणि पाळींव पक्षी, हीं त्यांजला सर्वथैव वर्ज्य आहेत. ह्यांस **लोहाणा** ( लोवाणा ) जातीचे व्यापारी ( वाणी ) लोक, आपले गुरु किंवा उपाध्ये मानतात; व हे यज्ञोपवीत घालतात. तथापि, कृषिकर्म करून व गुरेंढोरें बाळगूनच ते आपला चरितार्थ चालवीत असल्याचें दृष्टिगोचर होतें. ह्यांतील कित्येकजण अगदीं जंगली प्रदेशांत राहतात. त्यामुळें, त्यांची रीतभात आणि आचारविचारपद्धतिसुद्धां, कांहीं निराळीच असल्याचें दिसतें. कारण, एका बाजूनें पाहिलें तर, ते मांशाला किंवा तमाखूला देखील स्पर्श म्हणून करीत नाहींत, आणि तेणेंकरून आपला मोठा पवित्रपणा बाह्यातकारी मात्र दाखवितात. परंतु दुसऱ्या बाजूनें पाहिलें तर, ते इतके हीनत्वाप्रत पावलेले दिसतात कीं, त्यांजला कुणबी व माळी यांच्या हातचाही अन्नव्यवहार चालतो. फार तर काय सांगावें पण, नाहाव्यानें शिजविलेलें अन्न अथवा तयार केलेलें पदार्थ देखील खाण्यास, ते मागें पुढें पाहत नाहींत. तेव्हां, अशा स्थितींत, ते **आकाबाईच्या** दुर्धर फेऱ्यांत सांपडून, कालांतरानें **ब्राम्हणत्वासही** मुकतील कीं काय, अशी भीति दिवसानुदिवस सहजींच वाटत आहे.

तथापि, त्यांतही दुसरी गोष्ट विशेष रीतीनें विचारकरण्यासारखी आहे. आणि ती ही कीं, आम्हां हिंदूंपैकीं **ब्राम्हण** म्हणून जो म्हणविणारा आहे, तो त्या अत्युच्च पदवीपासून च्युत होण्याला केव्हांही प्रवृत्त होणार नाहीं. अथवा, **रामायस्वस्ति; रावणायस्वस्ति;** अशा स्थितीचें अवलंबन करून, स्वजातिप्रेमाला तो कधीं सुद्धां बेपर्वा राहणार नाहीं. किंवा **गंगागये गंगादास; जम्नागये जम्नादास;** अशी उदासवृत्ति देखील तो निष्कारण धारण करणार नाहीं. सबब, दिवसानुदिवस ते आपल्या आचारविचारांत बदल करून विशेष शूचिर्भूत वागतील; आणि याहीपेक्षां जास्त पवित्र राहून, खानपानादि व्यवहारांत **ब्राम्हणांस** अनुरूप असेंच वर्तन ठेवतील, अशी आपण आशा करूं.

सिंध आणि राजपुताना, यांच्या दरम्यान जंगली प्रदेशांत राहणारे ब्राम्हण.

**सिंध** आणि **राजपुताना**, या प्रांतांच्या दरम्यान असलेल्या जंगली प्रदेशांत देखील कित्येक **ब्राम्हणांची** वस्ती असून, हे शेतीभाती करूनच आपला उदरनिर्वाह चालवितात. हे गुरेंढोरेंही बाळगितात; आणि त्यांजपासून पैदा झालेल्या दूधदुभत्याचा चांगला संग्रह करतात. आपल्या मुलांबाळांस पुरून जें तूप राहतें, त्याचा ते विनियोग करतात; आणि प्रपंचाच्या सोयीसाठीं तें विकून, त्याच्या रकमेंत किंवा त्या-

बद्दल अन्य पदार्थ जरूरी पुरते घेतात. ह्यांचे आचार-विचार केवळ अंशतःच मनुस्मृतींत सांगितल्याप्रमाणें आहेत.

असो. याप्रमाणें, सारस्वतब्राम्हणांची हकीकत जेवढी ह्मणून देतां आली, तेवढी दिली.

काश्मीरी ब्राह्मण.

तथापि, ती पुरी करण्यापूर्वीं काश्मीरी ब्राह्मणांविषयीं येथेंच थोडेंसें दिग्दर्शन केलें पाहिजे. कारण, ते सारस्वतच असल्याविषयीं कांहींचें मत आहे. मात्र, कित्येक विद्वान पंडित तद्विरुद्धही आपलें मत देतात. पण तें कसेंही असलें तरी काश्मीरी ब्राम्हणांचें विवेचन झाल्यानंतरच, अनुक्रमानें कान्य कुब्ज ब्राम्हणांकडे वळणें विशेष सयुक्तिक वाटतें, आणि जास्त सवडीचें दिसतें. सबब, प्रस्तुत प्रसंगीं, तसेंच करण्याचा मी विचार केला आहे.

## १ काश्मीरी ब्राह्मण.

काश्मीर देश अत्यंत रमणीय असून, ह्या मनोहर

१ ह्यांत कांहीं पौरस्त्य पंडित असून, कित्येक पाश्चात्यविद्वानांचा देखील तसाच अभिप्राय आहे. यापैकींच सर. ज्यॉर्ज क्यांबेल हे होत. यानीं भरतखंडांतील नृवंशविद्येवर एक चांगला निबंध लिहिला आहे.

( Journal. Bengal Asiatic Society.
N. S. 1866. P. P. 57/58. )

२ सुप्रसिद्ध पंडित व पुढारी रा. रा. राधाकृष्ण हे ह्या मतांतले होत.

प्रांतांत आमची वस्ती फारच प्राचीन काळापासूनची आहे.

काश्मीर देशांत हिंदूंची पुरातन वस्ती.

आम्हीं **पंचनद** प्रदेशांत, (म्हणजे **पंजाबांत**), आणि त्याच्याही पलीकडे **वायव्य** सरहद्दीवर असतांनाच आमचे **आर्यपूर्वज** येथें दाखल होऊन, त्यांनीं शनैः शनैः आपली वस्ती या ठिकाणीं बरीच विस्तृत केली असावी, असें वाटतें.

रामायण आणि महाभारत कालांतील काश्मिरचें वर्णन.

पुढें, **रामायण**[1] कालांत देखील **काश्मीर**चें दिग्दर्शन झाल्याचें आढळून येतें. आणि तदनंतर **महाभारत**[2] कालांत सुद्धां त्याचा उल्लेख केला असल्याचें दृष्टीस पडतें. शिवाय, **काश्मीर**च्या अति पुरातन पौराणिक आख्यायिकांतही **कश्यप** प्रजापतीचें नांव दृष्टिगोचर होतें. हा **मरीची**चा मुलगा व **ब्रह्मदेवा**चा नातू होय. आणि ह्यानेंच तेथील एका मोठ्या सरोवराचें जल प्राशन करून, तें अजिबात कोरडें पाडलें असल्याविषयीं कथानक आहे

**प्रोफेसर विल्सनू**[3]चें असें मत आहे कीं, **पांडवांचें**

---

१ रामायण, किष्किंधाकाण्ड.

२ महाभारत, सभापर्व, दिग्विजय.

३ काश्मीरच्या इतिहासावर प्रोफेसर विल्सन्नें एक निबंध लिहिलेला असून, त्यांतच त्यानें आपले एतद्विषयक विचार प्रदर्शित केले आहेत.

( As. Res. vol I. P. 248. ).

वसतिस्थान काश्मीरच होतें. आणि **गोनन्द** नांवाचा हिंदू राजा देखील कांहीं कालपर्यंत येथेंच राज्य करीत होता. ह्यांचेंच **गोनर्द** असेंही नामधेय असून, **मगध** देशांत **जरासंध** नांवाचा जो राजा आपलें प्रभुत्व चालवीत असे, त्याचाच हा कोणी नातलग असल्याचें म्हणतात. **गोनन्दानें ब्राह्मणी** धर्माचें चांगलें परिपालन केलें होतें.

काश्मीर हें पांडवांचें वसतिस्थान.

तदनंतर **अशोक**[1], **जलोक**[2], **अभिमन्यु**[3], **महिरकुल**[4],

---

१ हा राजा बौद्धधर्मानुयायी होता. तथापि, तो धर्म, हिंदुधर्माचें पिलूंच असल्या कारणानें, हिंदु धर्माची त्याच्या कारकीर्दीत भरभराटच होती.

२ हा अशोकाचा मुलगा असून, ह्याच्यामागें तो गादीवर बसला. हा मोठा बलाढ्य पादशहा होता. व त्यानें आपल्या पराक्रमानें कान्यकुब्ज देशही जिंकला. ह्यानें ब्राह्मणी धर्मास पुष्कळ प्रोत्साहन दिलें होतें.

३ नील पुराणावरून असें कळून येतें कीं, ह्यानें ब्राह्मणधर्म पुनश्च प्रतिष्ठापिला. हें काम त्यानें चन्द्र नामक वय्याकरणी याच्या साहाय्यानें केलें असून, हा कश्यपाचा वंशज असल्याचें सांगतात. काश्मीरांत नील पुराणास मोठा प्रमाण ग्रंथ मानतात.

४ ह्यानें दक्षिण हिंदुस्थान आणि लंका सर केलें, व गंधार ब्राम्हणांस आश्रय दिला. परंतु कालांतरानें त्यांचें आचरण त्यास अमंगलसें दिसून आल्यावरून, त्यांत दिलेलें इनाम त्यानें छिनावून घेतलें. तदनंतर आर्य देशांतल्या ब्राह्मणांसच त्यानें बोलावून आणून, जमीनीच्या इनाम सनदा करून दिल्या.

अक्ष,[1] प्रतापादित्य,[2] लिलादित्य,[3] जयापीड,[4] अवंतिवर्मा, आणि त्याचा वडील मुलगा युवराज, इत्यादि सर्व, प्रत्यक्ष अथवा पर्यायानें, ब्राम्हण धर्माभिमानीच असल्या कारणानें, ह्या धर्माला उत्तम प्रकारचें प्रोत्साहन मिळालें; व त्याचा पाया उत्तरोत्तर मजबूतच होत चालला.

काश्मीरांत ब्राह्मणी धर्माचें संरक्षण.

अभिमन्यूच्या मातुःश्रीनें तर, कांहीं ब्राह्मणांकरतां विशेष तजवीज लावून ठेविली होती. कारण, तिनें सौर आणि लाट ब्राह्मणांच्या सोयीसाठीं, कंकपूर व दड्डपूर हीं नवीन नगरें स्थापिलीं, व त्यांची तरतूद केली. आतां, हे ब्राम्हण मध्यदेशांतले होते, इतकें या ठिकाणीं सांगणें अवश्य असल्यामुळें, तसें केलें आहे.

सदरहू विवेचनावरून, व खालीं दिलेल्या टिपेवरून, काश्मीरच्या ब्राम्हणांत बरेंच मिश्रण असल्याचें कोणाच्या-

---

१ ह्यानें अपवित्र ब्राह्मणांस हुसकावून लावून, त्यांच्याऐवजीं दूरदूरचे शुचिर्भूत आणि विद्वान् ब्राम्हणांस बोलाविलें.

२ ह्यानें रौहिन्य ब्राह्मणांसाठीं पाठशाला आणि अन्नपूर्णागृह स्थापिलें होतें.

३ ह्यानें कनोज, गौडदेश, कर्नाटा, आणि पश्चिम हिंदुस्थान जिंकून तेथें आपला विजयध्वज रोविला होता.

४ ह्यानें ठिकठिकाणचे पंडित आणि विद्वन्मुकुटमणी काश्मीरास बोलावून, तो देश केवळ सरस्वती मंदीरच बनवून टाकिला. व त्यामुळें इतर सर्व नगरें विद्याशून्य होऊन, उजाड पडलीं.

ही लक्षांत येईल. आणि म्हणूनच ते सारस्वत नाहींत, असें जें पंडित राधाकृष्णाचें म्हणणें आहे, तें खरोखर साधार व सयुक्तिक दिसतें. कोलब्रूकचा तर असा अभिप्राय आहे कीं, काश्मीरी ब्राम्हण हे कान्यकुब्जांचेच वंशज अथवा जातींतले असावेत.

इस्लामधर्माच्या जुलमामुळें, काश्मीरांतील हिंदूचें धर्मांतर.

असो. काश्मीर देशांत इस्लामशाहीचें प्रस्थ माजून, अखिल जनाचें मुंडन होण्यापूर्वी; अथवा त्या प्रांतांत समशेरीचा नांगर फिरल्यामुळें, सर्व प्रदेश उध्वस्त होऊन, यच्चावत् लोकसमूह शिखानष्ट होण्याच्या अगोदर; तेथली एकंदर वस्ती हिंदूंचीच होती. फार तर काय सांगावें, पण, अखिल भरतखंडभर हिंदूपदपादशाहीचाच झेंडा एकसारखा फडकत असल्याकारणानें, काश्मीराप्रमाणें अन्यत्र देखील हिंदुधर्मसूर्यच अश्रान्त चमकत राहिला होता. आणि हिमाचलापासून तों तहत सिंहलद्वीपापर्यंत; व त्याच्याही पलीकडे हिंदीमहासागरांत, आफ्रिकेंतील झांझिबार प्रदेशापावेतों; आणि आफगाणिस्थानापासून तों ब्रम्हपुत्रा नदीपर्यंत; व त्याच्याही पलीकडे पूर्वेस स्थीरमहासागरांत एशियाखंडांतील सुमात्रा, जाव्हा, बोर्नियो, वगैरे फिलिपाईन, बेटांत;

१ हे कृष्ण यजुर्वेदी असून, कठ शाखेंतील आहेत. व ह्यांचे सूत्र लौगाक्षी असल्याचें सांगतात.

२ Asiatic Researches, vol VII P. 226.

आणि **कांबोडिया, सायाम**, इत्यादि प्रांतांत; केवळ **आर्यसिंहाचीच** गर्जना निरंतर ऐकू येत होती.

त्यांची वाताहात.

परंतु, कालान्तरानें, **एशियाखंडांतील** पठारावरून, **मुसलमान** लोकांच्या झुंडीच्याझुंडी, ह्या पवित्र **भरतखंडांत**, एकामागून एक अशा एकसारख्या येऊं लागल्या. त्यामुळें, **काश्मीर** सारख्या सरहद्दीच्या प्रांतांत ते सर्वत्र पसरले; आणि "**चंचुप्रवेशान्मुसलप्रवेशः**" या म्हणीप्रमाणें, त्यांनीं येथेंच कायमचें बूड टेकून, शेवटीं अरेरावी करण्यास प्रारंभ केला; व कांहीं दिवसांनीं आपलें प्रभुत्वही गाज-विलें. त्या कारणानें, त्यांजला हवेंतसें करण्यास ही एक चांगलीच संधी मिळाली; आणि धर्मप्रकरणांत हात घाल-ण्यास त्यांजला उत्तम प्रकारें फावलें. तेथें त्यांचेंच राज्य असल्यानें, हिंदू प्रजेवर जुलूम करून त्यांजला बाटवि-ण्यास कोणतीही आडकाठी ह्मणून राहिली नव्हती; व त्यांतही मुख्यत्वेंकरून, **न्यायदेवता** ठिकाणावरच नस-ल्यामुळें, सूक्त वा असूक्त विचाराचेंही प्रयोजन नव्हतें.

त्यांजवर अनन्वित जुलूम.

पुढें, असें सांगतात कीं, **सुलतान शिकंदर** राजाच्या कारकीर्दीत अनन्वित जुलूम होऊन, अखिल **हिंदू प्रजा** संत्रस्त झाली. त्यामुळें, त्यांजला **इस्लाम** धर्माचा

१ भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक सहावें, भाग ३७ वा. पान १६३ तें १९५ पहा.

हा अहर्निशीं होत असलेला जंजाळ केवळ दुःसह वाटूं लागला; आणि हीच संधि पाहून त्या सर्वांस जबरदस्तीनें बाटविण्याचा परधर्मीयांनीं विचार केला. तेव्हां, अर्थात्च **कुराण** किंवा **मरण**, या दोहोंशिवाय दुसरी सोय किंवा गत्यंतरच नसल्या कारणानें, त्या बिचाऱ्यांनीं हो ना करतां करतां, केवळ मोठ्या प्राणसंकटानेंच एकदांचा **महमदी**धर्म[1] स्वीकारला; आणि तद्धर्मीयांचें पारणें फेडून, त्यांच्या मनाची हौस आपल्या स्वतःच्या निस्सीम अन्तर्गत वेदनांनीं पुरी केली.

अशा आणीबाणीच्या प्रसंगीं आणि जिवावरील संकटांत देखील हिंदूंची स्वधर्मावरील निष्ठा.

खरोखर, प्रत्यक्ष मानेवर सुरी ठेविली असतांना देखील, केवळ आपला धर्मच आपल्याला जीवितापेक्षांही विशेष प्यार, असें म्हणणारीं माणसें, किंवा मायेचा पूत खचितच विरळा! परंतु, महदाश्चर्याची गोष्ट ही कीं, ह्यावेळीं, **मुसलमानी** धर्माचा अंगिकार न करणाऱ्या प्रत्येक हिंदूस ह्या विधर्मीयांनीं अतिक्रूरतेनें **यमसदनास** पोहोंचविलें असतां, व **इस्लामधर्माचें** होमकुंड अहोरात्र पेटल्यामुळें, त्यांत **हिंदू** ह्मणविणाराची आहुति प्रतिक्षणीं पडत असलेली नजरेस येत असूनही, **काश्मीरांत हिंदूंचीं**

---

1 इ० स० १३८६.

Journal R. A. Society. vol, VII P. 370.

एकंदर अकरा कुटुंबें, फक्त स्वधर्मप्रीत्यर्थच आपले प्राण खर्चावयास एका पायावर तयार झालीं. आणि अशा प्रकारें केवळ आपल्या जिवावर उदार होऊन, जुलूम करून बाटविणारांस त्यांनीं अगदीं निश्चयपूर्वक असें निक्षून सांगितलें कीं,

**स्वधर्मो निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।**

स्वधर्म रक्षणाविषयीं अकरा कुटुंबांचा निर्धार, आणि त्यांनला मिळालेली द्रविड देशांतील अग्निहोत्री ब्राम्हणांची कुमक.

असो. ह्या अकरा कुटुंबांनीं आपल्या **सनातन आर्यधर्माचें** संरक्षण इतक्या निरपेक्ष बुद्धीनें, शौर्यानें, बहादुरीनें, व साहसानें केलें कीं, तत्प्रीत्यर्थ त्यांचे प्राणही वांचविणें आपोआपच भाग पडलें. अशा प्रकारें, ह्यांनीं केवळ धैर्याचेंच अवलंबन केलेलें असल्यामुळें, ह्यांस तेथें राहण्यास फारशी अडचण यापुढें पडली नाहीं. इतकेंच नव्हे तर, त्यांनीं आपला कळप दिवसानुदिवस जास्त वाढीस लागावा, एतदर्थ, **द्रविड देशांतून** अनेक **अग्निहोत्री ब्राम्हणांस** बोलाविलें; आणि त्यांजबरोबर **रोटीव्यवहाराप्रमाणेंच बेटीव्यवहार** करण्याची देखील सुरुवात केली.[1]

---

१ ह्याच कारणामुळें, **काश्मीरांतले ब्राह्मण** सारस्वत नाहीत, असें जें पंडित **राधाकृष्णानें** म्हणणें आहे, तें खचितच साधार दिसतें. मागें पान ६४ पहा, पुस्तक आठवें.

ह्याशिवाय, बाकी राहिलेल्यां कुटुंबांची अर्थात्‌च वाताहात झाली. कित्येक मृत्यूच्या दंष्ट्रेंत पडलीं. कांहीं देशान्तरीं पळून गेलीं. कित्येकांनीं जम्मूचा रस्ता पकडला. कांहीं कष्टवार येथें गेलीं. आणि राहिल्यासाहिल्यांनीं निबिडारण्यांत जाऊन वस्ती केली.

अन्य हिंदूंचें देशान्तर.

काश्मीरच्या ह्या प्रचंड इस्लाम सत्रांत जीं वर सांगितलेलीं अकरा हिंदूंचीं कुटुंबें वांचलीं, त्यांजला मालमाशी अशी संज्ञा असून, जीं द्रविड देशांतलीं कुटुंबें येथें येऊन नवीन राहिलीं, त्यांजला भनमाशी असें नामधेय पडलें आहे.

काश्मीरी ब्राम्हणांत मालमाशी आणि भनमाशी असे भेद.

दुसरे भेद.

काश्मीरी ब्राम्हणांत, या खेरीज आणखीही खालीं लिहिलेले प्रकार असल्याचें कळून येतें.

| | | |
|---|---|---|
| १ कौल. | ९ बुताल. | १७ कल्ला. |
| २ राजदन. | १० जवी | १८ सूम. |
| ३ गुरिटी. | ११ बजाज. | १९ हांजी. |
| ४ जितिश. | १२ रेई. | २० हस्तिवली. |
| ५ दर. | १३ हुंडो. | २१ मुटू. |
| ६ त्रकरी. | १४ दिसी. | २२ तिकू. |
| ७ मुझी. | १५ रुगी. | २३ गैस. |
| ८ मुनशी. | १६ छिचवली. | २४ गाडीं. |

| | | |
|---|---|---|
| २५ ब्रारी. | ४७ सरफ. | ६९ किचिलु. |
| २६ गंज. | ४८ गुरहा. | ७० छान. |
| २७ वांगन. | ४९ ठाणठर. | ७१ मुकदम. |
| २८ वगन. | ५० खार. | ७२ खपरी. |
| २९ भूत. | ५१ थौर. | ७३ बुलाकी. |
| ३० भैरव. | ५२ तेंग. | ७४ कार. |
| ३१ मदन. | ५३ सैयद. | ७५ जेलाली. |
| ३२ दिन. | ५४ त्रुपुराय. | ७६ सफायु. |
| ३३ शरगाल. | ५५ मुठी. | ७७ बटफली. |
| ३४ हाकचर. | ५६ सफाई. | ७८ हुखी. |
| ३५ हाक. | ५७ भान. | ७९ कुकपारी. |
| ३६ कुकर. | ५८ वान्य. | ८० कली. |
| ३७ छतरी. | ५९ गारिअल. | ८१ जारी. |
| ३८ सौनपुरी. | ६० थपल. | ८२ गंज. |
| ३९ मत्ती. | ६१ नाउरी. | ८३ किम. |
| ४० खूश. | ६२ मसलदार. | ८४ मुंडी. |
| ४१ शकदार. | ६३ मुश्रान. | ८५ जंगल. |
| ४२ वैष्णव. | ६४ तुरकी. | ८६ जाती. |
| ४३ कोतर. | ६५ फोतेदार. | ८७ रख्यम. |
| ४४ राक. | ६६ खरु. | ८८ नकाशी. |
| ४५ कचरी. | ६७ करबांगी. | ८९ गेरी. |
| ४६ तोते. | ६८ भठ. | ९० गारी. |

९१ काली.
९२ पंजी.
९३ बंगी.
९४ साहित्र.
९५ बेलत्र.
९६ रायी.
९७ गलिकरप.
९८ चन.
९९ ककार्वा.
१०० यच्छ.
१०१ जालपुरी.
१०२ नवशहरी.
१०३ किसी.
१०४ धुसी.
१०५ गमरवर.
१०६ थोलल.
१०७ पिस्त.
१०८ बादाम.
१०९ लच्छल.
११० नादीर.
१११ लिदारिगरी.
११२ प्याल.
११३ कात्री.
११४ छात्री.
११५ वाण्टी.
११६ वातलिलु.
११७ खरी.
११८ वास.
११९ लर्ता.
१२० सांबज.
१२१ दण्डी.
१२२ रावल.
१२३ मिसरी.
१२४ सिब्बी.
१२५ सिंगरी.
१२६ मिरजे.
१२७ मल.
१२८ वारिकि.
१२९ जान.
१३० लुतरी.
१३१ परिम.
१३२ हाली.
१३३ नकइत्र.
१३४ मइन.
१३५ अंबारादार.
१३६ उरवाल.
१३७ कंठ.
१३८ बालि.
१३९ जंगली.
१४० डुलि.
१४१ परव.
१४२ हरकार.
१४३ गगर.
१४४ पंडित.
१४५ जरी.
१४६ लंगी.
१४७ मुकी.
१४८ त्रिहि.
१४९ पदौर.
१५० पादे.
१५१ जन्द.
१५२ तेंग.
१५३ तुंद.
१५४ ट्राजी.
१५५ द्राल.
१५६ फंवी.

| | | |
|---|---|---|
| १५७ सजावूल. | १७९ चोकी. | २०१ खालसी. |
| १५८ बक्षी. | १८० चक्र. | २०२ चन्द्र. |
| १५९ उग्र. | १८१ राई. | २०३ गदिर, |
| १६० निचवी. | १८२ प्रिती. | २०४ जरात्री. |
| १६१ पठाण. | १८३ पर्ती. | २०५ सिहारी. |
| १६२ विचारी. | १८४ किचिली. | २०६ कलवित. |
| १६३ उंठ. | १८५ काढी. | २०७ नगरी. |
| १६४ कुचरी. | १८६ जिली. | २०८ मुंगवूच. |
| १६५ शाल. | १८७ किलमाक. | २०९ खैबरी. |
| १६६ बाबी. | १८८ सलमान. | २१० कुल्ली. |
| १६७ मरवानी. | १८९ कद्लबजु. | २११ काबी. |
| १६८ लाबरी. | १९० कंदहारी. | २१२ खोस. |
| १६९ खन्य. | १९१ बाली. | २१३ दुराणी. |
| १७० खन्यकती. | १९२ मनटी. | २१४ तुलि. |
| १७१ शाहा. | १९३ बनखान. | २१५ गरिब. |
| १७२ पीर. | १९४ हकीम. | २१६ गडी. |
| १७३ खुर्दी. | १९५ गरीब. | २१७ जती. |
| १७४ खुंकी. | १९६ मंदल. | २१८ राक्षस. |
| १७५ कलपोश. | १९७ मौज्हह. | २१९ हरकार. |
| १७६ पिशन. | १९८ शाईर. | २२० ग्रद. |
| १७७ बिशन. | १९९ नून. | २२१ वगरी. |
| १७८ बूल. | २०० तेली. | |

## २ कान्यकुब्ज ब्राह्मण.

कनोजे ब्राह्मणांचे तेरा प्रकार.

ह्यांमच कनोजे ब्राह्मण म्हणत असून, ह्यांचे एकंदर १ मिश्र, २ शुक्ल, ३ तिवारी, ४ दुबे, ५ पाठक, ६ पांडे, ७ उपाध्ये, ८ चोबे, ९ दीक्षित, १० लखनौ वाजपेयी, ११ सरवरीये, १२ कनिष्ठ, आणि १३ विश्लिष्ट, असे तेरा पोटभेद आहेत. सबब त्यांचा तपशील येथें देतों.

### १ मिश्र.

मिश्र.

ह्यांनलाच मिश्री अशी संज्ञा आहे; आणि कान्यकुब्ज अथवा कनोजे ब्राम्हणांत हे उत्तमांत मोडतात. ह्यांचे खालीं दर्शविल्याप्रमाणें एकंदर एकेचाळीस प्रकार आहेत.

१ मधबोनी.[1]
२ चंपारन.[2]
३ पटलोल,[3] अथवा पटलयाल.
४ रतनवाल.
५ बहडोल.
६ मटोल, किंवा मटेवाल.
७ कर्तरीय.[2]
८ नागरीय.[3]
९ पयासी.[3]
१० गाना.
११ तेउन्त, किंवा तेवन्त.
१२ माजेनी.
१३ गुरहा.
१४ मरकार.
१५ जिग्न्य.

---

१ ह्यांत ऋग्वेदी, व कांहीं सामवेदी आहेत. तथापि, त्यांत कित्येक काण्व शाखेंतील शुक्ल यजुर्वेदी ब्राम्हण असल्याचेंही आढळून येतें. २ हे सामवेदी आहेत. ३ हे वत्सगोत्रांतले आहेत.

१६ परायण.
१७ पेपरा.
१८ अंतर्वे.
१९ हथेपरा.
२० सुगंती.
२१ खेता.
२२ ग्रामवासी.
२३ बिरह.
२४ कौशी.
२५ केवती.
२६ बैशी.
२७ भत्रजीय.
२८ बेल्वे.
२९ उश्रैणा.
३० कोदीय.
३१ तवाकपुरी.
३२ हिमलपुरी.
३३ शृंगारपुरी.
३४ सीतापुरी.
३५ पूतवह.
३६ सिराजपुरी.
३७ भानपुरी.
३८ तेराक.
३९ दुधंगौमी.
४० रत्नपुरी.
४१ सुनहनल.

त्यांचा शरीरसंबंध.

**मिश्री** ब्राह्मण हे शुक्ल, तेवारी, दोबे आणि पांडे, यांच्याशीं शरीरसंबंध करतात. त्याचप्रमाणें, फाटक, उपाध्ये, व चोबे, यांच्याकडे देखील ते आपल्या मुली देतात; परंतु त्यांच्याकडील कन्या ते आपल्या येथें परत घेत नाहींत.

ह्यांत १ हेनिकर, २ परसु, ३ गोपीनाथ, ४ माजगाम, ५ अनकिन, आणि ६ सोठिअन्व, असे आणखीही पोटभेद असून, त्यांतही पहिल्या तिघांचा एक, व दुसऱ्या तिघांचा एक, असे दोन वर्ग झालेले आहेत. त्यामुळें ज्या त्या वर्गांतला मात्र आपापसांतच बेटीव्यवहार होतो; व तो अन्यवर्गांत होण्यास इलाज नसतो.

१ हेच अथर्व (वेदी) असावेत.

२ पेज २८ पासूनचे सर्व ब्राम्हण सामवेदी असल्याचें कळतें.

## २ शुक्ल.

शुक्ल.

ह्यांचे खालीं लिहिलेले पोटभेद असून, त्यांत कित्येक शाक्त आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ खर्खंयीजखोर. | १० अवस्थी. | १९ कयंव. |
| २ मामखोर[1]. | ११ तेवराशी. | २० अजमदगढ्य. |
| ३ तिपथी. | १२ प्रभाकर. | २१ पित्रौर. |
| ४ भेडी. | १३ महुलियर. | २२ मतौवस. |
| ५ बकरुव. | १४ गर्ग. | २३ सोंठीयनव. |
| ६ कंजही. | १५ गौतमी. | २४ अंकिन. |
| ७ खंडइल. | १६ परश. | २५ वीर. |
| ८ बालो[2]. | १७ तारौ[3]. | २६ गोपीनाथ. |
| ९ चंगे. | १८ बरिखपुरी. | |

हे **चाकरायण** शाखेंतील असून, ह्यांचें **गौतमगोत्र** असल्याचें समजतें. कित्येकांची अशी कल्पना आहे कीं, हे **माध्यंदिन** शाखेंतील **शुक्लयजुर्वेदी** असावेत.

## ३ तिवारी.

तिवारी.

हे पूर्वीचे **त्रिवेदी ब्राह्मण** होत. आणि **त्रिवेदी** शब्दापासूनच **तिवारी** असा अपभ्रंश झाला असल्याचें दिसतें. तथापि, सां-

---

१ हें नांव दोन गांवावरून पडलेलें आहे.

२ हे शेज ९।१०।११, यांच्याशीं बेटीव्यवहार करितात.

३ हें नांव गांवावरून पडलें आहे.

प्रतकाळीं हे आपणांस सामवेदीच म्हणवितात. हे कौथुम शाखेंतील असून, गोभिल सूत्राध्यायी आहेत. हे भिन्नगोत्री असल्यास, त्यांचा परस्पर बेटीव्यवहार होण्यास बहुतकरून हरकत नसते. यांच्यांत, खालीं लिहिल्याप्रमाणें पोटभेद आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ लोनाखार. | १४ नंदौली, किंवा तंडौली. | २६ गोवर्धन. |
| २ लोनापार. | | २७ तुके. |
| ३ मुंजैना. | १५ बुरहीयबारी. | २८ चत्तु. |
| ४ मंग्रइच. | १६ गुरौली. | २९ शिवली. |
| ५ झुनादिय. | १७ जोगीय. | ३० शखरेज. |
| ६ सोहगौर. | १८ दीक्षित. | ३१ उमरी. |
| ७ तारा. | १९ सोनौर. | ३२ मनोह. |
| ८ गोरखपुरीय. | २० अगोरी. | ३३ शिवराजपुर. |
| ९ दौख. | २१ भार्गव. | ३४ मंधन. |
| १० पेंडी. | २२ बकीय. | ३५ सपे. |
| ११ सिरजम. | २३ कुकुंरगरीय. | ३६ मंडन त्रिवेदी. |
| १२ धातुर. | २४ दमा. | ३७ लहरी त्रिवेदी. |
| १३ पनौली. | २५ गोपाल. | ३८ जेठी त्रिवेदी. |

हे तिवारी ब्राह्मण हल्लीं केवळ कृषिकर्मानेंच आपला उदरनिर्वाह करितात. इतकेंच नव्हे तर, कांहीं-जण दुकानदारीचा धंदा पतकरून देखील आपला चरि-

नार्थ चालवितात; आणि कित्येक तर शिपायाच्या वेशानेंच लष्करांत शिरून लढवय्ये बनतात.

## ४ दुबे.

दुबे. ह्यांस दोबेही म्हणत असून, ह्यांचे खालीं लिहिल्याप्रमाणें एकवीस पोटभेद आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ कंचानी. | ८ लथिआही. | १५ पलीया. |
| २ सिंधव. | ९ गुरद्रुन. | १६ घेगव. |
| ३ बेलव. | १० मेथीवेर. | १७ शिशिंर. |
| ४ पारव. | ११ ब्रम्हपुरीय. | १८ सिनानी. |
| ५ केरईय. | १२ सिंगिलव. | १९ कुदवर्य. |
| ६ वर्गईन्य. | १३ कुचलव. | २० कतैय. |
| ७ पंचनी. | १४ मुंजलव. | २१ पनव. |

ह्यांतील कित्येक माध्यंदिनशाखेंतील शुक्लयजुर्वेदी असून, बाकीचे सामवेदी असल्याचें कळतें.

## ५ पाठक.

पाठक. ह्यांनाच फाटक अशी संज्ञा असल्याविषयीं कांहींची समज आहे; व हे यजुर्वेदी आहेत, असें म्हणतात. ह्यांच्या संबंधानें एक चमत्कारिक दंतकथा आहे, त्यावरून यांची उत्पत्ति लोधकृसापासून आहे, असें कित्येक मानतात. ह्यांचे खालीं लिहिलेले पोटभेद आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ सोनौर. | ३ पतखवलीय. | ५ भंदरी. |
| २ अंवतर. | ४ धिगवच. | |

## ६ पांडे.

पांडे. ह्यांत खालीं लिहिलेले पंचवीस पोटभेद आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ त्रिफल. | १० खोरीय. | १६ चरपंद. |
| २ जोख. | ११ पिचौर. | १७ सिल. |
| ३ मतैन्य. | १२ पयासी. | १८ अधुर्जे. |
| ४ तोरय. | १३ जूतिय, किंवा जत्य. | १९ मदरीय. |
| ५ नाकचौरी. | | २० मजगाम. |
| ६ पर्सिह. | १४ इतर, अथवा इंतर. | २१ दिलिपपर. |
| ७ साहंकोल. | | २२ पायहत्य. |
| ८ बर्हदीय. | १५ बेष्ठोल, किंवा बेष्टवाल. | २३ नागव. |
| ९ गेगास. | | २४ तलाव. |
| | | २५ जंबु. |

ह्यांपैकीं शेज १४।२०।२१।२२।२३।२४ आणि १९, असे सामवेदी असून, शेजं २५ चे ऋग्वेदी आहेत.

## ७ उपाध्ये.

उपाध्ये. यांचे एकंदर दहा वर्ग आहेत. सबब, त्यांचा तपशील येथें देतों.

| | | |
|---|---|---|
| १ हिरण्य. | ३ खोरिय. | ५ दहेन्द्र. |
| २ देवरण्य. | ४ जैथिय. | ६ गोरठ. |

७ रनीसराप. ९ दुधेलिय.
८ विज्ञामाबाद. १० बसगव.

हे सर्व यजुर्वेदीच आहेत. तथापि, ते स्वतः नांगरकीचें काम करतात, आणि नांगर धरतात; व दानही घेतात. यामुळें, त्यांजला कनोजे ब्राह्मण जरा कमी समजतात.

## ८ चोबे.

चोबे.

ह्यांसच चौबे अशी देखील संज्ञा आहे. हे पूर्वी चार वेदांचें पठण किंवा अध्ययन करीत असत, म्हणून त्यांजला हें नामधेय प्राप्त झालें असावें, असें वाटतें. कारण, चतुर्वेदी शब्दाचा चौबेद, किंवा चौबे, अथवा चोबे, असा अपभ्रंश होण्याचा संभव दिसतो. तथापि, कित्येकांची अशी समज आहे कीं, चतुर्वेदी ( म्हणजे यज्ञ करण्याची चार स्थंडिलें ) या शब्दापासूनच हें नांव पडलेलें आहे. ह्यापैकीं, कांहीं यजुर्वेदी व कांहीं सामवेदी आहेत. ह्यांच्यांतील पोटभेद खालीं लिहिल्याप्रमाणें असल्याचें दिसून येतें.

| | | |
|---|---|---|
| १ नयपुर. | ४ कतय. | ७ हरिदासपुर. |
| २ हरगडी. | ५ रामपुर, | ८ तिवैय. |
| ३ चौखर. | ६ पलिय. | ९ जमडुव. |
| | | १० गागय. |

ह्यांपैकीं, गार्गेय हे यजुर्वेदी आहेत, असें म्हणतात.

## ९ दीक्षित.

दीक्षित.

जो कोणी ज्योतिष्टोम यज्ञ करतो, किंवा ज्याच्या घराण्यांत अथवा पूर्वजांनीं अशा प्रकारचा यज्ञ केला असेल, त्याजला **दीक्षित** ही संज्ञा प्राप्त होते. हे सर्व **यजुर्वेदी** असून त्यांच्यांत खालीं लिहिलेले पोटभेद आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ देवगाम. | ३ नेवर्षीय. | ५ सुकान्त. |
| २ ककरी. | ४ अन्तेर. | ६ चौधरी. |
| | | ७ जुजत्वतीय. |

हे बहुतकरून **यजुर्वेदी** असून, आग्रा, मैनपुरी, इत्यादि शहरानजीक राहतात,आणि जमीन कसून आपला चरितार्थ चालवितात. तथापि, त्यांतही अन्य प्रकारचे देखील धंदे करणारे असल्याचें आढळून येतें. कारण, त्यांपैकीं कित्येक व्यापारी आहेत; कांहीं दलाली करतात; कांहीं उपाध्येपण चालवितात; आणि कित्येक भिक्षा सुद्धां मागतात.

जुजत्वतीय हें नामधेय जुजावत् राजापासून पडलेलें आहे. हा बुंदेलखंडाचा राजा होता.

## १० लखनौ वाजपेयी.

लखनौ वाजपेयी.

ह्यांचें गोत्र उपमन्यु असून, ते शुक्ल यजुर्वेदी आहेत. ह्यांत, खालीं लिहिल्याप्रमाणें फक्त दोनच पोटभेद असल्याचें समजतें.

१ उंचे, म्हणजे उच्च वर्गांतले.

२ नीचे, म्हणजे कनिष्ठ प्रतींतले.

## ११ सरवरीये

ह्यांना सार्युपारी असेंही म्हणण्याचा परिपाठ आहे. हें नामधेय त्यांजला सर्यु नदीपासून प्राप्त झाल्याचें सांगतात. ह्यांची मुख्यत्वेंकरून वस्ती म्हटली म्हणजे ह्याच नदीचा पूर्वभाग होय. हे कनोजांच्या शाखेपैकींच असून, ह्यांच्याप्रमाणेंच त्यांचे पोटभेद आहेत. तथापि, त्यांचा कनोजांशीं बेटीव्यवहार म्हणून बिलकुल होत नाहीं.

सरवरीये.

## १२ कनिष्ट.

ह्यांत एकंदर पंधरा पोटभेद असून, त्यांचीं नांवें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत.

कनिष्ट.

| | | |
|---|---|---|
| १ समदरीय. | ६ चन्द्रवल. | ११ मिसिर्मन. |
| २ तिरगुनईत. | ७ कुसुभिन. | १२ पैतीय |
| ३ भौरा. | ८ बिसोद्य. | १३ मसोनाड. |
| ४ कनौरा. | ९ कन्हली. | १४ बिजरा. |
| ५ केवती. | १० खजुनाई. | १५ अन्सनोर. |

## १३ भिल्लट.

ह्यांचे दहा प्रकार आहेत; आणि ह्यांशिवाय, त्यांचा अन्यत्र बेटीव्यवहारही होत नाहीं.

आणि भिल्लट.

१ कनोजमिश्री. ह्यांत हेनिकर, परस, व गोपीनाथ, यांचा समावेश होतो.

२ मुरादाबादमिश्री. ह्यांत मजगाम, अंकिन, आणि सोठिआन्व, यांचा समावेश होतो.

३ लखनोवाजपेय

४ गेगसन पांडे.

५ शुक्ल.

६ त्राल.

७ चंगे.

८ खोरपांडे.

९ अवस्थी.

१० तेवराशी प्रभाकर.

कान्यकुब्जाचें प्राचीन साम्राज्य, आणि विस्तीर्ण प्रदेश.

प्राचीनकाळीं, कान्यकुब्जांचें प्रचंड साम्राज्य होतें, असें दिसतें. कारण ह्यांतील कान्यकुब्ज नामक राजधानींत, अथवा कनोज नांवाच्या शहरांत, फक्त तांबोळ्यांचींच तीस हजार दुकानें असून, ह्या नगराच्या सभोंवार जी तटाची भिंत होती, ती तर पंधरा कोस लांबीची होती, असें सांगतात. त्यामुळें, आणि त्याच्या एकंदर वैभवावरून देखील, मुसलमान इतिहासकार मुद्धां ह्या राजाला सर्व हिंदुस्थानचा सार्वभौम पादशहा असा किताब देतात. तथापि, मुसलमानांनीं तें अगदींच उध्वस्त करून टाकिलें असल्या कारणानें, त्याची जणुकाय रांगोळीच झाली आहे. इतकेंच नव्हे तर, पूर्वीच्या वैभवाचा हल्लीं तेथें मागमूसही राहिला नाहीं. कारण,

१ हें कानपुरापासून २५।३० कोसांवर, गंगेच्या कांठीं आहे.

२ एल्फिन्स्टनकृत हिंदुस्थानचा इतिहास, पान ५५४ पहा.

इस्लामशाहींत जुन्या राजवाड्याचा रंगमहाल बनला. हिंदूंच्या देवालयांचे नक्षीदार स्तंभ जुम्मामशीदीला लाविले. कित्येकांचा उपयोग मखदम जहनियव सारख्या इमारतींत केला. आणि राहिले साहिले नायनाट झाले.

कान्यकुब्ज असें नांव पडण्याचें कारण.

ह्या शहराला कान्यकुब्ज असें नामधेय पडण्याचें कारण असें सांगतात कीं, तेथल्या राजाची कन्या कुब्जा होती. आणि तिच्यामुळेंच त्याच्या राजधानीला हें नांव प्राप्त झालें होतें. तथापि, ही कन्या कालान्तरानें श्रीकृष्णाच्या कृपेनें अगदीं साफ होऊन, तिचें व्यंग अजिबात नाहींसें झालें असल्याविषयीं आख्यायिका आहे.

कान्यकुब्जाचें प्राचीनत्व.

सदरहू हकीकतीवरून, ह्या शहराचें प्राचीनत्व, अयोध्या, हस्ति-

---

१ तथापि, ह्या इस्लामशाहीच्या सपाट्यांतही कित्येक मूर्तींचा नाश न होतां, त्या अचानक वांचल्या. ह्या राहिलेल्या मूर्ती सिंग भवानी नांवाच्या गांवांत आहेत.

(Journal Asiatic Society of Bengal. 1865.P.209.)

२ ह्याचेंच इंग्रजींत औध असें झालें आहे. अयोध्या हें नांव "औदिच्य" म्हणजे उत्तरेकडील, या शब्दापासून झालें असावें, असें वाटतें. ह्यालाच साकेत अशी संज्ञा आहे.

३ हें शहर [illegible] दिल्ली नसून, तें [illegible] पूर्वेस एका स्वतंत्र [illegible] ठिकाण होतें; व तें पुरुकुलांत उत्पन्न झालेल्या सोमवंशीय [illegible] प्रतिष्ठापित केलें होतें.

( भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पु. [illegible], भाग १९ वा, पान १५६.

नापूर, आणि इन्द्रप्रस्थ, ह्या ऐतिहासिक व पुराण शहराप्रमाणेंच असल्याचें वाचकांच्या ध्यानांत सहजीं येईल.

कनोजे ब्राह्मणांची वस्ती.

असो. कनोज येथें पूर्वी ब्राह्मणांची फारच मोठी वस्ती असे. परंतु, कांहीं कालपर्यंत त्या विस्तीर्ण प्रांतांत इस्लामशाहीचा विशेष धुडगुस मातल्यामुळें, ती दिवसानुदिवस बरीच कमी होऊन, हल्लीं तर संपुष्टांतच आल्यासारखी झाली आहे. तथापि, तिची व्याप्ती इतर ठिकाणीं झाली असून, ती अन्तर्वेदींत, म्हणजे गंगा आणि यमुना या नद्यांच्या दरम्यानच्या प्रदेशांत, अयोध्या प्रांतांत, बैसवाडा व सखर या परगण्यांत, आणि उत्तर हिंदुस्थान, मध्यहिंदुस्थान, व पश्चिमहिंदुस्थान, या ठिकाणीं, पुष्कळ पसरलेली आहे. कनोजे

त्यांचें तेज व बल.

ब्राह्मण मोठे लढवय्ये असून, मांसाहारी आहेत. तरी पण, त्यांजला आपल्या स्वतःच्या जातीविषयीं निस्सीम अभिमान आहे. कारण, कोणत्याही प्रसंगीं त्यांजला क्रोध येऊन त्यांची वृत्ति क्षुब्ध झाली, म्हणजे ते असें ह्मणतात कीं, "हं क्षत्रिय ब्राह्मण हैं." ह्यावरून, ब्राह्मण

---

१ हेंच सांप्रतचें दिल्ली होय. हें यमुना नदीच्या तटीं असून, कुरुदेशाच्या राजधानीचें शहर होतें.

(भारतीय साम्राज्य पूर्वार्ध, पु. ३रें, भाग १९.वा. पान १५६पहा),

वर्णाचें तेज व क्षात्रवर्गाचें बल, हीं त्यांच्यांत अजून देखील पुरीं मुसमुसत आहेत, असें चांगल्या प्रकारें व्यक्त होतें.

हे **कनोजे ब्राह्मण** खाण्याच्या संबंधानें, म्हणजे पाकशुद्धीविषयीं, फारच चौकस आहेत; आणि त्याच कारणानें, त्यांजबद्दल अशी एक थट्टेची ह्मण पडलेली आहे कीं, " **आठ कनोजे, और नव चूला.** "

### ३ गौड ब्राह्मण.

गौड ब्राह्मणांचा प्रदेश, व त्यांचें उगमस्थान.

**बंगाल** आणि **बहार** ह्या प्रांतांची **गौड** ही प्राचीनकाळची राजधानी असून, त्यावरूनच तद्देशीय ब्राम्हणांस **गौड ब्राह्मण** अशी संज्ञा पडली असल्याचें दिसतें. ह्यालाच पूर्वी **लखनावती** म्हणत असत; व तें इ. स. पूर्वी ७३० वर्षें **बंगाल** देशच्या राजधानीचें ठिकाण होतें. हें **राजमहालापासून** सुमारें बारा किंवा तेरा कोसांवर, **भागीरथीच्या** वामतटाकीं आहे. आणि **टॉलेमीच्या** ग्रंथांत " **ग्यांजिया रिजाया** " ( Gangia Regia ) नांवाचें सुप्रसिद्ध शहर देखील हेंच होय. पुढें **मोगलशाहींत**, ह्यालाच विशेष नांवारूपास आणण्याचें **हुमायून** पादशहाच्या मनांत आल्यावरून, त्यानें आपलीही राजधानी तेथेंच नेली, व त्याला **जन्हुतिआबाद** ( म्हणजे जान्हवी नदीच्या तीरावरील शहर ) असें

नांव दिलें. परंतु येथील हवा लोकांच्या शरीरप्रकृतीस माफक न असल्याकारणानें, हें शहर कालांतरानें स्वाभाविकेच अगदीं ओंस पडत चाललें. त्यामुळें, ह्या ठिकाणची वस्ती उठून, ती नदीतीराच्या वरच्या प्रदेशावर तौन्यास ( तौड्यास ) गेली.

असें सांगतात कीं, हें एकंदर शहर कमींत कमी बारा कोस क्षेत्रफळाचें होतें; ह्मणजे त्याची फक्त लांबीच आठ कोस असून, रुंदी सुमारें दीड कोस होती. ह्यावरून त्याचें प्राचीनवैभव सहजीं ध्यानांत येण्यासारखें आहे.

**गौडब्राह्मणां**ची वस्ती सामान्यतः **दिल्ली** प्रांतांत बरीच असून, **बंगाल्यांत** तर **कनोजे ब्राह्मणां**चीच ज्यास्त संख्या आहे. त्यावरून, हा मोबदला कसा आणि केव्हां झाला, याविषयींचें कुतूहल स्वभावतःच विशेष रीतीनें जागृत होतें.

तत्संबंधानें मतभेद.

आतां, ह्यासंबंधानें **गौडब्राह्मणां**ची अशी समज आहे कीं, **कलियुगाच्या** प्रारंभीं, ह्मणजे **पांडवांच्या** वेळींच, ह्यांनें **बंगाल्यांतून** स्थानांतर होऊन, ते दिल्लीच्या आसमंतांतील भागांत जाऊन राहिले. **जनरल कनिंह्याम्** सारख्यांचें असें मत आहे कीं, **गौड** ह्मणजे **उत्तरकोशला**चाच एक पोटभेद असून, सांप्रतच्या नकाशावरील जें **गोन्द**, तेंच **गौड** होय. कारण, **गौड** प्रांतांतील

श्रावस्तीचा कित्येक अवशिष्ट भाग तेथेंच उपलब्ध होतो. आणि म्हणूनच **गौड ब्राह्मण** व **गौडतग**, हे **बंगाल्यां**-तील **गौड** नामक राजधानींतले नसून, ते सदरीं निर्दिष्ट के-लेल्या प्रांतांतले होत, असें ते समजतात. **जॉर्ज क्यांबेल्चें** याहूनही अगदींच भिन्न मत आहे. तो असें ह्मणतो कीं, हे **हरिआणा** देशांतले असावेत. कांहींचें असें मत आहे कीं, **सरस्वती** नदीचा मुख्य फांटा **गुग्गुर** अथवा **घरगर** या नांवाचा असून, त्याचाच अपभ्रंश **गौड** असा झालेला आहे. तथापि, सदरहू मतांपैकीं, कशांतही विशेष तात्पर्य असल्याचें दिसत नाहीं.

गौडब्राह्मणांचे वीस प्रकार.

**गौड ब्राह्मणांचे** खालीं लिहिल्याप्रमाणें एकंदर वीस प्रकार आहेत.

१ **गौड** अथवा **केवल गौड**. हे सर्व **यजुर्वेदीच** आहेत; आणि मुख्यत्वेंकरून **हरिद्वारासच** राहतात.

२ **आदिगौड**. ह्यांत **स्मार्त** आणि **शाक्त** असे पोटभेद असून, त्यांपैकीं कित्येक **वल्लभानुयायी** देखील आहेत. यांत बहुतेक **शुक्ल यजुर्वेदीच** आहेत. तथापि, कांहींजण चाऱ्ही **वेदांचें** अध्ययन करणारेही सांपडतात. अंबाला नजीक तर बरेचजण **वेदान्ताचा** सुद्धां अभ्यास करतात; व थोडे बहुत न्यायही पाहतात. ह्यांपैकीं कित्येकांनीं मांसाहार अगदीं वर्ज्य केला आहे.

३ **शुक्लवाल आदिगौड**. हे **राजपुतान्यांतील**

जयपूर संस्थानचे होत, व ते शुक्ल यजुर्वेदी आहेत. ह्यांत कित्येक जोशीपणाचा धंदा चालवितात, व ते शैव आहेत.

४ ओजस. हे शुक्लवाल आदिगौडांपैकींच असून, त्यांपैकीं कित्येक शाक्त आणि कांहीं शैव आहेत. हे भिक्षावृत्ति, सरकारी नोकरी, शेतीभाती, आणि व्यापार-धंदा करून आपला गुजारा चालवितात.

५ सनाढ्य गौड. हे बरेच पसरलेले दिसतात. कारण, ते राजपुतान्याच्या पूर्वेस, मध्य हिंदुस्थानांत, उत्तर हिंदुस्थानांत, आग्रा प्रांतांत, मथुरेस, व अन्तर्वेदींत देखील दृष्टीस पडतात. हे यजुर्वेदीच आहेत; आणि सरकारी नोकरी अथवा भिक्षावृत्ति, शेतीभाती अगर व्यापारधंदा, इत्यादि करूनच ते आपला उदर-निर्वाह करतात.

६ चिंगल गौड. हे सनाढ्य गौडांपैकींच एका प्रकारांतले आहेत. हे मुख्यत्वेंकरून अलवार, तिजारा, वगैरे ठिकाणीं असतात.

७ दायमी. हे आदिगौडांपैकींच आपण आहोंत, असें म्हणवितात.

८ खंडेलवाल. हे देखील आदिगौडांपैकींच आहेत.

९ श्रीगौड. ह्यांपैकीं कांहीं सामवेदी असून, भार-

द्वाज गोत्रांतले आहेत. हे काशीस व माळव्यास दृष्टीस पडतात.

१० तांबोळी. हा श्रीगौडांचाच एक भेद होय. मात्र ते पानसुपारी, कात, तमाखू, लवंगा, वेलदोडे, इत्यादि विकून आपलें पोट भरतात. आणि म्हणूनच त्यांजला तांबोळी असें नामधेय प्राप्त झालें आहे.

११ आदिश्रीगौड. हा देखील श्रीगौडांचाच एक प्रकार आहे. हे दिल्ली, मथुरा, आणि वृन्दावन, येथें मुख्यत्वेंकरून राहतात.

१२ गुर्जर गौड. हे मध्य हिंदुस्थान व राजपुताना, येथें विशेषेंकरून राहत असलेले दृष्टीस पडतात.

१३ तेकवारा गौड. ह्यांजविषयींची म्हणण्यासारखी विशेष माहिती मिळत नाहीं.

१४ चमार गौड हे चांभारांचे उपाध्ये असल्यामुळें, त्याजला हें नांव पडलें आहे.

१५ हरियान गौड. हें नांव हरियान नामक प्रांतावरून त्यांस प्राप्त झालें असल्याचें दिसतें. तथापि, ह्यांचा प्रवेश राजपुतान्यांत देखील झाला आहे.

१६ कीर्तन गौड. हे बहुतकरून कीर्तन करतात; किंवा गातात; अथवा एखादें वाद्य वाजवितात. आणि हाच धंदा चालविण्यासाठीं, ते राजपुतान्यांत अगर न्यायव्य प्रांतांत फिरून, आपला उदरनिर्वाह करतात.

१७ शुक्ल गौड. हे भिक्षुकी करतात. परंतु, ब्राम्हणांखेरीज इतरांपासून ते दान घेत नाहींत.

१८ बिरेशवाला. ह्यांचें नांव प्रिन्सेपच्या यादींत आहे.

१९ सिलुजन. हे देखील प्रिन्सेपच्या यादींत आढळून येतात.

२० चुमुवालगौड. ह्यांचें वास्तव्य मुख्यत्वेंकरून मारवाडांतच आहे.

छन्यात.

ब्राह्मणांत एकमेकांचा परस्पर रोटीव्यवहार आणि बेटीव्यवहार ज्यास्त वाढावा एतदर्थ, गौड ब्राह्मणांनीं सहा जाती मिळून, म्हणजे ब्राह्मणांच्या एकंदर असलेल्या सहा प्रकारांमिळून, एक निराळीच आणि अगदीं स्वतंत्र जात काढली; आणि तिला " छन्यात " असें नांव दिलें. हींत १ गौड, २ गुर्जर गौड, ३ दिव, ४ सारस्वत, ५ सिकावर, आणि ६ पारख, असे सहा प्रकार सामील केले आहेत.

## उत्कल ब्राह्मण.

उत्कल ब्राह्मण.

ह्या ब्राह्मणांस उत्कल असें नामधेय त्या नांवाच्या प्रांतावरून पडलेलें असल्याचें उघड दिसतें. हा देश जगन्नाथाच्या सर-

हद्दीवर असून, तद्विषयक वर्णन खालीं लिहिल्याप्रमाणें आढळून येतें.

**जगन्नाथ प्रांत देश ।**
**उत्कलः परिकीर्तितः ॥**

सांप्रतच्या **ओरिसा** प्रांताचा देखील यांतच समावेश होतो, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. **ओड्र** देशाचा उल्लेख **मनुस्मृतींत**[1] केला आहे; आणि **ओड्र** व **उत्कल** हे दोन्ही पर्याय शब्दच दिसतात.

त्यांचे पोटभेद, ह्या जातींत १ **शासनी**, २ **श्रोत्रिय**, ३ **पन्द**, ४ **घाटीय**, ५ **महास्थान** आणि ६ **कलिंग**, असे सहा प्रकार असून, त्यांतही आणखी खालीं लिहिल्याप्रमाणें पोटभेद आहेत.

**१ शासनी.**

| | | |
|---|---|---|
| १ सावन्त. | ५ कारा. | ९ सेनापति. |
| २ मिश्र. | ६ आचार्य. | १० पर्णाग्रही. |
| ३ नन्द. | ७ सतपस्ती. | ११ निशंक. |
| ४ पते. | ८ बेदी. | १२ बाडनिपति. |

**२ श्रोत्रिय.**

१ शुद्ध. २ सोनारबनी. ३ तेली. ४ अग्रभक्ष.

**३ पन्द.**

१ दाज. २ तिपादी. ३ पय.

---

१ म. स्मृ. अध्याय १० वा, श्लोक ४४ वा पहा.

| | | |
|---|---|---|
| ४ वाघी. | ७ पनी. | १० सालू. |
| ५ मौरी | ८ पाधा. | ११ पादहारी. |
| ६ देवता. | ९ वहली. | |

### ४ घाटीय.

| | | |
|---|---|---|
| १ घाटी. | २ नवगये. | ३ वैतर्णीये. |

### ५ महास्थान.

| | |
|---|---|
| १ महास्थान. | २ मस्तान. |

### ६ कलिंग.

ह्यांत पोटभेद असल्याचें कळून येत नाहीं.

व अन्य सूक्ष्म विचार.

सदरीं दिलेल्या साही प्रकारांपैकीं, **शासनी** हे कुलीन असून, **यजुर्वेदी** आहेत. मात्र, त्यांत कित्येक **माध्यंदिन** शाखेंतले **शुक्लयजुर्वेदी** आहेत; आणि कांहीं **कृष्ण यजुर्वेदी**ही असल्याचें कळून येतें. हे यांच्या शिवाय अन्य **ब्राह्मणां**शीं पंक्तिभोजन किंवा अन्नव्यवहार करीत नाहींत. **ओरिसा** प्रांताच्या दक्षिण किनाऱ्यावरील व **तेलंगण** देशांतले **नन्द ब्राम्हण** हे फारच पुढें सरसावलेले दिसतात. **श्रोत्रिय ब्राम्हणां**त जे चार वर्ग आहेत, त्यांपैकीं **शुद्ध श्रोत्रिय** हे, **ब्राह्मण** आणि **कायस्त** यांचें उपाध्येपण चालवितात. **सोनारवनी** हे सोनार व कासार यांच्याकडे भिक्षुकी करतात. **तेली ब्राह्मण** हे तेली, तांबोळी, व धोबी, यांजकडे पौरोहित्य चालवितात. **अग्र**-

भक्षक ब्राम्हण हे और्ध्वदैहिक क्रिया करतात; आणि त्यामुळें त्यांची गणना हीन ब्राह्मणांत होते. हे देवलक व ग्रामयाजक यांच्याच पंक्तींतले असल्याविषयीं कांहींची समज आहे. सबब, ह्यांच्या गौणत्वाच्या संबंधानें, दुसऱ्यांशीं यांचा रोटीव्यवहार अथवा बेटीव्यवहार मुळींच होत नाहीं. पन्द्र हे यात्रेकऱ्यांचे उपाध्ये होत. चवथ्या वर्गापैकीं कित्येक ब्राम्हण नद्यांच्या घांटावर असतात. कांहीं फिरते राहून यात्रेकऱ्यांस नव्या गयेस नेतात. व कित्येक त्यांस वैतर्णातीरीं पोहोंचवितात. हे सर्व यात्रेकऱ्यांचें उपाध्येपण चालवून पोट भरतात. महास्थान हे शेतीभाती आणि बागायत करून आपला उदरनिर्वाह चालवितात. त्यामुळें, हा धंदा चालविण्यांतच त्यांजला मोठें भूषण वाटून, ते वेदाध्ययन करणाऱ्या ब्राम्हणांचा उपहास करतात, आणि भिक्षा मागणाऱ्या द्विजांस हंसतात. कलिंग ब्राह्मणांची वस्ती हिंदुस्थानच्या आग्नेयी दिशेस असून, ती कृष्णा नदीपासून कलिंगपट्टणापर्यंत पसरलेली आहे. हे कण्व शाखेंतले यजुर्वेदी असावेत असें म्हणतात. तथापि, खानपानादि व्यवहारांत ते इतके भ्रष्ट आहेत कीं, त्यांच्या एकंदर आचारावरून जर विचार केला, तर ते ब्राम्हण असल्याचें देखील भासत नाहीं. हे शेतीभाती करून, आणि बैलगाडी हांकून, आपला चरितार्थ चालवितात, व गुजारा करतात.

उद्रीय किंवा उत्कल ब्राम्हणांत अनेक पंथ असून, त्यापैकीं कांहीं शैव, कांहीं गाणपत्य, कांहीं शाक्त, आणि कित्येक माध्व, व वल्लभानुयायी आहेत.

त्यांत असलेले पंथ.

### मैथिल ब्राम्हण.

ह्या ब्राम्हणांस मैथिल हें नामधेय मिथिल देशावरून पडलेलें आहे. हा देश सुप्रसिद्ध जनक राजाच्या ताब्यांतील असून, येथेंच तो फार प्राचीन काळीं राज्य करीत असे. तिरहूट, सारण, आणि पूर्णिय हे प्रांत, व नेपाळच्या दक्षिणेकडील भाग, यांनीं मर्यादित असलेला जेवढा ह्मणून प्रदेश हल्लीं दिसून येतो, तेवढ्या सर्वांचा समावेश मिथिल देशांतच प्राचीन काळीं होत असे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

मैथिल ब्राह्मण.

असो. ह्या ब्राम्हणांचे मुख्य सहा प्रकार आहेत. तथापि, त्यांतही आणखी कांहीं पोटभेद दिसून येतात. सबब, त्यांचा तपशील येथें देतों.

त्यांचे प्रकार व दुसरे पोटभेद.

१ ओज. ह्यांनाच उझा, किंवा झा, अशीही संज्ञा असल्याचें कळतें; व ओज हें नांव उपाध्यायापासून प्राप्त झालें असावें, अशी कित्येकांची समज आहे. कारण, ते उपाध्याय शब्दाचाच उपाझ्झा = ओझा = झा,

अशा रीतीनें परंपरेनें अपभ्रंश झाल्याचें मानतात. हे **शुक्ल यजुर्वेदी** असून, कांहीं **माध्यंदिन** आणि कांहीं **राननीय** शाखेंतले आहेत. मात्र, ते **कालीभवानीचे** उपासक असल्यामुळें आपणांस शाक्त म्हणवितात.

२ **ठाकुर**. हे उच्च वर्गांतले मिश्र होत.

३ **मिश्र**. ह्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें पांच पोट-भेद आहेत.

१ **चौधरी**. हे आपणांस चार **वेदांचे** अधिकारी ह्मणवीत असत; आणि त्यावरूनच हें नामधेय त्यांजला प्राप्त झालें असल्याचें दिसतें. तथापि, हल्लीं त्यांच्यांत फक्त **यजुर्वेदी** व **सामवेदीच** आढळून येतात.

२ **राय**. हे **सामवेदी** आणि **शुक्ल यजुर्वेदी** आहेत.

३ **परिहस्त**. हे देखील **सामवेदी** व **शुक्ल यजुर्वेदीच** आहेत.

४ **खान**. हे **शुक्ल यजुर्वेदी** असून, **माध्यंदिन** शाखेंतील आहेत.

५ **कुमार**. ह्यापैकीं कांहीं **सामवेदी** आणि कांहीं **शुक्ल यजुर्वेदी** आहेत.

४ **पूर**. हे **ऋग्वेदी** असून, ह्यांच्यांत १ **बकरीयार**, व २ **चेरवीयार**, असे दोन भेद आहेत.

५ **श्रोत्रिय**. ह्यांसच **सोटी** अशी देखील संज्ञा आहे. हे ब्राह्मण श्रुतींत निपुण असल्या कारणानें, त्यांजला **श्रोत्रिय** हें नांव पडलें असल्याचें दिसतें. ह्यापैकीं कांहीं **कौटुंभ** शाखेंतील **सामवेदी** असून, कांहीं **माध्यंदिन** शाखेंतील **शुक्ल यजुर्वेदी** आहेत

६ **भुइहर**. हे बहुतेक सर्व जमीनदार असून, आपला चरितार्थ शेतीभाती करून चालवितात. आणि ह्या **ब्राम्हणांनीं** पुष्कळ जमीन संपादन केली असल्यामुळेंच त्यांजला **भूमिहर** असें नांव पडून, त्याचाच **भुइहर** असा अपभ्रंश झाला असावा, असें वाटतें.

त्यांचा प्रसार.

हे **ब्राम्हण** बहुतकरून सर्व ठिकाणींच पसरलेले असल्याचें आढळतें. कारण, **नेपाळ**, **बंगाल**, आणि **मध्यहिंदुस्थान**, व त्याच्याही पलीकडे **महाराष्ट्र** देशांत देखील आहेत. हे मोठे विद्वान असतात; आणि **न्यायशास्त्रांत** तर ह्यांची विशेषेंकरून प्रवीणता असल्या कारणानें, त्या शास्त्राचें अध्ययन होण्यासाठीं, कित्येक **महाराष्ट्र ब्राम्हण** देखील **तिरहूटास** जातात. ह्यांच्या विद्वत्तेमुळें, **पेशव्यांच्या** दरबारांत त्यांजला मोठा मान मिळे. इतकेंच नव्हे तर, द्रव्याच्या संबंधानें देखील त्यांचें सर्व प्रकारें स्वास्थ्य होई. अशा तऱ्हेनें त्यांजला प्रोत्साहन मिळाल्या

कारणानें, त्यांचीं पुष्कळ कुटुंबें आमच्या **महाराष्ट्र** देशांतच येऊन राहिलीं आहेत.

त्यांचे पंथ.

ह्यापैकीं, कांहीं **वैदिक** आणि कांहीं **शास्त्री** असून, त्यांत कित्येक **रामानन्दी** व कित्येक **शाक्त** पंथांतले आहेत. ह्यांची वस्ती **तिरहूट** प्रांतांत इ० स० च्या अकराव्या शतकांत झाली असावी, असें वाटतें. कारण, यांची स्वस्थता **नान्यपदेव** राजाच्या कारकीर्दीतच[1] झाली, आणि ह्यानेंच हा **तिरहूट** प्रांत, इ० स० १०९७ सालीं सर करून आपल्या राज्याला जोडला. हा राजा तराई प्रदेशांत **सहनगड** येथें राज्य[2] करी, व ह्यालाच **सिमरूण** असें म्हणत.

त्यांचीं अडनांवें, व रोटी आणि बेटी-व्यवहार.

**मिथिल** देशांत, १ **ठाकूर**, २ **मिश्र**, आणि ३ **ओज** अशीं तीनच अडनांवें ( ह्मणजे उपनामें प्रचारांत असल्याविषयीं **कोलब्रुक**[3]ची समज असे. परंतु खरोखर पाहतां, ४ **चौधरी**, ५ **राय**, ६ **परिहस्त** ७ **खान**, व ८ **कुमार**, अशींही दुसरीं अडनांवें असल्याचें समजतें. ह्या सर्वांत आपापसांत **रोटी** आणि **बेटी**व्यवहार होतो, असें ह्मणतात.

---

१ Journal Asatic Society Vol. IV, P, 123.

२. Prinsep's Tables. P. 271

३ Asiatic Researches. Vol V P. 66

असो. येथपर्यंत पंचगौडांचें यथावकाश विवेचन झालें. सबब, आतां पंचद्राविडांकडे वळूं, आणि त्यांच्याबद्दलची तपशीलवार हकीकत देऊं. पंचद्राविडांत खालीं लिहिलेले पांच वर्ग आहेत.

पंचद्राविड ब्राह्मण.

१ महाराष्ट्र. हे महाराष्ट्र देशांतले ब्राम्हण होत; व हे सर्व मराठी भाषाच बोलतात.

२ आन्ध्र. हे तैलंगण देशांतले भूदेव असून, ते तेलगू भाषा बोलतात.

३ द्रविड. हे द्रविड देशांतले द्विज आहेत. तथापि, त्यांची व्यावहारिक भाषा तामिल होय.

४ कर्णाट. हे कर्नाटक देशांतले विप्र समजावयाचे. आणि हे कानडी भाषा बोलतात.

५ गुर्जर. हे गुजराथ प्रांतांतले अग्रजन्म असून, ते गुजराथी भाषा बोलतात.

ह्या प्रत्येक वर्गांतही आणखी दुसरे अनेक पोटभेद आहेत. सबब, त्या सर्वांचाच क्रमशः विचार करूं.

## माहाराष्ट्र ब्राम्हण.

हें नांव या ब्राम्हणांस ते ज्या देशांत राहतात, त्यावरून पडलें असल्याचें उघड दिसतें. तथापि, ज्या देशावरून त्यांजला हें नामधेय प्राप्त झालें आहे, त्याची सा-

महाराष्ट्र ब्राम्हण, व हें नांव पडण्याचें कारण

मान्य व्याप्ति व त्याची सहजीं लक्षांत येण्यासारखी मर्यादा, यांविषयीं थोडासा तरी उल्लेख करणें विशेष अगत्याचें आणि फार इष्ट वाटतें. यासाठीं, प्रथमतः तत्संबंधींच दिग्दर्शन येथें करतों.

महाराष्ट्र देशाची सामान्य सीमा.

स्थूलमानानें पाहिलें तर, **महाराष्ट्र** देशाच्या उत्तरेस **दमणगंगा**, **धरमपूरचें** संस्थान, **नान्दोनचें** राज्य, **सातपुडा** पर्वत, आणि त्याच्याही पलीकडे **विंध्याचलाचा** थोडासा भाग, **नर्मदा** नदीच्या उगमानजीकचा प्रदेश, **वर्धा**, **वाईनगंगा**, व पूर्वेकडील **गोदावरीचा** प्रवाह, इत्यादि असून, त्याच्या दक्षिणेस **तुंगभद्रा** आणि **कृष्णा**, या दोन नद्या आहेत. तसेंच, त्याच्या पश्चिमेस **आरबी समुद्र** असून, पूर्वेस **बंगालचा** उपसागर आहे. ह्यावरून, या देशाचा विस्तार व त्याचें परिमाण, हीं वाचकांच्या ध्यानांत सहजीं येतील.

महाराष्ट्र ब्राह्मणांचे चौतीस प्रकार.

**महाराष्ट्र ब्राम्हणांत** एकंदर चौतीस प्रकार आहेत. सबब, त्यांचा तपशील येथें देतों:—

| | | |
|---|---|---|
| १ कोंकणस्थ. | ५ माध्यंदिन. | ९ किरवन्त. |
| २ देशस्थ. | ६ पाध्ये. | १० त्रिगुळे. |
| ३ कऱ्हाडे. | ७ देवरुखे. | ११ जावळे. |
| ४ काण्व. | ८ पळशे. | १२ आभीर. |

| | | |
|---|---|---|
| १३ सवाशे. | २१ शेणवी. | २८ कुशस्थली. |
| १४ कास्त. | २२ नरवाणकर. | २९ खडापे. |
| १५ कुंडगोळक. | २३ केळोसकर. | ३० खजुले. |
| १६ रंडगोळक. | २४ बारदेसकर. | ३१ मैत्रायणी. |
| १७ ब्राह्मणजाई. | २५ कुडाळदेसकर अथवा कुडाळे ब्राम्हणें. | ३२ वऱ्हाडी ब्राह्मण. |
| १८ सामवेदी किंवा सोपारे ब्राम्हण. | | ३३ वऱ्हाडी ऋग्वेदी |
| | | ३४ झाडे किंवा नागपुरी ब्राम्हण. |
| १९ हुसेनी. | २६ पेडणेकर. | |
| २० कलंकी. | २७ भालावालेकर. | |

सदर्हूचे क्रमशः विवेचन केलें तर बरें, असें समजून तें खालीं लिहिल्याप्रमाणें करतों.

कोंकणस्थ ब्राह्मण, व त्यांसंबंधी कथानक.

१ **कोंकणस्थ.** ह्यांनाच **चितपावन** किंवा **चित्तपावन** म्हणण्याचा प्रचार आहे. ह्यासंबंधानें अशी एक आख्यायिका आहे कीं, **परशुरामानें** आपल्या स्वतःचें और्ध्वदैहिक आणि श्राद्धकर्म करण्यासाठीं, त्याच्या **क्षेत्रां**त पडलेल्या साठ **ब्राह्मणां**च्या चितांस सजीव केलें; आणि त्यांजला विद्या, सौन्दर्य, व लक्ष्मी, इत्यादि षड्गुणैश्वर्य दिलें.

परंतु, हें कथानक विशेष संभवनीयसें दिसत नाहीं. सबब, त्याबद्दल ज्यास्त विचार न करतां, एतद्विषयक दुसरें कांहीं प्रमाण असलें तर पाहूं, आणि त्यासंबंधानें विचार करूं.

दुसरी आख्यायिका.

आम्हां **कोंकणस्थांचें** राहण्याचें मुख्य ठिकाण किंवा क्षेत्र **शूर्पारक** असून, त्याच्या पूर्वेस सह्य[1]पर्वत, पश्चिमेस **आरबी** समुद्र, उत्तरेस **वैतर्णा**, आणि दक्षिणेस **सुब्रह्मण्या** नदी, याप्रमाणें होतीं. आतां, **शूर्पारक** प्रांताची एक स्वतंत्रच राजधानी असे, व तिचें नांव **चित्तपोलन** होतें. ह्याचाच पुढें **चिपळुण** असा अपभ्रंश झाला असून, तें कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे. याठिकाणीं **ब्राह्मणांची** वस्ती पूर्वीं पुष्कळ होती, आणि हल्लींही बरीच आहे; व हे सर्व विशेषेंकरून **चित्तपोलन** (चिपळुण) चेच राहणारे असल्या कारणानें, त्यांजला **चित्तपावन** अथवा **चितपावन** असें नामधेय पडलें असावें, असें सहजीं अनुमान होतें.

कोंकणस्थांचीं चवदा गोत्रें.

**कोंकणस्थांचीं** चवदा **गोत्रें** असून साठ उपनामें आहेत. सबब, त्यांचा तपशील येथें देतों.

## १४ गोत्रें.

| | | |
|---|---|---|
| १ काश्यप. | ६ नित्तुन्दन. | ११ वत्स. |
| २ शांडिल्य. | ७ भारद्वाज. | १२ बाभ्रव्य. |
| ३ वासिष्ठ. | ८ गार्ग्य. | १३ कौशिक. |
| ४ विष्णुवर्धन. | ९ कपि. | १४ अत्रि. |
| ५ कौण्डिन्य. | १० जामदग्न्य. | |

[1] सह्याद्रिखंड. अ. ८१।८२ पहा.

## ६० उपनामें.

त्यांचीं साठ उप-नामें.

### १ काश्यप गोत्रांतील.

| | | |
|---|---|---|
| १ लेले. | ३ जोग. | ५ गोखले. |
| २ गानु. | ४ ल्व्हाटे. | |

### २ शांडिल्य गोत्रांतील.

| | | |
|---|---|---|
| १ सोमण. | ४ गणपुले. | ६ जोशी. |
| २ गांगल. | ५ दामले. | ७ परचुरे. |
| ३ भाटे. | | |

### ३ वशिष्ठ गोत्रांतील.

| | | |
|---|---|---|
| १ साठे. | ५ बागुल. | ९ पोंगशे. |
| २ बोडस. | ६ धारु. | १० विंझे. |
| ३ ओक. | ७ गोगटे. | ११ साठये. |
| ४ आपटे. | ८ भाभे. | १२ गोणवडचे. |

### ४ विष्णुवर्धन गोत्रांतील.

| | |
|---|---|
| १ किडमिडे. | ३ परांजप्ये. |
| २ नेने. | ४ मेहेन्दळे. |

### ५ कौण्डिन्य गोत्रांतील.

| | |
|---|---|
| १ पटवर्धन. | २ फणशे. |

### ६ नित्युन्दन गोत्रांतील.

| | |
|---|---|
| १ वैशंपायन. | २ भाडभोके. |

## ७ भारद्वाज गोत्रांतील.

१ आचवले. ३ दर्वे. ५ रानडे.
२ टेणें. ४ गान्धारे. ६ घांघुरडे.

## ८ गार्ग्य गोत्रांतील.

१ कर्वे. ३ लोंढे. ५ दाबके.
२ गाडगीळ. ४ माटे.

## ९ कपि गोत्रांतील.

१ लिमये. ३ जाईल.
२ खांबेटे. ४ माईल.

## १० जामदग्न्य गोत्रांतील.

१ पेंडसे. २ कुंटे.

## ११ वत्स गोत्रांतील.

१ मालशे.

## १२ बाभ्रव्य गोत्रांतील.

१ बाळ. २ बेहेरे.

## १३ कौशिक गोत्रांतील.

१ गद्रे. ३ भावे. ५ आपटे.
२ बाम. ४ वाड.

## १४ अत्रि गोत्रांतील.

१ चितळे. २ अठवले. ३ भाडभोके.

सदर्हू साठ उपनामें अगदीं प्राचीन असून, ह्याशिवाय दुसरीं दोनशेंचव्वेचाळीस अर्वाचीन उपनामेंही आहेत. मिळून एकंदर तीनशेंचार अडनांवें आम्हां **कोंकणस्थांत** सांप्रतकाळीं असल्याचें कळतें. ह्यांत कांहीं **ऋग्वेदी** आणि कांहीं **यजुर्वेदी** आहेत; व **ऋग्वेदी** हे **आश्वलायन** शाखेंतले असून, **यजुर्वेदी** मात्र **तैत्तिरीय** शाखेंतले होत. वर निर्दिष्ट केलेल्या पुराण साठ उपनामांपैकीं, सदतीस **आश्वलायन** शाखेंतलीं आणि तेवीस **तैत्तिरीय** शाखेंतलीं आहेत; व नूतन दोनशें चव्वेचाळीस अडनांवांपैकीं, एकशें अठ्याहत्तर **आश्वलायन** आणि सहासष्ट **तैत्तिरीय** शाखेंतलीं आहेत. आम्हां परस्परांत **रोटी** आणि **बेटी** व्यवहार होतो. मात्र, शरीरसंबंध होते वेळीं, वधू आणि वर हे एकाच गोत्रांतले व प्रवरांतले आहेत कीं कसें, याबद्दलचा अवश्य तपास करावा लागतो; आणि तीं तशीं नसलीं तरच लग्नाचें जुळतें. तथापि, क्वचित् प्रसंगीं अज्ञानानें समगोत्रांचा अथवा प्रवरांचा लग्नविधि झालाच तर, त्याला गौणत्व येतें. इतकेंच नव्हे तर, त्या जोडप्यापासून झालेल्या प्रजेस **सप्रवर** म्हणतात.

दुसरीं अर्वाचिन उपनामें.

आतां, ज्याप्रमाणें **भरतखंडांत ब्राह्मण** हा ठरलेला श्रेष्ठ वर्ग आहे, त्याचप्रमाणें त्यांची खरी योग्यता असून, विदेशीय देखील

महाराष्ट्र ब्राम्हण व त्यांची कार्य क्षमता.

त्यांस तसेंच मानतात कीं काय, यांबद्दलचा थोडासा विचार करूं; आणि **महाराष्ट्र ब्रांह्मणाबद्दल** त्यांचा कसा अभिप्राय आहे, हें पाहूं.

आपण इतस्ततः जराशी दृष्टि फेंकली तर, आपणांस असें तेव्हांच दिसून येईल कीं, राजकीय कार्यांत, किंवा मोठमोठ्या जबाबदारीच्या कामांत, **ब्राम्हण** हेच कायमचे पुढारी असल्यानें, त्यांनीं अखिल दिशा व्यापून, सर्व महत्वाचे कारभार उचलले आहेत. राजकीय आणि न्यायखातें, फौजदारी व दिवाणी खातें, मुलकी आणि हिशेबी खातें, पैमाष व टपालखातें, वैद्यकीय आणि विद्याखातें, धर्म व व्यापारखातें, इत्यादि अनेक शाखांत, अथवा शास्त्रकलादि विषयांत, केवळ **ब्राम्हणच** पाहिजेल त्या बरोबर टक्कर मारून पुढें सरसावलेले आहेत; आणि ही गोष्ट **आंग्लप्रभूस व पाश्चात्य** इतिहासकारांस देखोल कबूल करणें भाग पडतें. कारण, सरकार दरबारच्या लेखांत सुद्धां, त्यांनीं एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं,

"The Deccani Brahmans fill *all the most important professional services*, and are also *priests*, *money lenders*, *general traders*, and, as has been shown, *not only superior holders of land, but actual cultivators* in some parts. The Brahmans are *self reliant*

and in no fear of the necessity of resorting to relief works, even in the severest distress."

( The Statistical Atlas of the Bombay Presidency. 1888. Prepared under Government orders, as per Section 17 of the Famine Relief Code, by the Director of Land Records and Agriculture Printed at the Government Central Press. Bombay. 1889. ) P. 20.

**भरतखंडांतील** जातीसंबंधीं लिहितांना, **जॉन विल्सन्** हा एके ठिकाणीं असें म्हणतो कीं, **ब्राम्हण** हे इस्लाम-शाहींत देखील हल्लींच्या सारखेच पुढें सरसावलेले असून, **बुऱ्हाण निजामशहानें** तर त्यांजलाच पेशव्याचीं वस्त्रें दिलीं होतीं. आणि सांप्रतकाळीं सुद्धां, ते मोठमोठ्या हुद्यांवर असून, आपलीं सर्व जबाबदारीचीं कामें फारच समाधान-कारक रीतीनें बजावितात.[१]

कोंकणस्थ ब्राम्हण, व त्यांबद्दल पाश्चात्यांचे लेख.

**कोंकणस्थ ब्राम्हणांविषयीं ग्रॅंटडफ्** असें लिहितो[२] कीं, ज्या ज्या **ब्राम्हणांची** व माझी ओळख झाली, अथवा जे जे माझ्या पाहण्यांत आले, त्या सर्वांत **कोंकणस्थ** हे फारच बुद्धिमान असून, त्यांजला ज्यास्त तारतम्य आहेसें दिसतें.

---

१. Indian Castes Vol. II.

२ ग्रॅंट डफकृत मराठ्यांचा इतिहास. पान ५. आवृत्ति तिसरी पहा.

काश्मीरी ब्राम्हणांसंबंधीं लिहितांना, सर. जी. क्यँबेल असे म्हणतो कीं, महाराष्ट्र ब्राम्हणांप्रमाणें काश्मीरी ब्राम्हण हे फारसे मोठमोठ्या हुद्यांवर दृष्टीस पडत नाहींत. ह्यावरून महाराष्ट्र ब्राम्हणांची कार्यक्षमता ते पर्यायानें व्यक्त करतात, हें उघड आहे.

सर्व ब्राम्हणांवर कोंकणस्थांची नाव व त्यांची सरशी.

सर्व ब्राह्मणांत कोंकणस्थ किंवा चित्तपावन ब्राम्हण हे विशेष समन्जस, चलाख, बुद्धिमान, राजकार्यधुरंधर, शूर, पराक्रमी, आणि निपुण असल्याविषयीं जगत्प्रसिद्ध आहे. व ही गोष्ट इतिहासावलोकनावरूनही सिद्धवत् ठरते. ह्या गोष्टीची सत्यता परद्वीपस्थ जे पाश्चात्य त्यांसही भासमान झालेली असून, त्यांनीं आपला अनुभव इतिहासांत[२] आणि खानेसुमारीच्या अहवालांत[३] नमूद केला आहे. हे ब्राम्हण सर्व कार्यांत कुशल असून, अखिल शास्त्र-

१ Ethnology of India. ( J. R. A. S. Bengal A. S. N. S. 1866, P. 57-58. )

२ " Of all the Bráhmans with whom I am acquainted, the Kokanists are the most sensible and intelligent."

( Grant Duff s History of the Marathas. ) Third Edition. P. 5.

३ Further North come the well known Kon-

( पुढें चालू. )

कलांत प्रविण आहेत. ते केवळ स्वतःच्या बुद्धिचातुर्यानेंच दुसऱ्यावर आपली छाप बसवितात. फक्त आपल्या कर्तबगारीनेंच अन्य राष्ट्रावर आपलें प्रभुत्व चालवितात. केवळ युक्तिप्रयुक्तीनेंच निव्वळ रानटी लोकांसही आपलेसें करून घेतात. आणि हरएक सल्लामसलतीनें पितृवत् प्रजापालन करितात.

ह्या संबंधानें क्याल्डवेल पाद्री असें म्हणतात कीं,[१]

"The Bráhmans acquired *their ascendency by their intelligence* and *their administrative skill.*"

ह्यांच्याविद्वत्तेच्या संबंधानें देखील; पाश्चात्य आणि

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालु. )

kanasth Brahmen, sometimes called Chitpawan, who gave to the Maráthas their line of Peshwas."

( Census of India, 1891. General Report by J. A. Baines. S. S. I. C. S. ) Printed 1893. P. 184.

१. A comparative Grammar of the Dravidian or South Indian Family of Languages. By the Rev. R. Caldwell. B. A. Missionary, Southern India. P.35.

२ मोक्षमुल्लर, मॉनियरविल्यम्स. बरनाफ्, इत्यादि विद्वानांचे ग्रंथ पहा.

पौरस्त्य[3] राष्ट्रं यांची मोठी तारीफ करतात, व त्यांचे वारंवार पवाडे गातात.

मिस्तर बेन्स् सेन्सस् कमिशनर हा एके ठिकाणीं[2] असें लिहितो कीं,

"The Brāhmans of Western India have for *generations borne a high reputation for scholarship.*"

असो. **कोंकणस्थ ब्राह्मणां**विषयीं ज्यास्त पाल्हाळ न लिहितां, येथें थोडक्यांत इतकेंच सांगतों कीं, ज्यांनीं अखिल **भरतखंडाच्या** राज्यकारभारांचीं सूत्रें आपल्या हातीं कांहीं कालपर्यंत ठेवून, जे सर्व **महाराष्ट्र देशाचे** आणि बहुतेक **हिंदुस्थानचे** सार्वभौम राजे बनले होते, ते सुप्रसिद्ध **पेशवे**[3] **कोंकणस्थच** होत. त्याचप्रमाणें, सुविख्यात राजकार्यधुरंधर **नानाफडणीस** व पराक्रमी लढवय्ये **परशुरामभाऊ पटवर्धन** आणि **बापु गोखले**, तसेंच अप्रतीम स्त्री रत्न **लक्ष्मीबाई** राणी साहेब, (संस्थान **झांशी**) इत्यादि सर्व **कोंकणस्थच** होत.

---

१ हूणसंग वगैरे चिनी लोकांचे ग्रंथ पहा.

२ सेन्सस रिपोर्ट. इ. स १८९३, पान १४१ पहा.

३ कोंकणस्थांचें सर्व साधारण गुणवैभव, पहिल्या बाजीरावाच्या संबंधानें जें पाश्चात्य इतिहासकारांनीं वर्णन केलें आहे, त्यांत दिसून येतें.

"Bred a *soldier* as well as a *statesman*, Bajirâo

( पुढें चालू ).

## २ देशस्थ.

देशस्थ ब्राह्मण.

ह्यांचें राहण्याचें क्षेत्र अथवा वसतिस्थान कोणतें, या संबंधानें **सह्याद्रिखंडांत**[1] उल्लेख केलेला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, **नर्मदा**नदीपासून तों तहत **कृष्णा** आणि **तुंगभद्रा** नदी पावेतों, **कोंकण** खेरीजकरून जेवढा ह्मणून प्रांत येतो, त्यांत ते इतस्ततः पसरलेले सांपडतात. मात्र, दक्षिणेस **कोयना** आणि उत्तरेस **वेदवती** या दोन नद्यांच्या प्रदेशांत **कऱ्हाड्यांची** वस्ती असून, तेथें **देशस्थ** नाहींत. तथापि, **हिंदुस्थानांत मराठ्यांनीं** आपला जेथें जेथें म्हणून **भगवाझेंडा** उभारला, अगर ज्या ज्या ठिकाणीं ह्मणून त्यांनीं आपली **तलवार** गाजविली, त्या त्या ठिकाणीं **देशस्थ ब्राह्मण** जाऊन राहिलेले आढळतात. ह्मणजे **काशी, गया, प्रयाग, ग्वाल्हेर, इन्दूर, बडोदें,**

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

united the *enterprise, vigour*, and *hardihood* of a Maratha cheif, with the *polished manners, the sagacity*, and *address, which frequently distinguished the Brahmans of the Konkan.*"

" *They are greatly distinguished* ( that is, the Konkanasthas ) *for their talents* and *administrative* capacity. Vol. II. P. P. 19-20-32 ).

१ सह्याद्रिखंड. अध्याय ८२.

गुजराथ, कोंकण, कर्नाटक, तैलंगण, आणि तंजावर, इत्यादि ठिकाणीं त्यांची वस्ती आहे.

### ३ कऱ्हाडे.

कऱ्हाडे ब्राह्मण.

ह्यांसच कऱ्हाटक असेंही म्हणतात. हें नामधेय कऱ्हाड नांवाचा जो गांव कृष्णा आणि कोयना या नदीद्वयांच्या संगमाजवळ आहे, त्यापासूनच प्राप्त झालें असल्याचें उघड दिसतें. ह्यांजला परशुरामानें उंटाच्या अस्थीपासून केलें असल्याविषयीं आख्यायिका असून, हे कोयना आणि वेदवती या नद्यांच्या दरम्यानच्या प्रदेशांत पूर्वी राहत होते. तथापि, हल्लीं ते मराठ्यांप्रमाणें इतर ठिकाणींही पसरलेले आहेत.

त्यांच्यांतील दुष्ट प्रघात.

ह्या जातींत, तरुण आणि आपल्या प्रत्यक्ष जवळच्या नातलगांस देखील, अन्नांत विषप्रयोग करून ठार मारण्याची मोठी दुष्ट चाल असे; व बळी देण्याचा हा अति निंद्य प्रघात केवळ संततिप्राप्त्यर्थच प्रचारांत होता, अशी पुष्कळांची समज आहे. परंतु, हा दुष्टसंप्रदाय, दिवसानुदिवस मोडत जाऊन बराच कमी झाला आहे, असें वाटतें. किंबहुना, तो अजिबातच नाहींसा झाला आहे, असेंही म्हणण्यास हरकत नाहीं.

कऱ्हाड्यांत १ भारद्वाज, २ कौषिक, ३ वत्स, ४ कौंडिन्य, ५ काश्यप, ६ वशिष्ठ, ७ जमदग्नि, ८ विश्वामित्र, ९ गौतम, आणि १० अत्रि, अशीं दहा गोत्रें आहेत.

यांचीं गोत्रें.

### ४ काण्व.

हे शुक्लयजुर्वेदी असून, ते आपणांस **प्रथमशाखी** म्हणवितात. **पंढरपूरचे बडवे** ह्या पैकींच होत.

काण्व.

### ५ माध्यंदिन.

हे देखील शुक्लयजुर्वेदीच आहेत. हे **माध्यान्ह** संध्येला विशेष मानीत असल्याकारणानें, त्यांजला सदरहू प्रस्तुतचें नांव मिळालेलें असावें, असें वाटतें.

माध्यंदिन.

### ६ पाध्ये.

ह्यांची उत्पत्ति कऱ्हाड्यांपासून झाली असल्याविषयीं कित्येकांची समजूत आहे. हे **कोंकणांत** व **घाटमाथ्यावर** राहत असून, ह्यांच्या हातचें पाणी देखील पिऊं नये, म्हणून **सह्याद्रिखंडांत**[1] उल्लेख केला आहे. **घाटमाथ्यावर** राहणाऱ्या कित्येक रानटी जातींचें उपाध्येपण हेच करीत असल्यामुळें, त्यांजला प्रस्तुतचें नामधेय प्राप्त झालें असावें, असें वाटतें.

पाध्ये.

1 सह्याद्रिखंड. अ. ८२.

## ७ देवरुखे.

देवरुखे.

ह्यांची वस्ती उत्तर व दक्षिण कोंकणांत आहे. हे पूर्वी फारच गरीब स्थितींत असत. त्यामुळें, त्यांची विशेष कींव येऊन पेशवे सरकारनीं त्यांजला येथेंच राहण्याची परवानगी दिली; व तदनंतर उत्तरोत्तर त्यांची स्थिति बरीच सुधारत गेली. यांचा म्हणण्यासारखा भरणा देवरुख, राजापूर, इत्यादि तालुक्यांत रत्नागिरी जिल्ह्यांत आहे. ह्यांच्याशीं भोजनाची एक पंगत झाली म्हणजे सहा महिन्यांनीं दारिद्र्य येतें, अशा समजुतीनें कित्येक ब्राह्मण त्यांच्या पंक्तीला अजूनही बसत नाहींत. तथापि, हल्लीं तो प्रचार पुष्कळ कमी पडत चालला आहे.

## ८ पळशे.

पळशे.

हे शुक्लयजुर्वेदी असून, ह्यांच्यांत कित्येक चांगले ज्योतिषी आणि वैद्य आहेत. हे मराठे, परभू, सोनार, वगैरे जातींत उपाध्येपण करितात. ह्यांचें मूळ वसतिस्थान पनवेलीनजीक पळस्प्याजवळ असल्याचें सांगतात. तथापि, हल्लीं ते मुंबई आणि ठाणें व कुलाबा जिल्ह्यांत बरेच आढळतात. ह्यांपैकीं, पुष्कळ मच्छमांसाहार करतात, त्यामुळें त्यांचा आणि आमचा पंक्तिव्यवहार होत नाहीं.

## ९ किरवन्त.

ह्यानांच **क्रमवन्त** असेंही म्हणतात. हे **ऋग्वेदी** असून, **आश्वलायन** शाखेंतील **ऐतरेय ब्राम्हणाध्यायी** आहेत. ह्यांजबद्दलचा उल्लेख **सह्याद्रिखंडांत** थोडाबहुत केला आहे. त्यावरून **गोमांचलाजवळ पंचक्रोशींत** त्यांचा वसतिप्रदेश असावा असें वाटतें. ह्यांची उत्पत्ति बारा **ब्राम्हणा**पासून झाली असल्याविषयीं वर्णन असून ते **अलिबाग, चौल, रेवदंडा,** इत्यादि ठिकाणीं विशेषेंकरून आहेत. **कोंकणस्थांशीं** आपला शरीरसंबंध व्हावा एतदर्थ ते मनापासून झटतात, व उत्कट लालसा प्रदर्शित करतात.

किरवन्त.

## १० त्रिगुळे.

हे **शुक्लयजुर्वेदी** असून, **मिरज, इन्दापूर, सोलापूर** इत्यादि ठिकाणीं असतात. परंतु ह्यांच्याशीं आमचा रोटीव्यवहार देखील होत नाहीं.

त्रिगुळे.

## ११ जावळे.

हे मच्छमांसाहारी आसल्या कारणानें, ह्यांच्याशीं आह्मीं अन्नव्यवहार करीत नाहीं. तथापि, क्वचित् कोणी त्यांच्या हातचें पाणी मात्र घेतात. हे **रत्नागिरी** जिल्ह्यांत **सुवर्णदुर्ग**

जावळे.

---

१ स्कन्द पुराण, सह्याद्रिखंड, अ. ८४.

तालुक्यांत बरेच आहेत. असे सांगतात कीं, सुप्रसिद्ध **परशुरामभाऊ पटवर्धन** यांनीं केवळ आपल्या सोईकरतांच त्यांजला **ब्राह्मण** बनविलें होतें. आणि ते निव्वळ त्यांच्याच आश्रयानें असल्यामुळें सहजींच **ब्राह्मणांत** मोडत. परंतु, ते मुळचे **कुणबीच** होत.

## १२ आभीर.

आभीर.

हे धनगर आणि शेतकरी, ह्मणजे **आभीर** किंवा **आहिर**, यांचे **उपाध्ये** असल्याकारणानें, त्यांजला हें नामधेय प्राप्त झालें आहे. यांची वस्ती **खानदेशांत** पुष्कळ असल्याचें सांगतात

## १३ सवाशे.

सवाशे.

ह्यांच्या संबंधानें अशी आख्यायिका आहे कीं, एका **ब्राह्मणानें** एक **चांभारीण** बाळगली होती. पुढें, कालांतरानें, त्यानें आपल्या घरीं श्राद्ध केलें. त्यावेळीं कित्येक **ब्राह्मणांस** भोजनाचें निमंत्रण देऊन, त्यानें त्यांस आपल्या घरीं जेवावयास बोलाविलें. तेव्हां, सुमारें १२५ **ब्राह्मण** त्याच्या येथें जेवल्यामुळें, ते अर्थात्च अपंक्त झाले; आणि त्या सर्वांस **सवाशे** असें नांव पडलें. ह्यांची मुळची वस्ती

१ जातिभेद विवेकसार.

**चांभारगोंद्यास** असून, तेथूनच ते सर्व **दक्षिण महाराष्ट्र** देशांत पसरले, असें ह्मणतात.

### १४ कास्त.

कास्त किंवा खोत.

**खोत ब्राह्मण** म्हणून ज्यांस ह्मणतात, तेच हे असावेत असें वाटतें. ह्यांच्या हातचें पाणी चालतें, परंतु अन्न चालत नाहीं, अथवा यांच्यांशीं पंक्तिव्यवहारही होत नाहीं.

### १५ कुण्ड गोळक.

कुण्ड गोळक.

**ब्राम्हण** मातापितरांची ही व्यभिचारापासून झालेली प्रजा होय.

### १६ रण्ड गोळक.

रण्ड गोळक.

**ब्राह्मण** पिता आणि **ब्राह्मणी** विधवा माता, यांजपासून झालेली ही प्रजा असून, ह्यांच्यापेक्षां **कुण्ड गोळक** हे आपणांस श्रेष्ठ मानतात.

### १७ ब्राह्मण जाई.

ब्राह्मण जाई.

**ब्राह्मणांचा शूद्र** जातीच्या स्त्रियांशीं संबध होऊन झालेली ही प्रजा होय.

### १८ सोपारे.

ह्यांसच **सामवेदी ब्राह्मण** अशी देखील संज्ञा आहे.

ह्यांचा आचार फारच अमंगल असून, ते मच्छमांसाहार करतात. त्यामुळें; आमचा आणि त्यांचा भोजनव्यवहार होत नाहीं. ह्यांची वस्ती **वसई** तालुक्यांत, **सोपारें** नामक गांवच्या आसपास विशेष आहे.

सोपारे, किंवा सामवेदी,

## १९ खिस्ती.

हे **गुजराथेंतून** आलेले **खेडावळ ब्राह्मग** होत. ह्यांची वस्ती फार दिवसापासून **नगर** व **पैठण** येथें असल्यामुळें, यांची रीतभात **देशस्थां**सारखी आहे.

खिस्ती.

## २० हुसेनी.

हे मूळचे **ब्राह्मण** असून, **मुसलमान**शाहींत बाटलेले होत. ह्यांचा सर्व आचारविचार **ब्राम्हणां**प्रमाणेंच आहे. मात्र धर्मसंबंधीं कित्येक चालीरीति त्यांनीं **मुसलमानांच्याच** उचलल्या असल्यासारखें दिसतें. हे **नगर** जिल्ह्यांत असून त्यांचा शरीरसंबंध अन्य जातीशीं होत नाहीं.

हुसेनी ब्राम्हण.

## २१ कलंकी

हे फार सुधारलेले असल्याकारणानें, ह्यांच्याबरोबर दुसऱ्यांचा अन्नव्यवहार होत नाहीं. ह्यांची वस्ती **नागपूर** परगण्यांत विशेष आहे.

कलंकी

## २२ शेणवी.

शेणवी.

हे पंचगौडापैकींच सारस्वत ब्राम्हण असावेत, असें वाटतें. तथापि, ते ह्या बाजूला सुमारें सातशें वर्षे असल्याकारणानें, ते पंचद्रविडांत मोडतात; आणि त्या दोहोंचा रोटी अथवा बेटीव्यवहार मुळींच होत नाहीं. हे मांसाहारी आहेत. ह्यांच्यांत २३ नरवाणकर, २४ केळोसकर, २५ बारदेसकर, २६ कुडाळदेसकर, २७ पेडणेकर, २८ भालावालेकर, २९ कुशस्तळी, ३० खडापे, आणि ३१ खजुले, असे पोटभेद आहेत. हे सर्व भिन्न-भिन्न गांवावरून झाले असून, त्या परस्परांत रोटी किंवा बेटीव्यवहार होत नाहीं.

## ३२ मैत्रायणीय.

मैत्रायणीय.

हे नाशीक येथें, आणि जवळ आसपास गोदावरी नदीच्या तीरीं असतात; व ते अन्य कोणाशीं देखील लग्नसंबंध करीत नाहींत.

## ३३ वऱ्हाडे.

वऱ्हाडे.

हे वऱ्हाड प्रांतांतले असून; शुक्ल यजुर्वेदी आणि माध्यंदिन शाखेंतले आहेत. ह्यांच्यांतच ३४ ऋग्वेदी म्हणूनही आणखी एक वर्ग आहे. परंतु त्यांचा परस्पर शरीरसंबंध होत नाहीं.

### ३५ झाडे.

ह्यांसच **नागपुरी ब्राह्मण** म्हणतात. कारण, त्यांचें वसतिस्थान **नागपूर** प्रांत होय. ह्यांत कित्येक चांगले पुराणिक, वैदिक, आणि ज्योतिषज्ञ आढळून येतात.

झाडे, अथवा नागपुरी ब्राह्मण.

याप्रमाणें **पंचद्राविडांपैकीं १ महाराष्ट्र ब्राह्मणांचें** यथावकाश दिग्दर्शन झालें. सबब, आतां पुढील विवेचनाकडे वळूं, आणि **आंध्रांविषयीं** उपलब्ध असलेली माहिती देऊं.

**२ आंध्रांसच तैलंग ब्राह्मण** म्हणतात. ह्यांचा प्रदेश **महाराष्ट्र** देशाच्या आग्नेयी दिशेस असून, तो **भारतद्वीप**कल्पाच्या पूर्वेस थेट पूर्वसमुद्रापर्यंत पसरला आहे; व ह्याच्या उत्तरेस **मणिपूर** आणि दक्षिणेस **पुलिकत** सरोवर आहे. किंबहुना, **ओद्र** ( ओरिसा ) देश व **द्राविड** ( तामिल ) देश, यांच्या दरम्यान त्यांची वस्ती आहे, असेंही म्हणण्यास हरकत नाहीं.

आन्ध्र अथवा तैलंग ब्राह्मण.

ह्यांचे खालीं लिहिल्याप्रमाणें, एकंदर सोळा पोटभेद आहेत:—

त्यांचे पोटभेद.

| | | |
|---|---|---|
| १ वर्णशालु. | ३ कर्णकमलु. | ५ तैलंग. |
| २ कमरुकुलु. | ४ माध्यंदिन. | ६ मुरकनाडू. |

| | | |
|---|---|---|
| ७ आराध्य. | १० वेलनाडू. | १३ तैलंग सामवेदी |
| ८ याज्ञवल्क्य. | ११ वेंगीनाडू. | १४ रामानुज. |
| ९ कासरनाडू. | १२ वेदीनाडू. | १५ माधवाचार्य. |
| | | आणि १६ नियोगी. |

यांत कांहीं ऋग्वेदी आणि कांहीं यजुर्वेदी आहेत.

त्यांची शाखा, वसतीस्थान, गोत्र, आणि पंथ.

शेज ( १ ) व ( ४ ) हे मेदक प्रांतांत राहतात. ( ६ ) हे मुरक परगण्यांत असतात. ( १० ) यांची वस्ती निजामच्या राज्यांत आहे. ( ११ ) हे वेंगीपुरांत असून, ह्यांची व्याप्ति पूर्वघांटाखालीं गोदावरी आणि कृष्णा नदी यांच्या दरम्यानच्या प्रांतांत आहे. ( १२ ) हे गंटूर आणि मच्छलीपट्टण जवळ असतात. ( १३ ) हे आपणांस राणायणी समजत असून, स्मार्त आहेत. ह्यांची एकंदर सात गोत्रें असल्याचें समजतें. १ भारद्वाज. २ वाधुलूष. ३ गौतम. ४ अत्रि. ५ नित्युन्दिन. ६ वशिष्ट. व ७ कौंडिन्य. शेज ( १४ ) ह्यांत १ वडगडलु आणि २ त्र्यंगडलु असे दोन पोटभेद आहेत. हे हनुमानाची पूजा वर्ज्य मानतात, व एकान्तात भोजन करतात. परंतु, ( १५ ) ह्यांस हनुमानाचीच पूजा विशेष प्रिय आहे. कांहीं तैलंग ब्राम्हण उत्तम वैदिक असतात; आणि ते पदें, क्रम, जटा, घन, इत्यादि फारच सुरेख ह्मणतात. ह्यांच्यांत संस्कृत अथवा शास्त्रीवर्ग जरा

कमी प्रमाणानें आढळतो. तथापि, द्राविडी भाषा विशेष नांवारूपास आणण्यास हेच विशेष कारणीभूत झाले असल्याचें सांगतात.

द्रविड ब्राम्हण.

३ द्रविड ब्राम्हण हे द्रविड देशांतले होत. हा देश म्हैसूर आणि तैलंगणच्या दक्षिणेस, व कोचीन आणि त्रावणकोरच्या[1] पूर्वेस असून, तेथें तामिल भाषा बोलतात. ह्या ब्राम्हणांचे खालीं लिहिल्याप्रमाणें सात पोटभेद आहेतः—

त्यांचे पोटभेद

१ ऋगूवेदी. २ कृष्णयजुर्वेदी. ३ माध्यंदिन. ४ काण्व. ५ सामवेदी. ६ द्रविड अथर्ववेदी. आणि ७ नुंब्री ब्राम्हण.

व धर्मपंथ.

ह्यांत अनेक धर्मपंथ आहेतसें दिसतें. कारण, कित्येक (१) स्मार्त म्हणजे शंकराचार्यानुयायी आहेत. कांहीं (२) वैष्णव आहेत, व ह्यांसच वीरवैष्णव म्हणतात. हे मध्वाचार्यांचे अनुयायी होत. ह्याशिवाय, कांहीं (३) श्रीवैष्णव आहेत. कित्येक (४) भागवत आहेत; व हे शिव आणि विष्णु ह्यांस सारख्याच प्रेमानें व भक्तीनें भजतात. आणि कांहीं (५) शाक्त असल्यामुळें, ते देवीची उपासना करतात.

---

[1] ह्यालाच तिरवानकुडी असें नामधेय आहे, व त्याचा अर्थ "पवित्र झालेलें स्थान" असा होतो.

४ कर्नाटकी ब्राम्हण हे कर्नाटक देशांत राहतात.

कर्नाटकी ब्राम्हण, व त्यांचे पोटभेद.

ह्यांत १ कुमे, २ नगर, ३ कोंकणी, ४ हुब, ५ गोकर्ण, ६ हैग, ७ तुळव ८ अम्माकोडग, ९ नांबूरी, १० पोट्टी ११ मुट्टडु, १२ इलेट्टु, १३ रामनाड, १४ पट्टर, आणि १५ अमळवासी, असे पंधरा भेद असून, त्या प्रत्येकांतही आणखी पोट भेद आहेत. १ कुमे ब्राह्मणांत (१) कानडे, (२) अरव तोकल, (३) उरीची, व (४) बोबोरे कुमे, असे चार प्रकार आहेत. परंतु त्यांचा परस्पर शरीरसंबंध होत नाहीं. २ नगर ब्राम्हणांत (१) बडगनाड, (२) वैश्यमा, आणि (३) असवुट्टु वोक्कल, असे तीन भेद असून, ते प्रथमतः नगर जिल्ह्याच्या ईशान्य दिशेकडून आले असल्याचें दिसतें. पुढें आनागुंदी व विजयनगरच्या राजांनीं त्यांस तेथेंच राहण्याची परवानगी दिल्यावरून, त्यांनीं तिकडे आपली वसाहत केली. ह्यांत बहुतेक स्मार्त आहेत आणि ते मोठे संभावित व शिकलेले असून, फारच तरतरीत दिसतात. तथापि, त्यांचा एकंदर देखावा, रीतरिवाज, आणि आचारविचार, यांत ते केवळ देशस्थासारखेच भासतात. ३ कोंकणीब्राम्हणांचा वसतिप्रदेश गोंव्यापासून कन्याकुमारीपर्यंतची पश्चिमपट्टी होय. परंतु वर ज्या कोंकणस्थब्राम्हणांची हकीकत दिली, ते हे नसून, अगदीं

भिन्न आहेत; आणि यांच्या व्यावहारिक भाषेंत **कानडी** व **तुळव** शब्दांचें मिश्रण आहे. किंबहुना, हे **शेणव्याशीं** विशेष साम्य पावतात. ४ **हुबु** हे आचारविचारानें हीन आहेत. ५ **गोकर्ण** हे आपणांस हुबूपेक्षां विशेष श्रेष्ठ मानतात; व ह्यांच्याजवळ एक लिंग असतें. ६ **हैग** यांची वस्ती **तेलीचरी** जवळ आणि घाटमाथ्यावर असून ते **कानडी** भाषा बोलतात; व पानमळा करून आपला उदरनिर्वाह चालवितात. हे आपणांस **ऋग्वेदी** आणि **यजुर्वेदी** ह्मणवितात, परंतु मांसभक्षण करतात. ७ **तुळवाचा** वसतिप्रदेश **मलयालम्**पासून **ब्रह्मवरा** नदीपर्यंत आहे. ह्मणजे तो १२° १०' अक्षांशापासून १३° ३' पर्यंत आहे, असेंही ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्यांत (१) शिवली, (२) पंचग्रामडवरु, (३) कोट, व (४) कंडवरू, असे चार पोटभेद आहेत. लग्नविधीविषयीं कडकबंधन नसल्याकारणानें, ह्यांच्यांत नीतिशैथिल्य बरेंच दिसून येतें. हे सर्व कानडी भाषाच बोलतात. ८ **अम्माकोडग** ब्राह्मणांस **कावेरी ब्राह्मण** अशीही संज्ञा आहे. **कोडग** ह्मणजे **कुर्ग** प्रदेश असून, हे याच प्रदेशाच्या नैर्ऋत्य दिशेस राहतात. हे मद्यमांसाहार करीत नाहींत. ९ **नांबूरी** ब्राह्मणांची वस्ती **ब्रह्मवरा** नदीपासून **कन्याकुमारी**पर्यंतच्या प्रदेशांत आहे. ह्यांचे

आचारविचार फारच चमत्कारिक आहेत. १० पोट्टी हे नांबूरींच्याच वर्गांतले होत. परंतु त्यांचा परस्परांचा फक्त रोटीव्यवहारच होत असून बेटीव्यवहार होत नाहीं. ११ मुट्टडु हे शस्त्रक्रियेचा अभ्यास करीत असल्यामुळें, त्यांजला बहिष्कृत केल्याचें दिसतें. १२ इलेडु हे शूद्रांची सेवा करीत, सबब त्यांजला जातीबाहेर टाकलेलें आहे. १३ रामनड हे कन्याकुमारीजवळ राहतात. १४ पट्टर हे मुळचे तुनकोरीन, कारोमांडल, मदुरा, व कोतुर, येथील रहाणारे होत. तथापि, हल्लीं मळयालम्‌मध्येंच त्यांची विशेष वस्ती आहे. ह्यांच्यांत तीन पोटभेद आहेत. १ पांडी किंवा तानलूर. २ तोईल अथवा चूलिया. आणि ३ तोइलिगेन किंवा मोकरांत्री. १५ अंबलवासी हे मलयालम् येथें पुजारी आहेत. ह्यांच्यांत नऊ पोटभेद असल्याचें कळतें. १ नंबडी. २ पिशिरोटी. ३ वर्यण. ४ पष्पत्तु अथवा नंब्यार. ५ पुडवळ. ६ मुत्तड्डु. ७ मुसत्तड्डु. ८ उण्णी, आणि ९ मारान, किंवा शिद्रन. ( १ ) हे हिशेब लिहितात, व देखरेख ठेवितात. ( ४ ) हे पुजेसाठीं हार तयार करतात. ( ५ ) हे झाडलोट करतात. ( ७ ) हे ब्राह्मणांचे न्हावी होत. ( ८ ) हें पडेल तें काम करतात. व ( ९ ) हे आपणांस वाजंत्री म्हणवितात, आणि संभळ सनई, चौघडा, वगैरे वाजवितात.

गुजराथी ब्राम्हणां-तील पोटभेद

गुजराथी ब्राह्मणांत खालीं लिहिलेले पोटभेद आहेत:—

**नागर ब्राह्मण:—**

१ वडनगरा नागरब्राह्मण. ४ प्रश्नोरा नागरब्राह्मण.
२ विसलनगरा नागरब्राह्मण. ५ कृष्णोरा नागर ब्राह्मण.
३ साठोदरा नागरब्राह्मण. ६ चित्रोडा नागरब्राह्मण.
आणि ७ बारड नागरब्राह्मण.

हा शेवटचा पोटभेद श्रेष्ठत्वाच्या संबंधानें जरा कमी समजला जातो.

उदिच्य

**औदिच्यब्राह्मण:—**१ सिद्धपुरा. २ शिहोरा. (ह्या दोघांस सहस्र औदिच्य पण म्हणतात). आणि ३ टोळकिया औदिच्य. हे सर्व उदीची म्हणजे उत्तर दिशेकडून अथवा अयोध्येकडून आले म्हणून, त्यांस औदिच्य म्हणतात, अशी कांहींची कल्पना आहे.

**मोढ ब्राह्मण:—**

१ त्रिवेदी. ३ अगियारशाणा. ५ जेठी.
२ चतुर्वेदी. ४ धिनोजा. ६ तांदळा (किंवा तांदळजा.

**इतर पोटभेद.**

१

१ साचोरा. २ उदंबरा. ३ नरसापुरा.

४ वलादरा अथवा वडादरा.
५ पंगोरा.
६ नांदोरा.
७ गिरनारा.
८ सोमपुरा.
९ हरसोरा.
१० सजोधरा.
११ गंगापुत्रा.
१२ मोढमैत्रा. आणि
१३ गोमित्रा.

२

१ श्रीगोड (किंवा श्रीगौड ).
२ गुर्जरगौड.
३ कऱ्हेडा.
४ वायडा.
५ भटमेवाडा.
६ त्रवाडी मेवाडा. आणि
७ द्रविडा.

३

१ देशवाळ.
२ रायकवाळ.
३ रोढवाळ.
४ खेडावाळ.
५ सिन्धुवाळ.
६ पल्लिवाळ.
७ गोमतिवाळ.
८ इंटवाळ.
९ मेडतावाळ.
१० गयावाळ.
११ अगस्त्यावाळ.
१२ प्रेतवाळ.
१३ याज्ञिकवाळ.
१४ घडवाळ.
१५ पुडवाळ.
१६ उनेवाळ.
१७ राजवाळ.

४

१ कनोजिया.
२ शरवरिया.
३ कंडोलिया.
४ करखेलिया.
५ परवालीया.
६ सोरठीया.
७ टंगमोडिया.
८ सनोठिया.
९ वंशवध्रा.

५

१ मोताळा.
२ झारोळा.
३ रायपळा.
४ कपीला.
५ अक्षयमंगला.
६ गुगळी.

७ नागळ. ८ अनावला. ९ भाटेला. १० श्रीमाळी.

६

१ वालमीका. २ नारदीका.

७

१ कलिंगा. २ तेलिंगा.

८

१ भार्गव. २ माळवी

९

१ नंदुवाणा २ भरथाणा. ३ पुष्करणा.

१०

१ सारस्वत. १३ प्रयागवाळ. २४ पराशरीय.
२ खेडायता १४ नायकवाळ. २५ आभीर.
३ मारू. १५ उत्कल. २६ कुंडु.
४ दहिमा. १६ पालिवाळ. २७ हिरण्यजीय.
५ चोवीसा. १७ माथुर किंवा माथुक. २८ मास्तान.
६ जांबू. २९ स्थितीश.
७ मराठी. १८ मैथिल. ३० प्रेदतवाळ.
८ दधीचा. १९ कुळभ. ३१ रांपुर.
९ ललाट. २० बेदुआ. ३२ जिरू.
१० वनुल. २१ रववाळ. ३३ तिळोत्य.
११ बोरसिव. २२ दशहार. ३४ दुर्मळ.
१२ गोळवाळ. २३ तळाजिआ. ३५ कोडव.

| | | |
|---|---|---|
| ३६ हनुशुन. | ४० मगार्य. | ४४ मुकणीथ. |
| ३७ शोडा. | ४१ रायथळ. | ४५ गरोड. |
| ३८ तिश्रग. | ४२ चपील. | ४६ तपोधन. |
| ३९ बसुलाड. | ४३ वारदा. | |

गुजराथी ब्राह्मणांत नागरांचें तेजाधिक्य

**गुजराथी ब्राह्मणांत नागर** हे विशेष बुद्धिमान् असल्याकारणानें, **गुजराथ** प्रांतांतील **सरकार दरबारांत** त्यांचा जास्त बोलबाला आहे.

दक्षिणी, गुजराथी, व हिंदुस्थानी ब्राह्मणांची आचारविचारांची तुलना.

आचाराच्या संबंधानें **दक्षिणी** आणि **हिंदुस्थानी ब्राह्मणांत** जितकी पवित्रता दृष्टीस पडते, तितकी **गुजराथी ब्राह्मणांत** दृष्टीस पडत नाहीं. कारण **गुजराथी** सर्व **ब्राह्मणांस**, अति शूद्र खेरीज करून, **ब्राह्मणेतरांच्या** देखील हातचें पाणी चालतें. यासंबंधानें **नागर ब्राह्मणांची** एक विशेष रीतभात ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. हे लोक मराठे, कुणबी, कोळी, वारली, दुबळे, इत्यादि शूद्र जातीच्या हातचें पाणी पितात. इतकेंच नव्हे तर, एखाद्या भांड्यांत डाळ, तांदूळ, इत्यादि पाण्यासहित घालून चुलीवर शिजण्याकरितां ठेविलें, तरी त्यांजला तें चालतें. परंतु **नागरेतर ब्राह्मणांच्याच** हातचें त्यांजला अन्नही चालत नाहीं, किंवा त्याचा ते स्वीकार देखील करीत नाहींत!

असो. येथपर्यंत, **पंचगौड** आणि **पंचद्राविड ब्राह्मणां**विषयींचें यथावकाश विवेचन झालें. सबब, ह्याशिवाय **ब्राम्हणांचें** आणखी कांहीं पोटभेद राहिले असल्यास पाहूं, आणि त्याबद्दलचें सामान्य विवेचन करूं.

इतर ब्राह्मण

आतां, **भरतखंडां**तील **ब्राम्हणांचे** सदरीं जे मुख्य प्रकार नमुद केले, त्याशिवाय **१ राजपुताना ब्राह्मण, २ माळवा ब्राह्मण** किंवा **मध्यहिंदुस्थानां**तील ब्राह्मण, **३ बंगाली ब्राह्मण, ४ आसामी ब्राह्मण**, आणि **५ नेपाली ब्राह्मण**, असे दुसरेही पांच प्रकार दिसून येतात. यास्तव त्याबद्दल देखील क्रमशः थोडक्यांत लिहूं, व हें **जातिवैचित्र्यपुराण**

## १ राजपुताना ब्राह्मण.

राजपुताना ब्राह्मण व त्याचे प्रकार.

ह्यांत एकंदर खालीं लिहिल्याप्रमाणें ३१ पोटभेद आहेत.

१ **श्रीमाळी**. हे भिनमाळ, साचोड, राजवाडा संस्थान, आणि मुंबई, इत्यादि ठिकाणीं असतात.

२ **साचोड**. हे द्वारका, मथुरा, पुष्कर, नगर-पारकर, वगैरे जागीं पुजाऱ्यांचें काम करितात.

३ **पलिवाळ**. हें नांव पाली शहरापासून पडलेलें असून, तें पूर्वी **मारवाडची** व्यापारनिमित्त राजधानी होती. ह्या ब्राह्मणांची विशेष वस्ती ह्मटली

म्हणजे जेसलमीर, बिकानेर, मारवाड, व जयपूर, या ठिकाणीं आहे.

४ नन्दावाण. हें नामधेय मारवाडांतील नन्दावाण गांवावरून पडलेलें आहे.

५ पुष्कर. ह्यानांच पोखर्णे अशी ही संज्ञा आहे. या नांवाचें तीर्थ आजमीरजवळ असून, तत्संबंधीं वर्णन पद्मपुराणांतील प्रथम खंडांत आहे.

६ पोरवर सेवक. हे पूजा करतात, आणि जरूर पडल्यास वल्लभाचार्य महाराजांची पाकनिष्पत्ति देखील बनवितात; व त्यामुळेंच त्यांस इतर ब्राह्मण कमी दर्जाचे समजतात.

७ मेडतवाळ. हें नांव मेडत अथवा मैर्त नांवाचें जें नगर ज्योतपुर संस्थानांत आहे त्यावरून पडलेलें आहे.

८ पारख. ह्यांनाच पुरोहित पारखही म्हणतात. हे जयपुरच्या ...च उपाध्ये होत. सूर्यवंशी क्षत्रियराजांचे हे पिढीजात पुरोहित असल्याविषयींची आख्यायिका आहे. मोती, जवाहीर, इत्यादिकांची त्यांजला चांगली परीक्षा असल्यावरून, त्यांजला पारख असें टोपण नांव पडलेलें असावें.

९ ल...ाण. हे विशेषतः मारवाडांत असून, लव्हाण जातीचे उपाध्ये आहेत.

१० **दाकोट.** ह्यांची बहुतेक वस्ती बिकानेर, मारवाड, कृष्णगड, उत्तरसिंधप्रांत, आणि जयपुर, वगैरे ठिकाणीं आहे. हे ब्राम्हण बीजाचे खरे, तथापि ह्यांचा मातुलपक्ष अहिर जातीचा असल्याचें सांगतात. हे फार अपवित्र आहेत. ह्यांच्या संबंधानें दुसरी एक अशी आख्यायिका आहे कीं, शनीचें दान घेण्यास श्रीरामचन्द्रास कोणीही ब्राह्मण मिळेना. तेव्हां, **दांक** ऋषींनीं दर्भाचा एक पुतळा करून त्यांत जीव घातला, आणि "हा माझा मुलगा तुझ्या दानाचें प्रतिग्रहण करील" असें **रामास** कळविलें. पुढें, ह्यानें त्यास दान दिलें; आणि ह्याला **दांक** ऋषीनें निर्माण केलेलें असल्या कारणानें, ह्याच्या प्रजेस **दाकोट** असें नामधेय पडलें.

११ **गरुड्य.** ह्यांनाच गुरु असें देखील ह्मणण्याचा परिपाठ आहे. यांची उत्पत्ति **अजमीर**जवळ दोराई नांवाच्या खेड्यांत ब्राम्हण आणि चांभारीण यांच्या जोडप्यापासून झाली असल्याचें सांगतात. ज्याप्रमाणें गुजराथेंत गरोड हे धेडांचे उपाध्ये असतात, त्याचप्रमाणें गरुड्य हे चांभारांचे उपाध्ये आहेत.

१२ **आचार्ज.** हा आचार्य शब्दाचा अपभ्रंशच आहे,

असें म्हणण्यास हरकत नाहीं. हे और्ध्वदेहिक क्रिया व बारावीं तेरावीं चालवितात.

१३ बुरे. बुरा हा शब्द हिंदी असून, त्याचा अर्थ वाईट, किंवा त्याज्य, अथवा अमंगल, असा होतो. हे उत्तर सिंधप्रांतांत आणि रजपूत संस्थानांत पुष्कळ आहेत. हे मेलेल्या श्रीमंत माणसांच्या कपड्यालत्यावर आपला उदरनिर्वाह चालवितात.

" आज माता, मारा मोटा,
तब मुजकु मिलेगा रोटा "

हा अमंगल पाठ जणुकाय त्यांचा आवडतान्न होऊन गेला आहेसें दिसतें. आणि म्हणूनच शेट सावकारलोक केवळ भीतिपूर्वकच त्यांचा तिरस्कार करतात.

१४ कापडी. हे ज्योतपूर व जयपूर संस्थानांत असून, वाणीलोकांपासून भिक्षावृत्ति करून, आपला उदरनिर्वाह चालवितात.

१५ दहिम. ह्यांसच दायिम अशी ही संज्ञा आहे. ह्यांची विशेष वस्ती म्हटली म्हणजे मारवाड, कृष्णगड. ढुण्ढार, आणि राजपुताना, इत्यादि ठिकाणीं असून ते आपणांस पिप्पलायनाचे वंशज म्हणवितात.

१६ खंडेलवाळ. जयपुरच्या उत्तरेस खंडेल गांवाचें जें

नगर आहे, त्यावरून हें नामधेय पडलें असल्याचें दिसतें. हे जयपुरास पुष्कळ आहेत.

१७ दिव हे बिकानेर, मारवाड, व नाथद्वार ( मेवाड ), येथें असतात

१८ सिकावड.
१९ चमतवाळ.
२० मारू.
२१ श्रीवन्त.
२२ आभीर.
२३ भरताना.

ह्यांची विशेष वस्ती जयपुरच्या राज्यांत असून, कित्येक राजपुतान्याच्या पश्चिमभागांत देखील आढळून येतात.

२४ सनावड. यांचा भरणा राजपुताना संस्थानांत मोठा आहे.

२५ बागडी. ह्यांसच बागडी असेंही म्हणतात हे जंगली जातीचे उपाध्ये होत.

२६ मेवाड. यांत १ त्रिवादी, २ भट्ट, आणि ३ चोरासी किंवा वव, असे तीन भेद आहेत; व पहिल्यास जोशी असाही म्हणण्याचा परिपाठ आहे. हे मुळचे मेवाडचे राहणारे होत.

२७ राजगुरु. हे रजपुत राजांचे गुरू होत. ह्यांत १ शेवड, २ मेत, ३ गुन्देच, ४ शीय, ५ चाविन्द्य, ६ पंचलड, वगैरे पोटभेद आहेत.

२८ भाट. हे राजपुतान्यांतील क्षत्रियांचे बन्दिजन

असल्याविषयीं सर्वांस महशूर आहे. हे राजांचा स्तुतिपाठ गातात; आणि त्यांचें शौर्य व पराक्रम इत्यादींचें वर्णन करतात. क्वचित् प्रसंगीं ह्यांस बक्षीस न दिल्यास, ते केवळ अन्यायानें एकाद्याची निन्दा देखील करण्यास सोडीत नाहींत.

२९ चारण. हे भाटासारखेच शिघ्रकवी असतात. यांच्यांत १ प्रदीय, २ तुंबेल, व ३ सुदरा, असे तीन पोटभेद आहेत. ह्या सर्वांचा परस्पर रोटीव्यवहार होतो. परंतु प्रदीय हे दुसऱ्याशीं बेटीव्यवहार करीत नाहीत. तुंबेल आणि सुदरा हे प्रदीयांस आपल्या मुली देतात; तथापि, ते आपापसांत बेटीव्यवहार करीत नाहींत ह्या चारणांचे आणखीही एकशेर्वीस पोटभेद आहेत, असें ह्मणतात.

३० काचिली हे चारण पैकींच आहेत, परंतु व्यापार करतात.

३१ मरु. हे भाटाप्रमाणें बंदिजनांत मोडतात; आणि यांचा रजपुतांशीं देखील शरीरसंबंध होतो.

## २ माळवा किंवा मध्यहिंदुस्थानांतील ब्राह्मण.

माळवा ब्राह्मण व त्यांचे पोटभेद.

ह्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें एकंदर चार प्रकार आहेत.

१ माळवी. हे माळव्यांतलेच राहणारे असून, माध्यंदिन

शाखेंतील आहेत. हे नागपुर आणि वऱ्हाड प्रांतांतही आढळून येतात.

२ **नारवदी.** ह्यांसच **नेमाडी** ब्राम्हण म्हणण्याचा परिपाठ आहे. हे नर्मदा नदीच्या तीरीं **विंध्याद्रि** व **सातपुडा** पर्वताच्या दरम्यान राहतात. ह्यांच्या भाषेंत मराठी, गुजराथी, आणि माळवी, या भाषांचें मिश्रण आहे.

३ **रांगडी.** ह्यांनीं **भील** व अन्य रानटी लोकांचें पौरोहित्य स्वीकारल्या कारणानें, त्यांजला हें नामधेय पडलें आहे.

४ **वागडी.** हे वागडी जातींत भिक्षुकी करतात, त्यामुळें त्यांजला हें नांव प्राप्त झालें आहे. ( वर पान १३२ शेज २९ पहा ).

ह्या **ब्राह्मणांत** कांहीं **पंचगौड** असून, ते मांसाहार करतात.

### ३ बंगाली ब्राह्मण.

बंगाली ब्राह्मण.

हे **वंगवासी** (म्हणजे **बंगाल** देशांत निवास करणारे) असल्यामुळें, त्यांजला हें नामधेय प्राप्त झाल्याचें उघड दिसतें. कारण, **बंग** हा **वंग** या **संस्कृत** शब्दाचाच अपभ्रंश असून, वंगदेश म्हणजे **बंगाल** प्रांत होय.

**बंगाली ब्राम्हणांसंबंधीं** अशी एक गोष्ट ऐकिवांत

आहे कीं, गौड देशाचा ( बंगालचा ) आदिशूर नामक राजा इ० स० पूर्वी सुमारें तीनशें वर्षे राज्य करीत असतां, त्यानें आपल्या राज्यांत कान्यकुब्जाहून पांच ब्राम्हण बोलाविले. १ एक शाण्डिल्य गोत्रांतला कश्यपाचा मुलगा भट्टनारायण म्हणून होता. २ दुसऱ्याचें नांव दक्ष असून, तोही कश्यप वंशजच होता. ३ तिसरा वत्स गोत्रांतला वेदगौर नांवाचा होता. ४ चवथा सावर्ण गोत्रांतील कश्यपाचा पुत्र असून, त्याचें नांव चंद्र होतें. आणि ५ पांचवा भवद्वाज वंशांतला श्रीहर्ष नांवाचा होता.

ह्या पांच कुटुंबांपासून एकंदर १५६ कुटुंबें उद्भवलीं. त्यांपैकीं, ( ०० ) शंभरांनीं वरेन्द्र येथें वसाहत केली, आणि बाकीचीं ( ५६ ) छपन्न कुटुंबें राधा परगण्यांत ( उत्तर बंगाल प्रांतात ) जाऊन राहिलीं. हल्लीं ते सर्व बंगाल्यांत पसरले आहेत. तथापि, ते सदरीं लिहिलेल्या पांच मूळ पुरुषांवरूनच ओळखिले जातात, आणि ते आपणांस कान्यकुब्ज ह्मणवितात. ह्या सर्व कुटुंबांचे, कायमचे दरजे, व त्यांच्या योग्यतेनुरूप प्रत्येकाचा मानमरातब, इत्यादि बल्लाळसेन राजानेंच आपल्या

---

१ Asiatic Researches vol. V.

२ ह्यानें इ. स. १०६६च्या सुमारास राज्य केलें असल्याविषयीं, राजेन्द्रलाल मित्राचें मत आहे.

( Journal Bengal R. A Society 1865 ).

कारकीर्दीत मुकरर ठरविले असल्याचें कळून येतें. त्याच्या आज्ञापत्रास मिश्र अशी संज्ञा आहे.

त्यांतले पोटभेद.

असो. ह्या ब्राम्हणांत खालीं लिहिलेले पोटभेद दिसून येतातः—

१ राधाकुलीन ब्राह्मण. ७ वादक ब्राह्मण. ब्राह्मण.
२ भंगकुलीन ब्राह्मण ८ आग्रदानी ब्राह्मण १३ दैवज्ञ ब्राम्हण.
३ वैशज ब्राह्मण. ९ मरैपोर ब्राह्मण. १४ मद्यदोषी ब्राह्मण.
४ राढीय श्रोत्रिय ब्राह्मण. १० रपली (शूद्रसवी) ब्राह्मण. १५ व्यासोक्त ब्राह्मण आणि
५ वरेन्द्र ब्राम्हण. ११ पाश्चात्य ब्राह्मण १६ पीरअली
६ सप्तशाति ब्राह्मण १२ दाक्षिणात्य ब्राह्मण.

भंगकुलीन ब्राह्मणांचे पांच पोटभेद आहेत. १ फुले. २ खंडदह. ३ वल्लभी. ४ सर्वानंदी. व ५ पंडितरत्नी. त्याचप्रमाणें, रपली ब्राह्मणांचे देखील, ज्या वर्गाची सेवा हे ब्राम्हण करतात, त्यावरून अनेक प्रकार झाले आहेत. उदाहरणार्थ, गोपाल, धोबी, सूत्रधर, कलु ( तेल काढणाऱ्यांचे उपाध्येपण करणारें ), बागाडी ( धीवर व भोई ), डुलिर, पातिनी ( तरवाले ), जालिक, शौण्डिक ( दारूगाळणाऱ्यांचे पुरोहित ), आणि डोम ब्राह्मण, इत्यादि. हे त्यात्या वर्गात भिक्षुकी करीत असल्या कारणानें, त्यांजला गोपाळ ब्राह्मण, धीवर ब्राह्मण, धोबी ब्राम्हण, वगैरे म्हणण्याचा परिपाठ पडलेला आहे.

व्यासोक्ति ब्राह्मण हे मुळचे शूद्रच होत. परंतु, **व्यास** वचनानें ते **ब्राह्मण** झाले, आणि तेव्हांपासून ते ह्या वर्गांत मोडूं लागले.

पीरअली ब्राह्मणांचा संक्षिप्त इतिहास.

" आतां, पीरअली " ब्राह्मणांविषयीं अशी एक आख्यायिका सांगतात कीं, **जेसूर** गांवांत जातिभेदासंबंधीं एक प्रकरण चालून विवाद उत्पन्न झाला, व तो इन्साफासाठीं म्हणून, त्या ठिकाणचा अमीन जो **पीरअलीखान** याजकडे गेला. त्यावेळीं, भवतिनभवति होतांना, कांहीं **ब्राह्मण** असे म्हणाले कीं, " हुंगणें म्हणजे खाण्याचाच एक पर्याय होय. " पुढें, अमीन मजकुरानें ही गोष्ट लक्षांत ठेवून, ह्या हुंगण्याच्या निमित्तानें कांहीं **ब्राम्हणांस** बाटविण्याचा त्यानें निश्चय केला; आणि त्या सर्वांस आपल्या घरीं पानसुपारीसाठीं म्हणून बोलावून, त्यांजकडून कित्येक मुद्दाम तयार केलेले पदार्थ हुंगविले. तदनंतर " हुंगणें म्हणजे खाणें," हे ब्राम्हणांनीं पूर्वी प्रतिपादन केलेलें वाक्य त्यांच्याच पदरांत घालून, " तुम्ही आतां **मुसलमान** झाला, " असें त्यानें त्यांस कळविलें. त्यावेळीं, कित्येकांस हा मायावी प्रकार खरा वाटला; व आपण आतां बाटलों असें त्यांच्या मनांत वारंवार येऊन, त्यांचें मन त्यांस खाऊं लागलें, आणि त्यांजवर जुलूम झाल्यामुळें, ते अखेर इस्लाम कळपांतही शिरले. परंतु,

कित्येक विशेष दृढनिश्चयाचे होते. त्यामुळें त्यांनीं ती गोष्ट जुमानलीच नाहीं. इतकेंच नव्हे तर; त्यांनीं आपला **ब्राह्मणा**चा आचारविचार कायम ठेविला व पूर्वीप्रमाणें शुचिर्भूतच राहिले. तथापि, ते पीरअल्लीच्या मजलसींत असल्या कारणानें, त्यांजला **पीरअल्ली ब्राम्हण** म्हणण्याचा जो परिपाठ पडला, तो अजूनही तसाच कायम आहे.

टागोर घराण्याची हकीकत.

असो. ह्यांपैकींचि **बंगाल**चें सुप्रसिद्ध **टागोर** कुटुंब आहे. ह्यांचे मुळचें उपनांव **ठाकर** असें असून, तें त्यांचा पूर्वज जो **पचानन** नामक होता, त्यानें आपल्या प्रामाणिकपणानें, बहादुरीनें, आणि हुशारीनें संपादन केलें होतें. **ठाकर** या शब्दाचा मूळ अर्थ प्रभु किंवा बडा असून, त्याचाच **टागोर** असा इंग्रजींत अपभ्रंश झाला आहे. ह्या घराण्याचा मूळपुरुष **भट्टनारायण** होय; व ह्यालाच **कान्यकुब्जां**तील इतर ब्राम्हणांबरोबर **आदिशूर** राजानें आपल्या राज्यांत **बंगाल** येथें बोलाविलें होतें. ( वर पान ८९ पहा ). **भट्टनारायणास** एकंदर सोळा पुत्र असून, त्यांपैकीं **नारु** किंवा **नरसिंह** म्हणून जो त्याचा मुलगा होता, त्यापासूनच झालेली सांप्रतची **टागोर** संतति होय. **पुरुषोत्तमाची** त्याच्या नंतरची दहावी पिढी समजावयाची; आणि ह्याजवरच अमीन मज-

कुरानें हा प्रसंग आणिला असल्या कारणानें त्यालाच पीरअली ब्राम्हण असें प्रथम म्हणावयास लागले.

### ४ आसामी ब्राम्हण.

आसामी ब्राह्मण, व त्यांचे पोटभेद.

ह्यांत बंगाल्याहून आलेले कांहीं राधीब्राम्हण असून, ते वैदिक आहेत. परंतु, हे जंगली व हीन जातींस वैदिककर्म शिकवितात. त्या कारणानें, व ही गोष्ट मन्वाज्ञेविरुद्ध असल्यामुळें, त्यांची योग्यता कमी मानली जाते. मरोसिंह ब्राम्हणांचाही येथें आणखी एक पोटभेद आहे. तथापि, ह्यांचा आचारविचार पवित्र नसल्याकारणानें, धर्मसंबंधीं कोणतेंही कृत्य करण्याचा त्यांजला अधिकार नाहीं यांची वस्ती कचार परगण्यांत आणि मणिपुर संस्थानांत अगदीं तुरळक आहे.

### ५ नेपाळी ब्राम्हण.

नेपाळी ब्राम्हण.

हे कान्यकुब्ज आणि चितुरकडून आलेले असावेत. असें वाटतें. यांत कांहीं यजुर्वेदी असून, ते आपणांस ब्राम्हणांचे व क्षत्रिय वर्गाचे उपाध्ये अथवा पुरोहित ह्मणवितात. हे सर्वांत उच्च जातीचे होत. तथापि, हे मांसभक्षण करितात. मात्र ते शिकार व पारध करीत नाहींत, किंवा हरिणाचें मांस खात नाहींत. यांच्यापेक्षां उतरती जात ह्मटली म्हणजे कमीय आणि पुरबी ब्राम्हणांची होय.

हे हलक्या जातींना शिकवून, त्यांच्यांतच भिक्षुकी चालवितात. हे यथेच्छ मांसाहार करतात, व तन्निमित्त कोंबडीं आणि डुकरें देखील आपल्या घरीं बाळगितात.

त्यांच्यांतील पोटभेद.

ह्यांच्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें, पंचाण्णव पोटभेद आहेत.

१ अर्जल.
२ भट्ट.
३ लमसाळ.
४ कोईक्यल.
५ अधिकारी.
६ दोतियाळ.
७ भट्टवाळ.
८ ओस्ती.
९ उफल्टोपी.
१० तेवपाण्य.
११ फुनवाळ.
१२ सिध्याळ.
१३ भरारि.
१४ केळसोनी.
१५ पोंडयाल.
१६ सपनकोट्य.
१७ रिमाळ.
१८ नेपालीय.
१९ दोएजा.
२० खंडयाळ.
२१ गज्नीयाळ.
२२ उत्कुळी.
२३ पारिजईकवल.
२४ तामीलसिन.
२५ चकासैनी.
२६ बराळ.
२७ बगल्य.
२८ गिलल.
२९ रवनाळ
३० महाराष्ट्र.
३१ देवकोट्य.
३२ बराळ.
३३ रुकाई.
३४ कट्याळ.
३५ चवलगाई.
३६ कन्दारिया.
३७ होम्यगाई.
३८ कफल्य.
३९ पुरसैनी.
४० गोतन्य.
४१ दुलाल.
४२ लहोनी.
४३ रेग्नी.
४४ कोइनराळ.
४५ पर्वत्यवश.
४६ पोखऱ्याळ.
४४ सैवाळ.
४८ धंजाळ.
४९ वस्तगाई.
५० घर्तमेल.
५१ चंपगाई.

| | | |
|---|---|---|
| ५२ गैथौल. | ६७ भुर्त्याळ. | ८२ सतोल |
| ५३ धुरारि. | ६८ रिस्थाळ. | ८३ आचार्य. |
| ५४ घोरसैनी. | ६९ बजगाई. | ८४ दोहाल. |
| ५५ परजुली. | ७० निरोळ. | ८५ दवारि. |
| ५६ मुठबरी. | ७१ सत्यळ. | ८६ दाखल. |
| ५७ भट्टरागी. | ७२ मिश्र. | ८७ लोइयाळ. |
| ५८ पकोन्यळ. | ७३ रवतिवार. | ८८ उाक्तियाळ. |
| ५९ पर्वत्य. | ७४ धुंगियाळ. | ८९ सोती. |
| ६० रूपखेति. | ७५ बिकाळ. | ९० तेम्रकोटी. |
| ६१ रिजाळ. | ७६ दर्जी. | ९१ पंडित. |
| ६२ सिग्याळ. | ७७ निविपान्य. | ९२ सिखारा. |
| ६३ बंजार. | ७८ सुबेरी. | ९३ लोइत्याळ. |
| ६४ घर्त्याळ. | ७९ घिमिर्थ. | ९४ धोंगान. |
| ६५ गुरगाई | ८० पनेरु. | ९५ धुरचोळी. |
| ६६ गरहापिल्ला. | ८१ चोलस्य. | |

नेपाळांत आर्यहिंदूंची वस्ती.

नेपाळात आर्यहिंदूंची पुष्कळ वस्ती असून, हा देश फार प्राचीन काळापासून आर्यांनीं वसविल्याचें दिसतें. तथापि, कित्येक पाश्चात्यांचें असें मत आहे कीं, येथें जर, मगर, गुराणी, इत्यादि अनार्य लोकांचीच मुळची

१ हामिलटनकृत नेपाळ.

वस्ती असावी. असो. ह्या देशांत **ब्राम्हणांनीं** आपली वसाहत केल्यावर, त्यांनीं आपला पगडा लवकरच सर्वत्र बसविला, आणि विद्यादानाचें काम त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें अगदीं जारीनें सुरू केलें. त्यामुळें, येथें पूर्वी पुष्कळ विद्वान लोक असत. परंतु सांप्रतकाळीं, तशी विद्येची भरभराटी असल्याचें दिसून येत नाहीं. तथापि, हल्लीं तेथें उत्तमप्रकारचे ज्योतिषी आहेत, असें म्हणतात.

गुरखे व त्यांची उत्पत्ति.

येथील कांहीं भागाच्या लोकांस **गुरखे** अशी संज्ञा असून, **हिंदुस्थान** सरकारची ह्या नांवाची जी पलटण आहे, ती मोठी लढाऊ आणि शूर असल्याविषयीं सर्वांस महशूर आहे. **गुरखे** हें नांव **गोरखनाथ** म्हणून जो सुप्रसिद्ध साधु आणि योगी होऊन गेला, त्यापासून पडलें असल्याचें सांगतात ह्याचेंच नांव **गुरखा** नामक शहरास दिलें आहे, व हें **कटमंडू** राजधानीपासून सुमारें तीस कोसांवर वायव्य दिशेस आहे. इ.स. १७६५।६६च्या सुमारास **पृथिवी नारायण** यानें मोठी बहादुरी करून बराच प्रदेश काबीज केला, आणि तो **नेपाळच्या** राज्यास जोडला. हा नरव्याघ्र **गुरखा** नगरचा राहणारा होय.

**नेपाळांत** **हिंदुंचेंच** राज्य असल्याकारणानें, तेथें जातिबंधनाचें नियंत्रण इकडच्या पेक्षां अर्थात्च जास्त कडक,

---

१ हाड्सनचे लेख. (Journal R. A S. Vol. I.)

आणि **मनुस्मृतीस** अनुसरून आहे. येथें **परबतीय** म्हणून ज्यांना म्हणतात, त्यांचे **ब्राम्हण, खास, नगर,** व **गुरूंग,** असे चार प्रकार आहेत. त्यांजला कांहीं विशेष हक्क आणि सवलती असून, त्या **नेवर मुरीम, कचर, भोतिय, विरंति** किंवा **किरात,** व इतर लोक, ह्यांस नाहींत. उदाहरणार्थ, **परबतीय स्त्रियांच्या** पातिव्रत्यास कोणीही धक्का लाविला तरी, त्याचा शिरच्छेद करून पुरा सूड उगविण्यास तिच्या पतीस पूर्ण अधिकार आहे. अथवा, असा सूड घेण्यास कोणाला धर्मसंबंधीं हरकत असल्यास, पतीनें अथवा तो लहान असेल तर त्याच्या पालकानें तो गोष्ट राजास जाहीर करावी. म्हणजे त्याच्याकडून त्या बाबतींत योग्य तो विचार होतो. परंतु इतर जातींच्या संबंधानें तसें नाहीं.

परबती, व इतर जाती, आणि त्यांचे हक्क.

ह्या देशांत **ब्राम्हणाला** फाशीं देत नाहींत, किंवा त्याचा वधही करीत नाहींत. कारण तसें करण्याबद्दल **धर्मशास्त्राप्रमाणें** सक्त मनाई आहे. तथापि, त्याच्या अपराधार्थ त्याला जातिबहिष्कृत करून, त्याची धिंड काढण्यांत येते.

ब्राम्हणांस शिक्षा.

असो. येथपर्यंत **ब्राम्हणांचें** तपशिलवार विवेचन झालें. सबब, आतां इतर वर्णांकडे वळूं, आणि त्यांबद्दलची यथावकाश हकीकत देऊं.

क्षत्रियांचीं मुख्यत्वेंकरून पांच कुटुंबेंच असल्याविषयीं रजपूत अन्वयज्ञांचें मत आहे. हीं पांच कुटुंबें खालीं लिहिल्याप्रमाणें होत.–

क्षत्रियांचीं मुख्य पांच कुटुंबें.

१ परमार.

२ राठोड.

३ यादव ( किंवा जाधव )

४ चहुवाण (किंवा चव्हाण, अथववा छोहण).

५ सोलंकी.

सदरहू पांच कुटुंबांच्या अनेक शाखा आहेत, सबब त्यांचा तपशील येथें देतों.

त्यांच्या शाखा.

| | | | |
|---|---|---|---|
| १ परमार | कुटुंबाच्या | ३५ | शाखा. |
| २ राठोड | ,, | १३ | ,, |
| ३ यादव | ,, | २० | ,, |
| ४ चहुवाण | ,, | २४ | ,, |
| ५ सोलंकी | ,, | ७ | ,, |
| | | ९९ | |

मिळून एकंदर नव्याण्णव शाखा झाल्या. परंतु ह्या सर्वांचा तपशील उपलब्ध नाहीं. सबब, माहीत असलेल्या छत्तीस शाखांचीच नांवें या खालीं देतों.

| | | |
|---|---|---|
| १ सूर्यवंशी. | ४ कच्छवाहा. | ७ चहुवाण. |
| २ चंद्रवंशी. | ५ परमर. | ८ सोलंकी. |
| ३ जादववंशी. | ६ तुवार. | ९ चंदेल. |

| | | |
|---|---|---|
| १० सीलार. | १९ देवडा. | २७ कोटवाळ. |
| ११ अभीवर. | २० टांक. | २८ हूण. |
| १२ दहिमा. | २१ सैन्धव. | २९ हाडा. |
| १३ मुकवाणा. | २२ अनीग. | ३० गोड. |
| १४ गोहिल. | २३ योटीक. | ३१ कयाड जेठवा. |
| १५ गुहिलोत. | २४ प्रतिहार. | ३२ जट. |
| १६ चावडा. | २५ दधीखट. | ३३ ध्यानपाल. |
| १७ पठार. | २६ कारटपाल—काठी. | ३४ लकुम. |
| १८ राठोड. | | ३५ राजपाल. |
| | | ३६ कालछर. |

कायस्तपरभू, पाताणेपरभू, व पांचकळशी.

**कायस्तपरभू**, **पाताणेपरभू**, आणि **पांचकळशी परभू**, इत्यादींचा समावेश क्षत्रियवर्गांतच होतो. व पांचकळशी तर आपण सोमवंशीयच आहोंत, असें उघडपणें सांगतात.

ब्रह्मक्षत्रिय, भाटे, व रजपूत.

आतां, **ब्रह्मक्षत्री**, **भट्टी** अथवा **भाटे**, आणि **रजपूत**, हे मिश्र वर्गांत मोडत असल्याविषयीं कांहींचें मत आहे.

वैश्य वर्ग व त्याचे पोटभेद.

**वैश्य** वर्गांत **बनिया** किंवा **वाणी**, यांचा समावेश होतो. ह्यांत बरेच पोटभेद असल्याकारणानें, त्यांचा तपशील देणें जरूर आहे. सबब तो या खालीं देतों:—

१

| | | |
|---|---|---|
| १ श्री श्रीमाळी. | ६ आरचीतवाळ. | ११ कपोळ. |
| २ श्री माळी. | ७ ओरवाळ. | १२ करबेरा. |
| ३ अगरवाल. | ८ ओसवाळ. | १३ काकलीया. |
| ४ अनेरवाल. | ९ अंडोरा. | १४ काजोटीवाळ. |
| ५ आटबरजी. | १० कठरवाळ. | १५ कोराटवाल. |
| | | १६ कंबोवाळ. |

२

१ खडायता. २ खातरवाल. ३ खीची. ४ खंडेवाल.

३

१ गसोरा. २ गुजरवाल. ३ गोयलवाल.

४

| | | |
|---|---|---|
| १ नफाक. | ३ नागर. | ५ नात्रोडा. |
| २ नरसिंहपरा. | ४ नागद्रा. | |

५

१ चित्रोडा. २ चेहेत्रावाल.

६

| | | |
|---|---|---|
| १ झारोला. | ३ जैलवाल. | ५ जंबु. |
| २ जीरनवाल. | ४ जेमा. | ६ झालीआरा. |
| | | ७ ठाकरवाल. |

७

| | | |
|---|---|---|
| १ डीडु. | ३ डीसावाळ. | ५ तीपोरा. |
| २ डिंडोरिया. | ४ तेरोटा. | |

८

१ दसारा. २ दोइलवाल.

९

१ पदमोरा.
२ पलेवाल.
३ पुष्करवाल.
४ पंचमवाल—पांचा.
५ बटीवरा.
६ बरूरी.
७ बाइस.
८ बाग्रिया.
९ बाबरवाल—बाबर.
१० बामणवाल.
११ बाहोर.
१२ बालमीवाल.
१३ बाहोर.
१४ बेडनोरा.

१०

१ भागेरवाल. २ भारीजा. ३ भुगवाल. ४ भुंगडा.

११

१ मेडतावाल.
२ मानतवाल.
३ माड.
४ मेहेबाडा.
५ मिहीरिआ.
६ मंगोरा.
७ मंडाहूल.
८ मोढ.
९ मांडलिआ.
१० मंडोरा.

१२

१ लाड.
२ लाडिसाका
३ लिंगायत.
४ वायडा.
५ स्तबा.
६ सुरवाल.
७ सीरकेरा.
८ सोनी.
९ सोजतवाल.
१० सारवीआ.
११ सोहारवाल.
१२ साचोरा.
१३ हरसोरा.

**वैश्य** वर्गांत कायस्थ, लोहाणा, आणि भणसाळी, यांचाही समावेश होतो.

शूद्रवर्ग.

शूद्रवर्गांत शेतकरी आणि शिल्पी यांचा समावेश होत असून, त्यांतही अनेक पोटभेद व भिन्नभिन्न प्रकार आहेत. सबब सुगम पडण्याकरितां, धंदेवारीच्या अनुक्रमानेंच त्याची विल्हेवारी लावतों.

## शेतकरी.

१ कुणबी.
२ माळी.
३ गवळी.
४ काछी. हे गुजराथेंत भाजीपाला विकतात.
५ तांबोळी.
६ आहीर.
७ धनगर.

## शिल्पी.

१ **सोनार**. यांतले पोटभेद खालीं लिहिल्याप्रमाणें असून, ते बहुत करून **गुजराथ** देशांतील आहेत.
१ मास्तान. २ त्रागड. ३ श्रीमाळी. ४ मारू.

२ **कासार**.

३ **सुतार**. यांत १ वैद्य आणि २ पंचोळी, असे दोन पोटभेद **गुजराथेंत** असल्याचें कळतें.

४ **लोहार**.

५ **गवंडी**.

६ **कडिया**. ( हे गुजराथेंत गवंड्याचेंचकाम करितात.)

७ **सलाट**. (हे दगडाचें घडीव कामकरणारे होत ).

८ **कुंभार**

९ **शिंपी** ( किंवा दर्जी. )

१० न्हावी. (ह्यालाच हजाम किंवा वाळंद ही ह्मणतात.)

११ साळवी. ( किंवा खत्री ).

१२ भावसार. ( किंवा छीपा ). चीट रंगविणारे

१३ गळियारा. नीळरंगारी.

१४ सरैया. ( अथवा शिकलगार. )

१५ चूडाघड. ( हस्तीदंती बांगड्या गुजराथी रिवाजाच्या करणारे ).

१६ लुहार.

१७ राजभरा.

१८ कामळी.

१९ सरगाडिया.

२० भडभुंजा

२१ हलवाई.

२२ तेली.

२३ परीट. ( किंवा धोबी ).

गवय्ये, बजवय्ये, नट, नर्तक, भाट, मल्ल, इत्यादि.

१ गंधर्व अथवा गंधप.

२ गवय्ये.

३ बजवय्ये.

४ नट.

५ नर्तक.

६ मस्करे (ह्मणजे थट्टा मस्करी करणें, चटकदार किंवा गमतीदार बोलणें, विनोदपर भाषण करणें,हाच ज्यांचा धंदा आहे असे लोक ).

७ भाट.

८ चारण.

| | | |
|---|---|---|
| ९ वंशज्ञ. | १२ हिजडा. | तरगाळा. (खेळणारे ). |
| १० गारोडी. | १३ भांड. | |
| ११ पवाया. | १४ मल्ल. | १६ भडवे. |
| | १५ भवाया किंवा | १७ बहुरूपी. |

## मजूरदार.

| | | |
|---|---|---|
| १ गोले. | ६ धीवर. ( मासे किंवा मासळी-मारणारे ). | ९ ठाणेग, ( या तिघांकडे निरोप किंवा संदेश पोहोचविण्याचें काम असतें ). |
| २ खारवे. | | |
| ३ भोई. | | |
| ४ भिस्ती. | ७ रावळ. | |
| ५ भंडारी. | ८ वाघरी. | |

गुजराथेंतील जातिभेद.

असो. अशा प्रकारचे प्रत्येक वर्णान्तर्गत असलेले पोटभेद **गुजराथ** प्रांतांत जितके दिसून येतात, तितके अन्य ठिकाणी दृष्टिगोचर होत नाहींत. राजमान्यराजश्री नामदार **जव्हेरीलाल उमाशंकर याज्ञिक** हे एकेठिकाणीं असें लिहितात कीं, खुद्द **सुरत** शहरांतच इ० स० १८२९ सालीं, दोनशें सात ( २०७ ) जातिभेद होते. मग त्या शहराबाहेर इतर सर्व ठिकाणीं, **गुजरा-**

१ Notices of Hindu Tribes and castes.
10 th December 1872.
B. B. Royal Asiatic Society No. 28.

थेंत किती आणि कोणत्या प्रमाणानें असतील, याचा विचार करण्याचें काम मी वाचकांकडेसच सोंपतों.

यति, योगी. संत-मंडळी, इत्यादि.

आतां **योगी, यति, भक्तजन** तपस्वी, **संतमंडळी,** इत्यादि संप्रदायांतील लोकांची कांहींशी हकीकत देणें जरूर आहे, सबब त्याबद्दलची थोडिशी माहिती येथें देतों.

**ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य,** आणि **शूद्र,** हे जे पूर्वी चार वर्ण सांगितले, त्यांत फक्त **द्विजांस** ह्मणजे **ब्राह्मणांस** मात्र चतुर्थाश्रम पतकरण्याचा अधिकार असून, इतरांस तो नाहीं. तथापि, **सन्यास** ग्रहणाशिवाय, योगी, भक्तजन, तपस्वी, संतमंडळी, इत्यादींचा पेशा पाहिजेल त्या वर्णातले लोक स्विकारतात, आणि तसें करण्यास त्यांस प्रत्यवायही नाहीं. ही मंडळी बहुतकरून आपापला वर्णाश्रमधर्म पाळते. परंतु त्यांतही, परमहंसासारखे कित्येकजण जातिभेद असा मानीतच नाहींत.

त्यांचे प्रकार.

ह्या वर्गातल्या लोकांचें दिग्दर्शन होण्यासाठीं, कांहींचे प्रकार येथें सांगतों.

१ परमहंस.
२ दिगंबर.
३ योगी अथवा जोगी.
४ सन्यासी किंवा स्वामी.
५ दंडी.
६ त्रिदंडी.
७ अवधूत.
८ उदासी.
९ कपाली.
१० अघोरी.
११ बैरागी.
१२ भरथरी. (गुजराथेंतील).

१३ जंगम.
१४ तेलिया राजा (गुजराथेंतील).
१५ गोरजी. (गुजराथेंतील).
१६ आरजा. (गुजराथेंतील).
१७ शिवडा (गुजराथेंतील).
१८ ब्रह्मचारी.
१९ गोसावी.

असो. येथपर्यंत हिंदुधर्मातील मुख्य चार वर्णांचा, व त्यांतील पोटभेदांचा साधारणतः विचार झाला. सबब, आतां **वर्णसंकर** ह्मणजे काय, व तो कोणत्याप्रकारें कसा होतो, याविषयींची थोडीशी हकीकत देतों.

वर्णसंकराचा प्रकार व त्याचा भेद.

**मनुस्मृतींत**[1] वर्णसंकराचे अनेक भेद सांगितले असून, त्याला भिन्नभिन्न नांवेंही दिलेलीं आढळतात.

मूर्धाभिषिक्त.

१ **ब्राह्मणा**पासून **क्षत्रिय** कन्येला झालेल्या प्रजेस **मुर्धाभिषिक्त** किंवा **माहिष्यकरण** म्हणतात.

अम्बष्ट.

२ **ब्राह्मणा**पासून **वैश्य** कन्येला झालेल्या संततीस **अम्बष्ट** ह्मणतात.

निषाद.

३ **ब्राह्मणा**पासून **शूद्र** कन्येला झालेल्या प्रजेस **निषाद** अथवा **पारशव** म्हणतात. आणि

उग्र.

४ **क्षत्रिया**पासून **शूद्र** कन्येला झालेल्या प्रजेस **उग्र** अशी संज्ञा आहे.

५ आतां, **ब्राह्मणा**पासून खालच्या तीन वर्णांला

---

१ दहावा अध्याय पहा.

ह्मणजे क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, यांस झालेल्या प्रजेस, तसेंच क्षत्रियापासून वैश्य व शूद्र, यांस झालेल्या संततीस, आणि वैश्यापासून शूद्रास झालेल्या प्रजेस, सर्व साधारणपणें **अपसद** असें नांव दिलेलें आढळतें.

अपसद.

ही, अनुलोमानें, म्हणजे वरच्या प्रत्येक वर्णापासून खाल-च्या दरज्याच्या वर्णास झालेली, सहा प्रकारची प्रजा होय.

६ क्षत्रियापासून **ब्राह्मण** कन्येला झालेल्या **संततीस** **सूत** अशी संज्ञा आहे.

सूत.

७ वैश्यापासून क्षत्रियेस झालेल्या प्रजेस **मागध** म्हणतात.

मागध.

८ वैश्यापासून **ब्राम्हणीस** झालेल्या मुलास **वैदेह** म्हणतात.

वैदेह.

९ शूद्रापासून **वैश्येला** झालेल्या प्रजेस **आयोगव** ह्मणतात.

आयोगव

१० शूद्रापासून क्षत्रियेस झालेल्या प्रजेस **क्षत्ता** ह्मणतात. आणि

क्षत्ता

११ शूद्रापासून **ब्राह्मणीस** झालेल्या प्रजेस **चण्डाल**, अशी संज्ञा आहे.

चण्डाल.

१२ **ब्राह्मणा**पासून **उग्र** कन्येस, ( म्हणजे क्षत्रिया-पासून शूद्र कन्येला जी झालेली प्रजा तिस ), निपजलेल्या संततीस **आवृत** ह्मणतात. ( भेद ४ था पहा ).

आव्रत.

१३ ब्राह्मणापासून **अम्बष्ठ** कन्येला जी प्रजा होते, तिला **आभीर** म्हणतात. ( भेद २ रा पहा. ) आणि

आभीर.

१४ ब्राम्हणापासूनच **आयोगवीला** (भेद ९ वा पहा ) जी संतती होते, तिला **धिग्वण** ह्मणतात.

धिग्वण.

१५ निषादापासून ( भेद ३ रा पहा ) **शूद्रीला** जी प्रजा होते, तिला **पुक्कस** म्हणतात.

पुक्कस.

१६ शूद्रापासून **निषादीला** जीं मुलें होतात, त्यांस **कुक्कुटक** अशी संज्ञा दिलेली आहे.

कुक्कुटक.

१७ क्षत्त्यापासून ( भेद १० वा पहा ) **उग्र** कन्येला ( भेद ४ था पहा ) झालेल्या प्रजेस **श्वपाक** ह्मणतात.

श्वपाक.

१८ वैदेहकापासून ( भेद ८ वा पहा ) **अम्बष्ठीला** झालेल्या प्रजेस ( भेद २ रा पहा ) **वेण** ह्मणण्याचा परिपाठ आहे.

वेण.

१९ ब्राह्मण व्रात्यांपासून[१] **ब्राह्मणीला** झालेल्या मु-

---

१ व्रात्य म्हणजे वर्णाश्रम धर्माला उपनयनकालाची जी मर्यादा सांगितली आहे, तिचें उत्क्रमण करून जे मुंजीशिवाय राहतात, ते होत.

अतऊर्ध्वंत्रयोप्येते यथाकालमसंस्कृताः ।
सावित्री पतिता व्रात्या भवन्त्यार्य विगर्हिताः ॥ ३९ ॥
( मनुस्मृति. अ २. )

( पुढें चालू )

लांस **भूर्जकंटक,** आवन्त्य, वाटधान, पुष्पध, आणि शैरव, अशा संज्ञा आहेत.

भूर्जकटक वगैरे.

**२० क्षत्रिय** व्रात्यापासून क्षत्रिणीला झालेल्या संततीला **झल्ल**, मल्ल, निच्छिवि, नट, करण, खस, आणि द्रविड, अशीं नांवें आहेत.

झल इत्यादि.

**२१ वैश्य** व्रात्यापासून वैश्येला झालेल्या प्रजेला **सुधन्वा**, आचार्य, कारुष, विजन्मा, मैत्र, सात्वत, असें म्हणतात.

सुधन्वा.

**२२ निषादा**पासून ( भेद २ रा पहा ) **वैदेही**ला ( भेद ८ वा पहा ) झालेल्या प्रजेस **कारावर**, पांडुसोपाक, आहिण्डिक, किंवा चर्मकार म्हणतात.

चांभार.

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

पहिल्या तीन वर्णांचा मौंजीबंधन काल खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

ब्राह्मणाचें उपनयन पांचव्या, आठव्या, किंवा सोळाव्या वर्षी करावें. क्षत्रियाचें सहाव्या, अकराव्या, किंवा बाविसाव्या वर्षी करावें. आणि वैश्याचें आठव्या, बाराव्या, किंवा चोविसाव्या वर्षी करावें.

गर्भाष्टमेऽब्दे कुर्वीत ब्राह्मणस्योपनायनम् ।
गर्भादेकादशे राज्ञो गर्भात्तु द्वादशे विशः ॥ ३६ ॥
ब्रह्मवर्चसकामस्य कार्यं विप्रस्य पंचमे ।
राज्ञो बलार्थिनः षष्ठे वैश्यस्येहार्थिनोऽष्टमे ॥ ३७ ॥
आषोडशाद्ब्राह्मणस्य सावित्री नातिवर्तते ।
आद्वाविंशात्क्षत्रबंधोराचतुर्विंशतेर्विशः ॥ ३८ ॥

( म. स्मृ. अ. २ ).

अशा प्रकारें वर्णसंकर झाल्यानें जी प्रजा उत्पन्न होते, त्यांच्या गुणधर्मास अनुसरून निरनिराळे धंदे व उद्योग मनुस्मृतींत सांगितले आहेत.

ह्या प्रत्येक जातिभेदाचा धंदा व उद्योग.

आतां, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, या वर्णांपैकीं पहिल्या तीन वर्णांतले लोक एकमेकांबरोबर, फार प्राचीन काळीं, रोटीव्यवहार करीत असत. इतकेंच नव्हें तर, ते आपापल्या स्थितिपराक्र-

प्राचीनकाळीं, ब्राह्मणांचा इतर वर्णांशीं रोटी आणि बेटी व्यवहार.

---

१ सूतानामश्वसारथ्यमम्बष्टानां चिकित्सनम् ।
वैदेहकानां स्त्रीकार्यं मागधानां वणिक्पथः ॥ ४७ ॥
मत्स्यघातो निषादानां त्वष्टिस्त्वायोगवस्यच ।
मेदान्ध्रचुञ्चुमद्गूनामारण्य पशुहिंसनम् ॥ ४८ ॥
क्षत्तुग्रपुक्कसानां तु विलौको वधबंधनम् ।
धिग्वणानांचर्म कार्यं वेणानां भाण्डवादनम ॥ ४९ ॥
चैत्यद्रुमश्मशानेषु शैलेषूपवनेषुच ।
वसेयुरेते विज्ञाना वर्तयन्तः स्वकर्मभिः ॥ ५० ॥
(अ) चण्डालश्वपचानांतु बहिर्ग्रामात्प्रतिश्रयः ।
अपपात्राश्च कर्तव्या धनमेषां श्वगर्दभम् ॥ ५१ ॥
(आ) दिवाचरेयुः कार्यार्थं चिन्हिता राजशासनैः ।
अबान्धवं शवंचैव विर्हरेयुरिति स्थितिः ॥ ५५ ॥
(इ) वध्यांश्चहन्युः सततंयथाशास्त्रं नृपाज्ञया ।
वध्यवासांसि गृण्हीयुः शय्याश्चाभरणानिच ॥ ५६ ॥
(म. स्मृ. अ. १० ).

मानुसार उच्च वर्णांतही जाऊं शकत. त्याचप्रमाणें, अनार्य[1] लोकांस देखील **व्रात्यस्तोम** करून उच्च वर्गांत जातां येई.

मनुस्मृतिकालांतील व्यवस्था.

**मनुस्मृतिकालांत**, हें वर्णव्यवस्थेचें बंधन जरासें जास्त कडक होतें. तथापि, त्या वेळेस देखील **ब्राह्मणवीर्यापासून शूद्रीस** झालेली प्रजा, सातव्या पिढींतच, **ब्राह्मण** वर्णांत सामील होई. म्हणजे **ब्राह्मणापासून शूद्रीस** झालेली जी प्रजा एकसारखी सात पिढ्यांपर्यंत फक्त **ब्राह्मणाशींच** शरीरसंबंध ठेवी, ती सातव्या पिढीला **ब्राह्मण** वर्गांत जाई.

**शूद्रायां ब्राह्मणाज्जातः श्रेयसाचेत्प्रजायते ।**
**अश्रेयान् श्रेयसीं जातिं गच्छत्यासप्तमाद्युगात् ॥ ६४ ॥**
**शूद्रो ब्राह्मणतामेति ब्राह्मणश्चैति शूद्रताम ।**
**क्षत्रियाज्जातमेवं तु विद्याद्वैश्यात्तथैवच ॥ ६५ ॥**

( मनुस्मृति अ. १०. )

**याज्ञवल्क्य स्मृतीप्रमाणें** तर, **क्षत्रिय** किंवा **वैश्य** हे वरील नियमास अनुसरून, पांचव्या अथवा तिसऱ्या पिढींत देखील **ब्राह्मण** होऊं शकत.

परंतु, हा प्रकार प्राचीन काळचा झाला असून, त्यापैकीं,

---

१ याबद्दलची सविस्तर हकीकत पूर्वार्धाच्या दुसऱ्या पुस्तकांत दिलेली आहे. भाग ११ वा, पान ४६ ते ५१ पहा.

त्यांत बदल, व सांप्रतकाळची स्थिति.

अर्वाचीन काळीं, काडीमात्रही अवशिष्ट ह्मणून राहिलें नाहीं. हल्लीं, एक वर्णाचा **रोटीव्यवहार** दुसऱ्या वर्णाशीं तर बिलकूल होतच नाहीं, परंतु, ज्या त्या वर्णांत देखील हा रोटीव्यवहार होण्याची मोठी मारामार पडते. मग **बेटीव्यवहाराची** तर गोष्टच बोलावयास नको.

त्याचा परिणाम.

तथापि, एकदृष्टीनें पाहिलें ह्मणजे, इतर वर्णांशीं हा जो **बेटीव्यवहार** अजिबात बंद झाला, हेंही एकप्रकारें कांहीं अंशांनीं बरेंच झालें ह्मणावयाचें. कारण, तशी बंदी कायमची होऊन चुकल्यामुळें, **विशि-ष्टोत्पत्ति** होण्यास सद्यःस्थितींत पुष्कळ अंशीं चांगली जागा-राहिली. ती अशी कीं, ह्या व्यवस्थेनें उच्च वर्णांतील शरीर-संबंध उच्च वर्णांतच होत गेला; आणि तेणेंकरून, आनु-वंशिक बुद्धिप्रागल्भ्य, तेजोविशेष, किंवा पराक्रमशीलता, इत्यादि गुण आमच्या सांप्रतच्या अवनतिकालांतही बऱ्याच अंशानें टिकले, व. चालत आले. त्याचप्रमाणें, खालच्या वर्णांतील शरीरसंबंध तत्सदृश वर्णांशीं होत गेल्यानें, परंपरा मिळत असलेलें शिक्षण किंवा औद्योगिक व्यवसाय, अथवा कलानैपुण्य, हीं देखील ज्या त्या कुटुं-बांत बऱ्याच प्रमाणानें अजूनही राहिलीं.

आतां, **हिंदुसमाजांतील हे विशिष्ट प्रजोत्पत्तीचे** नियम हल्लींपेक्षांही विशेष पद्धतशीर आणि दृढतर पाया-

वर असते; म्हणजे फक्त उच्च, किंवा ज्या त्या वर्णांतील

त्याचें मूलबीज, विशिष्ट प्रजोत्पत्तीच होय.

उत्तम स्त्रीपुरुषांचाच परस्पर शरीरसंबंध होत गेला असता; किंवा, तद्विषयक जास्त काळजी घेतली असती; तर ही चालत आलेली परंपरा व तदंगभूत संस्कार, आणि हें आनुवंशिक प्राबल्य व तदन्तर्गत गुणोत्कर्ष, हीं आमच्यांत हल्लींपेक्षांही जास्त प्रमाणानें, किंबहुना शतपटीनें, वास करतीं. इतकेंच नव्हें तर, तीं ठायीं ठायीं भासमान होऊन, विशेष रीतीनें चमकलीं असतीं.

परंतु विशिष्ट प्रजोत्पत्तीकडे आमचे पुढें पुढें पुष्कळच दुर्लक्ष होत गेलें. तसेंच, सर्व प्रकारें योग्य अशा जोडप्यांचाच शरीरसंबंध होण्याविषयीं देखील आम्हीं बेफिकीर राहिलों; व एकाच वर्णांतही भलतींच जोडपीं होऊं दिलीं. त्यामुळें, सशक्त किंवा अशक्त, बुद्धिमान अथवा मतिमंद, निरोगी अगर रोगी, यांजविषयींचा वर्ज्यावर्ज्य विचार एक बाजूला राहून, सकट घोडे आणि बारा टक्के, या न्यायानें मनःपूत मिश्रण होऊं लागलें. आणि त्याचा अनिष्ट परिणाम असा झाला कीं, वर्णान्तर्गतच संकर होऊन, आमचें आनुवंशिक तेज मात्र फिकें पडलें.

१ तद्विषयक दुर्लक्ष्य, व त्यामुळें झालेला संकर.

असो. या ठिकाणीं आणखी एक गोष्ट सांगणें अगदीं

१ Natural Selection.

जरूर आहे. ती ही कीं, केवळ वर्णान्तर होण्याकडेच लक्ष न पुरवितांही फक्त **विशिष्ट प्रजोत्पत्तीसंबंधीं** अथवा उत्तम प्रजोत्पादन होण्याबद्दलच जर विशेष लक्ष्य पोहोंचविलें, तरी देखील, आपले इष्ट हेतु म्हणून सिद्धीस गेलेच पाहिजेत. कारण, संयोगजन्यफल हेंच ह्या गोष्टीचें मूलतत्व आहे. सबब, जावत्कालपर्यंत उत्तमोत्तम जोडप्यांचा शरीरसंबंध होत आहे, तावत्कालपर्यंत निकोप आणि तेजस्वी अशी प्रजा होणें अगदीं स्वाभाविक आहे.

विशिष्ट प्रजोत्पत्तीला वर्णभेदाची निरवश्यकता.

ह्याचें ठळक उदाहरण जसें प्राचीन काळीं दृष्टीस पडतें, तसेंच सांप्रतकाळींही तें दृग्विपयीभूत होतें.

त्याचीं उदाहरणें.

पूर्वी, एकवर्णाचा रोटी आणि बेटीव्यवहार[1] इतर वर्णांशीं होत असे. तरी देखील त्यावेळची प्रजा सकस, बलवान, निरोगी आणि बुद्धिमान् होती. व हल्लीं सुद्धां, **विशिष्टप्रजोत्पत्तीकडे** ज्यांचें ज्यांचें ह्मणून लक्ष्य आहे, त्यांची प्रजा देखील तशीच निकोप आहे.

प्राचीन काळचीं, व सांप्रतकाळचीं,

**पाश्चात्य** देशांत वर्णभेद किंवा जातिभेद नाहीं. तथापि

१ भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक दुसरें, भाग ११ वा, पान ४९ । ५० । ५१ पहा.

लग्नव्यवहार होते वेळीं, स्त्रीपुरुषांच्या प्रकृतींची स्थिति मनांत आणूनच परस्पर शरीरसंबंध होत असल्या कारणानें, भावी संतति चांगली निपजते. **पौरस्त्य** देशांतही, **भरतखंड** खेरीज करून वर्णभेद किंवा जातिभेद बिलकूल नाहीं. तथापि, जिकडे जिकडे म्हणून **विशिष्टप्रजोत्पत्तीकडे** जास्त लक्ष्य आहे, तिकडे तिकडे निकोप प्रजा असल्याचेंच दिसून येतें.

पौरस्त्य व पाश्चात्य देशांतील.

परंतु धर्मबंधनाशिवाय, मनुष्यमात्राची अशा प्रकारची प्रवृत्ति कधींही कायम राहत नाहीं. व त्यामुळें, हं हं म्हणतां सर्व प्रकारचा संकर उत्पन्न होतो. केवळ धर्मबंधन असलें तरी देखील तें कालान्तरानें विगलित होतें, आणि एकदां कां तें शिथिल झालें म्हणजे मनावरचा दाबही हळू हळू लयास जाऊन, सामाजिक अरिष्ट ओढवतें. कारण, प्रजोत्पादनविधीविषयीं जरूर ती काळजी न घेतल्यानें संकर उद्भवतो, व भावीप्रजा निःसत्व आणि निर्बल होऊन, देशाच्या अवनतीस साहजीकच प्रारंभ होतो. मग अशा प्रकारचें कोणत्याही तऱ्हेचें सामाजिक किंवा धर्मबंधनच नसल्यावर, किती व कसा अनर्थ गुदरेल, याची कल्पना कोणालाही होण्यासारखी आहे.

विशिष्टप्रजोत्पादनांत धर्मबंधनाचें कारण.

याकरितां, संकर न होऊं देण्याविषयीं जपण्याचें काम प्रत्येक राष्ट्राचें, प्रत्येक समाजाचें, आणि प्रत्येक व्यक्तीचें आहे. आतां, **संकर** म्हणजे मिश्रण, किंबहुना कुमिश्रण, अथवा विजोडत्व होय. सबब, हा न होऊं दिल्यानें प्रत्येक व्यक्तीचा, समाजाचा, व त्यामुळेंच राष्ट्राचा देखील आपोआपच फायदा होणारा आहे.

संकर व त्याची स्थूल व्याख्या.

ह्या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून, आणि दुसऱ्या कित्येक आनुषंगिक गोष्टी मनांत आणून, आमच्या दूरदर्शी पूर्वजांनीं **आर्यहिंदूंच्या वर्णसंस्थेंत**, एक धर्मबंधनाचेंच घोडें दकललें. आणि निदान वर्णसंकर तरी होऊं नये, अशाविषयीं दूरवर लक्ष्य पुरवून, एक वर्णाचा अन्य वर्णाशीं बेटीव्यवहारच न व्हावा, एतदर्थ, तद्विषयक कायमचा नियमच करून टाकला.

तद्विषयक आर्य हिंदूंची दूरदृष्टि.

आतां, ज्या त्या वर्णांत देखील, **विशिष्टप्रजोत्पत्ती**कडे प्रत्येक व्यक्तीनेंच चांगलें लक्ष्य दिलें असतें; म्हणजे यच्चावत् स्त्रीपुरुषांचा उत्तम प्रकारचा जोडा किंवा शरीरसंबंध होण्याविषयीं प्रत्येकानेंच चांगली काळजी घेतली असती तर, आमच्या पूर्वजांचे हेतु सर्वप्रकारें पार पडून, सर्वथैव सफळ झाले असते. परंतु तितकी व्यंगता कायम

वर्णसंस्था व विशिष्टप्रजोत्पत्ती.

राहत गल्यामुळे, आमच्या आनुवंशिक तेजांत तितक्याच प्रमाणानें गौणत्व आलें. तथापि, सांप्रतच्या आमच्या अवनतिकाळांतही, आमची **भारतीय** प्रजा ह्या भूगोलावरून अजिबात नाहींशी झाली नाहीं, किंवा ती साफ धुळीस मिळाली नाहीं, याबद्दल आम्हीं सर्वथैव आमच्या पूर्वजांचेच ऋणी आहोंत. आणि ह्याचें मुख्य कारण म्हटलें ह्मणजे आमची **वर्णसंस्था**च होय.

ह्यासंबंधानें कोणी कदाचित् असा प्रश्न करील कीं, अहो, **वर्णसंस्थे**ची ही जी तुम्ही येवढी मोठी थोरवी गातां, किंवा तिचा हा जो येवढा मोठा तुम्ही ढंढाराच माजविला आहे, त्यापासून **आर्य**हिंदुसमाजाला आजपर्यंत म्हणण्यासारखे फायदे ते कोणते झाले ? किंवा अशा प्रकारची वर्णसंस्था नसल्या कारणानें, **आर्य**-हिंदूसारखींच महापराक्रमी व अति बलाढ्य अशीं जीं राष्ट्रें प्राचीन काळीं होऊन गेलीं, त्यांचें नुकसान तें कोणतें होऊन गेलें ?

हिंदू व इतर प्राचीन राष्ट्रांची तुलना

होय. हा प्रश्न अगदीं बरोबर आहे. आणि अशा प्रकारची शंका निघणें देखील केवळ रा त आहे. सबब, तिचें निवारण कोणत्या साधनांनीं करितां येईल, याविषयींचा विचार करूं.

सदरहू प्रश्नाचें उत्तर देण्यासाठीं, आपल्याला फार

प्राचीन काळचा इतिहास पाहून, त्या प्राक्कालीन सर्व राष्ट्रांचें अवलोकन केलें पाहिजे. आणि तसें केल्यानेंच, पूर्वींची थोडी बहुत हकीकत कळून येईल; व एकंदर तुलनेनें कार्यकारणभावाचा आणि घडून आलेल्या परिणामाचा सारासार विचार करण्यास सुगम पडेल.

मिसर देश.

**मिसर ( ईजिप्त )** देशाचें राज्य फार प्राचीन असून, तें २१५८ वर्षें[१] टिकलें असल्याविषयीं प्राचीन इतिहासकारांचें मत आहे. परंतु त्याचा हल्लीं मागमूसही नसून, सांप्रत काळीं हा देश **इस्लाम** प्रभुत्वाखालीं आहे.

कार्थेज.

**कार्थेजचें** राज्य ७०० वर्षेंपर्यंत[२] एकसारखें चालल, परंतु तेंही शेवटीं **रोमन्सनीं** भस्मसात् केलें.

आसीरिया.

**आसीरियाचें** राज्य १४५० वर्षें[३] राहून, त्याचा आज मित्तीस कोठें पत्ताही नाहीं.

निनिव्ही, बाबिलन् इत्यादि.

**निनिव्ही, बाबिलन्, मीड, लिडिया,** व **इराण,** यांचींही राज्यें एकामागून एक अशीं होऊन, शेवटीं धुळीसच मिळालीं.

---

१. Rollin's Ancient History. (Vol 1 Book 1, P,19.)
२ Rollin's Ancient History. (Vol.I Book II.P.40.)
३ Rollin's Ancient History.(Vol,I BookIII.P.111.)

ग्रीस व मासिडोनिया.

**ग्रीस** आणि **मासिडोनिया** यांनींही आपला बराच पराक्रम गाजविल्यावर, शेवटीं **रोमन्** साम्राज्यांत गडप्प होऊन, तींही लयास गेलीं.

आणि रोम.

शेवटीं, जें **रोमचें** राज्य **आशिया, आफ्रिका,** आणि **यूरोप,** या तीन्ही खंडांत विस्तृत होतें, तेंही कालान्तरानें रसातळास जाऊन, त्याचा फक्त नामावशेषच राहिला.

भरतखंड, त्याचा ऱ्हास, व त्याचें पुनरुज्जीवन.

आतां, हीं जीं प्राचीन राष्ट्रें एकदां जमीनदोस्त झालीं, तीं पुनश्च कधीं देखील उदयास आलीं नाहींत. परंतु ह्या सर्वांत आमचें राष्ट्र अतिप्राचीन, किंबहुना प्राचीनतम असतांही, तशी वाताहात आमच्या **हिंदुराष्ट्राची ईशकृपेनें** आजपर्यंत कधीं देखील बिलकूल झाली नाहीं. आम्हांवर अनेक वेळीं वारंवार फारच तीव्र आघात झाले. आमच्या देशावर परकियांनीं कित्येक वेळां जुलमाच्या स्वाऱ्या करण्यास सैन्य देखील आणिलें. कित्येक प्रसंगीं त्यांनीं आमचा देश लुटून फस्तही केला. कांहींनीं आमचें कनकरत्नादि द्रव्यभांडार सुद्धां नाहींसें करण्याच्या हेतूनें देशान्तरीं नेलें. कित्येकांनीं आमची अमूल्य ग्रंथसंपत्तीच जाळून टाकिली. कांहीं मदांधांनीं आमच्या गद्यपद्यादिरत्नोदधीनें भरलेल्या पुस्तकालयास आग लावून

आपल्या नेत्रकमलांचें एकदांचें पारणें फेडलें. आणि **अविन्धांनीं** व **पोर्चुगीज्** सारख्या **ख्रिस्ती** राष्ट्रांनीं तर, आमचा सनातन **हिंदुधर्म** व आमचें प्राचीनतम **हिंदुराष्ट्र**, ह्यांस अजिबात ढाळक देऊन रसातळास मिळविण्यासाठीं, समूळच खणून टाकण्याचा कायमचा संकल्प केला.

त्याचें कारण, व त्याचे दाखले.

परंतु, आमची **वर्णसंस्था** आणि तदन्तर्गत **समाजबंधन**, हींच परिणामीं फलास येऊन, आमच्या विशेष उपयोगीं पडलीं. आणि ज्याप्रमाणें पाण्याचे लोटच्या लोट आले असतांही, लव्हाचीं बेटें कायमच राहतात; व मोठा पूर आला कीं आपली मान नमती करून, तो गेल्यावर हे लव्हे आपलें डोकें हळूच पुढें काढतात; त्याचप्रमाणें आम्हां **आर्य हिंदूंची** स्थिति असल्या कारणानें, अनेक राज्यक्रान्ती झाल्या असतांही आम्हीं आपलीं डोकीं वरच करून आहोंत. असंख्य राज्यांच्या घडामोडी झाल्या तरी आम्ही कधींही निमालों नाहीं. इतकेंच नव्हें तर, प्रत्येक अनुकूल अशी संधी पाहून, आम्हीं आपलेंसेंच कायम केलें; मनांत आणलेली गोष्ट तडीस नेली; पारदेशिकांस निःसत्व करून, त्यांस झुगारूनही दिलें; त्यांचा शक्तिनिपात करून फिरून **स्वातंत्र्य** संपादन केलें; आणि **हिंदु साम्राज्याची** पुनः पुनः संस्थापना करून, **एकछत्री राज्य**ही अनेक वेळां भोगिलें.

वेदकालीन साम्राज्य.

वेदकालीन साम्राज्यांत[1] आम्हीं आपला पगडा आर्यावर्तांत सर्वत्र बसविला; आणि रामायणकालीन साम्राज्यांत[2] त्याचा ज्यास्त विस्तार केला. त्यामुळें, हिमालयापासून तों तहत कन्याकुमारीपर्यंत, आर्यहिंदूंचें एकछत्री राज्य झालें. तदनंतर युधिष्ठिर कालीन साम्राज्यांत[3] तें पूर्व आणि पश्चिम दिशेकडे पसरलें. परंतु पुढें, पश्चिमेकडून इराणी, ग्रीक, इत्यादि लोकांनीं या भरतखंडावर अनेक स्वाऱ्या केल्यामुळें, हिंदुस्वातंत्र्यास जरासा अचका बसला. तथापि, मौर्यकुलावतंस जो अशोक[4], त्यानें पुनश्च दिग्विजय करून, आर्यस्वातंत्र्यास स्वस्थानापन्न केलें.

युधिष्ठिर कालीन साम्राज्य.

विक्रमादित्यादि साम्राज्य.

पुढें, उज्जनीचा राजा विक्रमादित्य, आणि बंगालें[5], कनोजें[5], व दिल्ली[6], येथील हिंदू राजांनीं देखील मोठमोठे पराक्रम करून, हिंदूसाम्राज्याची परंपरा कायम राखली.

---

१ ऋग्वेद पहा. त्याचप्रमाणें डाक्टर हण्टरचा हिंदुस्थानचा इतिहास पहा.

२ रामायण, आणि टॉडकृत राजस्थानचा इतिहास पहा.

३ महाभारत, व टॉडचें राजस्थान पहा.

४ भारतीय साम्राज, पूर्वार्ध, भाग ११ वा, पुस्तक २ रें. पान ६० व पान ५६ ते ७१ पहा.

५ Elphinstone's India. ६ Tod's Rajastan.

तदनंतर, तैमूरलंगाच्या वंशजांनीं हिंदुस्थानांतच आपली कायमची गादी स्थापण्याचा विचार केला. आणि औरंगजेब बादशहानें तर आपल्या राजकीय अमलाबरोबर आणखी एक परधर्माचा अम्मलही सर्वत्र गाजविला.

तैमूरवंशज प्रभुत्व.

तेव्हां, अशा प्रकारें, धर्मासारख्या नाजूक प्रकरणांत, दिल्लीच्या अधिपतीनेंच हात घातल्यामुळें, इस्लामशाही मातली. आणि त्याचा घातक परिणाम असा झाला कीं, अखिल भरतखंडच शिखानष्ट होऊन, आमचा सनातन आर्यधर्म एकदम मावळतो कीं काय, अशी सर्वांस भीति वाटूं लागली. परंतु,

धर्मप्रकरणांत इस्लामचा हात व त्याचा घातक परिणाम.

दैवेनोपहतस्यबुद्धिरथवापूर्वंविपर्यस्यति[1] ॥

या ह्मणीप्रमाणें, त्या अविन्धांचे हे सर्व दुष्ट हेतु, वंध्यापुत्राप्रमाणें अगदीं वृथा होऊन, जेथल्या तेथेंच थिजले. इतकेंच नव्हें तर, आमच्या ह्या दयित हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं, परमेश्वर संकल्पानुरूप प्रत्यक्ष शिवरूपी श्री शिवछत्रपती महाराजांची अपूर्व योजना झाली; आणि त्यामुळें हिंदुधर्मास मोठेंच पाठबळ मिळालें. फार तर काय सांगावें, पण रामदासस्वा-

हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन.

शिवाजी महाराजांचा उदय, व इस्लामची समाप्ति.

१ मुद्रा राक्षस.

मीच्या ह्याच शिवबांनीं दिगंतरीं अतुल पराक्रम गाजवून आपल्या प्रौढ प्रतापांनीं हिंदुसाम्राज्याची पुनश्च प्रतिष्ठापना केली. आणि पुढें, त्यांच्याच कृपाप्रसादानें थेट एकोणिसाव्या शतकापर्यंत, पेशव्यांनीं आपल्या बाहुबलानें व सूर्यसमदीप्तीनें, इस्लाम[2] आणि ख्रिस्तशाहीस[2] दातीं तृण धरावयास लाविलें.

ह्याचें मुख्य कारण म्हटलें ह्मणजे आमची वर्णसंस्था,[3]

१ Vide.

Dr. Hunter's Indian Empire.

David Sinclair's History of India.

Grant Duffs' History of the Marathas.

२ मराठ्यांनी फिरंग्यांस ( पोर्चुगीज् लोकांस ) कसें जर्जर केलें; आणि ज्या ज्या ठिकाणीं ह्मणून त्यांचीं ठाणीं होतीं, तीं कशीं उध्वस्त करून टाकिलीं; तसेंच इंग्रजासारख्या तरवारबाहाद्दुरांस देखील आह्मीं कसें जेरीस आणिलें व त्यामुळें ते मराठ्यास कसें थरथरा कांपत होते, हें सर्वांस महशूर आहे. मेकाले ह्मणतो कीं,

" Even the European factors trembled for their magazines, * * * and the name of the Maratha ditch still preserves the memory of the danger ".

( Lord Clive by Macaulay ).

३ याकामीं, आनी बिझांट नामक विदुषीबाईंचे देखील अशाच मासल्याचे उद्गार आहेत. मुंबईत व्याख्यान देतांना एके दिवशीं असें बोलल्या कीं,

" In the history of the world, India lived because

व तदन्तर्गत असलेलें आमचें जबरदस्त **समाजबंधन**, हीं होत. आणि ह्यामुळेंच, आमचें आनुवंशिक **तेज** व **बुद्धिप्रभाव**, आणि प्रौढ **पराक्रमप्रताप**, हीं आज हजारों वर्षांच्या वंशपरंपरेंतही कांहीं कमी जास्त प्रमाणांनीं आह्मांत अगदीं कायम राहिलीं आहेत.

वर्णसंस्था व समाजबंधन हेंच त्यांचें बीज.

---

India's was the spirit of humanity which could not die. She was the earliest of the Aryan peoples, the first born of the mightiest races, she had for her guides and instructors spiritual sages, and rishi's, and divine kings. It was, therefore, that India's religion and her social system was *permanent* at its foundation, whatever might appear on the surface. These had in themselves the *possibility of a revival*, though they might have disappeared for a time. These were *the four great Castes*, which they would find in every Scripture spoken of continually and woven into the growing history of the nation. The caste- system had enshrinedin it a principle, which was based on a truth which was the truth of natural order."

( Mrs. Anne Besant on India and its Mission. )

हें व्याख्यान विदुषीबाई मजकुरनीं, तारीख १ जानेवारी १८९४ रोजीं, मुंबई येथें हायकोर्टासमोरील मैदानांत दिलें असून, त्यावेळीं सुमारें तीन हजार प्रेक्षक जमलेले होते.

आतां, क्वचित् प्रसंगीं त्या गुणांचा लोपही झाल्यासारिखें भासमान होतें खरें. तथापि, वस्तुतः त्यांचा अजिबात म्हणून कधीं देखील नाश होत नाहीं. मात्र ते प्रच्छन्नावस्थेंत असतात, आणि जरासें कारण मिळालें कीं ते अपोआपच प्रज्वलित होतात. त्यामुळें, त्यांचें वारंवार पुनरुज्जीवन होतें, व तेणेंकरूनच आमचा प्रौढ प्रताप पुनःपुनः दृष्टिगोचर होतो.

त्याची प्रच्छिन्न स्थिति.

असो. आमच्या सारखी अशाप्रकारची समाजव्यवस्था, प्राचीनकाळच्या कोणत्याही राष्ट्रांत नसल्यामुळें, तीं ( राष्ट्रं ) एकदां नष्ट झाल्यावर पुनश्च म्हणून उफाळ्यास अशीं आलींच नाहींत. आणि याच कारणांसाठीं, आह्मीं हिंदूंनीं आपल्या वर्णाश्रमधर्माला व समाजसंस्थेला अगदीं बिलगून राहिलें पाहिजे. आणि म्हणूनच **आनिबिझांट्** बाई देखील "**हिंदूंनीं आपल्या हिंदुधर्माचें बंधन कधीं देखील सोडूं नये**," अशा अर्थाचा उपदेश, आम्हांला वारंवार करितात; व **जर्मनींतले डाक्टर पाल देवसेन** हे सुद्धां असेंच म्हणतात.

सिंहावलोकन.

---

१ "Indians ! stick to it." ( Anne Besant. )

( Dr. Paul Deussen's address on the Philosophy of the Vedanta. Saturday the 25th February 1893. )

पाश्चात्यांचे तद्विषयक अभिप्राय.

परधर्मीयांच्या अनेक राज्यक्रान्तींतही आमचें हिंदुत्व कोणत्या कारणांनीं कसें राहिलें, आणि तें आज हजारों वर्षांच्या घडामोडींत कायम राहण्याला आमच्या हिंदुसंस्था कशा उपयोगीं पडल्या, हें सर. सी. मेट्काफ् सारख्या पाश्चात्य[१] विद्वानांचे व शोधक गृहस्थांचे लेख वाचल्यानें तेव्हांच कळण्यासारखें आहे.

विशिष्ट प्रजोत्पत्तीचें मूलतत्व, व तदंगभूत आमच्या वर्णव्यवस्थेचें ध्येय.

अस्तु. तात्पर्य ह्मणून इतकेंच कीं, विशिष्ट प्रजोत्पत्तीचें जें मूलतत्व, त्याला तिळमात्रही धक्का बसूं नये एतदर्थ, आणि होता होई तों आमचें अति पुराण, किंबहुना पुराणतम हिंदुराष्ट्र कोणत्याही प्रकारें कधीं देखील लयास जाऊं नये यासाठीं, आमच्या पूर्वजांनीं हें वर्णव्यवस्थेचें घोंगडें, जाणून बुजून आमच्या गळ्यांत घातलें व त्याला एक नियमित मर्यादा लावून दिली.

१ vide. (1) Sir C. T. Metcalfe's report of the Select committee of the House of Commons. vol. III 1832.
(2) Maine's village communities.
(3) Elphinstone's History of India.
(4) Times of India. Dated 18th June 1891.

पाश्चात्यांची तद्विषयक भ्रांतिमूलक समज.

आतां, **पौरस्त्य** ज्ञाननिर्झराचा आस्वाद न मिळालेल्या कांहीं विद्वानांस, व फक्त पाश्चात्य **ज्ञानामृत** मकरंदांनींच पोषित झालेल्या कित्येक उंबरांतील **पंडित** भ्रमरांस, असें वाटतें कीं, **विशिष्टप्रजोत्पादनविधीचें** तत्त्व **डार्विन्**शिवाय अन्य कोणाला[१] माहीत नव्हतें; मग **पौरस्त्यांस** तर त्याचा गंध देखील असण्याचा संभवच नाहीं. किंवा तें त्यांच्या स्वप्नीं सुद्धां नसेल! परंतु तसें बिलकूल नसून, हें तत्व आमच्या **आर्यपूर्वजांस** चांगल्या प्रकारें माहीत होतें. आणि त्याविषयींची प्रत्यक्ष साक्ष आमच्या **श्रुति** व **स्मृतिच** देतील.

सुसंस्कृत ज्ञानानें शंकेचें निरसन.

फार तर काय सांगावें पण, ज्या ज्या **पाश्चात्य पंडितांच्या** विद्येंत **पौरस्त्य** देशांपैकीं **भरतखंडांतील** ज्ञानाची भर पडून तें सुसंस्कृत झालें आहे, त्या त्या सर्वांचाही असाच अनुभव आहे. एके ठिकाणीं, **सर. मॉनियर विलियम्स्नें** असें म्हटलें आहे कीं, **हिंदु हे डार्वि-**

१. "Indeed, if you will pardon the anachronism, the Hindus were Spinozaites more than 2,000 years before Spinoza; and Darwinians many centuries befor[e] Darwin; and Evolutionists many centuries be-f[ore the] Doctrine of Evolution had been accepted by

(पुढे चालू.)

पाश्चात्यांचे तद्विषयक अभिप्राय.

परधर्मीयांच्या अनेक राज्यक्रान्तींतही आमचें हिंदुत्व कोणत्या कारणांनीं कसें राहिलें, आणि तें आज हजारों वर्षांच्या घडामोडींत कायम राहण्याला आमच्या हिंदुसंस्था कशा उपयोगीं पडल्या, हें सर. सी. मेट्काफ् सारख्या पाश्चात्य[1] विद्वानांचे व शोधक गृहस्थांचे लेख वाचल्यानें तेव्हांच कळण्यासारखें आहे.

विशिष्ट प्रजोत्पत्तीचें मूलतत्व, व तदंगभूत आमच्या वर्णव्यवस्थेचें बंधन.

अस्तु. तात्पर्य ह्मणून इतकेंच कीं, विशिष्ट प्रजोत्पत्तीचें जें मूलतत्व, त्याला तिळमात्रही धक्का बसूं नये एतदर्थ, आणि होता होई तों आमचें अति पुराण, किंबहुना पुराणतम हिंदुराष्ट्र कोणत्याही प्रकारें कधीं देखील लयास जाऊं नये यासाठीं, आमच्या पूर्वजांनीं हें वर्णव्यवस्थेचें घोंगडें, जाणून बुजून आमच्या गळयांत घातलें, व त्याला एक नियमित मर्यादा लावून दिली.

---

१ vide. (1) Sir C. T. Metcalfe's report of the Select committee of the House of Commons. vol. III 1832.
(2) Maine's village communities.
(3) Elphinstone's History of India.
(4) Times of India. Dated 18th June 1891.

आतां, **पौरस्त्य** ज्ञाननिर्झराचा आस्वाद न मिळालेल्या काहीं विद्वानांस, व फक्त पाश्चात्य ज्ञानामृत मकरंदांनींच पोषित झालेल्या कित्येक उंबरांतील **पंडित** भ्रमरांस,

पाश्चात्यांची तद्विषयक भ्रांतिमूलक समज.

असें वाटतें कीं, **विशिष्टप्रजोत्पादनविधीचें** तत्त्व **डार्विन्** शिवाय अन्य कोणालाही माहीत नव्हतें; मग **पौरस्त्यांस** तर त्याचा गंध देखील असण्याचा संभवच नाहीं. किंवा तें त्यांच्या स्वप्नीं सुद्धां नसेल! परंतु तसें बिलकूल नसून, हें तत्व आमच्या **आर्यपूर्वजांस** चांगल्या प्रकारें माहीत होतें. आणि त्याविषयींची प्रत्यक्ष साक्ष आमच्या **श्रुति** व **स्मृतिच** देतील.

फार तर काय सांगावें पण, ज्या ज्या **पाश्चात्य पंडितांच्या** विद्येंत **पौरस्त्य** देशांपैकीं **भरतखंडांतील** ज्ञानाची भर पडून तें सुसंस्कृत झालें आहे, त्या त्या सर्वांचाही असाच अनुभव आहे. एके ठिकाणीं, **सर. मॉनियर विलियम्सनें** असें म्हटलें आहे कीं, हिंदु हे डार्वि-

सुसंस्कृत ज्ञानानें शंकेचें निरसन.

१. "Indeed, if you will pardon the anachronism, the Hindus were Spinozaites more than 2,000 years before Spinoza; and Darwinians many centuries before Darwin; and Evolutionists many centuries before the Doctrine of Evolution had been accepted by

(पुढे चालू.)

न्च्या पूर्वींही कित्येक शतकें, त्यानें स्थापित केलेलीं तत्त्वें पूर्णपणें जाणून होते. किंबहुना, ते अनेक विद्याविशारद आहेत असेंही म्हणण्यास हरकत नाहीं.

कारण, **आर्यहिंदु** हे अखिल गुणांत आणि वैद्यकच्या सर्व शाखांत अष्टपैलू असून, ते आसमंतांतील सर्व दिशांत आपला प्रवेश करितात. इतकेंच नव्हें तर, ते आपला सर्वत्र तीव्र प्रकाश पाडून, स्वबुद्धिवैभवाची विलक्षण चमक दाखवितात.

त्यांचें परमार्थ विषयक ज्ञान.

**वेदान्त** विषयांत ह्या **भरतभूमीची** तर अनादिकालापासूनच ख्याति आहे. कारण, **हिंदुस्थानांतील** अतिप्राचीन तत्त्ववेत्ते आणि अध्यात्म विषयाभिज्ञ, हे खरोखर विलक्षण कुशाग्रबुद्धीचे असून, ह्यांच्याबद्दल पंडित **मोक्षमुल्लर** हे विशेष गौरवानें लिहितात. आणि **प्लेटो** व **क्यांट** नामक पाश्चात्य विद्वानांच्या पुस्तकांचें अध्ययन करणाऱ्यांनीं देखील **भारतीय** तत्त्वमीमांसाविषयक ग्रंथांची एकसारखीं पारायणेंच करावींत, अशीही ते शिफारस करतात.

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

the Huxleys of our time, and before any word like Evolution existed in any languages of the world. "

( Sir M. Monier-Williams on the Religion of the Hindus. vide the Indian Magazine for September 1891)

आतां, **हिंदु** लोक हे केवळ तत्त्वज्ञानांतच श्रेष्ठतम आहेत, असे नाहीं. तर ते ज्ञानाच्या सर्व शाखांत, व इतर शास्त्रकलापांत आणि कलासमुदायांत सुद्धां, निःसंशय अग्रेसर असून, त्यांचीं सर्वांपुढेंच धांव आहे. कारण, ते उत्तम कवी; उत्तम नाटककार; व उत्तम कादंबरीकार होत. फार तर काय सांगावें पण, ज्या हिंदूंनीं **उपनिषदासारखे** अप्रतीम ग्रंथ लिहिले; ज्यांनीं **योगशास्त्र** रचलें; आणि ज्यांनीं **वेदान्त** विषयावर एकसारखा कोटिक्रम चालविला; त्यांनींच कालान्तरानें सर्व जगास धान्य पुरवून त्यांचें यथायोग्य पोषणही केलें; व ह्या भूतलावरील यच्चावत् लोकांस वस्त्रप्रावरणें देऊन, त्यांचें थंडीवाऱ्यापासून संरक्षण व्हावें एतदर्थ झीज घेतली.

त्यांचें शास्त्रज्ञान, व कलाज्ञान.

पण येवढ्यानेंच झालें नाहीं. कारण, अवश्यकतेच्या जिन्नसांखेरीज ऐषआरामाचे पदार्थ सुद्धां केवळ हिंदूंनीच अखिल जगास पुरविले; आणि केशर व कस्तुरी, अत्तर आणि मसाला, लवंगा व वेलदोडे, इत्यादि अनेक सुखोपभोगाच्या पदार्थांची देखील त्यांनींच आजपर्यंत अगदीं रेलचेल करून सोडली. ह्यावरून, खरोखरच त्यांची फार कर्तबगारी दिसून येते; आणि त्यांची कार्यक्षमता विशेष रीतीनें व्यक्त होते.

त्यांचें विषयोपभोग ज्ञान.

ह्यांच्या बुद्धीचा आश्चर्यकारक प्रभाव तर महाभारतांतच उत्तम प्रकारें दृष्टीस पडतो. कारण, इंद्रप्रस्थाची ती विलक्षण रचना केवळ हिंदु शिल्पकारांनींच केली होती, यांत संशय नाहीं.

त्यांचें शिल्पज्ञान.

असो. गणितशास्त्राचे धडे सर्व जगाला फक्त हिंदूनींच घालून दिले. बीजगणित देखील हिंदूपासूनच सर्व लोकांस प्राप्त झालें. आणि त्रिकोणमितीचें शास्त्रसुद्धां अखिल सुधारलेल्या राष्ट्रांस हिंदूनींच शिकाविलें. व म्हणूनच ही गोष्ट डाक्तर कोलेन्सोसारखे गणितमर्मज्ञही निरभिमानानें कबूल करतात.

त्यांचें गणितशास्त्रज्ञान.

विशेष काय सांगावें पण, गुरुत्वाकर्षणाचे नियम देखील अति प्राचीनकाळीं हिंदूनींच प्रथम शोधून काढिले असून, तद्विषयक कल्पना न्यूटन्च्याही पूर्वी त्यांजला हजारों वर्षे अगोदरच सुचल्या होत्या; व यूरोपस्थांचे शोध केवळ त्या मागूनचेच होत. अमक्या वेळीं ग्रहण लागणार, असें फार प्राचीन काळीं सुद्धां हिंदूच सांगत; आणि ग्रहणाचा काल अगदीं तंतोतंत तेच वर्तवीत. ग्रहमंडलांचे दुसरेही अनेक चमत्कार हिंदूच निवेदन करीत; व त्याबद्दलचीं साधक बाधक कारणेंही तेच देत.

त्यांचे गुरुत्वाकर्षण ज्ञान, आणि ग्रहवेध.

वणिक्श्रेण्यांचे उत्पादक देखील हिंदूच होत. मात्र,

वणिक् श्रेण्यांसंबंधीं त्यांची कल्पकता, व त्यामुळें व्यापार आणि कलावृद्धि.

दैवदुर्विपाकानें त्या संस्थेचें पुढें पुढें पुष्कळ रूपान्तर होऊन, जातिभेद मातला; आणि ह्यानेंच सर्व नासाडी करून टाकिली. तथापि, त्या उत्पन्न करण्याचा मूळहेतु निःसंशय उद्योगवृद्धीच असून, त्याचें प्रत्यक्ष प्रमाण आपल्याला आजमित्तीस देखील चांगलें दृष्टिगोचर होत आहे. कारण, ताजमाहालासारखीं अद्वितीय भवनें; अथवा ढाका येथलि वस्त्रांसारखीं अमूल्य वस्त्राभरणें; किंवा करंगळीच्या आंगठींत मावणारीं व तींतून आरपार जाणारीं उंचीं पांघरुणें; अगर दिल्लीकडील अतिसूक्ष्म चित्रक्रिया; (जी निव्वळ हातानेंच केलेली असल्यामुळें, तिच्या हस्तपाटवाबद्दल सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेल्या पाश्चात्यांस देखील महदाश्चर्य वाटून त्यांची मति कुंठित होते, व अक्कलही चालत नाहीं). अथवा कलाभवनांचीं आणि शिल्पचातुर्याचीं दृष्टिगोचर होत असलेलीं असंख्य कामें; हीं सर्व हिंदूंचींच असून, त्यांत आपल्याला त्यांचे हजारों वर्षांचे आनुवंशिक संस्कार दिसून येतात.

त्यांची वीर्यश्री.

आतां, हिंदूंत वीर्यश्री देखील काडीमात्रही कमी नाहीं. कारण, त्यांच्या धर्मबंधनामुळें, त्या लोकांत उत्तमोत्तम पराक्रमी

पुरुष निपजले असून, ते अखिल जगाचे केवळ अलंकारच होऊन राहिले आहेत.

हिंदूशीं टक्कर मारण्यांत इतर राष्ट्रांची पिछेहाट.

असो. तात्पर्य ह्मणून इतकेंच कीं, हिंदूंची जीवनकला आणि स्थितिस्थापकता, हीं कालाच्या अनंतत्वांत, व हजारों वर्षांच्या घडामोडींतही, अजून देखील नाहींशीं झालीं नाहींत. आणि हींच त्यांच्या विलक्षण प्रोत्साहन शक्तीचें मुख्य प्रमाण असून, विशेष द्योतक होत. खरोखर, कालाच्या अत्यंत तीव्राघाताला अशा प्रकारें टक्कर देऊन कायम रहाणारें असे, आर्यहिंदुशिवाय अन्य कोणतेंही प्राचीन किंवा अर्वाचीन राष्ट्र इतकें सावरलेलें असल्याचें, ह्या पृथ्वीच्या पाठीवर दिसत नाहीं.

हिंदूंचा कायमचा जोम, व आर्य पुरुषव्याघ्र.

आह्मीं हिंदु इतके वयोवृद्ध आणि तपोवृद्ध झालों आहों, तरी देखील आमचा जोम मावळला नाहीं. आमचा बुद्धिप्रभाव नाहींसा झाला नाहीं. आमची कल्पकता कुंठित झाली नाहीं. आमचें शौर्य बुडालें नाहीं. आणि आमचें साहसही लयास गेलें नाहीं. कारण, त्या सर्वांचा चालू एकुणिसाव्या शतकापर्यंत सतत प्रकाश पडत गेला असून, हे सर्व गुण आज मित्तीस देखील थोड्याबहुत प्रमाणानें आमच्यांत चमकत आहेत. तात्याटोपी सारखे तरवारबहादूर ह्याच एको-

णिसाव्या शतकांत निपजले असून, त्याचें निस्सीम शौर्य पाहून मी मी ह्मणविणारे इंग्रजसुद्धां तोंडांत बोटें घालतात. बाबू केशव चंद्रसेनसारखे नामांकित वक्ते आपल्या एकेश्वरी मतात्मक विचारांनीं पौरस्त्य व पाश्चात्यांस चकित करून सोडतात. नामदार न्यायमूर्ति रावबहादूर महादेव गोविंद रानड्यासारखे आपल्या अष्टपैलू गुणांनीं व मोहक लेखनपटुत्वानें आंग्लजेत्यांसही अगदीं गार करून सोडतात. तेलंगासारखें उत्तम इंग्रजी भाषा लिहून पाश्चात्यांस रिझवितात. डाक्तर भांडारकरासारखे आपल्या अत्युत्तम संस्कृत ज्ञानानें पाश्चात्यांस चकित करून टाकतात. राजेंद्रलाल मित्रासारखे पुराणवस्तुशास्त्रांत अनेक परिश्रम करून हरतऱ्हेचे शोध लावतात. मूकरजीसारखे वर्तमानपत्रकार सर्वत्र गरजतात. रोमेशचन्द्रासारखे इतिहासकार सर्वांचीं मनें आकर्षून घेतात. बंकिमचन्द्रछत्रजींसारखे सरवाल्टर स्कॉट्च्या तोडीचे कादंबरीकार इतस्ततः दृष्टिगोचर होतात ईश्वरचन्द्र विद्यासागर आणि विष्णुशास्त्री चिपळूणकरासारखे मेकॉलेच्या बरोबरीचे निबंधकारही मधून मधून चमकतात. तसेंच, जी कोणाला आजपर्यंत यत्किंचित् देखील कल्पना सुचली नव्हती, व जी कधीं कोणीं आजपर्यंतही शोधून काढिली नव्हती, अशी अचाट कल्पना प्रोफेसर

बोसे सारख्यांस सुचून, ते अत्यंत मार्मिक आणि अद्वितीय शोध करतात; आणि सुधारलेल्या म्हणून म्हणविणाऱ्या आधुनिक **पाश्चात्य** रसायनशास्त्रवेत्त्यांस सुद्धां, अगदीं थक्क करून सोडतात. इतकेंच नव्हें, तर त्यांजकडून वाहवा मिळवून, कधीं कोणास न मिळालेली पदवीही प्राप्त करून घेतात. त्याचप्रमाणें, **स्वामी विवेकानन्दासारखे** पाश्चात्य देशांत जाऊन, अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांतील धर्मपरिषदेंत प्रवेश करतात; आणि **भारतीय** तत्त्वविचारांची अमूल्य अमृतवृष्टि करून, अखिल पाश्चात्य ख्रिस्त जनसमूहास हिंदुधर्माचें नितान्त मोहक स्वरूप दाखवितात; व विशेष आश्चर्य हें कीं, ते त्यांस आचारविचारांत व धर्मतत्त्वदृष्ट्या केवळ हिंदूचें करून सोडतात.

१. Professor J. C. Bose, of the Presidency Collage, Calcutta, has been honored with the degree of D. Sc.—quite a unique distinction—by the University of London. ( Times of India. 11-7-96. )

२. "The Swàmi Vivekánand * * * * has been, in fact a missionary from India to America. Everywhere he has made warm personal friends; and his expositions of Hindu philosophy have been listened to with delight. * * * We may not be *so near to actual conversion as some seem to believe*; but Vivekânand has created a hight degree of interest in himself and his work."

(On behalf of the Brooklyn Ethical Association.
Z. Sidney Sampson. President, &
L. G. Jones. Ex. President. America.)

आर्यस्त्रीरत्नें.

आतां, **आर्यहिंदूंच्या** चतुर्वर्णांतील पुरुषव्याघ्रांची सदरीं लिहिलेली मालिका फक्त-चांचणीदाखलच नमूद केली. परंतु, येवढ्यानेंच झालें नाहीं. कारण, ह्या नरश्रेष्ठांप्रमाणें, कित्येक अप्रतीम **स्त्रीरत्नें** देखील आमच्यांत चालू एकोणिसाव्या शतकांत चमकलीं असल्याचें दिसतें. सबब, त्याबद्दलही प्रस्तुत प्रसंगीं थोडाबहुत उल्लेख केला पाहिजे.

अतिप्राचीन काळचीं.

प्राचीनकाळीं **गार्गी**, **अनुसूया**, **पार्वती**, **सीता**, **मंडोदरी**, **द्रौपदी**, इत्यादि अनेक स्त्रियांनीं आपल्या ज्ञानानें, सात्त्विक वृत्तीनें, पातिव्रत्यानें, आणि सहनशीलतेनें, सर्व जगास व विशेषतः अखिल **भारतीयांस** उत्तम वळण लावून दिलें असून, तें प्राणिमात्रासही महशूर आहे. सबब, त्यासंबंधानें याठिकाणीं ज्यास्त विवेचन करण्याचें प्रयोजन नाहीं. परंतु, तशा मासल्यांचीं उदाहरणें सांप्रतकाळीं, म्हणजे मागील किंवा चालू एकोणिसाव्या शतकांतही कांहीं दृष्टीस पडतात कीं काय हें पाहूं, आणि तसें असल्यास त्यासंबंधीं थोडेसें दिग्दर्शन करूं.

सांप्रतकाळचीं,

ह्या आधुनिक स्त्रीरत्नांची नामावली देण्याची सुरवात केली ह्मणजे शूरत्वाच्या संबंधानें प्रथमतः **लक्ष्मीबाई** राणीसाहेब ( संस्थान **झांशी** ) यांचेंच नांव मालिकेंत गुंफून प्रारंभ करणें

भाग पडतें. खरोखर हिच्यासारखी विलक्षण शूर अबला पृथ्वीच्या पाठीवर एक देखील होऊन गेली नाहीं, असें म्हटलें असतां काडीमातही बाध येणार नाहीं, किंवा तिळप्रायही अतिशयोक्ति होणार नाहीं. कारण, हिनें आपल्या पराक्रमतेजानें सर्व जगास थक्क करून सोडिलें, आणि मी मी म्हणविणाऱ्या योद्ध्यांस देखील तोंडांत बोटें घालावयास लाविलें. इतकेंच नव्हें तर, ह्या द्विजोत्तमेनें शौर्यांत क्षात्रकुलावतंसावरही कडी करून आपली छाप बसविली.

अहल्याबाईसारख्या क्षत्रिय अबलेनें तर, जणु काय ब्राह्मणांच्या ब्रीदाचाच उत्साहपूर्वक स्वीकार करून, नीति व सत्यशीलता, राजकार्य धुरंधरत्व आणि न्यायसन्मुखता, प्रजावात्सल्य व अनाथरक्षा, इत्यादि गुणांची अगदीं कमाल करून सोडली.

---

१ "Her (Queen of Zashi's) *cause was a righteous cause.* To them she will always be a heroine."
(Malleson's History of the Indian mutiny.)

"The extraordinary actions and heroism of this great lady shed an imperishable lustre on the ever memorable period of 1857."
(The National Guardian 14 th December 1891.)

२. इंदूर संस्थानची महाराणी.

३ ह्या साध्वीच्या नितान्त सत्वगुणाबद्दल पाश्चात्य देखील तिची मोठी वाखाणणी करितात. सर जॉन माल्कम म्हणतात:—

( पुढें चालू )

मराठी ग्रंथ

बायजाबाईसारख्या दानशूर कुलांगनेनें आपल्या कीर्तीचा दुंदुभिरव थेट हिमालयापासून तों तहत कन्याकुमारीपर्यंत अखिल जगाच्या कानीं पाडला.

डाक्तर आनन्दीबाई जोशीसारख्या विप्र योषितेनें अमेरिकेंत जाऊन धन्वन्तरींची उच्च पदवी मिळविली, आणि आपल्या भारतीय भगिनीस, सहनशीलता व साहस, धैर्य आणि उत्साह, विद्याभिरुचि व स्वभावसौजन्य, इत्यादि गुणांचा कित्ता घालून, वळण लावून दिलें.

तोरुदत्तसारख्या शिघ्र स्त्रीकवीनें पाश्चात्यांस देखील आपल्या कवित्वानें मान डोलवयास लाविलें. आणि पंडिता रमाबाईसारख्यांनीं आपल्या अश्रांत श्रमानें

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू,)

" The success of Ahalya Bai in the internal administration of her domains was altogether wonderful." ( P. 197 ) ( Memoirs of Central India. )

" Ahalyà Bai's spirit of charity had the truest character of wisdom and benevolence. " ( P. 188 )

" The mind of this extraordinary woman had been more cultivated than is usual with Hindus. " ( 193. )

" She certainly appears ... ... ... to have been one of the purest and most exemplory rulers that ever existed. " ( P. 194. )

१. " Toru Dutt * * * a great Poetess."
( Times of Indfa 11 th July 1896 ).

२. ह्या बाईनें ख्रिस्तीधर्म स्वीकारल्यामुळें, तिची भरतखंडांत

( पुढें चालू )

व केवळ विद्वत्तेच्या जोरावर **विधर्मीयांस** देखील आप-लेसें करून टाकिलें.

आर्यहिंदूंची चमक, आणि देशकल्याणाचा मार्ग.

ह्यावरून इतकें चांगलें व्यक्त होतें कीं, आह्मां **आर्य-हिंदूंत** अजूनही बरीच चमक आहे. मात्र, ती दिवसानुदिवस एकसारखी वृद्धिंगत होऊन, ति-च्यांत विशेष तीव्रता आली पाहिजे. ह्मणजे हीच प्रभा ज्यास्त प्रखर होऊन सर्वत्र भासमान होईल. शिवाय, आमच्या देशाचें खरें हित कशांत आहे, याजबद्दलही दूरवर विचार करून, तत्प्रीत्यर्थ आह्मीं अहोरात्र झटलें पाहिजे. विद्यावृद्ध्यर्थ सर्वांनींच एकदिलानें मेहेनत केली पाहिजे. आणि एकंदर देशासाठीं, प्रत्येक व्यक्तिमात्रानें स्वार्थत्याग करून, जेणेंकरून सार्वजनिक कल्याण होईल, त्यासाठीं आपला देह मनःपूर्वक झिजविला पाहिजे.

आशातन्तु, व

अहाहा! अशा प्रकारची स्पृहणीय अवस्था आह्मां **भारतीयांस** पुनश्च केव्हां येईल? हा आमचा सांप्रतचा अज्ञातवास केव्हां चुकेल? आह्मीं सर्व

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू)

फारच विटंबना झाली. व ती **हिंदु** धर्माचाच स्वीकार करून रा-हिली असती तर तिची जी कीर्ति झाली असती, अथवा तिला जो सन्मान मिळाला असता, त्यांस ती सर्वथैव मुकली. तथापि, तिची विद्वत्ता आणि बुद्धिप्रभाव, हीं खरोखरच नांवाजण्यासारखीं आहेत.

जगाच्या उपयोगी केव्हां पडूं? आमचा अलोट मतिप्रकर्ष केव्हां दिसूं लागेल? आणि बुद्धिवैभवानें पूर्ववत् प्रचंड झाल्या कारणानें, आह्मी अखिल जगताचें आदरस्थान केव्हां होऊं?

खरोखर, असा दिवस येण्याला महद्भाग्य पाहिजे. भारतभाग्य. अथवा, अशी स्थिति प्राप्त होण्याला, निदान आणखी बरींच वर्षें लोटलीं पाहिजेत. परंतु, कोणत्याही सबबेनें निराश होण्याचें तिळभरही कारण नाहीं. मात्र, कांहीं कालपर्यंत, धैर्याचें दृढावलंबन केलें पाहिजे. ह्मणजे, केव्हां ना केव्हां तरी खचितच सुदिन येईल, आणि आमचें दैव उघडेल. प्रस्तुतची धर्मग्लानि व हीन कळा लवकरच जाईल. आह्मां **भारतीयांच्या** उन्नत्यर्थ एकादा मायपूत खचितच उत्पन्न होईल. ह्या **भरतखंडाचें** दैन्य फेडण्यासाठीं एकादें अत्युज्ज्वल रत्न चमकून, तें आम्हांस अज्ञानांधकारांतून लवकरच मुक्त करील. आमची अनुपम **ब्रह्मविद्या**, आमची प्राचीन पवित्रकीर्ति, आमचें पुराणवैभव, आणि आमच्या **साम्राज्याचा** यशोध्वज, इत्यादींच्या तेजःकणांनीं एकाद्या नरपुंगवास तरी चटका लागून तो खचितच जागा होईल. गतवैभवाची आठवण होऊन निदान एखादा नरव्याघ्र तरी दचकून उठेल. ह्या पतित देशाचें काज कोणी तरी मनःपूर्वक

हातीं घेईल; आणि सर्वांस विद्यामृत पाजून, त्यांस जागे करील.

आतां, केवळ पैशाची हाव धरणारे पुष्कळ असतील. कनकदेवीची मनोभावें पूजा करणारे अनेक सांपडतील. गरीब बिचाऱ्या निरपराधी गाईवर तुटून पडणाऱ्या व्याघ्राप्रमाणें, ह्या पृथ्वीवरील राज्याची आशा धरून महत्वाकांक्षेनें तिला पायांखालीं पाहिजे तशी तुडविणारे हवे तेवढे मिळतील. परंतु, कनवाळूपणानें तिला पोटाशीं धरून, तिचें यथायोग्य संरक्षण करणारे खरोखरच विरळा!

अस्तु. **धीरसेगंभीर.** आपण धीर धरून चालू, ह्मणजे आपल्याला **ईश्वरच** हात देईल. आपण एकनिष्ठेनें वर्तूं ह्मणजे आपले सांप्रतचे **प्रभूच** आपल्याला अवश्य ती मदत करतील आणि आपण आपली पात्रता दाखवूं, म्हणजे एकंदर **प्रजेचा** देखील आपल्यावर विश्वास बसेल, व आपल्या **आंग्ल** राज्यकर्त्यांसही संतोष वाटेल.

शिवाय, **नानारत्नवसुन्धरा** असल्यामुळें, काळाच्या अनंतत्वांत आमच्यांतही एकादा **शंकराचार्य**, एकादा **नानाफडणवीस**, एकादा सर. **दिनकरराव**, एकादा **रामदास**, एकादा **नामदार रानडे**, एकादा **तुकाराम**, एकादा **स्वामी विवेकानन्द**, इत्यादि अनेक रत्नें चमकून, तीं ह्या पवित्र **भरतभूमीचें** आजपर्यंत सुविश्रुत असलेलें नांव राखतील. कारण,

**कालोऽह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी ॥**

असो. **विशिष्ट प्रजोत्पत्ति नियमाचें** तत्व, किंवा **तपोबीजप्रभाव**, हीं आमच्या पूर्वजास खाचितच माहीत होतीं, यांत आतां काडीमात्रही शंका नाहीं. कारण, ह्याचें प्रत्यक्ष प्रमाण पुढील श्लोकांत आढळतें.

बीजप्रभावाविषयीं आर्यांचें ज्ञान, व त्याचें प्रमाण.

**तपोबीज प्रभावैस्तु ते गच्छन्ति युगे युगे ।**
**उत्कर्षं चापकर्षंच मनुष्येष्विह जन्मतः ॥४२॥**

मनुस्मृति अध्याय १०.

ह्याच श्लोकांवर श्रीमत् कुल्लूकभट्टानीं टीका दिली आहे; व ही देखील विशेष महत्वाची असल्याकारणानें ती येथें देतों. ते म्हणतात कीं,

" सजातिजानन्तरजास्तपःप्रभावेण विश्वामित्रवत् बीजप्रभावेण ऋष्य शृंगादिवत् कृत त्रेतादौ मनुष्यमध्ये जात्युत्कर्षं गच्छन्ति । अपकर्षंच वक्ष्यमाण हेतुना यान्ति ।"

ह्यावरून **यथाबीजं तथांकुरः** । ह्मणजे जितकें सतेज बीज तितक्याच प्रमाणानें त्याचा अंकुर देखील सतेजच निघतो, हें तत्व आमचे प्राचीन काळचे **आर्यहिंदु** पूर्णपणें जाणून होते. आणि म्हणूनच, त्यांनीं घालून दिलेल्या नियमांचें उल्लंघन आह्मी फारच विचारानें केलें पाहिजे.

विशिष्टप्रजोत्पत्तीला जितक्या अंशानें उत्तम बीजाची अवश्यकता आहे, तितक्याच अंशानें उत्कृष्ट क्षेत्राचीही मोठी जरूर आहे. आणि हें तत्व आमचे पूर्वजे फार चांगल्याप्रकारें जाणत होते. व ह्मणूनच आह्मीं आपलीं डोकीं आजपर्यंत वर करून आहोंत.

कारण, अत्युत्कृष्टाचें अवस्थान,[2] हाच नियम सर्व काळीं आणि सर्व स्थळीं अगदीं अबाधित आहे. सबब, वीर्यदोषानें आपल्याला दौर्बल्य येऊन आपण निःसत्व होऊं नये, म्हणून आपण फारच काळजी व खबरदारी घेतली पाहिजे. आणि अशी नेटानें तजवीज राखली, तरच आपला चांगला निभाव लागून, आपण अगदीं शेवटपर्यंत निर्धास्त टिकूं.

असो. आर्यजातींत बौद्ध[3], जैन[4], आणि शीक[5]धर्मा-

---

१ सुबीजंचैव सुक्षेत्रे जातं संपद्यते यथा ।
तथार्याज्जात आर्यायांसर्वं संस्कारमर्हति ॥६९॥
( मनुस्मृति. अ० १० )

२ Survival of the fittest.

३ हल्लीं, आर्यहिंदूपैकीं, बौद्धधर्म पाळणारे कोणी नाहींत.
( Baine's Report 1893. P. 162 ).

४ जैनलोक देखील आपला धर्म हिंदूच असल्याविषयीं सांगतात.
( Baine's Report. 1893 P. 162 ).

५ शीकलोकही आपणांस हिंदूच ह्मणवितात; आणि खरोखरी ते हिंदूच आहेत.
(Baine's Report. 1893. P. 164 ).

नुयायी, यांचा देखील समावेश होतो. कारण, त्या सर्वांची उत्पत्ति आर्यांपासूनच असून, हे सर्व धर्म देखील थोड्या बहुत मतान्तरानें आर्यहिंदुधर्मापासूनच उद्भवले आहेत.

आर्य व अनार्य जातींचें हिंदुत्व.

सदरीं लिहिलेल्या धर्मांतले लोक, आणि यक्षपिशाच्च व भूताखेतांची पूजा करणारे रानटी अनार्य लोक, हे सर्व आपणांस हिंदूच म्हणवितात. सबब, ह्या भरतखंडांतील एकंदर लोकसंख्येंत आम्हां हिंदूंची संख्या २२,७४,६८,०२६ आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

आतां, भरतखंडांतील लोकसंख्येंत आपणांस हिंदु म्हणून ह्मणविणाऱ्यापैकीं, आर्य जातींतले लोक किती आहेत, तसेंच त्या मानानें इतर जातींचा भरणा कसा आहे, आणि ह्या सर्वांचें एकंदर लोकसंख्येशीं शेंकडा काय प्रमाण बसतें, हें समजणें विशेष महत्वाचें असल्या कारणानें, तत्संबंधीं तपशील या खालीं देतों.

त्यांचें एकंदर लोकसंख्येशीं प्रमाण.

---

१ हे मुद्दां बराबर हिंदूच बनत चालले आहेत.

( Dr. Hunter's Indian Empire. P, P. 70-51 ).

बौद्ध आणि जैनधर्म हिंदुधर्मांपासूनच उद्भवले असल्याविषयीं, सातव्या पुस्तकांत सविस्तर विवेचन आहे. भारतीय साम्राज्य उत्तरार्ध, पु. ७. पान १५-१३९ पहा.

| | धर्म[१]. | | इ० स० १८९१ सालच्या खानेसुमारीप्रमाणें लोकसंख्या. | एकंदर लोकसंख्येशीं शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| आर्यजाति. | ब्राह्मणधर्म. | हिंदु धर्मानुयायी. | २०,७७,३१,७२७ | ७२.३२ |
| आर्यजाति. | बौद्धधर्म. | हिंदु धर्मानुयायी. | ७१,३१,३६१ | २.४८ |
| आर्यजाति. | जैनधर्म. | हिंदु धर्मानुयायी. | १४,१६,६३८ | ०.४९ |
| आर्यजाति. | शीकधर्म. | हिंदु धर्मानुयायी. | १९,०७,८३३ | ०.६६ |
| अनार्यजाति. | वनचरधर्म(ह्म. यक्ष-पिशाच-पूजकांचाधर्म.) | हिंदु धर्मानुयायी. | ९३,८०,४६७ | ३.२३ |
| इतर जाति. | झरथुष्ट्र(पारसी)धर्म. | | ८९,९०४ | ०.०३ |
| इतर जाति. | यहूदीधर्म. | | १७,१९४ | ०.००६ |
| इतर जाति. | ख्रिस्तीधर्म. | | २२,८४,३८० | ०.८० |
| इतर जाति. | इस्लामधर्म. | | ५,७३,२१,१६४ | १९.९५ |
| इतर जाति. | इतर लहानसानधर्म. | | १८५ | . . |
| इतर जाति. | नांव न ठेवलेलेधर्म. | | ४२,५७८ | ०.०१४ |
| | एकूण एकंदर. | | २८,७२,२३,४३१ | १००. |

आर्य हिंदूशिवायच्या आर्यजाति, आणि त्यांचें निःसारण.

असो. सदरहू कोष्टकांतील माहितीवरून, वाचकांच्या लक्षांत इतकें सहजीं येऊन चुकेल कीं, हिंदु म्हणविणाऱ्या कांहीं अनार्य लोकांशिवाय, बाकीचे सर्व

१ Baine's General census Report 1893. P. 171.

**हिंदु** हे **आर्य वर्गा**पैकींच आहेत. तथापि, या ठिकाणीं इतकें सांगणें अगदीं जरूर आहे कीं, **हिंदु** समाजांत न मोडणारे असे, प्राक्कालीन **आर्य** कुटुंबांतले आणखी दुसरेही कळप आहेत. आणि हे कोणते म्हणाल तर, ते **पारसीक, ग्रीक, रोमन्स, जर्मन्स, इंग्रज,** इत्यादि होत. परंतु आचार विचार, रीतिभाति, आणि धर्मबंधन, इत्यादि संबंधानें त्यांच्यांत आणि आमच्यांत केवळ जमीन अस्मानाचेंच अंतर असल्या कारणानें, त्यांजविषयींचा उल्लेख " **आर्य जातींत** " न करतां, तद्विषयक विवेचन फक्त " **इतर जातींतच** " करण्याचें योजिलें आहे. ( भाग ४७ वा. इतरजाति पहा. )

# भाग ४६ वा.

## अनार्यजाति.

अनार्यजाति.

मागील भागांत आर्यजातीविषयीं यथावकाश विवेचन झालें. आतां, अनार्यजाति कोणत्या, आणि त्यांचा वसतिप्रदेश कोठें आहे, याबद्दलची थोडीशी हकीकत देऊं.

त्यांची व्याख्या.

अनार्य म्हणजे आर्य नव्हेत ते लोक होत. ह्या लोकांस देवकालांत आमचे आर्यपूर्वज दस्यु म्हणत, व हे कर्महीन असल्या कारणानें आर्य लोक त्यांचा कंटाळा करीत.

ऋग्वेदांतील त्यांचें नांव.

ऋग्वेदांत एका ऋचेंत त्यांनीं असें म्हटलें आहे कीं,

विजा॑नी॒ह्यार्या॒न्येच॒ दस्य॑वो

ब॒र्हिष्म॑ते रंधया॒ शास॑द॒व्रता॑न् ।

शाकी॑ भव॒ यज॑मानस्त चो॒दि॒ता

विश्वेत्ता॑त्ते सध॒मादे॑षु चाकन ॥ ८ ॥

( ऋ. मं. १ अ. १० सू. ९१ ).

हे इन्द्रा, आर्य कोण आणि दस्यु कोण यांत तूं भेद कर, आणि कर्महीन दस्यूंचें शासन करून, तूं त्यांजला ईश्वरपरायण आर्यांच्या स्वाधीन कर.

मनुस्मृति कालांतील त्यांचें नांव, व त्यांची व्यापकता.

मनुस्मृतिकालांत दस्यु शब्दाची व्यापकता जरा जास्त असल्याचें दिसतें. कारण, त्यांत ब्राह्मण किंवा क्षत्रिय, आणि वैश्य अथवा शूद्र, यांपैकीं जे जे म्हणून क्रियाहीन झाले, व ज्यांना ज्यांना म्हणून जातिबहिष्कृत करण्यांत आले, ( मग ते म्लेंच्छ भाषा बोलणारे असोत अगर आर्य भाषा बोलणारे असोत, ) त्या सर्वांचा समावेश होई.

मनुस्मृतिकारांनीं खालीं लिहिलेल्या लोकांस दस्यु वर्गांत घातलेलें आहे.

**पौड्रकाश्चौड्र द्रविडाः काम्बोजा यवनाः शकाः।**
**पारदापल्हवाश्चीनाः किराता दरदाः खशाः॥ ४४॥**
**मुखबाहूरूपज्जानां या लोके जातयो बहिः।**
**म्लेच्छवाचश्चार्यवाचः सर्वे ते दस्यवः स्मृताः॥ ४५॥**

( मनुस्मृति अ. १० ).

त्यांचें आगमन.

हे अनार्य लोक भरतखंडांत दोन वाटांनीं शिरले असावेत, असें यूरोपस्थ पंडितांचें मत आहे. १ ईशान्य दिशेनें; आणि २ वायव्य दिशेनें. ईशान्य दिशेनें त्रिविष्टप-ब्रह्मी

आणि **कुलाल** यांनीं आगमन केलें असून, वायव्य दिशेनें **द्रविडांनीं** प्रवेश केला, अशी त्यांची समजूत आहे.

प्रस्तुतकाळीं, अनार्य लोकांच्या वस्तीचा अवशिष्ट भाग.

असो. ह्या **अनार्य**[१] लोकांच्या वस्तीचा अवशिष्ट भाग अजूनही आमच्या **भरतखंडांत**, व आसपास इतर ठिकाणीं दृष्टिगोचर होतो. सबब, तद्विषयक उपलब्ध असलेली थोडीशी हकीकत येथें देतों.

आन्दामान बेटें.

**बंगालच्या** उपसागरांत **आन्दामान** बेटांतले मूळचे राहणारे लोक फारच रानटी अवस्थेंतील असल्याचें दिसतें. **आरब** आणि **यूरोपस्थ** दर्यावर्दी हे त्यांजला नृभक्षक ह्मणत. सणावारीं व आनंदाच्या दिवशीं, हे जंगली लोक आपल्या अंगाला तांबडी माती लावितात, आणि दुःखी किंवा कष्टी असल्यास **जितवृक्ष** फळाच्या रंगासारख्या चिखलानें ते आपलें अंग सारवितात. त्यांच्यांत स्त्री आणि पुरुषवाचक नांवें सारखींच असतात; आणि स्नेहभाव प्रदर्शित करण्याकरितां, ते एक प्रकाराचा रडण्यासारखा शब्द वापरतात. **परमेश्वराविषयीं** त्यांची कल्पना कांहीं विलक्षण आहे. कारण, रोग पसरणारा असा तो एक पिशाचच आहे, असें ते त्या परमेश्वरास मानतात.

---

१ आर्य आणि अनार्य लोकांच्या मूलस्थानासंबंधीं अगदीं तपशीलवार हकीकत, आह्मी सोळाव्या पुस्तकांत देणार आहों. (ग्रंथकर्ता.)

ह्या बेटांतील वसाहत स्थापन करण्यासाठीं, इ० स० १८५५ साली, कांहीं इंग्रज कामगार तिकडे पाठविले होते. त्यांनीं हीं वनचरें माणसाळण्याकरितां, हरतऱ्हेचे सतत प्रयत्न केले. परंतु पांच वर्षेपर्यंत ते सर्व निष्फळ झाले. त्यानंतर ह्या अधिकारी वर्गांनीं त्या वनचरांच्या सोईकरितां कित्येक झोपड्या बांधून, त्यांस दवा वगैरे देण्याची व औषधोपचार करण्याची तजवीज केली. त्यामुळें, तेथें ते वारंवार जात, आणि ऊन, वारा, व पाऊस, यांजपासून निवारण होण्यासाठीं, सवडीप्रमाणें विश्रांति घेत. पुढें, तेथें त्यांची अन्नाचीही थोडीबहुत सोय होऊं लागली, व तेव्हांपासून ते बरेच माणसाळत चालले.

त्यांतील लोक सुधारण्याविषयीं इंग्रजांचा प्रयत्न.

आमच्या आर्य लोकांचा जसजसा दक्षिण हिंदुस्थानांत प्रवेश होत चालला, तसतसा ह्या लोकांनीं भरतद्वीपांतून आपला गाशा गुंडाळून काटशह काढला, व द्वीपान्तरीं नजीक आसपास आपली पथारी पसरली. आणि त्या कारणानेंच ह्या वनचरांची आन्दामान बेटांत वस्ती झाली.

आर्य हिंदूंचा दक्षिण दिशेकडे प्रवेश, व त्यामुळें रानटी लोकांचें द्वीपान्तरीं पलायन.

मद्रास प्रांताच्या दक्षिणेस अनामलै नांवाच्या डोंगरांत अशा प्रकारच्या जंगली जाती बऱ्याच आहेत. पुलियार नांवाचे लोक भुताखेतांस भजतात, आणि

अनामलै डोंगर, व मद्रास इलाख्यांतील रानटी लोक.

जंगलांत उत्पन्न झालेले पदार्थ, किंवा उंदीर, आणि घुशी, यांजवर ते आपला उदरनिर्वाह करितात. हे फार उग्र दिसतात, आणि ह्यांचे केंस लांब सडक असतात. **मुंडावेर** लोक आपलीं गुरेंढोरें घेऊन दरीकंदरींत हिंडतात; झाडपाल्यांच्या कुडाटारूं झोपड्यांत आपला गुजारा करितात; आणि एक जागीं कधींही स्थिर राहत नाहींत.

पुलियार व मुंडावेर लोक.

**कादर** लोक तर आपल्याला वनचे राजेच ह्मणवितात. ह्यांची कद लहान असून, ओंठ सिद्ध्यांसारखे जाड असतात. हे आपल्या पूर्वजांस पुरीत असत; व त्यामुळें त्यांच्या थडग्यावर उभारलेले स्मारकादाखल चिरे, आजमित्तीसही दृष्टिगोचर होतात. **नाईर** हे **हिंदुस्थान**च्या नैर्ऋत्य दिशेस राहणारे लोक होत. ह्यांत अनेक भर्तृकतेची अजूनही चाल आहे; म्हणजे त्यांच्यांत प्रत्येक बायकोला एकाहून अधिक नवरे असतात. आणि त्यांच्यांतला **दायविभाग** हा बहिणीच्या वंशाकडे जातो. हीच चाल **हिमालयावरील** जंगली जातींतही दिसून येते.

कादर व नाईर लोक.

**कोंकणांत**, ह्मणजे **सह्याद्री** खालच्या समुद्रवलयांकित प्रदेशांत, **कातकरी**, **वारली**, **कोळी**, **ठाकूर**, वगैरे लोक देखील याच वर्गांतले होत. ह्यांपैकीं, अगदीं उतरत्या पाहिरीचे म्हटलें ह्मणजे,

कोंकणांतील कातकरी, वारली, कोळी, व ठाकूर, वगैरे लोक.

**कातकरी** असून, ते आपला उदरनिर्वाह घुशी, उंदीर, ससे, आणि इतर वन्य पदार्थांवर करितात. ह्यांच्या मानानें **वारली**, आणि **कोळी**, हे कांहींसे पुढें सरसावलेले दिसतात; आणि **ठाकरांची** तर त्यांच्याही पलीकडे मजल गेलेली दिसते. ह्यांचीं घरेंदारें स्वच्छ असून, रीतरिवाज, आणि वर्तन, हीं सामान्यतः बऱ्या प्रकारचीं आहेत. **सातपुड्यांत** व त्याच्या पायथ्याशीं, आणि **विंध्याद्रीच्या** अजूबाजूला व **राजपुतान्यांत**, **भील** नांवाच्या रानटी लोकांची बरीच वस्ती आहे. हे जंगली व अडाणी असून, दिसण्यांत उग्र व काळेकभिन्न आहेत.

सातपुडा व राजपुतान्यांतलि भील लोक.

पूर्वीं, हे लोक चोरी व लूटफाट करूनच आपला उदरनिर्वाह चालवीत असत. परंतु सांप्रतकाळीं, **आंग्लप्रभूंच्या** अमलांत ते बऱ्याप्रकारच्या स्थितींत येत चालले आहेत. कारण, त्यांची ही लुटारूपणाची आदत जावी, आणि त्यांचा योग्य रीतीनें चरितार्थ चालावा, एतदर्थ **इंग्रज** सरकारानें त्यांजला आपल्या नोकरींत ठेविलें, व त्यांजला कायद्याची दिशा दाखवून, व्यवस्थितपणानें राहण्यास शिकाविलें. पुढें, त्यांच्याचपैकीं कांहीं फौजेंत ठेवण्यांत आले, आणि हल्लीं तर त्यांची एक लहानशी लष्करी गांवशिबंदीच बनविली आहे, असें म्हटलें तरी चालेल.

त्यांची पूर्वींची व सांप्रतची स्थिति.

डांग लोक अशाच मासल्याचे आहेत. ह्यांचा वसतिप्रदेश ह्मटला ह्मणजे **नाशिक** आणि **खानदेश** जिल्ह्याला लागून जो **गुजराथ** प्रांताचा डोंगराळ मुलूख आहे, तो होय.

डांग लोक.

**मध्यप्रांतांत** अशा प्रकारच्या रानटी लोकांची बरीच वस्ती आहे, आणि त्यांपैकीं मुख्य **गोन्द** हे होत. हे हल्लींच कांहींसे सुधारत चालले आहेत. तथापि, ज्यांस सुधारणेचा अजून गंधही नाहीं, अशा जाती पुष्कळ आहेत; आणि कांहीं कांहीं तर **अरणिकालांतील** दगड व गारगोट्यांच्या बनविलेल्या शस्त्रांचा अद्यापि उपयोग करितात. **मारिआ** नांवाचे लोक धनुष्य वापरतात, आणि **मारी** नामक जात ही परक्या मनुष्याचें वारें देखील लागूं देत नाहीं. ह्याच लोकांवर तेथील एका मांडलीकाची सत्ता असल्यामुळें, त्यांजकडून तो करभार घेतो. अशा वेळीं, आपण आल्याची तो टिमकीनें दवंडी पिटवून सर्वांस खबर देतो, आणि स्वतः कोठें तरी लपून बसतो. मग, कोणी नाहीं असें पाहून, हे भित्रे **मारी** पुढें सरकतात; व जंगलांत उत्पन्न झालेले पदार्थ करभार ह्मणून नेमलेल्या ठिकाणीं ठेवून, ते पुनश्च दाट व गर्द झाडींत पोबारा करतात.

मध्यप्रांतांतील गोन्द, मारिआ, व मारी लोक.

ह्याच्याही पलीकडे उत्तरेस, परंतु जरा ईशान्य

बाजूला, **ओरिसा** प्रांतांतील मांडलिक संस्थानांत, **जुआंग** अथवा **पतुआ** नांवाची एक जात आहे. तींत स्त्रिया ह्मणून कधीं वस्त्र असे परिधानच करीत नाहींत. त्यांच्या जातींतल्या नांवाप्रमाणें, जणुंकाय तें अन्वर्थ करण्यासाठींच, त्या मागेंपुढें फक्त पानांची योजना करून, आपलें अंग झांकतात; आणि हीं पानें पडला जाऊं नयेत ह्मणून, आपल्या कंबरेसभोंवती कसला तरी वेल गुंडाळतात. ह्यांतील कित्येकांस **इंग्रजी** रीतिभातींचा कांहींसा गंध असल्याचें वाटल्यावरून, त्यांजला थोडेसे सुताचे कपडे देण्यांत आले होते. व पर्णवसनाऐवजीं कार्पासवस्त्रच वापरणें चांगलें, अशाबद्दल त्यांच्या मांडलिकास, **इंग्रजी** कामगारांकडून समजूतही मिळाली होती. ह्या लोकांची एकंदर वस्ती १०,००० वर असून, त्यांपैकीं १,९०० जणांस कपडे वाटण्यांत आले होते. परंतु ते त्यांजला न आवडून, ते पुनश्च पूर्ववत आपले पर्णपटच वापरूं लागले आहेत. ह्या लोकांस अजूनही धातूचे पदार्थ, किंवा धातु कशी असते, हें माहीत नव्हते. मात्र, विशेष सहवासानें, आतांशा कोठें त्यांजला त्यांची ओळख होऊं लागली आहे. आणि म्हणूनच त्यांजला, **प्रस्तरकालां**[1]तील एक अवशिष्ट भाग, असेंही ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

ओरिसाप्रांतांतील जुआंग आणि पतुआ लोक.

1 Flint and Stone-ages.

**मध्यहिंदुस्थानांत मोघी, म्हाईर**, इत्यादि वनचरांची बरीच वस्ती आहे. परंतु पूर्वकालीन लूटफाट आणि तंटेबखेडे करण्याचें सोडून देऊन, सांप्रतकाळीं ते शेतीभातीवरच आपला उदरनिर्वाह करीत असल्याचें समजतें.

मध्यहिंदुस्थानांतील मोघी, व म्हाईर लोक.

**हिंदुस्थान**च्या उत्तरेस, **हिमालया**च्या पायथ्याशीं व उतरणीच्या प्रदेशांतही, कित्येक रानटी जातींच्या लोकांची वस्ती आहे. ते मोठे उग्र, रंगानें काळसर, ठेंगणें, आणि क्षुत्क्षाम असे दिसतात, व बहुतकरून चोरीचिरी करूनच आपला उदरनिर्वाह चालवितात. ह्यांपैकीं, **आबर** नांवाच्या जंगली लोकांस सरहद्दीच्या संरक्षणार्थ बिनपगारी **शिबंदींत** ( पोलिसांत ) म्हणून **इंग्रज** सरकारानीं ठेविलें असून, त्यांच्या नोकरीबद्दल ते त्यांस लत्ताकपडा, कापडचोपड, धान्यधिन्य, कुदळपावडें, इत्यादि पुरवितात.

हिमालयावरील आबर लोक.

**आसामांत आका** नांवाचे लोक ह्या रानटी जातींपैकींच असून, त्यांत दोन पोटभेद आहेत. ह्यांचीं नांवें अगदीं चमत्कारिक असतात, व त्यावरूनच त्यांच्या पूर्व स्वरूपाचें सहजीं दिग्दर्शन होतें. ह्यांपैकीं एकीचें नामधेय " **हजार माणसांचा स्वयंपाक चट्ट करणारी,** "

आसामांतील आका लोक.

आणि **दुसरीचें** नांव "**कापसाच्या शेतांत चोरी साठीं लपून बसणारी**" असें आहे.

**संताळ** लोक रानांत किंवा डोंगरांच्या दरींत राहतात.

संताळ परगण्यांतील संताळ लोक.

तथापि, **संताळपरगणा** या नांवाचा एक स्वतंत्र प्रांतही असून, तो **कलकत्यापासून** सत्तर कोसांवर, वायव्य दिशेला आहे. ह्या लोकांची एकंदर संख्या पंधरा लक्षाजवळ जवळ होईल. हे जरी रानटी अवस्थेंत आहेत, तरी ते बरेच माणसाळलेले असल्या कारणानें, ते शेतीभाती करूनच आपला जेमतेम गुजारा चालवितात.

त्यांची ग्रामव्यवस्था.

ह्या लोकांची ग्रामव्यवस्था जरा ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. सबब, तिचें येथें थोडक्यांत दिग्दर्शन करतों. प्रत्येक गांवांत कोणीतरी ग्रामाधिकारी म्हणून असतोच. हा बहुतकरून ग्रामसंस्थापकाच्या वंशांतला असून, त्याच्या हाताखालीं एक दुय्यम कामगार आणि एक ग्रामरक्षक देण्यांत येतो. गांवचा सर्व पोरवडा, किंवा प्रत्येक गांवांतील जेवढीं ह्मणून मुलें असतील, त्या सर्वांवर देखरेख राखण्याचें काम निराळ्या कामगाराकडेसच सोंपले असतें. त्यामुळें मुलांचें लग्न होईपर्यंत, तीं त्यांच्याच नजरेखालीं असतात. ह्यांच्यांत सात जाती आहेत. परंतु ते जातिभेद पाळीत नाहींत. त्या कारणानें, त्यांचा खानपानादि व्यवहार एकत्रच चालतो.

त्यांचा धर्म.

संताळ लोकांचा धर्म रानटी अवस्थेंतील असल्या कारणानें, अज्ञानमूलक भासतो. कारण अखिल विश्वांत ओतप्रोत भरलेला असा जो परमात्मा, तोच सर्वांचा नियन्ता व चालक आहे, अशी त्यांची समजूत नसून, भुतेंखेतें, यक्ष, आणि पिशाच्च, हेच काय ते सत्ताधीश, अशी त्यांची कल्पना आहे. या शिवाय, त सूर्याची देखील उपासना करितात; आणि सर्वांस संतृप्त राखण्यासाठीं, कोंबडीं व बकरीं इत्यादिकांस बळी देतात. तथापि, क्वचित् प्रसंगीं वधाकरितां प्राणी नच मिळाला तर, पुष्प आणि फळ, यांच्यावरही त्यांचा निर्वाह चालतो.

ओरिसा आणि मद्रास प्रांतांतील खोंड लोक.

खोंड लोकांचीं मुख्य राहण्याचीं ठिकाणें म्हटलीं म्हणजे ओरिसा प्रांतांतील दुआब, आणि मद्रास प्रांतांतील गंजम, व विजयपट्टण, हीं होत.

खोंड म्हणजे डोंगरकरी.

" खोंड " याचा मूलशब्दार्थ म्हटला म्हणजे पर्वतनिवासी किंवा डोंगरकरी, असा होतो. आणि यांची वस्ती सदरच्या प्रांतांत, सुमारें पंधराशें वर्षांवर असल्याचें कळून येतें.

खोंड लोकांची गृहस्थिति.

खोंड लोकांची गृहव्यवस्था अविभक्त कुटुंबांतील स्थितिरीतीस अनुसरून असल्याचें दिसतें. कारण, त्यांच्यांत बापाचें विशेष महत्त्व असून, तो जिवंत आहे

तावत्कालपर्यंतच त्याच्याजवळच त्याच्या सर्व मुलांनीं राहिलें पाहिजे. इतकेंच नाहीं तर, त्याच्या हयातीपर्यंत त्यांच्यांत आपापसांत वांटणी देखील व्हावयाची नाहीं.

त्यांची आपापसांतली सल्लामसलत.

कोणतेंही एकादें महत्वाचें कृत्य करावयाचें असल्यास, ह्या जातींतील कुटुंबांचीं मुख्य माणसें एकत्र होतात, आणि जमलेल्या बुदरुक मंडळींचा ज्याप्रमाणें अभिप्राय पडेल, त्याप्रमाणें तें करण्याविषयींचा किंवा न करण्याविषयींचा, ते कायमचा ठराव करितात.

गुन्हेगारास शिक्षा करण्याविषयींची त्यांची पद्धत.

कोणी गुन्हा केला असल्यास त्याचा सूड उगविण्याविषयीं, ते एकदिलानें कट करतात. एखाद्यानें खून केला असल्यास, त्याचा ते जिवास जीव घेतात. मात्र, खून करणारानें दंडादाखल कांहीं धान्य अथवा गुरेंढोरें दिलीं तर, त्याला त्या गुन्ह्याची माफी होते. कोणी कोणास मारून अपखुशीनें दुखापत केली तर, गुन्हा करणारानें दुखापत झालेल्या इसमाचें पोषण, त्याची दुखापत बरी होईपर्यंत, केलें पाहिजे. चोरी करणारानें चोरलेली वस्तु किंवा जिन्नस परत आणून द्यावी, नाहीं तर त्याची योग्य किंमत भरावी. ज्या गुन्हेगारास दोनदां शिक्षा झाली आहे, त्याला पुनः शिक्षा करावयाची असल्यास, त्याला जातीबाहेर

टाकण्याची वहिवाट आहे. आणि अशा प्रकारची शिक्षा म्हटली म्हणजे परमावधिच होय.

त्यांची लग्नपद्धति.

त्यांच्यांत मुलांचीं लग्नें फारच लहानपणीं करतात, आणि त्यांच्या बायका त्यांच्यापेक्षां जास्त वयाच्या असतात. मुलगा दहा वर्षांचा असला तर, मुलगी चवदा वर्षांची असते; आणि अशा प्रकारच्या जोडप्याचें लग्न होतें, ही विशेष आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट आहे. ही वधू, वर जाणता होईपर्यंत, आपल्या सासऱ्याच्या घरींच राहून कामकाज करते, व नवऱ्यापेक्षां बायको वयानें मोठीच असल्यांकारणानें, तिचें त्याच्यावर सहजींच नेहेमीं वजन असतें. आणि तीही आपला त्याजवर अवश्य तो दाब ठेवण्यांत अगदीं कमी करीत नाहीं. ह्या जातींत पहिल्या बायकोचा रुकार मिळाल्याशिवाय, दुसरी बायको करण्याचा पारिपाठ नाहीं. ह्यांच्यांत **राक्षस**विवाहपद्धति सुरू असून, तींत मेजवानीच्या वेळीं नवरी मुलगी जबरदस्तीनें नेण्याचा प्रचार आहे.

त्यांच्या राहण्याचा रिवाज.

**खोंड** लोक एके ठिकाणीं चवदावर्षांपेक्षा जास्त कालपर्यंत कधींही राहत नाहींत. कारण, गांवठणची जी जागा असेल, ती चवदा वर्षांनीं तरी एकदां बदलण्याविषयीं त्यांच्यांत रिवाज आहे. त्याचप्रमाणें, जमीनी पीक देतनाशा झाल्या, किंवा त्यांचा मगदूर कमी होत

चालला, अथवा त्या निःसत्व होऊं लागल्या, तर त्या सोडून देऊन त्यांच्या ऐवजी दुसऱ्या निराळ्याच जमीनी लागवड करण्यासंबंधीं ते चांगली खबरदारी घेतात.

त्यांचा सेवक वर्ग. ज्याप्रमाणें हिंदूंत सेवकवर्ग आहे, त्याचप्रमाणें खोंड लोकांतही दासवर्ग आहे. हे अगदीं जंगली जातीपैकीं असून, त्यांजकडे झाडलोट, साफसफाई, अथवा अशाच प्रकारचें हलकें व नीच काम असतें. तसेंच लोहार, कुंभार, धनगर, कोष्टी, भंडारी, इत्यादींचीं कामें देखील हेच करतात. ह्यांच्याशीं खोंड लोक मिसळून असत नाहींत, किंवा त्यांच्याशीं हे अन्नव्यवहार देखील करीत नाहीं. फार तर काय सांगावें पण, त्यांच्या हातचें अन्न सुद्धां हे खात नाहींत. कारण, तसें केल्यानें आपल्या जातीला कमतरपणा येतो, असें हे समजतात. तथापि, त्यांजला हे फारच चांगल्याप्रकारें वागवितात, यांत संशय नाहीं.

त्यांची धर्मपद्धति. खोंड लोकांचेही संताळ लोकांप्रमाणेंच नानातऱ्हेचे देव, आणि अनेक प्रकारच्या देवता आहेत. ह्यांपैकीं, मुख्य आणि महत्वाचें पूजास्थान म्हटलें ह्मणजे भूदेवता असून, तत्संतृप्त्यर्थ नरमेध करण्याची त्यांच्यांत वहिवाट होती. हा नरमेध किंवा मनुष्याचा बळी दोन वेळां देण्याची चाल असे. एकदां पेरणीच्या वेळेस, आणि तदनंतर लावणीच्या संधीला,

म्हणजे भातें कापण्याच्या हंगामांत. क्वचित् प्रसंगीं देशाला आपत्ति आली, किंवा त्याजवर एकादें अरिष्ट ओढवलें, तरी देखील हा मनुष्याचा बळी देण्यांत येत असे.

नरमेध.

हा नरमेध म्हटला म्हणजे "बळी तो कान पिळी" याच धोरणावर असे. कारण, जवळ असलेल्या आसपासच्या सरहद्दीच्या गांवावर छापा घालून, त्यांत जीं मुलेंबाळें किंवा माणसें सांपडत असतील तींच पकडून आणून, ज्या गांवाची पाळी आली असेल, त्या गांवानें त्यांतूनच बळी देण्यासाठीं एकादा इसम पुरविण्याची चाल असे तथापि, अशा मेध्य मनुष्याबद्दल नेहमींच किंमत देण्यांत येई. कारण असा इसम फुकट घेऊं नये, म्हणून त्यांच्यांत एक प्रकारचें धर्मबंधनच असे.

असो. वधकाल येईपर्यंत ह्या मेध्य मनुष्याची उत्तम प्रकारची शुश्रूषा होऊन, त्याच्या खाण्यापिण्याचाही योग्य बंदोबस्त ठेविला जाई पुढें, नेमिलेल्या दिवशीं त्याचा वध होऊन, त्याचें रक्त आणि मांस प्रथमतः भूदेवतेला अर्पण करून, बाकीचा अवशिष्ट भाग जमीनीवर ठिकठिकाणीं टाकण्यात येई.

त्याची बंदी

हा प्रकार इ० स० १८३९ पर्यंत चालला. परंतु तदनंतर यांच्यावर इंग्रजाचा अम्मल सुरू झाल्या कारणानें, त्यांनीं तो सर्व प्रकार अजिबात बंद

केला. त्यामुळें, नरमेधाऐवजीं टोणगे, बकरीं, व कोंबडीं, यांचाच चक्काचूर होत गेला, आणि शेवटीं केवळ त्यांच्यावरच निर्वाहा करणें भाग पडलें.

ह्या लोकांस वश करण्याविषयीं इंग्रजांचें धोरण.

अस्तु. हे खोंड लोक माणसाळले जाऊन निरंतर शान्ततेंत राहावेत एतदर्थ, कांहीं कांहीं काबिल इंग्रज कामदारांनीं फार मेहेनत घेतली, व त्यामुळें त्यांचे हेतूही सफळ झाले. त्यांनीं कित्येकांस जंगली प्रदेश दिले. कित्येकांस गुरें ढोरें देऊन संतुष्ट केलें. कांहींजणांस पदव्या देऊन राजी राखिलें. आणि राहिल्यासाहिल्यांस कपडे व धान्य वगैरे देऊन, त्यांची चंगल उडविली. एतावता, ह्या जंगली लोकांस थोडक्यांत खूष ठेवून, इंग्रजांनीं आपला महत्वाचा असा राजकीय कार्यभाग साधून घेतला. कारण, त्यामुळें ह्या लोकांकडून वारंवार उद्भवणारा असा बखेडा कायमचाच मोडला जाऊन, ह्या प्रदेशांत देखील सर्वत्र शान्तता झाली. इतकेंच नव्हें तर, त्यांजला आमच्या आंग्लप्रभूंनीं आपलेसेंच केल्या कारणानें, ते ह्यांच्या कबजात राहून, त्यांचें एक प्रकारचें पाठबळच झालें, असेंही ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्याचें नांव खुबी, आणि हेंच खरें राजकीय धोरण.

आतां, अनार्य जातींत ज्यांचा समावेश होण्यासा-

रखा आहे, अशा अतिशूद्र किंवा अन्त्यज वर्गाचें मात्र

बाकी राहिलेल्या महार, मांग, इत्यादि अनार्यजाति.

विवेचन करणें राहिलें आहे, सबब त्यांचा तपशील येथें देतों. हे अन्त्यज म्हटलें म्हणजे १ महार, २ चांभार, ३ मांग, ४ धेड, ५ परिअर[1], ६ मालेर[2], ७ डोम[3], ८ चांडाळ, व ९ वेड्ड[4], इत्यादि होत. ह्यांच्या उत्पत्तीविषयींचें दिग्दर्शन मागील भागांत(पान १५३-५वर) केलें आहे, व यांच्या इतिकर्तव्यतेची थोडीबहुत हकीकत पूर्वार्धाच्या पांचव्या पुस्तकांत ( पान १०७।१०८ वर ) यथावकाश दिली आहे.

ह्याप्रमाणें मुख्य मुख्य अशा अनार्य जातींचा अवश्य तो विचार झाला. सबब, अखिल भरतखंडांत त्यांची कोठें कोठें किती किती वस्ती आहे, याबद्दलची थोडीशी माहिती देऊन, हा भाग पुरा करितों.

अनार्य लोकांची एकंदर वस्ती दोन कोटींवर असून, ती खालीं लिहिल्याप्रमाणें विभागली आहे.

---

१ परिअर, पुलिअर, व पल्लर, हे एकाच वर्गांतले असून ह्यांची वस्ती मद्रास इलाख्यात आहे.

२ मालर, आणि मलयरसर किंवा मलरसर हे घाटाच्या दक्षिणेस असतात.

३ डोम अथवा राजी हे उत्तर हिंदुस्थानांत व हिमालयाजवळ राहतात.

४ ह्यांची वस्ती लकेंत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बंगाल. | .... | .... | .... | १,११,१३,८८३ |
| आसाम. | .... | .... | .... | १४,९०,८८८ |
| वायव्यप्रांत. | | .... | .... | ३,७७,३७४ |
| अयोध्या. | .... | .... | .... | ९०,४९० |
| पंजाब. | .... | .... | .... | ९,५९,७२० |
| मध्यप्रांत. | .... | .... | .... | १६,१९,८३५ |
| वऱ्हाडप्रांत. | | .... | .... | १,३३,०५९ |
| कुर्गप्रांत. | .... | .... | .... | ४२,५१६ |
| मुंबई | .... | .... | .... | ७,११,७०२ |
| देशी संस्थानें | | .... | .... | १०,०९,५६४ |

ही खानेसुमारी इ० स० १८७२ सालीं झालेल्या टिपेवरून घेतलेली असून, यांत मद्रास इलाख्यांतील लोक गाळाऊ केले आहेत. कारण; तिकडील समग्र माहिती मिळालेली नाहीं.

# भाग ४७ वा.

## इतरजाति.

इतरजाति.

मागील दोन भागांत आर्य आणि अनार्य जातींविषयीं यथावकाश विवेचन झालें. सबब, प्रस्तुत भागांत राहिलेल्या इतर जातींबद्दलचा विचार करूं.

पारशी यहुदी, खिस्ती, मुसलमान यांचा त्यांत समावेश.

ह्या राहिलेल्या इतर जातींत, **पारशी**, **इस्त्रायल**, **ख्रिस्ती**, **मुसलमान**, इत्यादींचाच समावेश होतो. कारण, ह्यांचीच आमच्या **भरतखंडांत** वस्ती आहे. ह्मणून तद्विषयक थोडीशी हकीकत येथें देतों.

पारशी व पाश्चात्य यांचा आर्यजातींत समावेश न करण्याचीं कारणें.

आतां, **पारशी** हे **आर्य** असूनही, त्यांजविषयींची हकीकत आर्य जातींत न देतां, ती इतर जातींत कां नमूद केली, याबद्दलची शंका सहजी उत्पन्न होण्यासारखी आहे. सबब, तत्संबंधीं निरसन प्रथमतःच केलें पाहिजे.

आमचे **पारसीक** बंधु हे आमच्याच आर्य कुटुंबा-

तले असल्याकारणानें, ते आमचे फारच जवळचे नातलग आहेत. आणि ते **आर्य** जातीपैकीं आहेत, याविषयीं देखील तिळमात्रही शंका नाहीं. त्याचप्रमाणें, **पाश्चात्य** देशांतील **ग्रीक, रोमन, इंग्रज,** वगैरे **ख्रिस्ती** लोक देखील **आर्य** शाखेंतीलच असल्याविषयीं अनेक **भाषा-कोविदांचें** मत असल्यामुळें, त्याची गणना सुद्धां **आर्य-जातींतच** झाली पाहिजे होती. परंतु तसें न करतां, आम्हीं फक्त **आर्यहिंदूंचाच आर्य**जातींत समावेश करून, **अनार्यांशिवाय** बाकीच्यांस इतर जातींतच घातलें.

पहिलें कारण.

ह्याचें कारण असें कीं, एक तर **आर्यावर्तां**तील **आर्यहिंदु** हे आपणांसच विशेष रीतीनें **आर्य** ह्मणून म्हणवीत असत. इतकेंच नव्हे तर, त्यांनीं आपल्या देशालाही **आर्यावर्त** असें प्रौढ नांव दिलें आहे. त्यामुळें, **भरतखंड-**निवासी असे जे **आर्यहिंदु,** त्यांसच "**आर्य**" या नांवानें सर्व जगभर ओळखूं लागले; व "**आर्य**" हा शब्द निघतांच, **भरतखंडा**कडेसच बोट दाखविण्याचा प्रचार पडून, **आर्य** हें नांव **हिंदुराष्ट्राचेंच** द्योतक झालें आहे.

दुसरें कारण.

दुसरें कारण असें आहे कीं, **पारसीक** आणि सदरीं निर्दिष्ट केलेले काहीं **ख्रिस्ती** लोक, हे जरी आमच्या **आर्य** कुटुंबांतल्या शाखेपैकींच आहेत, तरी पण, आमच्या सर्व **आर्यहि-**

दूंच्या आचार विचारांत जें ऐक्य व साम्य आहे, तें आर्यशाखेंतील इतर लोकांत बिलकूल दिसून येत नाहीं. शिवाय, आम्हां आर्यहिंदूंत अनेक जातिभेद असतांहीं, आमच्या केवळ धर्मबंधनानेंच, आह्मी सर्वजण जणु काय, एकत्रच गोंवलेले आहोंत. फार तर काय सांगावें, पण आमच्या फक्त हिंदुधर्मबंधनानेंच आमचें वारंवार ऐक्य होत गेलें. ह्याच धर्मबंधनानें, आमच्याकडून, आमच्या पडत्या काळांतही, अगदीं अतुल पराक्रम करविलें. इतकेंच नव्हे तर, ह्याच धर्मबंधनानें मधून मधून आपली चमक मारून, केवळ स्वतःच्याच प्रज्वलित तेजोराशीनें अखिल जगासही तोंडांत बोटें घालावयास लाविलें. कारण, धर्म ह्मणजे आमचा प्राण, आणि धर्मच आमचें जीवन, अशी आम्हां आर्यहिंदूंची पूर्ण श्रद्धा असल्यामुळें, त्या नेटानेंच हा कार्यभाग आजपर्यंत होत गेला.

तिसरें कारण हें कीं, आर्यांचें विवेचन करितांना,

तिसरें कारण.

परकी लोक देखील आर्य शब्दाच्या व्याख्येंत फक्त, आम्हां आर्यहिंदूंचाच समावेश करितात; आणि आर्य कुटुंबांच्या इतर शाखांचा त्यांत शिरकावही करूं देत नाहींत. तेव्हां, आर्य जातींत केवळ आर्यहिंदूच यावयाचे, हें यथान्याय ठरल्यामुळें, मींही तसें केलें आहे.

इ० स० १८९१ सालच्या खानेसुमारीचा जो आहवाल[1] मिस्तर बेन्स[2] यांनीं लिहिला आहे, त्यांत सुद्धां ते असें लिहितात कीं, वायव्य दिशेनें जे लोक हिंदुस्थानांत गेले, आणि ज्यांनीं आपली तेथेंच कायमची वसाहत केली, तेच आर्य[3] लोक होत, व तेच "आर्य" या नांवानें सुसंज्ञित आहेत. निदान, त्यांजलाच आर्य असें नांव देणें, हें तरी विशेष सोइस्कर आहे.

आमच्या मताच्या समर्थनार्थ आधार.

सबब, ह्या सर्व गोष्टी मनांत आणून, आर्य जातींत फक्त आर्य हिंदूंचाच समावेश करून, केवळ त्यांजविषयींच अवश्य ती माहिती त्या भागांत दिली आहे.

असो. प्रस्तुतभागाच्या विषयोपन्यासार्थ, ही अवश्य

---

१ रिपोर्ट.

२ हिंदुस्थानचे सेन्सस कमिशनर.

३ "It will be Convenient to restrict the term Arya to the Community that found its way to India." * * *

"By Arya, then, we mean in this work, the people who entered India from the north-west, leaving a larger Community of the same race who seem to have kept a south-westerly Course along the opposite side of the mountains."

( Baines' 1891 Census Report. Published 1893 ) P. 122

ती प्रस्तावना प्रथमतःच करणें अगदीं जरूर वाटलें, सबब ती केली. यास्तव आतां, पुढील विषयाकडे वळतो.

पुढील विषयोपक्रम.

पूर्वी विर्दिष्ट केल्याप्रमाणें, भरतखंडांतील इतर जातींत पारशी, इस्रायल, ख्रिस्ती, आणि मुसलमान, यांचाच मुख्यत्वेंकरून समावेश होतो. अतएव, त्यांचाच आपण क्रमशः विचार करूं.

पारशी व त्यांचे वर्ग.

**पारशी** जातींत दोन वर्ग आहेत. १ ब्राह्मण किंवा पुरोहित वर्ग, आणि २ गृहस्थ अथवा ब्राह्मणेतर वर्ग. हे लोक, फार प्राचीन काळीं, आमच्याच पासून विभक्त होऊन, फिरत फिरत व स्थलांतरें करीत करीत, इराणांत गेले; आणि तेथें त्यांनीं एक निराळाच धर्म स्थापन केला.

त्यांचें वसतिस्थान.

ह्या धर्माची उत्पत्ति, त्याची चळवळ, आणि त्याचें आर्यधर्माशीं निकट साम्य, इत्यादि संबंधीं सविस्तर विवेचन सातव्या पुस्तकाच्या ४० व्या भागांत यथावकाश केलें आहे. सबब, तद्विषयक पुनश्च चर्चा करण्याची अवश्यकता नाहीं. परंतु, या ठिकाणीं इतकें मात्र सांगणें अगदीं जरूर आहे कीं, इराणांत झरथुष्ट्रानें मनसोक्त धर्मसंस्थापना केल्यावर, पारसीकांनीं पूर्ण स्वातंत्र्यांत बरेच

दिवस घालविले. तदनंतर कालवशात् ग्रीक लोकांच्या त्यांजवर वारंवार स्वाऱ्या होऊं लागल्या, आणि त्यामुळें त्यांच्या धर्मास बराच आचका बसला. परंतु त्यांतूनही त्यांची जेन्तेम् निभावणी होऊन, सासान राजांच्या कारकीर्दीत तर त्याला चांगलेंच प्रोत्साहन मिळालें; व त्या कारणानें धर्मग्रंथांवर टीका वगैरे होऊन, धर्मग्रंथसंपत्तिही वाढली.

त्यांजवर मुसलमानांचा जुलूम.

त्यानंतर, इस्लामसत्ता सुरू होऊन, त्याचें वावटळ, प्रचंड झंझावाताप्रमाणें, सर्वत्र पसरलें. आणि इस्लाम समशेरशाहींत अखिल इराण देश अगदीं पादाक्रांन्त झाल्यानें, एकंदर बिस्मिल्ला होऊन, सर्वांसच कुराण पढण्याची वेळ येत आहे कीं काय, अशी अखिल पारसीकांस जबरदस्त भीति वाटूं लागली. इतकेंच नव्हे तर, इतो भ्रष्टस्ततोभ्रष्टः, अशी सर्वांची स्थिति होऊन, एकच कल्होळ मातला, व सर्वच बेदील झाले.

त्यामुळें त्यांचें इराणांतून पलायन.

मग काय विचारता! यःपलायति सजीवति, अशीच ज्याची त्याची अवस्था झाल्याकारणानें, जो तो दे माय धरणी ठाय, असें करूं लागला; आणि चोहोंकडे एकसारखी पळापळच सुरू झाली. ज्यांच्यावर एकदम गदा येऊन ठेपली, ते बिचारे तर तावडतोबच शिखानष्ट

बनले. व कित्येकांस देशान्तरापेक्षां धर्मान्तरच बरें वाटलें. परंतु ज्यांची मजदीन धर्मावर विशेष प्रीति होती, किंवा जे मनःपूर्वकच झरथुष्ट्र धर्मानुयायी होते, त्यांजला प्राणांपेक्षांही आपला धर्म विशेष प्यारा आणि श्रेयस्कर वाटत असल्यानें, त्यांनीं इराण देश सोडण्याचाच विचार केला.

त्यांचें हिंदुस्थानांत आगमन.

इराण सोडल्यावर, हे लोक काहीं वर्षें ऑरमज येथें येऊन राहिले; व तेथूनच ते पुढें हिंदुस्थानांत आले. ते प्रथमतः इ० स० ७१७ सालीं संजाणांत जाऊन उतरले, आणि इराणांतून जो त्यांनीं अग्नि आणिला, त्याचीही त्यांनीं येथंच प्रतिष्ठापना केली. तदनंतर सुमारें चार वर्षांनीं, त्यांनीं तेथें पुजादिविधीसाठीं एक अग्यारी देखील बांधली. संजाण हें मुंबईच्या उत्तरेस सुमारें तीस कोसांवर आहे.

असो. आमच्या देशांत उतरल्यावर, त्यानीं आमच्या धर्मवाबी व कित्येक रीतीभातीही स्वीकारल्या. आणि उत्तरोत्तर आमच्याशीं त्यांचा निकटसंबंधच पडत गेल्यानें, ते गाईला अगदीं पूज्य मानूं लागले. गोमूत्र आणि गोमय पवित्र समजून, घरांत त्याचा सडासंमार्जन करण्याची त्यांनीं सुरुवात केली. लग्नविधींत बायकांनीं कपाळीं कुंकू लावण्याचा परिपाठ पाडला. आणि ह्या सर्व गोष्टी आजमित्तीस देखील त्यांच्यांत अगदीं ज्यारीनें अमलांत आहेत.

आह्मां हिंदूंच्या विस्तीर्ण समुदायार्णवांत, ही पारसीकांची नूतन वसाहत केवळ जलबिंदूप्रमाणेंच असल्याकारणानें, पारशी हे हल्लीं आमच्या सहवासानें अगदीं हिंदुच बनले आहेत इतकेंच नव्हें तर, आमच्या सर्वव्यापी हिंदुधर्मानें देखील त्यांजवर बराच संस्कार केला आहे. आणि ही गोष्ट पाश्चात्यांच्याही चांगली अनुभवास आली असल्याकारणानें, त्यांनीं सुद्धां तद्विषयक उल्लेख ठिकठिकाणीं करून, एकंदर खरी वस्तुस्थिति दाखविली आहे.

पारशी व हिंदू यांचें ऐक्य.

तथापि, सांप्रतकाळीं, आमच्या आंग्ल प्रभूंच्या निकट संबंधानें, ते बहुतेक, निदान त्यांपैकीं कांहीं तरी खचित,

१ "Their ( Parsi ) religion during the early years of their residence in India suffered from the influence which must be exercised over a small and foreign body, numerically weak, by a strong Animistic atmosphere; Combined with that *absorptive power* which is, as we have seen, one of the *most prominent characteristics* of the Brahmanism of the day; and from the accounts of contemporary travellers it appears that at one time it was barely distinguishable from the surrounding form of worship." *

"In the present day, the *Parsi is a completely Indian community* "

[ Baine's Census Report. 1891. P. 166 ].

अगदीं हुबेहूब इंग्रजच बनू पहात आहेत. कारण, त्यांचा कपडालत्ता, खाणेंपिणें, रीतरिवाज, ख्यालीखुशाली, इत्यादि सर्व **इंग्रजी** तऱ्हेवरच आहे. फार तर काय सांगावें, पण कित्येक **पारशी** कुटुंबें आपली मूळभाषा देखील **इंग्रजीच** असल्याविषयीं अगदा जाहीरपणें सांगतात, आणि सरकार कागदीं देखील तसेंच लिहून देतात.[१]

पारशांची सांप्रतची चलबिचल.

आतां, खरें पाहूं गेलें तर असें दिसून येईल कीं, आमच्या **पारसीक** बंधूंची मूळभाषा **संस्कृतच** होती. परंतु पुढें ते आमच्यापासून विभक्त होऊन देशान्तरीं गेले, आणि शेवटीं त्यांनीं आपली कायमची वस्ती **इराणांतच** केली. तेथें, मूळच्या भाषेंत अनेक तऱ्हेचे अपभ्रंश होऊन, तींत बरीच भेळसाळही झाली. त्यानंतर ह्याच अपभ्रंष्ट भाषेला कालान्तरानें चांगलें स्थैर्य प्राप्त होऊन, तीच **पल्हवी** नांवानें सुप्रसिद्धीस आली; व ती त्यांची केवळ देशभाषाच बनली. पुढें **इस्लाम** समशेरशाहींत, **इराणांत** धर्मक्रान्ति झाली; आणि त्या सपाट्यांत आमच्या **पारसीक** बंधूंना आपल्या पूर्वजांच्या दयित जन्मभूमींतच पुनश्च जाण्याची पाळी आली. त्यामुळें, त्यांजला इकडील भाषेचाच अंगिकार करणें अगदीं भाग

त्यांची प्रथमची भाषा.

१ Baine's Census Report. 1891. P P. 166/167.

पडलें. आणि ते ज्या मुलखांत उतरले, तिकडील भाषा फक्त गुजराथीच असल्याकारणानें, तीच त्यांची मूळभाषा बनली.

त्यांची स्वीकृत केलेली भाषा.

याप्रमाणें, आज सुमारें एक हजार वर्षांवर, ही नवीन पतकरलेली **गुजराथी** भाषाच आमच्या **पारसीक** बंधूंची केवळ स्वभाषा होऊन राहिली आहे. आणि असें असूनही, सांप्रतकाळीं आमच्या **आंग्ल** प्रभूंच्या अगदीं निकट संघट्टणानें, ते हुबेहूब **इंग्रज**च बनूं पाहत आहेत, व आपल्या दोन्ही तिन्ही भाषा ( म्हणजे प्रथमची संस्कृत आणि **पल्हवी**, व तदनंतरची **गुजराथी**, इत्यादि ) अजिबात सोडून देऊन, **इंग्रजी** हींच आपली जन्मभाषा आहे, असें सांगण्याचा त्यांनीं नूतनच प्रारंभ केला आहे, ही महदाश्चर्याची गोष्ट होय.

तिची धरसोड.

याप्रमाणें, हरएक बाबींत, आणि सूक्त वा असूक्त

---

१ " In certain circles, especially in Bombay, the Census shows a considerable tendency to return English as their ( Parsee's ) mother tongue, a statement which will be by no means improbable in a few years, when the girls of the present generation arrive at the dignity of maternity. " * *

( Baine's Census report 1891 ).

गोष्टींतही, केवळ पाश्चात्यांचेंच अनुकरण[1] करण्यांचा हा जो झपाटा आमच्या पारसीक बंधूंनीं एकसारखा चालविला आहे, तो पुढें मागें केव्हांना केव्हां तरी, त्यांस खचितच विघातक होईल असें वाटतें. इतकेंच नव्हे तर, तज्जातीयांस त्याबद्दलचा कालान्तरानें पश्चात्तापही होईलसें दिसतें. कारण, कोणत्याही अनुकरणाला कांहीं ना कांहीं तरी मर्यादा म्हणून पाहिजेच आहे. सबब, जेव्हां जेव्हां कोणतेंही काम हद्दीबाहेर जातें, तेव्हां तेव्हां तें आपोआपच अनुतापास कारणीभूत होतें. तथापि, ते लोक साहसी, दीर्घोद्योगी, आणि व्यापारपटु आहेत, यांत मात्र तिळभरही शंका नाहीं.

त्यांनीं केलेलें परकीयांचें बेहद्द अनुकरण.

त्यांचें साहस व व्यापारपटुत्व.

अस्तु. भरतखंडांत पारशी लोकांची एकंदर संख्या ९०,००० पेक्षां थोडी कमी आहे. तथापि, कास्पिअन् समुद्राच्या कांठावर, आणि दक्षिणेकडे येझ्द येथेंही, त्यांची आठ दहा हजार लोकांची वस्ती असून, तेथें त्यांच्या अग्निदेवतेचीं पूजास्थानें अजून देखील आहेत.

त्यांची एकंदर लोकसंख्या.

---

[1] " For, this ( Pàrsi ) race has shown a remarkable aptitude for assimilating the lighter tints of Western life. "

( Baine's Census report, 1891. P.167 )

यहुदी लोकांत दोन वर्ग आहेत. १ इस्त्रायल, आणि २ बेनी इस्त्रायल. पहिले गारे-वर्णाचे असून, दुसरे श्यामवर्णी आहेत. व्यापार धंद्यानिमित्त हे हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं वस्ती करून राहिलेले आढळतात. आमच्या महाराष्ट्रांत जेवढे ह्मणून यहुदी लोक आहेत, तेवढे सर्व मराठी भाषाच बोलतात. मात्र, एडन नजीक राहणाऱ्या यहुदी लोकांत, आरबी भाषा बोलण्याचा प्रचार आहे. ह्यांची संख्या एकंदर १७,२०० आहे.

यहुदी लोकांचे दोन भेद.

त्यांची संख्या.

ख्रिस्ती धर्माचे लोक हिंदुस्थानांत कसे व केव्हां आले, आणि ते कशा प्रकारें फैलावले, याविषयींची माहिती पूर्वी[1] दिलेलीच आहे. ह्यांची भरतखंडांत एकंदर संख्या २२,८४,३८० असून, त्यापैकीं शेंकडा ५७½ रोमनक्याथलिक, ८¾ जेकोबाइट किंवा सिरिअन्‌चर्च, ३३ रिफार्म्ड्‌चर्च, आणि राहिलेले ग्रीक, आर्मीनियन्, इत्यादि पंथांतले आहेत. ह्या धर्माचे लोक जातिभेद असा मुळींच मानीत नाहींत.

ख्रिस्ती लोकांची संख्या.

मुसलमान लोकांत देखील ख्रिस्ती धर्माप्रमाणेंच जाति-

---

१ उत्तरार्ध. पुस्तक सातवें. भाग ४२ वा, पान २१९-२२८ पहा.

भेद म्हणून नाहींच. तथापि, त्यांच्यांत खालीं लिहि-

मुसलमान लोकांतील पृथक वर्ग.

ल्याप्रमाण भिन्न भिन्न लोकांचे पृथक् पृथक् वर्ग असल्याचें दिसून येतें.

१ तुर्क. २ आरब. ३ इराणी. ४ बलूची. ५ मकराणी. ६ मोंगल. ७ पठाण. ८ बोहोरी. ९ खोजी. १० मेमन. आणि ११ सिंधी.

त्यांचे दोन मुख्य धर्मपंथ.

मुसलमान लोकांत, शिया आणि सूनी असे दोन धर्मपंथ आहेत, व त्यांतही आपापसांत बराच मतभेद आहे, असें दिसतें.

त्यांची एकदर लोकसंख्या.

हिंदुस्थानांत मुसलमानांची एकंदर लोकसंख्या ५,७३,२१,१६४ आहे. तथापि, ह्या संबंधानें मख्य ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती ही कीं, हे सर्व मुसलमान मुळचे इकडील राहणारे नसून, त्यांत कांहीं परकी अथवा बाहेरून आलेले आहेत; आणि बाकीचे धर्मान्तरामुळें, किंवा जुलुमानें बाटविल्या कारणानें, तद्धर्मीय बनले आहे.

परदेशांतील मुसलमान.

आतां, जे मुसलमान इकडील नसून, येथें फक्त बाहेरूनच आलेले आहेत, त्यांत दोन प्रकार आहेतः—

१ वायव्य दिशेनें सरहद्दीवरून आलेले, व

ग्रंथ ठाण.

२ जलमार्गानें अरबस्थानांतून येऊन बलोचिस्तानच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरलेले.

ह्या दोहोंतही; मुसलमानी राजघराण्यांतील कांहीं अवशिष्ट राहिलेले लोक आहेत.

**ह्या देशांतील बाटलेले हिंदु, किंवा एतद्देशीय मुसलमान.**

परंतु, जे लोक बाटून मुसलमान झाले आहेत, ते सर्व मूळचे हिंदूच होत. तथापि, ह्यांत राजकीय घराण्यांतील अवशिष्ट भाग फारसा असेल असें वाटत नाहीं. मात्र, हिंदु कुलांतील ज्या राजकीय घराण्यांचा शरीरसंबंध मुसलमान राजपुत्रांशीं झाला, अशांचे वंशज क्वचित् राहण्याचा संभव असून, त्यांचा समावेश ह्यांत होऊं शकेल.

**एतद्देशीय मुसलमानांची हिंदु धर्मावरील श्रद्धा.**

असो. ज्या हिंदु लोकांस जुलमानें बाटविलें, त्यांपैकीं कित्यकांची अजूनही हिंदु धर्मावर दृढतर श्रद्धा असून, ते अद्यापि हिंदु देवतांस भजतात[1], आणि मूर्ति पूजा करितात.

---

१ ह्याचें ठळक उदाहरण पंजाबांत दृष्टोत्पत्तीस आलें आहे.

" A traveller entering a rest-house in a Mussalman village found the headman refreshing the idol with a new coat of oil, whilst a Brahman read holy texts along side. The pair seemed rather ashamed at be-

( पुढें चालू )

यांप्रामाणें, मुख्य मुख्य जातींचा अवश्य तो विचार झाला. तथापि, ह्या इतर जातींत, आणखी कांहीं मंडळीचा समावेश करणें जरूर आहे. आणि ही मंडळी कोणती ह्मणाल तर, तत्वविवेचक, एकेश्वरमतवादी, नास्तिकवादी, व बौद्धधर्मानुयायी, इत्यादि होत.

ह्याशिवायच्या जाती.

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू,)

ing caught in the act; but, on being pressed, explained that their Mulla (priest) had lately visited them and being extremely angry on seeing the idol had made them bury it in the sand. But now the Mulla had gone, they were afraid of the possible consequences, and were endeavouring to console the god for his rough treatment."

(Baine's Census Report. 1891 P. 168.)

# भाग ४८ वा.

## जातिविभाग.

मागील भागांत भरतखंडांतील मुख्य मुख्य जातींचा क्रमशः विचार झाला. आंतां, ह्या विस्तीर्ण देशांत सदरहू जाती कसकशा विभागल्या गेल्या आहेत, याविषयींचें थोडेसें तरी दिग्दर्शन केलें पाहिजे. सबब, तें या भागांत यथावकाश करतों.

जातिविभाग.

हिंदुस्थानांत हिंदु लोकांची वस्ती सर्वांत मोठी असून, त्यांचे आणखी दुसरे चार पोटभेद आहेत. हे पोटभेद हिंदूंच्या वर्णव्यवस्थेमुळेंच झाले असल्यानें, वर्णसंस्था ही जणू काय आर्य हिंदूंची निशाणीच होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आणि पाश्चात्य लोकांची देखील तद्विषयक अशीच कल्पना आहे.

वर्णसंस्था हीच आर्य हिंदूंची मूळ निशाणी.

---

१ 'Very high authorities have described Caste as the '*express badge of Hinduism,*' and M. Barth considers that this institution is not merely *the Symbol of Hinduism,* but its *stronghold,* and a *religious factor of the very highest order.*'

( Baine's Census Report of 1891, P. 182. )

हिंदूंत शीख, जैन, आणि जंगली जातींच्या लोकांचा समावेश.

असो. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, असे आर्य हिंदूंत चार वर्ण असल्याविषयीं, मागें सांगितल्याचें वाचकांच्या ध्यानांत असेलच. आतां, ह्यांतच शीख, जैन, व भुताखेताची पूजा करणारे जंगली लोक, यांचाही समावेश करण्यास हरकत नाहीं. कारण, ते आपल्याला केवळ हिंदूच म्हणवितात, सबब, हिंदूंच्या कळपांतच त्यांची परिगणना करणें अत्यवश्य आहे.

शीख हे हिंदूच असल्याविषयीं प्रमाण.

आतां, इंग्रजी इतिहासांत, आणि खानेसुमारीच्या आहवालांत, शीखलोकांस हिंदू कळपांतून, किंबहुना हिंदु वर्गांतून अजिबात काढिल्याचें पाहून, व त्यांचा स्वतंत्र वर्गच बनविला असल्याचें वाचून, मजला फारच अचंबा वाटला; व ह्यासंबंधानें कांहीं ना कांहीं तरी गौडबंगाल असावें, अशी माझी कल्पना झाली; आणि दुसऱ्या कित्येक कारणांवरून, माझ्या मनानेंही तसेंच घेतलें. पुढें, ह्या कल्पनेला संशयाची विलक्षण मगरमिठी बसली, व ती कालेंकरून दुणावत चालली. परंतु, ह्या संशयाची निवृत्ति प्रत्यक्ष प्रमाणाशिवाय, किंवा कोणी तरी एकादा शिकलेला आणि विद्याविभूषित शीखच भेटल्याशिवाय होणें मुष्किल असल्याकारणानें, ह्या संशयात्मक मोहजालांत मजला बरेच दिवस कंठावे लागले.

पुढें, एके दिवशीं[1], एका शीख गृहस्थाचीं[2] आणि माझी मुलाकत झाल्यामुळें, त्यांजला ह्या संबंधाची मी इत्थंभूत हकीकत विचारली, व त्यांनींही कृपा करून त्या बाबतींत मजला संपूर्ण खुलासा दिला.

एका शीख गृहस्थाची भेट.

हे गृहस्थ पंजाब इलाख्यांत झेलम जिल्ह्यांत, मौजे हरणपूर गांवीं राहत असून, त्यांच्या एकंदर आविर्भावावरून ते मोठे देशाभिमानी व माहितगार असल्याचें मला वाटलें. ते बरेच चौकस असून, त्यांजला इतिहासाची देखील पुष्कळ गोडी असावी, असें माझें अनुमान झालें. त्यांजला शीख धर्माची चांगली माहिती आहे, व त्यांनीं ह्या धर्मांतलीं बरींच पुस्तकें वाचलीं असल्यामुळें, ह्या धर्माचें हृद्गत, व त्याचीं मूलतत्त्वें, हीं सुद्धां त्यांजला अवगत आहेत: तेव्हां, अशा गृहस्थांनीं माझी शंका सावधान ऐकून घेऊन, मजला असें खात्रीपूर्वक कळविलें कीं, शीख आणि हिंदु हे केवळ एकत्र आहेत. कारण, दोघांचे आचार, विचार, आणि धर्म, यांत कांहीं एक फेर नसून, हिंदुप्रमाणेंच शीख लोकांत सुद्धां ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र, असे वर्णभेद आहेत. ते मूर्तिपूजा

त्यांनीं दिलेली माहिती.

---

१ मार्गशीर्ष शुद्ध १४, शके १८१७, रविवार. तारीख १ डिसेंबर १८९५ रोजीं.

२ ह्यांचें नांव **शतरसिंग दिवाण** असून, ते मौजे **हरणपूर**, जिल्हा झेलम, इलाखा पंजाब, येथें राहतात.

करितात, आणि हिंदू प्रमाणेंच गाईला भजतात. मात्र इतकेंच कीं, शीख लोक हे केसाला ह्मणून कधींही धक्का लावीत नाहींत, किंवा वस्तऱ्यानें केंस काढीतही नाहींत.

असो. तात्पर्य एवढेंच कीं, शीख हे केवळ हिंदुधर्मांतलेच असून, त्यांचा पंथ मात्र निराळा समजावयाचा. याशिवाय दुसरा कांहींएक भेद नाहीं.

सदरहू गृहस्थांनीं दुसरी अशी एक गमतीची आणि विशेष महत्वाची गोष्ट मला कळविली कीं, शीक लोकांनीं इस्लामधर्म स्वीकारावा एतदर्थ हरएक प्रयत्न चालू असून, त्या संबंधांत त्यांजला बरीच लालूचही दाखविण्यांत येते. परंतु ह्या आमिषास ते बिलकुल मानीत नाहींत. इतकेंच नव्हे तर, आपण कट्टे हिंदु, व हिंदुधर्माभिमानीच आहोंत, असें ते साफ उत्तर देतात; आणि त्यामुळें कोणाचेंच कांहीं चालत नाहीं.

शीखलोकांस इस्लाम धर्म स्वीकारण्याविषयींचा आग्रह.

ह्यासंबंधानें, नामदार बाबा खेमसिंग बेदी यांनीं तर हिंदु आणि शीख हे एकच असल्याविषयीं, स्पष्ट रीतीनें, व अगदीं निर्भिडपणें, सर्वांस कळविलें. आहे.

---

१ माहे जून इ. स. १८९७ त, हिंदु ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूटमध्यें जें त्यांचें व्याख्यान झालें, त्यावेळीं त्यांनीं ह्या संबंधाचा उल्लेख केला. तो खालीं दिलेल्या अर्जुनांतील उताऱ्यावरून व्यक्त होईल.

( पुढें चालू )

ह्यावरून, शीख हे प्रत्यक्ष हिंदुच[1] असल्याविषयीं आतां तिळमात्र देखील शंका राहत नाहीं.

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

SIKHS AND HINDUS UNITED.

The constitution of the Council shows that the Hindus and Sikhs are considered as one people and not two separate communities, as they have been treated for some time past. We are glad to see this, and congratulate ourselves on the fact, that the attempts of the Anglo-Indian prints at stirring up social antagonism between the two sections have failed. The happy result achieved is mainly due to the patriotic efforts of the Honorable Baba Khem Singh Bedi, the acknowledged spiritual leader of the Sikhs, who at the memorable meeting of the Hindu Jubilee Technical Institute, held in June last 1897, remarked in terms unmistakable, that the Hindus and Sikhs are the descendants of the same parents, that the same blood runs through their veins and that the latter are only the warrior class organised by *Guru Govind Singh, to defend* the country. This authoritative pronouncement has dispelled once for all the clouds of misrepresentations that have been allowed to accumulate and spread, darkening the bright future the Hindus have before them. Some cringing Sikhs whose unblessed mission is to

१ * ही टीप २३० पृष्ठावर पहा.

तसेंच, जैन लोक जरी श्रावक धर्मातले आहेत तरी, ते देखील मूर्तिपूजा करितात, आणि आमच्या देवादिकांस भजतात. इतकेंच नव्हे तर, ते आपणांस केवळ हिंदुच मानतात. आणि ते आपापल्या जातींत हिंदूबरोबर यथेच्छ रोटी व बेटीव्यवहार[१] करितात, हेंच आमच्या म्हणण्याला प्रत्यक्ष प्रमाण होय.

जैन हे हिंदुच असल्याविषयीं प्रमाण.

---

( मागील पृष्ठावरून पुढे चालू. )

stir up bad blood between the Sikhs and Hindus, must now beat their breasts and tear their hairs at their discomfiture.—*The Arjuna.*

( Quoted from the Maratha of 3rd October 1897 ).

* " For not only is a true Sikh generally called a Hindu in common parlance, but many of these who are spoken of as Sikhs are not true Sikhs, but Hindus. "

( Baine's Census Report 1891. )
P. 164.

सदरहू इंग्रजी अवतरणावरून, आमच्या म्हणण्याची सत्यता, व वर नमूद केलेल्या पंजाबी शीख गृहस्थांच्या प्रतिपादनाची सार्थकता, वाचकांच्या लक्षांत येईल.

१ ही गोष्ट मिस्तर बेन्सनें देखील आपल्या खानेसुमारीच्या आहवालांत कबूल केली आहे. कारण, तो असें लिहितो कीं:—

" Amongst the Jains again, of Western India, intermarriage is not uncommon between the Bráhmanic and Shráwak sections of the same community."
( Baine's Census Report. 1891. P. 182. )

जंगली लोकांची स्थिति देखील अशाच मासल्याची होय. कारण, ते सुद्धां हिंदूंच्या कळपांतच भराभर मिसळले जाऊन, केवळ हिंदुच होऊं पहात आहेत.

जंगली लोकांचा हिंदूंत शिरकाव.

आणि ही गोष्ट हण्टर[१] सारखे इतिहासकारही कबूल करीत आहेत; व बेन्सच्या खानेसुमारीच्या[२] अहवाल्नांत देखील तद्विषयक उल्लेख आहे.

आतां, ह्या जातिविभागाचा यथार्थ खुलासा होण्यासाठीं, आपण प्रथमतः जातवार संख्या देऊं. म्हणजे पुढील विषयोपन्यासाला कांहीं एक अडचण न पडतां, तो सहजीं लक्षांत येईल.

अखिल भरतखंडां-तील जातवारसंख्या.

---

१ " On the one hand, there can be no doubt that the aboriginal castes and tribes are, in many parts of the country, tending towards Hinduism; and that many of them, as they rise in the scale of civilisation, lose their identity in the Hindu Community."*

" In Centers of the Aryan Civilisation, the aboriginal peoples have been pounded down in the mortar of Hinduism, into the low-castes and outcastes, on which the social fabric of India rests. "

( Indian Empire. P. P. 70/71 ).
Second Edition.

२ Baine's Census Report 1891.

| जात. | | लोकसंख्या. | | शेंकडावण. | |
|---|---|---|---|---|---|
| १ ब्राम्हण. | हिंदु. | २०,७७,३१,७२७ | एकुण हिंदु लोकसंख्या २१,८३,३६,६६५. | ७२.३३ | ७६.७१ |
| २ जंगली. | | ७२,८०,४६७ | | ३.२३ | |
| ३ शीख. | | १९,०७,८३३ | | ०.६६ | |
| ४ जैन. | | १४,१६,६३८ | | ०.४९ | |
| ५ पारशी. | | ८९,९०४ | | ०.०३ | |
| ६ बुद्ध- | | ७१,३१,३६१ | | २.४८ | |
| ७ यहुदी. | | १७,१९४ | | ०.००६ | |
| ८ किरिस्ताव. | | २२,८४,३८० | | ०.८० | |
| ९ मुसलमान. | | ५,७३,२१,१६४ | | १९.९६ | |
| १० इतर किरकोळ. | | १८५ | | —— | |
| ११ न दाखल झालेले. | | ४२,५७८ | | ०.०१४ | |
| एकुण एकंदर. | | २८,७२,२३,४३१ | | १००.०० | |

वर नमूद केलेले आंकडे सन १८९१ सालच्या टिपे-

ब्राह्मण शब्दाची व्याख्या.

वरून घेतलेले असून, त्यांत ब्राह्मण सदरांत, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र, या चार्‍ही वर्णांचा समावेश केला आहे असें दिसतें. कारण, ब्राह्मण शब्दानेंच हिंदुत्वाचें विशेष अवबोधन होतें, अशी मिस्तर बेन्सची

१ "Thus limited, a more applicable title for it (Hinduism) would be Bráhmanism, which connotes its two chief characteristies in the present day the recognition of inherited social status and the authority of a hereditory sacerdotalism.

(Baine's Census Report. 1891. P.158).

समज असून, ह्या चाऱ्ही वर्णांचे केवळ **ब्राह्मणच** उत्पादक आहेत, असें बेन्स मजकूर प्रतिपादन करितात.

हिंदूंचें हिंदुस्थान.

असो. सदरीं दाखल केलेल्या कोष्टकावरून, वाचकांच्या लक्षांत इतकें सहजीं येऊन चुकेल कीं, **हिंदुस्थान**च्या वस्तीच्या मानानें पाहतां, हा देश केवळ **हिंदूं**चाच आहे. कारण, **हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत**, आणि **अफगाणबलूच** सरहद्दीपासून तों तहत **आराकानपर्यंत**, **हिंदुधर्मा**चाच प्रसार व प्रचंड परिवार असून, येथील पाउणपटीपेक्षांही जास्त वस्ती केवळ **हिंदूं**चीच आहे.

आतां, ही वस्ती कसकशी विभागली आहे, आणि ती कोणत्या प्रकारानें कोठें पसरली आहे, याचा थोडासा विचार करूं.

आर्यबीज व आर्यमिश्रण.

येथील **हिंदूं**च्या वस्तींत कांहीं शुद्ध व कांहीं मिश्रित असा प्रकार आहे. म्हणजे कांहींत केवळ **आर्यबीज**च असून, कांहींत **आर्यां**चा इतर कुटुंबांशीं शरीरसंबंध झाल्यामुळें, **आर्यमिश्रण** आहे. सबब, तद्विषयक प्रथमतःच इतिवृत्तान्त देणें अगदीं जरूर आहे.

---

१ 'Hinduism is the work of the Brâhman.'

हिंदुधर्म हा ब्राह्मणांपासूनच उत्पन्न झाला आहे.

( Baine's Census Report. 1891. P. 159 ).

मागें सांगितल्याप्रमाणें, आर्यांची प्रथमची वस्ती वायव्यप्रांतांतली असून, ह्या वायव्य सरहद्दीची वेदकालीन सीमा फारच विस्तृत होती. म्हणजे ह्या सरहद्दींत कूभाप्रांत ( अफगाणिस्थान ), आणि सप्तसिंधूंचा प्रांत ( पंजाब ), यांचा समावेश होई. आतां, सप्तसिंधू कोणत्या म्हणाल तर, जेलम, रावी, चीनाब, सिंधु, कुभा ( काबूलनदी ), आणि गंगा, व यमुना, ह्या नद्या होत.

वेदकालीन वायव्य सरहद्दीची मर्यादा.

ह्या प्रांतांत बराच काळ लोटल्यावर, तो अत्युच्च हिमनग आणि तन्निसृत फों फों करणारी ती विशाल सिन्धुनदी, यांच्या अलौकिक व भव्य श्रीचा आर्यांच्या हृत्पटिकेवर वारंवार संस्कार होत गेल्यामुळें, त्यांचें कुतूहल जागृत झालें; व आणखी पुढें काय आहे हें पाहण्यासाठीं, त्यांनीं आपला मोर्चा ठिकठिकाणीं फिरविला. कित्येक जणुकाय गंगायमुनेच्या पवित्र जलानेंच पुनीत होण्यासाठीं, पूर्वाभिमुख होऊन मध्यदेशांत शिरले. कित्येक हरएक प्रांत सर करून, आपला विजयध्वज फडकावीत, प्राची दिशेकडे वळले. कांहींनीं जणुकाय हिमालयाचेंच ऐश्वर्य पाहण्यासाठीं, त्या नगेन्द्राच्या

आर्यांचा पूर्वोत्तर दक्षिण दिक्‌संचार.

१ भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक २ रें, पान २१३ पहा.

उत्तुंगभागीं प्रवेश करून नेपाळांत गमन केलें. आणि कांहीं सिन्धुनदीच्या मुखांतून दक्षिणाभिमुख होऊन पाश्चिमसमुद्रांतून पश्चिम किनाऱ्यावर आले.

याप्रमाणें, आर्य कुटुंबजाल सर्वत्र पसरून, तें भरतखंडभर फैलावलें. आणि कालान्तरानें त्यांचाच इतर कुटुंबांशीं शरीरसंबंध होऊन, त्यांत बरेंच मिश्रण झालें.

उत्तरेकडील आर्य.

उत्तर हिंदुस्थानांत नेपाळाकडे विदेशीयांचें गमन झालें नसून, तो देश त्यांजकडून जिंकण्यांतही आला नाहीं. येथें ब्राह्मण बीजाचें रजपुतांशीं मिश्रण होऊन, खास नांवाची एक निराळीच जात उत्पन्न झाली आहे; व ती हिमालयाच्या खालच्या प्रांतांत, दरींत, आणि डोंगराळ प्रदेशांत राहते. ह्यांनीं बसविलेल्या भागांत हिंदुधर्माचें खरें स्वरूप दिसून येत असून, तेथें मनुकालीन सामाजिक व्यवस्था अजूनही जारीनें अमलांत असल्याविषयीं बेन्सचें मत आहे. कारण, इ० स० १८९१ सालच्या खानेसुमारीच्या आहवालांत, ते एकेठिकाणीं असें लिहितात कीं,

" It is the same in Nepal, the most orthodox tract in India, and the only one wherein the Mussalman has never set his Conquering foot. The ruling family was found by the refugee Brâhmans to be of

Rajput blood; and the Bráhmans themselves laid the foundation of the well known Khàs tribe, of mixed blood, who now constitute the predominant Community in the whole of the lower valleys In this tract, by the way, it is said that there is the only opportunity to be found in the present day of judging of Bráhmanism, where its developement has been absolutely unchecked; and something very like the Code of Manu is in force in its unmitigated bigotry." ( P. 183 84 ).

दक्षिण हिंदुस्थानांतील महाराष्ट्र देशांतले चित्तपावन ब्राह्मण तर सर्वांसच महशूर आहेत. हे पुराणतम आर्यांचेच वंशज असून, ह्यांचें कुल अद्यापिही शुद्ध आहे. इसवी सनाच्या सतराव्या आणि अटराव्या शतकांत, त्यांनीं आपल्या प्रचंड बाहुप्रतापानें अखिल भरतखंड अगदीं दणागून सोडून, पौरस्त्य व पाश्चात्यांस केवळ 'त्राहि भगवन्' केलं, आणि त्यांस तोंडांत बोटें घालावयास लाविलें.

दक्षिणेंतील आर्य.

असो. गंगानदीच्या दुआबांतही केवळ आर्य-कुटुंबांतलिच वंशज आहेत. आणि मलबार किनाऱ्यावर नंबुदिरि नामक जे ब्राह्मण आहेत, ते देखील निव्वळ

दुआब आणि मलबारांतील आर्य.

१ "Further North come the well known Konkanasth Bràhman, sometimes called Chitpáwan, who gave the Maràthas their line of Peshwà's."

( Baine's Census Report. 189 P.. 1184 ).

आर्य कुलापैकींच आहेत. परंतु हविग किंवा हैग नांवाचे जे **ब्राह्मण** आहेत त्यांत, आणि **नाईर** नांवाचे जे लोक **मलबार** किनाऱ्यावर राहतात त्यांत, थोडें बहुत **आर्य-मिश्रणच** असल्याचें दिसतें. **नाईर** हे **मलबारांतील** लढवय्ये लोक होत.

आतां, **आर्यांचें अनार्यांशीं** जें मिश्रण झालें, त्याविषयीं नूतन मत काय आहे, याबद्दलचें थोडेंसें तरी दिग्दर्शन केलें पाहिजे.

त्रिविष्टप ब्रह्मी, कुलाल, आणि द्रविड, इत्यादि अनार्य शाखा.

अनेक भाषाकोविदांचें असें मत[1] आहे कीं, **आर्य** लोक हे प्रथमचे **हिंदुस्थानांतले** नसून, ते **मध्यआशियांतील** पठारावरून वायव्य दिशेनें येथें आले. आणि म्हणूनच ते बाहेरचे व परकी समजावयाचे आहेत, असा त्यांच्या लेखांचा आशय दिसतो. तसेंच, हे **आर्य** लोक ज्या वेळीं **हिंदुस्थानांत** आले, त्या वेळीं येथें **आदिमवासिन** ( म्हणजे **आर्येतर** अशा मुळच्या राहणाऱ्या ) लोकांची वस्ती असून, ह्यांच्या तीन शाखा असल्याविषयीं त्यांची कल्पना आहे. ह्या तीन शाखा म्हटल्या ह्मणजे १ **त्रिविष्टप ब्रह्मी**, २ **कुलाल**, आणि

---

१ एतद्विषयक साधक बाधक कारणांचें विवेचन पूर्वार्धांतल्या दुसऱ्या पुस्तकांत प्रथमारंभींच केलें असून, शिवाय उत्तरार्धांतील सोळाव्या पुस्तकांतही त्या संबंधाचा साद्यन्त उहापोह करण्याचा आमचा विचार आहे. [ ग्रंथकर्ता. ]

३ द्रविड, अशा होत. आणि ह्या तिन्ही अनार्य कुटुंबांच्याच शाखा आहेत, असे विद्वान लोक समजतात.

त्रिविष्टप-ब्रह्मयांची वस्ती.

१ त्रिविष्टप-ब्रह्मी शाखेंत, तिबेट आणि ब्रह्मदेश येथील जातींचें मिश्रण असून, ती हिमालयाच्या प्रांतभागांत व भरतखंडाच्या ईशान्य दिशेला पसरलेली आहे. ही प्रागितिहास कालीं, मध्यआशियांत कोठें तरी, मंगल्ली आणि चिनी लोकांच्या पूर्वजांच्या निकटवर्ती असावी, अशी विद्वान् लोकाची कल्पना आहे. त्रिविष्टप-ब्रह्मी ही अनार्य कुटुंबाची पहिली शाखा होय.

कुळाल नामक अनार्यांची वस्ती.

२ अनार्य कुटुंबाच्या कुळालनामक दुसऱ्या शाखेची वस्ती, हिंदुस्थानचा जो त्रिकोणाकृति पठार प्रदेश आहे, त्याच्या उत्तरेस आणि ईशान्य प्रान्तभागीं आहे.

द्रविडाची वस्ती.

३ द्रविड ही अनार्य कुटुंबांची तिसरी शाखा असून, तिनें आपला प्रवेश वायव्य सरहद्दीच्या बाजूनें हिंदुस्थानांत केला असावा, आणि तेथूनच ती पंजाबांत शिरली असावी, असें आधुनिक पंडितांचें मत आहे.

---

१ माझें स्वतःचें मत याहून अगदीं भिन्न असून, त्यासंबंधीं साद्यन्त विवेचन सोळाव्या पुस्तकांत करण्याचें योजिलें आहे.
[ ग्रंथकर्ता. ]

कुलाल आणि द्रविड यांचा सामना.

याप्रमाणें, १ **त्रिविष्टप-ब्रह्मी** आणि २ **कुलाल** नामक **अनार्य** लोकांनीं **हिंदुस्थानांत** ईशान्य दिशेनें आगमन केलें असून, ३ **अनार्य द्रविड** हे या देशांत वायव्य दिशेनें आले. पुढें या दोघांचाही सामना **मध्य-हिंदुस्थानांत** झाला. तदनंतर, त्या झटापटींत **द्रविडांची** सरशी होऊन, **कुलालशाखा** पराजित झाली; आणि त्यामुळें, **द्रविड** शाखेला दक्षिणेकडे, थेट **कन्याकुमारिकेपर्यंत**, पर्यटन करण्याला ऐतीच संधि मिळाली, असें अनेक भाषाकोविद सांप्रतकाळीं मानतात. परंतु, त्याला बलवत्तर असें प्रमाण कोठेंही उपलब्ध होत नाहीं.

कुलाल अनार्यांचें वंशज.

आतां, **त्रिविष्टप ब्रह्मी** शाखा ही **कुलाल** शाखेंत सामील झाल्याचें दिसत असून, ह्या **कलाल** शाखेचे मात्र १ **संताळ**, २ **कुर्कुस**, ३ **सवर**, ४ **जुआंग**, इत्यादि वंशज आहेत.

त्यांची वस्ती.

**संताळ** लोक **भरतखंडाच्या** त्रिकोणाकृति पठार प्रदेशाच्या अगदीं पूर्व बाजूला राहतात. ह्यांच्याच पश्चिमेस सुमारें दोनशें कोसांवर एका टापूंत **कुर्कुस** नांवाचे लोक राहतात. यांची भाषा **संताळ** लोकांच्या भाषेशीं निकट साम्य पावते. **सवर** नांवाची **अनार्य** जात **मद्रास** प्रांताच्या उत्तरेस आणि **ओरिसा** परगण्यांत दृष्टिगोचर होते. हे

वनचर असून, अगदीं कंगाल आहेत; आणि लांकुडफांटा तोडून, त्यांजवरच आपला उदरनिर्वाह करितात, व दिनचर्या चालवितात. ह्याच लोकांचा **प्लिनी** आणि **टालेमी** यांनीं उल्लेख केल्याविषयींचा लेख आढळतो. **नूतन** शोधावरून तर असें कळून येतें कीं, त्यांची वस्ती थेट **मध्य-हिंदुस्थानांत** व **राजपुतान्यांत**ही पसरत गेली आहे. **जुआंग** लोक **ओरिसा** प्रांतांतील मांडलिक संस्थानांत अ ात, आणि पर्णवस्त्रें परिधान करून ते बहुतेक नग्नावस्थेतच आपले दिवस काढतात.

द्रविडांची वस्ती.

**द्रविड** लोकांची वस्ती **महाराष्ट्र** देशाच्या दक्षिणेस आहे. येथें त्यांचा मोठा भरणा असून, सुमारें २,८०,००,००० लोक **द्रविड** भाषा किंवा तिची शाखा बोलतात, असें अनुमान आहे. **स्थीर महासागरांतील** फार दूरदूरचीं कित्येक बेटें यांनींच वसविलीं असावींत, असा कांहींचा तर्क आहे. परंतु त्याला प्रमाण असल्याचें कोठेंही दिसत नाहीं.

आर्यांचें वळण, व त्यामुळें अनार्यांची सुधारणा.

**आर्यांचा** सर्व **भरतखंडभर** पगडा बसल्या कारणानें, त्यांचा धर्म, त्यांची सामाजिक संस्था, त्यांची रीतभात, आणि त्यांची सुधारणा, इत्यादींचा **अनार्यांवर** शनैः शनैः बराच संस्कार होऊन, ते हळूहळू **आर्यांत** मिसळत चालले; व त्या कारणानें **अनार्यांच्या**

रीतिभातींत आणि आचरणांतही बराच फरक पडत गेला. पुढें, ह्याचा परिणाम असा झाला कीं, त्यांच्या वृत्तींत कालान्तरानें फेरबदल होऊन, ते सुधारणेच्या पंथास लागले. त्यामुळें, त्यांचा तो अडाणीपणा व ती रानटी अवस्था नाहींशी होऊन, आर्यांच्या निकट सहवासानें

त्यांचा परस्पर शरीरसंबंध.

त्यांचें अनार्यत्वही आपोआपच लोपलें. कारण, वृत्त्यन्तरानें त्यांच्या एकंदर आचार-विचारांत पुष्कळ परिवर्तन झालें चित्तविकासानें परस्परांत पुष्कळ सांमिलन होऊं लागलें आणि त्या योगानें, कालेंकरून, एकमेकांना शरीरसंबंधही सुरू झाला.

हिंदु वर्ग.

आतां, हें जें संमिश्रण झालें, त्याचाच पुढें प्रचंड हिंदु वर्ग बनला. सबब, हिंदु आणि हिंदुव्यतिरिक्त इतर जातीचे लोक, हे कसकसे विभागले गेले आहेत, याचा आपण विचार करूं.

त्यांचा विभाग.

**काश्मीर, पंजाब, सिंध, बंगाल, आसाम,** आणि **ब्रह्मदेश,** हे प्रांत खेरीज करून इतर ठिकाणीं, सर्व **हिंदुस्थानभर, हिंदूंचें** प्रमाण इतर जातींच्या वस्तीच्या मानानें पाउणपटीनें जास्त आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

वायव्य वगैरे प्रांतांत.

**काश्मीर, सिंध,** व **बंगाल,** या ठिकाणीं, आणि वायव्य **प्रांतांतील रामपूर** संस्थानांत,

हिंदु लोकांच्या वस्तीचें मान जरासें कमी असून, येथें **मुसलमान** लोकांची वस्ती इतर ठिकाणापेक्षां जास्त आहे.

पंजाबांत व असामांत.

**पंजाबांत** जे हिंदु लोक आहेत, ते **शाख** पंथांतले असून, **आसामांतील** लोक यक्षपिशाचपूजक, म्हणजे भुतांखेतांस भजणारे आहेत.

ब्रह्म देशांत.

वरच्या **ब्रह्म देशांत**, बहुतेक सर्वच **बौद्धधर्मानुयायी** आहेत. तथापि, खालच्या **ब्रम्हदेशांत**, **हिंदु** लोकांची थोडीशी तरी वस्ती आहे. मात्र, ती शेंकडा पंधरा असून, तात **बंगाल** आणि **मद्रास** प्रांतांतून जे मजुरदार किंवा देशान्तराधिवासी तिकडे जातात, त्यांचा विशेष भरणा असतो.

दक्षिण-हिंदुस्थानांत, मध्य-हिंदुस्थानांत, व उत्तर-हिंदुस्थानांत.

**दक्षिण-हिंदुस्थानांत म्हैसूर, कूर्ग, मद्रास**, आणि **हैदराबाद**, या प्रांतांत **हिंदूंची** वस्ती फारच मोठी असून, **मुंबई** इलाख्यांत ही तशीच आहे, असें म्हणण्यास हरकत नाही. **मध्य-हिंदुस्थानांत वऱ्हाड** वगैरे प्रांतांत, व **उत्तर-हिंदुस्थानांत, राजस्थान, अयोध्या**, आणि **वायव्येकडील** प्रांत, इत्यादि ठिकाणीं इतर जातींच्या मानानें **हिंदूंची** वस्ती पुष्कळ आहे. म्हणजे ती शेंकडा ऐंशी आहे, असें म्हटलें तरी चालेल.

उत्तर-हिंदुस्थानांतील काश्मीर संस्थानांत मुसलमान लोकांची वस्ती शेंकडा ऱ्याहत्तर असून, हिंदूंची वस्ती शेंकडा सत्तावीस आहे; आणि त्या सर्वांवर, हिंदु अधिपतीचेंच प्रभुत्व आहे.

दक्षिण-हिंदुस्थानांत ह्याच्या उलट मासला दिसून येतो; व ह्याचें प्रत्यक्ष उदाहरण हैदराबादेस ठळक रीतीनें दृष्टिगोचर होतें. येथें मुसलमान लोकांची वस्ती शेंकडा दहापेक्षांही कमी असून, हिंदूंची वस्ती शेंकडा नव्वदपेक्षां देखील जास्त प्रमाणानें आहे. तथापि, त्या सर्वांवर मुसलमानी मांडलिकाचीच सत्ता आहे.

शीख.

आतां, एकंदर हिंदूंची वस्ती शेंकडा पाऊणशें असून, त्यांतच शीख आणि जैन लोकांचा समावेश होत असल्याविषयीं मागेंच सांगितलें आहे. शीख[१] लोकांचा विशेष भरणा पंजाबांतच आहे; व तेथील एकंदर वस्तीपैकीं त्यांची संख्या शेंकडा अठ्याण्णव असल्याचें समजतें. हे लोक मोठे लढवय्ये आहेत.

---

१ "A true Sikh is generally called a Hindu in Common parlance.

[ Baine's Census Report. 1891. P. 164 ].

जो खरा शीख आहे, त्याला सामान्यतः हिंदुच म्हणण्याची चा प्रचार आहे.

जैन[१] लोकांची वस्ती मधून मधून बहुतेक सर्वत्र आहे. उत्तर-हिंदुस्थानांत राजपुताना, आजमीर, यमुनेच्या कांठचा प्रदेश, दिल्ली, बहार, आणि आसाम, इत्यादि ठिकाणीं त्यांची वस्ती असून, येथें त्यांची संख्या शेंकडा पांचप्रमाणें आहे. मध्य-हिंदुस्थानांतही त्यांची वस्ती थोडीच असल्याचें दिसतें. दक्षिण बहारांत, पारसनाथ म्हणून जें त्यांचें पवित्र स्थान आहे, तेथें त्यांची संख्या १४८७ आहे. दक्षिण हिंदुस्थानांत मुंबई, मद्रास, आणि म्हैसूर प्रांतांतही त्यांची वस्ती आहे. म्हैसुरांत त्यांची संख्या १३,३०० आहे; मद्रासेंत २७,४०० आहे; आणि

जैन.

१ जैन लोक आपल्यास केवळ हिंदुच समजतात, यांत तिळमात्र देखील शंका नाहीं. इतकेंच नव्हें तर, ते हिंदु कळपाबाहेर राहण्यास सुद्धा अगदीं नाखुष आहेत, असें बेन्सच्या रिपोर्टावरूनच सिद्ध होतें. कारण, त्यांत असें लिहिलें आहे कीं,

" From evidence indirectly offered by applications made from the neighbouring tract just before the Census, it seems highly probable in this part of the Country, instead of desiring to emphasise the distinction of their religion from Bráhmanism, as was the case at Delhi, &c, the Jains are anxious to efface it, as their social position is evidently based on Caste orthodoxy within the Bráhmanic fold If tendency be true, it will account for disappearance of the Jains into the general sea of Hinduism. "

[ Baine's Census Report. 1891 P. 176 ].

**कर्नाटकांत** ४६,००० आहे. परंतु **गुजराथ** प्रांतांत **अमदाबाद, काठेवाड, पालिताणा, गिरनार,** इत्यादि ठिकाणीं त्यांची वस्ती मोठी आहे. हे लोक शेतकी आणि व्यापार करितात. तथापि, व्यापारधंद्यांत ते जास्त निष्णात आहेत.

**मुसलमानांची वस्ती.**

**उत्तर-हिंदुस्थानाच्या** सरहद्दीवर जी **मुसलमान** लोकांची वस्ती आहे, ती खेरीज करून, बाकी राहिलेली **हिंदुस्थानांतील** सर्व **मुसलमान** प्रजा मुळची हिंदुच होय. परंतु, **इस्लाम** धर्माचा त्यांजवर जुलूम होऊन, तें वाटल्या कारणानें त्यांचें धर्मान्तर झालें, व ते **परधर्मा**नुयायी बनले.

**सिंध प्रांतांत.**

**सिन्ध** देशांत **मुसलमान** लोकांची शेंकडा सत्याहत्तर प्रमाणानें वस्ती आहे. तथापि, कांहीं कालामागें येथें हिंदूंचाच अम्मल होता. पूर्वेकडील प्रातांत, म्हणजे **बंगाल** व **असा-मां**तही, **मुसलमान** लोकांची बरीच वस्ती आहे.

**मध्यहिंदुस्थानांत.**

**मध्यहिंदुस्थानांत मुसलमान** लोकांची वस्ती बरीच कमी दिसते. मात्र, **भोपाळ** संस्थानांतच कायती **मुसलमानांची** म्हणण्यासारखी जास्त वस्ती आहे.

स्थूलमानानें पाहिलें तर, **मुसलमान** लोकांच्या एकंदर संख्यच्या प्रमाणानें त्यांचा भरणा **उत्तर-हिंदुस्थानांत**च जास्त आहे, असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. आतां, **उत्तर-हिंदुस्थानांत** कित्येक ठिकाणीं हिंदु आणि **मुसलमान** लोकांची वस्ती सारखीच असल्याचें जरी दर्शनीं भासमान होतें, तरी **मुसलमान** लोकांची इतर ठिकाणीं जी वस्ती आहे, त्या मानानें त्यांच्या संख्येचें प्रमाण येथें जास्त आहे.

उत्तर हिंदुस्थानांत.

**दक्षिण हिंदुस्थानांत, मुसलमानांचा** भरणा इतर ठिकाणांच्या मानानें बराच कमी आहे, असें म्हटलें तरी चालेल. आणि **खंबायत, जुनागड, राधनपूर, सचिन, जंजीरा, हैदराबाद** (दक्षिण), इत्यादि मांडलिक संस्थानांत जरी इस्लामप्रभुत्व आहे, तरी देखील, तेथें हिंदूंची संख्या एकंदरीनें पुष्कळ आहे.

दक्षिण हिंदुस्थानांत.

**पारशी** लोकांची वस्ती मुख्यत्वेंकरून **मुंबई** इलाख्याच्या पश्चिम भागाला आहे. **भडोंच सुरत,** व **नवसारी,** वगैरे परगण्यांत त्यांची वस्ती शेंकडा ३० ४ असून, **उदवाड्यास** तर त्यांच्या धर्माचें अतिपवित्र स्थान आहे. हल्लीं **मुंबई** शहरांत त्यांची वस्ती बरीच वाढत चालली आहे; आणि ती शेंकडा ९२.८ जवळजवळही येईल, असें वाटतें. तथापि, दिवसानुदिवस हे

पारशी लोकांची वस्ती.

लोक चोहोंकडेसच पसरत चालल्यामुळें, **कराची, एडन, दक्षिणहैदराबाद, केटा, पुणें**, इत्यादि ठिकाणीं त्यांची वस्ती आहे. ते व्यापारांत दक्ष असल्यामुळें, आणि खानपानादि व्यवहारांत त्यांजला कोणतीही अडचण किंवा हरकत येत नसल्याकारणानें, ते फारच दूर दूर जातात; व **ब्रह्मदेश, चीन**, आणि **इंग्लंड**, इत्यादि देशांत राहून, आपापल्या इच्छेप्रमाणें पाहिजेल ते धंदे चालवितात.

ज्यूची वस्ती.

इकडे जे **ज्यू** लोक आहेत, त्यांत दोन भेद आहेत; १ अस्सल **ज्यू**, आणि २ मिश्रित **ज्यू**. हे लोक प्रथमतः '**आरबस्थानां**तून व **इराणां**तून आले; आणि त्यांनी पश्चिम किनाऱ्यावर आपली वस्ती केली. **एडनास** देखील हल्लीं त्यांची २,८२६ पर्यंत संख्या आहे. अस्सल ज्यू हे गौरवर्ण असून, ते मिश्रित ज्यू लोकांस ह्मणजे **बेनिइस्रायलांस** जरा कमी दर्जाचे समजतात; कारण, हे जरा श्यामवर्णाचे असतात. यांची वस्ती **मुंबई, पुणें, कलकत्ता**, इत्यादि ठिकाणीं आहे. हे बहुतकरून व्यापार धंदा करितात. परंतु कित्येकांस नोकरीशिवाय दुसरें गत्यन्तरच नाहीं; आणि त्यामुळें ते लष्करी खात्यांत व पलटणींतही शिरले आहेत

किरिस्तावांची वस्ती.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, **भरतखंडांत ख्रिस्ती** लोकांची संख्या २२,८४,३८० असून, त्यांत २०,३६,६०० बाटलेले आहेत. ह्यापैकीं **वायव्य** प्रांतांत

२३,४०० आहेत; **पंजाबांत** १९,६००; **बंगाल्यांत** १,९२,९००; **मुंबई** व **सिंध** मिळून १,२२,६००; **मद्रास** आणि **मलबार** मिळून १९,२८,८००; व **हैदराबाद**, **म्हैसूर**, आणि **कूर्ग** मिळून ४३,४०० आहेत.

यूरोपस्थांची वस्ती.

याशिवाय **यूरोपस्थ** लोकांची वस्ती, **आंग्लप्रभुत्व** असल्याकारणानें, सुमारें १,१९,८७४ होईल; व हे सर्व **ख्रिस्तीधर्मानुयायीच** आहेत. यांपैकीं फौजेनिमित्त ८९,१०० लोकांची वस्ती असून, त्यांत ६७,८०० शिपाई; २,९५० अम्मलदार; ३,१२० बायका; ९,९०० मुलें; आणि ८०० इतर मनुष्यें आहेत. ह्याखेरीज, एतद्देशीय फौजेवरील अम्मलदार, व त्यांच्या बायका आणि मुलें, मिळून ४,८३० ची वस्ती आहे.

फौजेशिवाय मुलकी व इतर कामगारांची वस्ती सुमारें ३४,८७४ असून, ती खालीं लिहिल्याप्रमाणें विभागली आहे:—

| | |
|---|---|
| मुंबई .... .... .... .... | ११,४९८ |
| कलकत्ता... .... .... .... | ११,९१४ |
| मद्रास .... .... .... .... | ४,२०० |
| रंगून .... .... .... .... | ४,१२० |
| कराची ... .... .... .... | ३,१८२ |
| एकूण | ३४,८७४ |

सदरहू वरून, वाचकांच्या लक्षांत इतकें सहजीं येईल कीं, **हिंदुस्थानां**तील एकंदर लोकसंख्येपैकीं, शेंकडा ८९.१ एतद्देशीय आहेत; शेंकडा ७.४ **युरोपस्थ** असून, त्यांत थोडेसे **अमेरिका** आणि **आस्ट्रेलेशिया** येथील राहणारे आहेत; व बाकीचे शेंकडा ३.९ मिश्र जातीचे आहेत; आणि ह्यांसच **युरेशिअन्स** म्हणतात.

# भाग ४९ वा.

## भिन्नाभिन्न जातींतील श्रमविभाग

आणि

## जीवनसाधन.

भरतखंडांतील समाजस्थितीशीं व भूमिवैपुल्याशीं, श्रमविभागाचा आणि जीवनसाधनाचा संबंध.

भरतखंडांतील भिन्न भिन्न जातींच्या श्रमविभागाचा व जीवन साधनांचा विचार करतांना, आपल्याला मुख्यत्वेंकरून या विस्तीर्ण देशांतील एकंदर समाजस्थिति व भूमीची विपुलता, या दोन गोष्टींचा प्रथमतः विचार केला पाहिजे. आणि एकदां आपण त्यांजवर सूक्ष्म दृष्टीनें नजर फेंकिली, ह्मणजे आपल्या लक्षांत असें तावडतोब येऊन चुकेल कीं, येथील बहुतेक प्रजा कृषिकर्मजीवी आहे; म्हणजे, ती शेतीभाती करून आपला उदरनिर्वहा चालविते, व जमीन नांगरून आपला गुजारा करिते.

भरतखंडांत हिंदुसमाजस्थितीचें प्राबल्य

हा देश आमचाच असल्या कारणानें, त्यांत आह्मां हिंदूंची मोठीच वस्ती आहे; आणि त्याच कारणानें हिंदुसमाजस्थिति अगदीं प्रबळ आहे, हें जास्त सांगा-

वयास नको. ह्या समाजाची मुख्य निशाणी ह्मटली म्ह जे **वर्णसंस्थाच** असून, तींत **ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य** आणि **शूद्र**, असे चार वर्ग केलेले आहेत.

ह्या समाजसंस्थेचा जन्मकाळ.

ही समाजव्यवस्था, किंवा विशेष उक्त ह्मटलें ह्मणजे **वर्णसंस्था**, वेदकालीं देखील प्रचारांत होती, असें दिसतें. कारण, तद्विषयक प्रमाण वेदांतील अनेक ऋचांत[१] दिसून येतें, आणि **पुरुषसूक्तांत** तर त्याबद्दलचा प्रत्यक्षच उल्लेख असल्याचें आढळतें.

**ब्राम्हणोस्य मुखमासीद्‌ बाहू राजन्यः कृतः ।**

**ऊरू तदस्य यद्वैयः पद्भ्यां शूद्रोऽअजायत ॥**

( ऋ. अ. ८ मं. १० अ. ७. )

ऋग्वेदांतील पुराणतम ऋचांत तिचा उल्लेख.

आतां, कोणी कदाचित् अशी उत्प्रेक्षा घेईल ( व तशी पाश्चात्य पंडितांकडून हरहमेश घेण्यांतही येते ) कीं, सदरहू ऋचा दहाव्या मंडळांतील असल्या कारणानें, ती प्राचीनतम नाहीं; आणि अतएव तद्बोधित **वर्णसंस्था** देखील पुराणतम नाहीं. परंतु ह्या उत्प्रेक्षेचें

१ ऋग्वेद. १. ११३. ५. ६.
ऋ. अ १. अ ७. व २७. मं १. अ १६. सू १०८.
ऋ. अ १. अ ६. व १६. मं १. अ १४. सू ८९.

निरर्थकत्व पहिल्या मंडळांतील ऋचांवरून सुद्धां सहजीं लक्षांत येण्यासारखें आहे. कारण, पहिलें मंडळ दहाव्या मंडळाच्या पुष्कळ अगोदरचें आहे, व ह्या पहिल्याच मंडळाच्या एका ऋचेंत ( **यद् ब्राह्मिण राजनिवा यजत्रे** ) असें म्हटलें असून, तींत ब्राह्मण क्षत्रियांचा उल्लेख केला आहे. ह्या ऋचेंत, **इन्द्र** व **अग्नि** देवतांस अनुलक्षून त्यांची अशी प्रार्थना केली आहे कीं, " तुम्ही आपल्या घरीं आनंद करीत असला, अथवा ब्राह्मणांच्या किंवा राजांच्या कडे आनंदांत असला, तथापि तिकडून येऊन, हा सिद्ध झालेला सोमरस प्या. " [1]

दुसऱ्या एका ऋचेंत [2] ( **अदितिः पंचजना अदितिर्जातमदितिर्जनत्वम्** ) असें म्हटलें आहे; आणि अदिती हेच **पंचजन**, व तेच सर्व उत्पन्न झालेले किंवा यापुढें उत्पन्न होणारे पदार्थ आहेत, असा ह्या ऋचेचा भावार्थ आहे. आतां, हे **पंचजन** म्हणजे कोण, अशी शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे. परंतु, अन्वय आणि अर्थसंदर्भ यांस अनुसरून, ह्या शब्दांनीं **वर्णसंस्थेचेंच** दिग्दर्शन होतें, असा विद्वान् [3] लोकांचा अभिप्राय आहे.

तिसऱ्या एके ठिकाणीं **उषस्** देवतेच्या प्रभावाचें वर्णन

---

१ ऋ. अ. १. अ. ७. व. २७. मं. १. अ. १६. सू. १०८.

२ ऋ. अ. १. अ ६. व १६. मं १. अ १४. सू. ८९.

३ वेदार्थयत्न. पु २. अं ७. पान ४०८.

केलें आहे. ह्यांतील भावार्थ असा आहे कीं, ही देवता प्राणिमात्रास जागृत करिते; कांहींकडून दूरदर्शित्वानें सर्वांवर नजर ठेववितें; कांहींस राज्यकारभाराचें काम करावयास लाविते; कांहींकडून ऐषआराम भोगविते; कित्येकांस द्रव्यार्जनासाठीं इतस्ततः हिंडविते; कित्येकांकडून कीर्तिप्राप्त्यर्थ हरएक प्रयत्न करविते; आणि कांहीं जवळून सेवाधर्म बजाविते. याप्रमाणें, प्रत्येक प्राणिमात्राला पृथक् पृथक् मार्ग लावून दिल्याअन्वयें, ज्यानें त्यानें आपापलें काम करावें एतदर्थ, उषस् देवता उद्युक्त असते, आणि ती सर्वांवर नजर ठेविते.

आतां, ह्या ऋचेंत **ब्राह्मण**, **क्षत्रिय**, **वैश्य**, आणि **शूद्र**, यांचा स्पष्टच उल्लेख केलेला असल्याचें दिसतें. आणि ही ऋचाही प्रथमच्याच मंडळांत असल्या कारणानें, तिच्या प्राचीनत्वाविषयीं देखील कांहीं एक शंकाच राहत नाहीं.

आमच्या वर्णसंस्थेच्या पुरातनत्वाविषयीं पाश्चात्यांचें मत.

**लड्विग** वगैरे पाश्चात्य पंडितांचें देखील असेंच मत असल्याचें दिसतें. कारण, **वेदकालीन भरतखंड** नामक पुस्तकांत **झीनेड. ए. रागोझिन्** यानें असें लिहिलें आहे कीं,

१ ऋ. १. ११३. ४.

२ ऋ. १. अ. ११३. ५. ६.

"Ludwig suggests that there is a hint at caste— or at least the incipient conception of caste— in the hymn to Ushas ( Rig Veda 1136 ), where it is said that the goddess "arousing one to *wield the royal power*, another to follow *after fame*, another to the *pursuit of wealth*, another to *perform services*, awakes all creatures to go their *different paths in life.*"

( Vedic India. By Zenaide. A. Ragozin. P. 281 ).

ह्यावरून, हिंदूंची वर्णसंस्था अगदीं अनादि आहे, असें कोणालाही वाटल्यावांचून राहणार नाहीं. किंबहुना, हिंदुराष्ट्राच्या जन्मापासूनच तिचा उदय असून, ती हिंदुसमाजांत जणुकाय प्रत्यक्ष खिळली जाऊन, केवळ अद्वैत भावानेंच जीव धरून राहिली आहे, असें सुद्धां ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

हिंदुराष्ट्र आणि हिंदूंची वर्णसंस्था, यांचा एक जीव.

असो. वेदकालीन वर्णसंस्था, आणि सांप्रतचा वर्णाश्रमधर्म, ह्यांत बरेंच अवस्थान्तर झालेलें असल्याचें दिसतें. कारण, वेदकालांत प्रत्येक व्यक्तीचें ज्ञान, त्याचें तपोबल, त्याचें शिक्षण, त्याचें कर्म, आणि त्याचें आचरण, इत्यादि गोष्टींस अनुलक्षून,

वेदकालीन व सांप्रतच्या स्थितींत, वर्णाश्रमधर्मांचें अवस्थान्तर.

जो ज्या योग्यतेचा असे, त्या मानानें तो ज्या त्या वर्गांत शिरे. ह्मणजे, तो तपोनिधि व ब्रम्हज्ञानी असल्यास त्याची गणना ब्राम्हणांत होई. शूर आणि पराक्रमी दिसल्यास, तो क्षत्रियांत मोडे. वाणिज्यांत किंवा व्यापार धंद्यांत त्याची प्रवीणता वाटल्यास, त्याला वैश्य समजत. आणि सेवाधर्मांतच तो कुशल भासल्यास, त्याला शूद्र म्हणत.

प्राचीन काळचा परस्परांतला रोटी आणि बेटी व्यवहार, व

ह्याला विशेष बलवत्तर प्रमाण म्हटलें म्हणजे, पूर्वीच्या काळीं आपापसांत होत असलेला रोटी आणि बेटी व्यवहार होय. वेद-कालीं, पहिल्या तीन वर्णांतले लोक आपापल्या पराक्रमानुरूप व स्थित्यनुसार वरच्या वर्णांत जाऊं शकत. उदाहरणार्थ, विश्वामित्र हा मुळचा क्षत्रिय असतांही तो पुढें केवळ आपल्या तपोबलानेंच ब्राह्मण झाला. वसिष्ठ हा वेश्येचाच पुत्र होता. पण तो देखील स्वतःच्या पुण्याचरणानें ब्रह्मर्षि बनला. सत्यवती ही पराशराची बायको होती. परंतु ती एका मच्छी मारूचीच मुलगी असल्याचें समजतें. रेणुका ही राजकन्याच होती. तरी पण ती ब्राम्हण कुळांत पडून, जमदग्नीची बायको झाली. लोपामुद्रेची देखील अशीच हकीकत आहे. कारण, ती क्षत्रिय कुलांतील असून, अगस्ति नामक ब्राह्मण ऋषीनेंच तिचें पाणिग्रहण केलें होतें. ययाति हा क्षत्रियच होता; तथापि त्याची स्त्री ब्राम्हण

कन्या होती. **पारस्कर गृह्यसूत्रांत, ब्राम्हणांस** पहिल्या तिन्ही वर्णांतलि मुलांबरोबर लग्न करण्याविषयींची सूट दिली असल्याचें दिसतें. त्याचप्रमाणें, **क्षत्रियांस** देखील पहिल्या दोन वर्णांतील मुलांबरोबर, आणि **वैशांस** तत्साम्य वर्णांबरोबर लग्न करण्याची परवानगी असल्याचें आढळतें.

ह्यावरून प्राचीन काळीं, परस्परांत रोटी आणि बेटी व्यवहार हा अगदीं ज्यारीनें सुरू होता, असें म्हणण्यास कांहींएक प्रत्यवाय दिसत नाहीं. मात्र इतकेंच कीं, ज्या वर्णांतला पिता, त्याच वर्णांतली त्याची संतती समजून, ती त्यांत मोडे.

अनार्यांचा आर्य-कुटुंबांत प्रवेश.

कित्येक बाबतींत तर, ह्याच्याही पलीकडे मजल गेलेली असल्याचें दिसतें. कारण, त्यावेळीं, **अनार्य** लोकांस देखील **व्रात्यस्तोम** करून **आर्य**वर्गांत शिरतां येई. इतकेंच नव्हें तर, एकदां का त्यांनीं सदरहू **व्रात्यस्तोम** केला, म्हणजे ते **त्रैवर्णिकां**बरोबर सर्व प्रकारचा व्यवहार करीत. आणि त्याच कारणानें, त्यांजपासून जाहीरपणें दक्षिणा घेण्यास **ब्राह्मणांस** सुद्धां काडीमात्रही प्रत्यवाय वाटत नसे.

संस्कारानुरूप उच्च-पद प्राप्ति.

**वेद**कालीं, **ब्रह्ममंत्र** म्हणणारास **ब्राम्हण** म्हणत. कारण, "ब्रम्ह" शब्द हा, बृह किंवा (बृहि विस्तारे) या धातूपासून झाला

असून, तो ब्रम्हमंत्र ह्मणणारे तेच ब्राम्हण होत, अशी त्या वेळची समजूत असल्याचें दिसतें.

**जन्मना जायते शूद्रः संस्कारैर्द्विज उच्यते ।**
**कर्मणा याति विप्रत्वम् ब्रह्म जानाति ब्राह्मणः ॥**

ह्या श्लोकावरून तरी इतकें निःसंशय ध्वनित होतें कीं, लहान पाहिरीपासून मोठ्या पाहिरीपर्यंत जाण्याला संस्कार आणि कर्म करणें अत्यवश्यक असून, त्यापासूनच महत् पदाची प्राप्ती होणारी आहे. इतकेंच नव्हें तर, तशी पूर्वीं होत होती, हें देखील आपणां सर्वांस कबूल केलें पाहिजे.

त्यांत कालान्तरानें झालेला फरक.

परंतु, आमच्या समाजाच्या अशा प्रकारच्या स्थितींत कालान्तरानें बराच फरक होत गेला; आणि शनैः शनैः अवस्थान्तर होऊं लागल्यानें, एकंदर विचारतरंग सुद्धां हळूं हळूं बदलत चालला. कारण, भिन्नभिन्न कुटुंबांतील नानाप्रकारच्या व्यक्तींचे पारंपर्य दिवसानुदिवस अगदीं दृढ होत गेलें; व आनुवंशिक तत्वाचें प्राबल्य जास्त भासमान झाल्यानें, आणि त्याचें महत्व समजूं लागल्यानें, तें आपोआपच वृद्धीप्रत पावलें. त्यामुळें, धर्मबंधन बलवत्तर राहून, आर्यांची अजरामर अशी असलेली पुराणतम **वर्णसंस्था, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य,** आणि **शूद्र,** या वर्गचतुष्टयानें मुद्रित होऊन, अखेर वज्रलेपच बनली.

पुढें, मनुस्मृति कालांत तर, याहीपेक्षां जास्त मजल येऊन ठेपली असल्याचें दिसतें. कारण, त्या वेळीं, प्रत्येक वर्णाच्या इतिकर्तव्यतेची दिशा लावून देण्याचें काम तत्कालीन **स्मृतिकारांनीं** हातीं घेऊन, तें तडीसही नेल्याचें **मनुस्मृती**[1]वरून चांगलें लक्षांत येतें.

वर्णसंस्था निर्माण करण्याचा हेतु.

आतां, ही एवढी जी प्रचंड **वर्णसंस्था** आमच्या **आर्य**-पूर्वजांनीं उत्पन्न केली, ती करण्यांत त्यांचा हेतु तरी कोणता असावा बरें? ती त्यांनीं केवळ आपमतलबानेंच केली होती काय? किंवा, ह्या जगांत फक्त आपलीच थोरवी मिरविण्याच्या उद्देशानेंच, ती त्यांनीं अमलांत आणिली होती? अगर आपलें नांव चिरकाल राहवें, यासाठींच हा त्यांचा आपलपोटेपणाचाच प्रयत्न होता? अथवा, " **परोपकाराय सतां विभूतयः** " या महावाक्याची जणुकाय सार्थकता करण्यास्तव, आणि एकंदर समाजाचें कल्याण व्हावें एतदर्थच, ह्या वर्णसंस्थेची त्यांनीं उभारणी केली होती?

खरोखर, हे प्रश्न अति महत्वाचे असून, त्यांचें उत्तर, **महाराष्ट्र** कविवर्य आणि साधुश्रेष्ठाच्या मुखकमलांतून प्रस्रवलेल्या वचनामृत मकरन्दानेंच दिल्याशिवाय गत्यन्तर नाहीं. आणि त्यामुळेंच, " **जगाच्या कल्याणा संता**-

---

१ मनुस्मृति, अध्याय १ श्लोक ८८।८९।९०।९१.

च्या विभूती," ही जी त्याची मधुर व प्रेमळ उक्ति —आहे, ती रसिक वाचकांपुढें सादर करणें अगदीं भाग पडतें.

श्रमविभाग.

असो. ह्या **वर्णसंस्थे**चा मुख्य हेतु ह्मटला म्हणजे **श्रमविभाग** होय. आणि हा निःसंशय विशेष महत्वाचा असल्यामुळें, प्रायः प्रत्येक राष्ट्राच्या उन्नतीस हाच कारणीभूत होतो, असेंही लिहिण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. कारण, श्रमविभाग झाल्यानें, कोणाचेही श्रम अथवा उत्साहशक्ति काडीमात्र देखील वाया जात नाहीं. इतकेंच नाहीं तर, ती निर्विवाद सार्थकीं लागते. कारण, डोईजड ओझें, किंवा शक्ति बाहेरचा बोजा उचलण्याचें प्रयोजन, कोणास देखील पडत नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. सबब, ह्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे, आमच्या **वर्णसंस्थे**पासून फारच मोठा कार्यभाग झाला आहे, असें म्हणण्यास कांहीं एक अडचण नाहीं.

मूळ हेतूचा विपर्यास, व त्यामुळें ओढवलेला अनिष्ट परिणाम.

आतां, **श्रमविभाग** हाच **वर्णसंस्थे**चा मूळ उद्देश असूनही, तो कालान्तरानें व चुकीच्या समजुतीनें अगदीं बाजूला राहून, त्या योगानें अनन्त जाती मात्र वाढल्या. आणि त्यामुळें, सदरहू संस्थेचा इष्ट हेतु मनांत योजल्याप्रमाणें सर्व प्रकारें सिद्धीस न जातां, फक्त दुष्ट परिणामच अंशतः उदयास आले. कारण, दिवसानुदिवस जातिभेदाचें बंड वाढत गेल्यानें,

जातिमत्सर साहजीकच वृद्धिंगत झाला. त्यामुळें अर्थात्च एकी मोडली, व तेणेंकरून एकमेकांचा विश्वासही अजिबात कमी होत गेला. कालवशात्, तदंगभूत जो कलि, त्यानें सुद्धां आपलें अति दारुण स्वरूप प्रकट करून, जणुकाय कलहान्धकारानेंच दाही दिशा अगदीं व्यापून टाकिल्या, आणि इतस्ततः सर्वत्रच दुई माजविली.

स्वातंत्र्यापहरण, व तदुद्भूत यमयातना.

ह्या अखिल अनिष्ट बीजांकुरांचें अचुक फल कोणतें म्हणाल तर **स्वातंत्र्यापहरण**, आणि तदुद्भूत अशी ह्या **दयित आर्यभूमीमातेची** व तिच्या **भारतीय प्रिय** पुत्रांची दुःसह ताडातोड होय. त्यामुळेंच आमची शोचनीय **दीनावस्था**; त्यायोगानेंच आमचा अज्ञातवास, आणि त्या कारणानेंच आमची सांप्रतची **यमयातना**! अथवा, फार दूर जावयासच नलगे. थोडक्यांत तात्पर्यार्थ इतकाच कीं, जो कोणी हतभाग्यप्राणी **स्वातंत्र्यास** म्हणून आंचवला असेल, त्याला सुख तें कशाचें, व कोठून असणार? त्याचा हा प्राणवायूच नाहींसा झाल्यावर, त्याच्या शरीरांत हालचाल ती कसलीं राहणार? उघडच आहे कीं, त्याला जगत्त्रय शून्यवत् भासून, ह्या त्रैलोक्यांतील यच्चावत् कारभार देखील केवळ निर्माल्यासारखे वाटतील, यांत कांहींच नवल नाहीं.

अस्तु. सांप्रतकाळीं आम्हाला तद्विषयक परिणाम

कसाही दृष्टिगोचर होवो, तथापि, त्याबद्दलचा तिळमात्रही दोष आमच्या परमपूज्य आर्यपूर्वजांस बिलकुल देतां येत नाहीं. कारण, कार्यकारणभावाचा जर आपण योग्य विचार केला तर, आपणांस असें दिसून येईल कीं, उत्तम कार्यासाठींच त्यांनीं उत्कृष्ट कारणाची योजना केली; व **आर्यराष्ट्रोन्नत्यर्थच** त्यांनीं **वर्णसंस्था** अमलांत आणिली; आणि तसें करून, **श्रमविभागाचा** अपूर्व मासला अखिल जगापुढें मांडून दाखविला.

तद्विषयक आमच्या पूर्वजांची निर्दोषता.

ह्यावरून ही **वर्णसंस्था** आपल्या पोळीवरच तूप ओढून घेण्यासाठीं **ब्राह्मणांनीं** बिलकुल केली नाहीं, हें आतां निःसंशयपणें सिद्ध आहे.

खरोखर, लोकहिताच्या संबंधानें आम्ही आपला जो स्वार्थत्याग आणि आत्मविनियोग दाखविला आहे, तो केवळ अवर्णनीय असल्या कारणानें, त्याचा स्तुतिपाठ आम्ही करावा, यांत तर कांहींच नवल नाहीं. परंतु, त्याचे पोंवाडे आमच्या **पाश्चात्य** बंधूंनीं देखील वारंवार गाइले आहेत.

लोककल्याणासाठीं त्यांची आसक्ति.

सुप्रसिद्ध इतिहासकार डाक्तर **हंटर** हे एकेठिकाणीं असें लिहितात कीं,

त्यांच्या स्वार्थत्यागाचे प्राचीन काळचें उदाहरण.

" But the whole body of Sanskrit literature bears witness to the fact that this ( Bràhman ) ideal life was constantly before their ( Bràh-

mans') eyes, and that it served to the whole caste as a high standard in its two really essential features of *self-culture* and *self-restraint.*" * * *

( Indian Empire. P. 95. 2nd Edition ).

"The Brahman Caste, having established its power, made a wise use of it. From the ancient Vedic times, its leaders recognised that if they were to exercise spiritual supremacy, they must renounce earthly pomp. In arrogating the priestly function, they gave up all claim to the royal office. They were divinely appointed to be the guides of nations and the Counsellors of kings, but they could not be kings themselves." * * *

( Indian Empire. P. 94. 2nd Edition ).

"The Brāhmans, therefore, were a body of men who, in an early stage of this world's history, *bound themselves* by a rule of life the essential precepts of which were *self culture* and *self restraint.*" * * *

"He ( the Brahman ) is an example of a class becoming the ruling power in a country, *not by force of arms,* but by the *vigour* of *hereditary culture* and *temperance.* One race has swept across India after another, dynasties have risen and fallen, religions have spread

themselves over the land and disappeared. But since the dawn of history, the Brâhman has *calmly ruled; swaying the minds* and *recieving the homage* of the people, and accepted by foreign nations as the *highest type* of Indian mankind."

"The paramount position which the Bràhmans won, resulted, in no small measure, from the *benefits* which *they* bestowed. For their own Aryan Country-men, they developed. a noble language and literature. The Bráhmans were not only the priests and philosophers. They were also the law-givers, the statesmen, the administrators, the men of Science, and the poets of their race."

(Dr. Hunter's Indian Empire.
P. P. 96/97. Second Edition).

त्यांच्या स्वदेशभक्तींचें सांप्रत काळचें उदाहरण.

आतां, प्रसंगविशेषीं कोणी कदाचित् असा प्रश्न करील कीं, अहो, ब्राह्मणांच्या ह्या स्वार्थत्यागाविषयींच्या ज्या तुम्ही गोष्टी सांगतां, त्या वेदकालीन कथा, किंवा स्मृतिकालीन वृत्तान्त, अथवा पौराणिक काळच्या आख्यायिका असून, हल्लीं, अर्वाचीन काळीं, तत्सम एक देखील उदाहरण दिसून येत नाहीं.

परंतु, आमच्या सुदैवानें तसा कांहींच प्रकार

नसून, ब्राह्मणांच्या स्वार्थत्यागाचें अगदीं मूर्तिमंत उदाहरण आम्हाला आज मितीसही केवळ प्रत्यक्षच दाखवितां येण्यासारिखें आहे.

दक्षिण हिंदुस्थानांतील.

आमच्या भरतभूमींत महाराष्ट्र विद्याप्रसारक[1] नामक जी मंडळी आहे, तींत अशा प्रकारचे गुप्त हिरे अजूनही चमकत आहेत. ह्या गृहस्थांनीं स्वार्थाचें निव्वळ मातेरें करून, आपला देह केवल स्वदेशहितासाठींच सर्वप्रकारें विकला आणि झिजविला आहे. इतकेंच नव्हें तर, त्यांनीं आपलें तनमनधनसुद्धां तत्प्रीत्यर्थ अर्पण केलें आहे, असेंही म्हणण्यास हरकत नाहीं. व त्याच कारणानें, माजी लॉर्ड रे साहेबासारख्या मर्मज्ञ क्षत्रपानें[2] देखील त्यांची फार वाहवा केली, व त्यामुळेंच ते मोठ्या स्तुतीस पात्र होऊन, अखिल जनसमुहाचें प्रेमभाजन झाले.

फार तर काय सांगावें, पण ह्या उदार महात्म्यांची ती स्वदेशभक्ति आणि ती स्वार्थत्यागपरायणता, इत्यादि पाहून, पाश्चात्य व पौरस्त्य लोकही अगदीं थक्क झाले; आणि त्यामुळें प्रसंग व संधी पाहून, इ० स० १८९५ सालच्या अकराव्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष जे सुरेन्द्रनाथ बानरजी, त्यांनीं देखील त्यांचें मोठ्या गौरवानें वर्णन केलें. ते म्हणतात कीं,

---

१ Deccan Education Society. २ गव्हरनरानें.

१ " Ladies and Gentlemen, in this address you have referred to the noble dignity that attends the profession of a teacher who is the model of our lives. It must be so in this great historical city. When you have in that Fergusson College *the monument of undying self-sacrifice* (cheer), when you have it as *a monument of the devoted and self-denying efforts of men who have dedicated the best years of their lives to the upbuilding* of that institution ( cheer ). Young men, where can you have *better examples of devotion, sacrifice,* and *courage than in the lives of Professor Gokhale* ( hear hear and cheers ) or of that illustrious man now dead and gone whose memory you adore and I respect, of the late Principal Apte ( cheers ). As I was having a quiet conversation with my friend Mr. Gokhale just as I was coming to this meeting. I came to understand that at the present moment you have the principal in the person of a gentleman whose name I am not able to recall but who, I understand, gave up an appointment worth Rs. 350 a month with prospects of increase, for an appointment worth Rs. 75 a month. I should like *to present this pattern of self sacrifice in the cause of duty for the imitation of these young men.* "

१ Reply to the address from the Poona students, to the Honourable Mr. Surendradath Bannerjea, B. A.; C. S.; given on the 30th of December 1895.

उत्तर हिंदुस्थानांत सुद्धां, अशाच मासल्याचीं स्वार्थ-

उत्तर हिंदुस्थानांतील.

त्यागाचीं अनेक उदाहरणें आढळून येतात. ह्यासंबंधानें डाक्तर हण्टर असें लिहितात कीं,

" At this day, Brâhman Colleges, called *tols*, are carried on *without fees*, on the old model, at Nadiyà in Bengal, and elsewhere."

( Indian Empire. P. 96 ).

असो. आतां, वर्णसंस्थेनें कोणतें कार्य केलें, आणि

वर्णसंस्थेचें फल व श्रमविभाग.

त्यापासून कशा प्रकारचा श्रमविभाग झाला, ह्याविषयींचें थोडेंसें दिग्दर्शन करूं.

आमच्या प्राचीन काळच्या समाजस्थितीचा, किंबहुना मनुस्मृतिकालांतील समाजस्थितीचा हुबेहुब आरसा, किंवा साक्षात् प्रतिबिंबच, पाहण्याची ज्याची इच्छा असेल, त्यानें निदान एकदां तरी मनुस्मृतीचें दर्शन घ्यावें. म्हणजे त्याला श्रमविभागचसा काय, पण समाजसंस्थेचीं सर्व अंग दृष्टिगोचर होतील. सबब, ह्याच अपूर्व समाजरत्नाकराकडे आपण जरासे वळूं.

मनुस्मृतींत प्रत्येकाची इतिकर्तव्यता सांगितली असून, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, यांनीं काय करावें, व यांचा कसकसा श्रमविभाग आहे, याविषयींचें सविस्तर विवेचन आहे.

अध्यापनमध्ययनं यजनं याजनं तथा ।
दानं प्रतिग्रहंचैव ब्राह्मणानामकल्पयत् ॥८८॥
( मनुस्मृति अ. १ )

ब्राह्मणांची इतिकर्तव्यता किंवा त्यांच्याकडे सोंपलेलें काम.

"ह्यांत " ब्राह्मण वर्णावर जितका इतिकर्तव्यतेचा बोजा पडलेला आहे, तितका अन्य कोणावरही नाहीं, असें सहजीं कोणाच्याही लक्ष्यांत येण्यासारिखें आहे. कारण, ह्यांचें मुख्य काम म्हटलें म्हणजे स्वतः अहोरात्र अध्ययन करून, विद्याधन मिळवावें. हाडांचीं काडें करून, ज्ञानार्जन करावें. मोठ्या प्रयत्नानें हरतऱ्हेचे शोध लावावे. नानाविध कला शिकून, त्यांत कुशल व्हावें. अनेक देश हिंडावे, आणि देशपर्यटनाचे अनन्त लाभ लोकांच्या व अज्ञजनसमूहाच्या मनांत चांगल्या प्रकारें बिंबवून द्यावे. ठिकठिकाणच्या संस्था पहाव्या. त्यांत काय कमी जास्ती आहे, हें लक्ष्यांत घ्यावें. त्या कशा चालल्या आहेत, याविषयीं मर्मज्ञतेनें पूसतपास करावी. त्यांत कोणत्या ठिकाणीं, कशा प्रकारच्या चुका, काय कारणांनीं होत आहेत, हें बारकाईनें लक्ष्यांत आणावें. त्यापासून किती फायदा आहे, हें काळजीपूर्वक पहावें. त्यांचा समाजावर कसा परिणाम होत आहे, ह्याविषयीं चांगलें लक्ष पुरवावें. आणि आपल्या आचरणानें एकंदर समाजास शुद्ध वळण लागेल, असें वर्तन ठेवावें.

परंतु, इतक्यानेंच झालें नाहीं; किंवा एवढ्यानेंच सर्व बाजार आटोपला नाहीं. कारण, **ब्राह्मणांच्या** षट्कर्मांपैकीं, **१ अध्ययन** हें पाहिलें असून, सदरीं नमूद केलेल्या सर्व गोष्टींचा ह्या अध्ययनांतच अन्तर्भाव होतो. सबब, ह्या शिवायचीं राहिलेलीं जीं दुसरीं पांच कर्मे, त्यांचाही यथावकाश विचार करणें अवश्य आहे. हीं पांच कर्में म्हटलीं म्हणजे **२ अध्यापन, ३ यजन, ४ याजन, ५ दान,** आणि **६ प्रतिग्रह,** हीं होत. तेव्हां, **ब्राह्मणांनीं** प्रथमतः स्वतः अध्ययन करून, तदनंतर अध्यापन करावें, म्हणजे पात्र असणारांस ( **ब्राह्मण, क्षत्रिय,** आणि **वैश्य,** यांस ) शिकवावें. यजन आणि याजन हें देखील त्यांच्याचकडे असल्याकारणानें, त्यांजला यज्ञ करावे लागतात, आणि राजे लोकांनीं किंवा क्षत्रियांनीं ते करविल्यास, तत्संबंधीं पुढारीपणाचा सर्व बोजा त्यांजलाच उचलणें भाग पडतें. शिवाय, पात्रापात्र विचार करून, त्यांनीं दान केलें पाहिजे व ज्ञानेच्छूंस ज्ञान, गरजवंतांस द्रव्य, क्षुधार्तांस अन्न, तृषार्तांस जीवन, अपंगांस साहाय्य, व्याधिग्रस्तांस औषध, आणि चिंतातुरांस शांतिसौख्य देण्यासही त्यांनीं अहर्निशीं झटलें पाहिजे. शिवाय, कारण पडेल तेव्हां प्रतिग्रहाविषयीं सुद्धां धर्माज्ञा असल्याकारणानें, कधीं कधीं प्रसंगानुसार, आणि क्वचित् ठिकाणीं नेहेमीं देखील, त्यांजला दान जरूर घेतलें पाहिजे

प्रजानां रक्षणं दानमिज्याध्ययन मेव च ।
विषयेष्वप्रसक्तिश्च क्षत्रियस्यसमासतः ॥ ८९ ॥
( मनुस्मृति. अ. १ )

क्षत्रियांचें कर्तव्यकर्म.

क्षत्रियांचें मुख्य इतिकर्तव्य म्हटलें ह्मणजे, बाह्य संकटांपासून, अथवा शत्रूंच्या हल्ल्यापासून, किंवा संक्षोभाच्या आकस्मिक उपद्रवापासून, हरएक प्रकारें प्रजेचें रक्षण करावें, हें होय. हें झाल्यावर, बाकी सांपडल्या वेळेंत त्यांनीं अध्ययन, दान, व यज्ञ करून, इंन्द्रिय संयमन आचरावें. ह्यांस दुसऱ्यास पढविण्याचा किंवा शिकविण्याचा अथवा दान घेण्याचा अधिकार नाहीं.

पशूनां रक्षणं दानमिज्याध्ययन मेव च ॥
वणिक्पथं कुसीदं च वैश्यस्यकृषिमेव च ॥ ९० ॥
( मनुस्मृति अ. १ )

वैश्यांची इतिकर्तव्यता.

वैश्यांनीं गोधन पाळून त्याचें रक्षण करावें. ज्या ज्या उपायांनीं त्यांची वृद्धी होईल, अशी तजवीज पहावी. सत्पात्रीं दान द्यावें. अध्ययन करून गुरूपासून विद्या शिकावी. व्यापारधंद्यांत दाक्षिण्य दाखवावें. आपला फायदा होईल असा व्याज बट्टा घेऊन, गरीब आणि गरजवंतावर जुलूम होणार नाहीं, अशी दृष्टी ठेवावी. त्यांनीं कृषिकर्म देखील करावें, व नानाप्रकारच्या

उपायांनीं जमीन सुधारावी. हरएक तऱ्हेचीं खतें शोधून काढावीं. जमीनीच्या मगदुराप्रमाणें, अनेक जातींचीं पिकें तिच्यांतून घ्यावींत. आणि थोडक्या परिश्रमानें मोठा कार्यभाग उरकेल, अशी नित्यशः खटपट करावी.

> एकमेव तु शूद्रस्य प्रभुः कर्म समादिशत् ।
> एतेषामेव वर्णानां शुश्रूषामनसूयया ॥ ९१ ॥
>
> ( मनुस्मृति अ. १ ).

शूद्राचें कर्म.

आमच्या वर्णसंस्थेंत, शूद्र वर्ग हा शेवटचा असून, ह्या वर्गानें पहिल्या तीन वर्गांची सेवा करण्याविषयीं मन्वाज्ञा आहे. आतां, हा सेवाधर्म शूद्रांच्या माथ्यावर मुद्दाम लादला; अथवा त्यांचें हीनत्व दाखविण्यासाठीं हा त्यांजवर जाणून बुजून बोजा ठेविला; किंवा त्यांची पायमल्ली करण्याच्या हेतूनेंच आमच्या आर्यपूर्वजांनीं त्यांजला दास्यत्वाच्या पंक्तीस बसविलें; असा भावार्थ बिलकूल समजण्याचा नाहीं. तर, हा श्रम-

शूद्रांवरच सेवाधर्माचा बोजा घालण्याचें कारण.

विभाग प्रत्येक वर्णाची बुद्धिमत्ता, त्यांची कर्तबगारी, त्यांची हुशारी, त्यांचें अवसान, त्यांचें तेज, त्यांची लायकी, आणि त्यांचें सामर्थ्य, इत्यादि गोष्टींवर नजर पुरवून, ज्याच्या त्याच्या योग्यतेनुरूपच केला असल्याचें दिसतें. अथवा, ज्यानें त्यानें आपापला स्वपराक्रम जाणूनच, आपल्याला झेंपण्याजोगा बोजा उचलला असावा.

पुढें, प्रत्येकजण ज्या कामधंद्यांत किंवा व्यवहारांत शिरला, त्यांतच त्याची प्रवीणता होत गेली. व त्य मुळें, तोच उद्योग त्याजला बरा वाटूं लागला. इतकेंच नव्हे तर, आनुवंशिक संस्कारांचा त्यांच्यावर एकसारखा पिढिजात परिणाम होऊन तोच धंदा, किंवा तोच व्यवहार, अथवा तोच उद्योग, ज्यांच्या त्यांच्या वंशांतला कायम ठरला.

वर्णसंस्थेमुळें झालेला श्रमविभाग.

असो. अशा प्रकारचें वर्णान्तरर्गत व्यवहारबंधन मनुकालांत जितकें बलवत्तर होतें, तितकें सांप्रतकाळीं प्रचारांत असल्याचें दिसत नाहीं तथापि, ह्या वर्णसंस्थेमुळें जो श्रमविभाग झाला आहे, त्यापासून दुसरी एक विलक्षण संस्था अमलांत आली आहे; आणि तिचा वज्रलेप संस्कार ह्या भरतभूमीवर, व विशेषतः आम्हां आर्यहिंदूंवर झाला असल्याकारणानें, ती ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

ग्रामसंस्थेमुळें झालेला श्रमविभाग.

आतां, ही अपूर्व संस्था कोणती म्हणाल तर, ती ग्रामसंस्था होय राजकीय किंवा सामाजिक दृष्टीनें ह्या संस्थेचें फारच महत्व आहे. कारण, तिच्यांत लोकमताचें विशेष प्राबल्य असल्याकारणानें, तिला प्रातिनिधिकत्वाचें सोज्ज्वल स्वरूप येतें. आणि तिच्यांत संघशक्ति असल्यामुळें, गांवकीचें हरएक काम ती तडीस नेते ती स्वपोषणाची तजवीज लावते; स्वरक्षणाचा बंदो-

बस्त करते; आणि स्वावलंबनाविषयीं योग्य खबरदारी ठेविते. फार तर काय सांगावें, पण प्रत्यक्ष सरकाराला जितकीं म्हणून अंगें आहेत, तितकीं सर्व ग्रामसंस्थेला आहेत. मात्र, भेद काय तो इतकाच कीं, हीं सर्व अंगें ग्रामसंस्थेला अगदींच अल्प प्रमाणानें असतात.

ग्रामसंस्थेचीं अंगें व त्यांचा तपशील.

कारण, ह्या **ग्रामसंस्थेंत पाटील** हा अधिकारी असून, **कुळकर्णी** वगैरे त्याजला लिहिण्याच्या कामीं मदत करणारे आहेत. **ग्रामयाजक** किंवा गांव गुरव हा गांवच्या मुख्य देवांची पूजा करण्यासाठीं ठेवलेला असतो. **ग्रामज्योतिषी** हा गांवकीच्या जोशीपणाचें काम करतो. **ग्रामकर्मार** हा गांवचें लोहारकाम करण्यासाठीं गांवांत राहतो. **ग्रामतक्षाकडे** गांवकीचें पडेल तें सुताराचें काम सोंपलेलें असतें. **ग्रामकुलाल** हा गांवकुंभार होय; व ह्यानेंच सर्व ग्रामस्थांना मडकीं पुरविलीं पाहिजेत; आणि दुसरें पडेल तें कुंभारकाम केलें पाहिजे. **ग्रामरजक** हा गांवधोबी असून, हा गांवकऱ्यांचे कपडे साफ करतो. **ग्रामनापित** ह्याच्याकडे हजामतीचें काम असून, जरूरीच्या प्रसंगीं तो तुंबड्या देखील लावतो. **ग्रामपाल** ह्मणजे गांवजागल्या होय. ह्याच्याकडे गांवचा पहारा करण्याचें काम असतें. **ग्रामवैतालिक** हा गांवभाट, किंवा गांवचा शिघ्रकवि होय. **ग्रामगोदुह** हा गौळ्याचें काम

करून दूध पुरवितो. **ग्रामघातिन्** याजकडे गांवखाटकाचें काम असतें. **ग्रामप्रेष्य** हा गांवचा मिराशी किंवा गांवमहार असून, तो फारच उपयोगी आहे; व ह्याच्याकडे पुष्कळ प्रकारचीं कामें सोंपलेलीं असतात. तो गांवच्या हद्दीचें संरक्षण आणि पिकावर देखरेख ठेवतो. अन्य गांवांतल्या अपरिचित मनुष्याला तो वाट दाखवितो. प्रसंगीं वेठ बिगारही करतो; जरूर पडेल तेव्हां लोकांस बोलावितो; व गांवांत दवंडी पिटवितो. आणि प्रसंगोपात येणारें गांवचें सर्व सरकारी टपाल तोच पोहोंचवितो. तात्पर्य इतकेंच कीं, गांवकीच्या बहुतेक सर्व कामांत त्याला हजर राहवें लागतें. **ग्रामचर्मकार** हा गांवचांभार असून, तो ग्रामस्थांचे जोडे तयार करतो. **पोतदार** हा गांवसोनार होय. **शिंपी** हा गांवचें शिवणकाम करतो. **तांबोळी** हा पानसुपारी विकतो. **गवंडी** घरें बांधतो. **तेली** तेल काढतो. **कासार** भांडीं घडवितो, आणि त्यांस कल्हई व डाक लावतो. **बुरूड** सुपें व टोपल्या करितो. **वाजंत्री** वाद्यें वाजवितो, आणि पत्रावळी व द्रोण लावतो. **मशालजी** दिवाबत्ती करतो. **सिंगाड्या** शिंग फुंकतो. **मढवी** झाडसारवण करून भांडीं घांसतो. **वेठ्या** वेठबिगार करतो, व बोजा उचलतो. **बागवान** फुलें देतो. **ठाणगा** हा गांवचें किरकोळ काम करतो; आणि ह्याच कारणास्तव त्याला गांव-चपराशी ह्मणण्या-

सही कांहीं हरकत नाहीं. **मांग** हा कोणास फांशी देणें असल्यास फांस चढावितो, व शिंकीं दावीं आणि दोर, इत्यादि करून विकतो, किंवा ग्रामस्थांस पुरावितो.

याप्रमाणें, आमची **वर्णसंस्था** आणि **ग्रामसंस्था**, यांनीं जो कार्यभाग उरकला आहे, तो खरोखरच अपूर्व आहे, असें ह्मणण्यास कांहीं एक हरकत नाहीं. कारण, त्या योगानेंच **श्रमविभागाचें** उत्तम प्रकारचें साधन होऊन, ज्याच्या त्याच्या योग्यतेनुरूपच **भारतीयांस** मानसिक व शारीरिक श्रमाचा बोजा यथास्थित वाटला गेला.

वर्णसंस्था व ग्रामसंस्था, यांचा हिंदुसमाजावर झालेला परिणाम.

ह्यामुळें, पृथिवीवरील कित्येक राष्ट्रें निपजलीं नव्हतीं तेव्हां देखील, आणि कांहीं राष्ट्रें बाल्यावस्थेंत व कांहीं निद्रावस्थेंतच होतीं अशा वेळीं सुद्धां, आमच्या **आर्यदेशाला** व **हिंदुराष्ट्राला** उन्नतदशा प्राप्त होऊन, आमचा भाग्योदय अगदीं उच्च कोटीप्रत पोहोंचला होता. इतकेंच नव्हे तर, आमच्या पाठीमागून जीं जीं राष्ट्रें म्हणून उदयास आलीं, तीं तीं सर्व लयास गेलीं असतांही, आमची परंपरा, आमचें **राष्ट्रत्व**, आणि आमचें **हिंदुत्व**, हीं आज हजारों वर्षांच्या, किंबहुना अनेक युगांच्या घडामोडींत, सांप्रतकालपर्यंतही अगदीं कायम राहिलीं आहेत. मात्र, कांहीं दिवस सामूचे व कांहीं दिवस सुनेचे, या नात्यानें, कांहीं प्रसंगीं आम्हीं

सर्वांशीं सार्वभौमत्व भोगलें असून, समयानुसार, तें आह्मांला अंशतःच लाभलें असेल. तथापि, तें कसेंही असलें तरी, सदरहू संस्थांच्या योगानेंच आमच्या हिंदुत्वास अमरत्व आलें आहे, यांत संशय नाहीं.

तद्विषयक प्रमाण व बिझांटबाईचें मत.

ह्यासंबंधानें आनि बिझांट्बाई असें म्हणते कीं,

" It was her ( India's ) *mighty religion* that formed her claim to *greatness* amongst the world's people. Rome had passed and left her *ruins,* and Greece had passed and left her *literature;* India *older* than Greece or Rome— India that was *old* before Egypt was *born*— India that was *ancient* before Chaldea was *dreamed of*—India that went back thousands of *centuries* before Persia had come to the front—India *was still a living nation,* when the nation of the past were dead, and their dust had vanished from the surface of the globe. Why was it, that amongst such ancient civi-lization, *hers* alone was *living at the present day* ? Why was it, that amongst so many ruins, India had still a *future,* as well as the memory of the past ? * * * In the his-tory of the world, India lived because India's was the spirit of humanity, which could not

die. She was the earliest of the Aryan peoples, the first born of the mighte-t races."

( Mrs. Anne Besant on India and its Mission. A lecture delivered in Bombay in January 1894 ).

आमची वर्णसंस्था आणि जातिबंधन, हीं बलवत्तर असल्या कारणानेंच आमच्या हिंदुत्वाचा पाया चिरस्थाई झाला आहे, असेंही सप्रमाण दाखवून, ती म्हणते कीं,

जातिबंधनानें हिंदुत्वाचा कायमपणा.

" It was, therefore, that India's *religion* and her *social system* was *parmanant at its foundation*, whatever might appear on the surface. These had in themselves the possibility of a revival, though they might have disappeared for a time. There were the *four great Castes*, which they would find in every Scripture spoken of continually and woven into the growing history of the nation. The caste system had enshrined in it a principal which was based on a *truth*, which was the *truth of natural order*. "

( Mrs Anne. Besant on India and its Mission vide Times of India, dated 5th January 1894 ).

आमच्या वर्णसंस्थेचें अशा प्रकारचें प्राबल्य आनी बिझांटबाईनीं गावें, यांत कांहींच नवल नाहीं. परंतु, हिंदु धर्मावर, हिंदु जातीवर, आणि हिंदु संस्थावर

त्याबद्दल पाद्री लोकांचा अभिप्राय.

वारंवार, जाणून बुजून, व निष्कारण हल्ला करणारे जे पाद्री आणि दैषैकदृक् मिशनरी, त्यांजला देखील आमच्या वर्णसंस्थेच्या वर्चस्त्राचें वर्णन केल्याशिवाय राहवत नाहीं. ते म्हणतात कीं,

" I think, it will be admitted by all who have thoughtfully considered the problem of Indian evangelization, that the *strength and influence* of Hinduism are to be found in that *great Socio-religious* organisation which is conveniently described as the *System of Caste*. "

१ Education a Missionary Agency. A paper read by the Rev. D. Machichan. D. D. Principal of the Wilson College Bombay, in the Decennial Conference, held on the 2 nd of January 1893 ).

आंग्लवर्तमानपत्रांतील त्या संबंधीं उल्लेख.

असो. वर्णसंस्थेचा जितक्या मानानें आमच्यावर परिणाम झाला आहे, तितक्याच प्रमाणानें ग्रामसंस्थेचा देखील आह्मांवर, व आमच्या एकंदर समाजावर, अगदीं वज्रलेप संस्कार झाला आहे.

ह्या संबंधानें एक प्रात्याहिक आणि वजनदार ह्मणून नांवाजलेलें जें आंग्ल-हिन्दी वर्तमानपत्र तें असें लिहितें कीं,

" The existance of the ( Village ) Community has been traced to the earliest times of which history speaks. * * * Indeed, it has been the one un-

changing, effectual, and enduring refuge of mankind in this Country ( India ), in the midst of changes, the most violent and fundamental in its Government. "

( The Times of India. 18th June 1891 ).

आन्स्टीचें मत.

पूर्वी, म्हणजे सुमारें तीस चाळीस वर्षांमागें, हिंदुस्थानांत मिस्तर आन्स्टी नांवाचा एक फारच विद्वान आणि विशेष प्रसिद्ध बारिस्टर होऊन गेला. त्याला आमच्या ग्रामसंस्थेचें अतिशय महत्व वाटत असे. त्यानें एके प्रसंगीं, लन्दन् येथें भरलेल्या ईस्टइंडिया असोशिएशन् नामक सभेंत असें बोलून दाखविलें कीं,

"We are apt to forget in this Country ( England ) when we talk of preparing people in the East, by education and all sort of thing, for Municipal Government, and Parliament Government, that the East is the *parent* of Municipalities. Local Self Government in the widest acception of the term, *is as old as the East itself.* No matter what may be the religion of the people who inhabit what we call the East, there is not a portion of the Country from West to East, from North to South, which is not swarming with Municipalities; and not only so, but like to our Municipalities of old, they are all bound together as in a species of net-work, so that you have ready made to your hand, the frame work of a *great system of representation.* "

आमच्या ग्रामसंस्थांवर सर. डब्ल्यू. मेन नांवाच्या एका विद्वान गृहस्थानें एक स्वतंत्र पुस्तकच लिहिलें आहे. त्यांत तो तद्विषयक असें वर्णन करतो कीं,

मेनचा लेख.

" The East is certainly full of fragment of ancient Society. Of these the most instructive, because the most open to sustained observation, are to be found in India."

(Maine's Village Communities. P. 13 ).

" I have several times spoken of them as organised and self-acting. They, infact include a nearly complete establishment of occupations and trades for enabling them to continue their Collective life without assistance from any person or body, external to them."

( Maine's Village Communities. P. 125 ).

ह्या संबंधानें सर. सी. टी. मेटकाफ् यांचें तर असें अगदीं ठाम मत आहे कीं, ह्या ग्रामसंस्थांमुळेंच, अनेक राज्यक्रांतींच्या प्रचंड झंझावातांतही, हिंदूंचा निभाव लागून त्यांचा तरणोपाय झाला; व अगदीं शेवटपर्यंत, निदान थोडें बहुत तरी, त्यायोगानेंच त्यांचें स्वातंत्र्य कायम राहिलें; आणि ते हिंदुत्वासही मुकले नाहींत. कारण, ते आपल्या अहवालांत असें स्पष्टपणें लिहितात कीं,

मेटकाफ्चा अभिप्राय.

"The *Village Communities* are little *Republics*, having nearly every thing they can want within themselves, and almost independent of any foreign relations. They seem to last where nothing else lasts. * * * This *union* of the Village Communities, each one forming a *separate little state* in itself *has I conceive, contributed more than any other cause to the preservation of the people of India*, through all the revolutions and changes which they have suffered, and is in a high degree conducive to their happiness, and to the *enjoyment of a great portion of freedom and independance.*"

(Sir. C. T. Metcalfe. Report of the Select Committee of the House of Commons. 1832. Vol. III. Appendix 84. P. 331).

जीवनसाधनाविषयीं सामान्य विचार.

असो. येथपर्यंत श्रमविभागाचें सामान्य विवेचन झालें, व त्यांत **वर्णसंस्था, ग्रामसंस्था,** आणि **श्रमविभाग,** यांचा परस्पर किती निकट संबंध आहे, हें स्थूलमानानें दाखविण्यांत आलें. सबब, आतां, ह्या विस्तीर्ण भरतखंडांतील एकुणतीस कोटी जवळ जवळ असणाऱ्या एकंदर प्रजेच्या[1] जीवन साधनाचे कोणते मार्ग आहेत, याविषयीं साधारण विचार करूं.

---

१ इ० स० १८९१ सालीं झालेल्या खानेसुमारीप्रमाणें, हिंदुस्थानाची एकंदर लोकसंख्या २८,७२,२२,४३१ आहे.

भरतखंडांतील जातींचें, किंबहुना बहुतेक हिंदीजनसमुहाचें मुख्य जीवनसाधन म्हटलें म्हणजे कृषिकर्म होय. कारण हिंदुस्थानांतील एकंदर लोकसंख्येच्या मानानें विचार केला तर, शेंकडा नव्वद लोक फक्त शेतकीवरच आपला उदरनिर्वाहा करीत असून, बाकीचे शेंकडा दहा मात्र उपजीविकेच्या इतर साधनांवर आपला चरितार्थ चालवितात; असें साधारणतः दिसून येतें. म्हणजे स्थूलनानानें येथील प्रजा एकुणतीस कोटी घेतली तर, तींत सत्तावीस कोटी निव्वळ शेतीवरच निर्वहा करणारे असून, फक्त बाकीचे दोन कोटीच कायते इतर साधनांवर राहणारे आढळतात, असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

नऊदशांश लोकसंख्या कृषिकर्मोपजीवी, व एकदशांश अन्य साधनोपजीवी.

आतां, हें स्थूलमान क्षणभर बाजूला ठेवून, आपणांस उपलब्ध असलेल्या साधनांवरूनच जो कांहीं तपशील मिळेल, तो साद्यंत देऊं.

इ० स० १८९१ सालच्या खानेसुमारीप्रमाणें, हिंदुस्थानची लोकसंख्या २८,७२,२३,४३१ आहे. त्याचा तपशील.[१]

---

१ Baine's Census Report of India 1891, published in 1893.

ह्यांतूनच आहवालाचे बहुतेक आंकडे, ग्रंथकर्त्यानें कृतज्ञतापूर्वक घेतले आहेत. ( ग्रंथकर्ता.

| | | |
|---|---|---|
| हा एकंदर लोकसंख्येचा $\frac{1}{10}$ हिस्सा आहे. | २५,८५,०१,०८८ | वरिष्टधारण करणार, आणि जमीन कसणारीं कुळें, मिळून शेतीभातीवर गुजारा चालविणारे. |
| हा एकंदर लोकसंख्येचा $\frac{1}{10}$ हिस्सा होय. | २४,२०,००० | इंग्रज सरकारची नोकरी करणारे. |
| | १६,५०,००० | संस्थानांत नोकरी करणारे. |
| | ४०,००,००० | वाहक, ह्मणजे गाड्याघोड्यांचें भाडें करणारे. |
| | २५,००,००० | इतर धंदेवाले. |
| | २०,००,००० | पान, सुपारी, व तमाखु विकणारे. |
| | ७,००,००० | भाजीपाला फळफळावळ विकणारे. |
| | ५,८०,००० | मिठाईवाले. |
| | ५,८६,००० | हारतुरे विकणारे, |
| | ४,६३,००० | दलाली करणारे, |
| | ६,५८,००० | आविहित धंदा करणारे, ह्मणजे कसब करणाऱ्या स्त्रिया, जूगार, रामोशी वगैरे. |
| | १,३१,६५,३४३ | धर्माधिकारी, व इतर धर्मसंबंधी कामगार. |
| | २,८७,२२,३४३ | |
| | २८,७२,२३,४३१ | एकुण एकंदर लोकसंख्या. |

आतां, सदरीं जो तपशील दिला आहे, त्यांत कोणकोणत्या धंद्याचे लोक असून, ते कसकशा प्रमाणानें विभागले गेले आहेत, याविषयीं थोडेसें दिग्दर्शन करूं.

| धंदा. | लोकसंख्येवर शेंकडावण. |
|---|---|
| १ वरिष्टधारण करणार आणि कुळें. | ९२.९८ |
| २ शेतकी करणारे मजुरदार. | ६.९० |

| धंदा | लोकसंख्येवर शेंकडावण. |
|---|---|
| ३ सामान्य मजुरदार. | ८.८७ |
| ४ गुराखी, धनगर, आणि लोंकरकाम करणारे | १.४९ |
| ५ कापूस काम करणारे. | ३.०७ |
| ६ सोनार. | ०.६२ |
| ७ लोहार. | ०.५५ |
| ८ तांबट, व कासार. | ०.१४ |
| ९ सुतार. | १.०६ |
| १० गवंडी. | ०.३६ |
| ११ नाहावी. | ०.९० |
| १२ धोबी. | ०.७२ |
| १३ मच्छी मारणार. | ०.९५ |
| १४ तेली. | ०.६९ |
| १५ कुंभार. | ०.८२ |
| १६ गांवकामगार. | १.०७ |
| १७ चांभारकाम करणारे. | १.१४ |
| १८ हलालखोर, अथवा भंगी. | ०.४० |
| १९ धर्माधिकारी. | ०.६० |
| २० भिक्षुक, आणि याचक. | १.९५ |
| एकूण आद्यावस्थेंतील धंदे. | ८४.८४ |
| २१ दूध विकणारे. | ०.३५ |
| २२ धान्य व कडदण विकणारे. | १.१० |
| २३ दुकानदार. | ०.८८ |

| धंदा. | लोकसंख्येवर शेंकडावण. |
|---|---|
| २४ सावकार, ह्मणजे कर्जाऊ पैसा देऊन व्याजबट्टा करणारे. | ०.३४ |
| २५ वाणी, ( वाणिज्य करणारे ). | ०.७४ |
| २६ शिंपी. | ०.४२ |
| २७ किराणा जिन्नस विकणारे. | ०.३२ |
| २८ ताडी काढणारे. | ०.३५ |
| २९ वेत काम करणारे | ०.५० |
| ३० गवत, फांटी, वगैरे विकणारे. | ०.४७ |
| ३१ इतर किरकोळ. | ९.६९ |
| एकूण शेष पूरण. | १५.१६ |
| एकुण एकंदर. | १००.०० |

असो. जीवनसाधनाचा हा फक्त सामान्य विचार झाला. सबब, आणखी विशेष पद्धतशीर रीतीनें एतद्विषयक विवेचन करून, उपलब्ध असलेला जास्त तपशील देऊं.

राज्यशकटाचीं मुख्य दोन अंगें.

**राज्यशकटाचीं** फारच महत्वाचीं, आणि विशेषतः मुख्य अंगें म्हटलीं म्हणजे **१ प्रजापालन**, व **२ प्रजासंरक्षण**, हीं होत. तथापि, ह्याशिवाय अन्य कित्येक गोष्टींचाही ह्यांत अन्तर्भाव होतो. आणि केवळ प्रजेच्या कल्याणार्थच राजाला ह्या सर्व बाबतींत प्रत्यक्ष मन घालून, एकंदर राज्यांगें परिपूर्ण दशेप्रत पावतील,

अशी खबरदारी घेणें अगदीं जरूर पडत असल्या कारणानें, त्या गोष्टींचें देखील प्रसंगविशेषीं योग्य तें विवेचन करावें लागतें.

ह्याच कारणासाठीं, एकंदर जीवनसाधनाचे सात प्रकार करून, त्यांचे[1] आणखी चोवीस वर्ग केलेले क्वचित ठिकाणीं आढळतात. आतां, ही गोष्ट खरी आहे कीं, अशा तऱ्हेचें विवेचन शास्त्रीयपद्धतीस अनुसरून, किंवा संपूर्ण रीतीनेंही केलेलें दिसत नाहीं. तथापि, त्यावरून सांप्रत विषयाचें अवश्य तें दिग्दर्शन होण्यासारखें आहे. सबब, तत्संबंधीं अवश्य ती हकीकत येथें देतों.

जीवनसाधनाचे सात प्रकार.

असो. जीवनसाधनाचे सदरीं लिहिलेले सात प्रकार खालीं लिहिल्याप्रमाणें होत.

१ राज्यकारभार.

२ कृशिकर्म व तृणरक्षा.

३ अनुजीवीवृत्ति.

४ द्रव्यसामग्री आणि पदार्थसिद्धता.

५ क्रयविक्रय व्यवहार, साठवण, व प्रवहण.
( किंवा व्यापार, वखार, आणि ने आण. )

---

१ इ. स. १८९१ सालच्या खानेसुमारीचा सेन्सचा छापील अहवाल (रपोट) पहा.

६ **शास्त्रीय व कलाभियुक्त धंदे,** आणि इतर उद्योग.

७ **अन्य वृत्ति, व स्वायत्त जीवन साधनाचे इतर मार्ग.**

सदरहू सात प्रकारांत, आणखी खालीं लिहिलेले चोवीस वर्ग केले आहेत, ते असे.

त्यांचे चोवीस वर्ग.

पहिल्या प्रकारांत तीन वर्ग आहेत.

१ राज्यपद्धति.

२ संरक्षण.

३ परराज्य व मांडलिक सेवा.

दुसऱ्या प्रकारांत दोन वर्ग आहेत.

४ पशुसंवर्धन.

५ कृषिकर्म.

तिसऱ्या प्रकारांत एकच वर्ग आहे.

६ सेवा.

चवथ्या प्रकारांत अकरा वर्ग आहेत.

७ खानपान

८ दीप, इन्धन, तृण, इत्यादि सामग्री.

९ गृहरचना, व बांधकाम.

१० वहन आणि गलबतें.

११ शेषपूरणार्थ अन्य द्रव्यें.

१२ तंतुनिर्मितपट, आणि वस्त्राभरण, व विणकर काम.

१३ धातू व मौल्यवान खडे.

१४ कांचकाम, कुंभारकाम, आणि दगडी-काम.

१५ लांकुडकाम, व वेतकाम.

१६ औषधिक्रिया.

१७ चर्मक्रिया.

पांचव्या प्रकारांत दोन वर्ग आहेत.

१८ व्यापार.

१९ वखारींत पदार्थांचा संग्रह, व त्यांची ने आण.

सहाव्या प्रकारांत दोन वर्ग आहेत.

२० शास्त्रीय आणि कलायुक्त धंदे.

२१ मृगया ( शिकार ), व क्रीडा.

सातव्या प्रकारांत तीन वर्ग आहेत.

२२ इतर धंदे.

२३ अन्य व्यवसाय.

२४ श्रमविरहितवृत्ति,

भरतखंडांतील प्रजेचा धंदेवारीप्रमाणें विभाग.

आतां, **भरतखंडांतील** वर जी सांगितलेली प्रजा २८,७२,२३,४३१ आहे, ती धंदेवारीनें कसकशी पांगली आहे, आणि ह्या **जीवनकलहार्थ** ती कशा प्रकारें विभागली गेली आहे, हें पाहूं.

## पहिला वर्ग.

| | | |
|---|---|---|
| १ | सरकारी नोकर. .... .... | २३,९५,१६२ |
| २ | इतर संस्थांचे नोकर. .... | १,१८,१३५ |
| ३ | गांवनोकर. .... .... .... | ३०,८६,८५५ |
| | एकुण | ५६,००,१५२ |

## दुसरा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| ४ | फौज. .... .... .... | ६,६३,२७१ |
| ५ | आरमार, वगैरे. .... .... | १,१५१ |
| | एकुण | ६,६४,४२२ |

## तिसरा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| ६ | मुलकी व दिवाणी कामगार. .... | ३,५८,०७९ |
| ७ | लष्करी कामगार. .... .... | १,४१,९५१ |
| | एकुण | ५,००,०३० |

## चौथा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| ८ | घोडे व शृंगी जनावरें, यांजवरील नोकर. .... .... | २९,५०,६४९ |
| ९ | इतर ओझेलीं जनावरांचें नोकर. | ३३,०६७ |
| १० | मेंढरें, बकरीं, डुकरें, इत्यादींचे नोकर. .... .... .... | ९,७१,६८२ |
| ११ | गुरांचें पालन वगैरे करणारे. .... | ५४,४६७ |
| १२ | कृमिगण, व जीवजंतूस धरणारे. .... | ५,९८४ |
| | एकुण | ३६,४५,८४९ |

## पांचवा वर्ग

| | | |
|---|---|---|
| १३ | जमीनीचे वरिष्ट धारण करणार व त्यांचीं कुळें. | १४,९९,३१,१५९ |
| १४ | शेतकी संबंधीं मजूर. .... | १,८६,७३,२०६ |
| १५ | बागाईत करणारे. .... .... | २२,६१,४८१ |
| १६ | शेतकीच्या कामावर देखरेख ठेवणारे. .... .... .... | ८,६९,५४४ |
| | एकुण. | १७,१७,३५,३९० |

## सहावा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| १७ | खानगी व घरची नोकरी करणारे. .... .... | १,००,०८,३८७ |
| १८ | इतर नोकर. .... .... | ४७,८०३ |
| १९ | आरोग्य रक्षणार्थ नोकर. .... | ११,६३,८८२ |
| | एकुण. | १,१२,२०,०७२ |

## सातवा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| २० | मांस वगैरे विकणारे. .... | ४०,४५,१६५ |
| २१ | भाजीपाला विकणारे. .... | ५३,९७,११३ |
| २२ | गरममसाला, व पेयपदार्थ, वगैरे विकणारे. .... .... | ५१,३३,३१७ |
| | एकुण. | १,४५,७५,५९३ |

## आठवा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| २३ | दिवाबत्ती करणारे. .... .... | २१,६३,५९३ |
| २४ | लांकुड, फांटी, आणि गवत पुरविणारे. .... .... .... | १३,५८,६६४ |
| | एकुण. | ३५,२२,२५७ |

## नववा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| २५ | इमारतीला लागणारें सामान पुरविणारे. .... .... .... | ४,१०,१४२ |
| २६ | इमारती संबंधीं कारागीर लोक | १०,२७,५९७ |
| | एकुण. | १४,३७,७३९ |

## दहावा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| २७ | आगगाडीच्या कारखान्या-वरील लोक. .... .... | ....४२,५२९ |
| २८ | गाड्या वगैरे वहनें करणारे. | ....४७,७२८ |
| २९ | होड्या, मचवे, आणि गलबतें, इत्यादि तयार करणारे. .... | ....५६,२५१ |
| | एकुण. | १,४६,५०८ |

## अकरावा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| ३० | कागद करणारे. .... .... | ....७८,१५३ |
| ३१ | पुस्तकें बांधणारे. .... .... | ....९४,२७७ |
| ३२ | घड्याळें करणारें. .... .... | ....११,६३८ |

| | | |
|---|---|---|
| ३३ | खोदकाम, व कोरींव काम करणारे. | ४४,३३६ |
| ३४ | खेळणीं करणारे. .... .... .... | ६९,७४७ |
| ३५ | बाजे व वाद्यें तयार करणारे. .... | २१,३९७ |
| ३६ | बांगड्या, सरी, हार, वगैरे करणारे. | ५,८६,७३९ |
| ३७ | बैठक, खुर्च्या, मेजें, इत्यादि करणारे. | १५,६१६ |
| ३८ | खोगीर, व इतर सामान करणारे. | १७,४०६ |
| ३९ | यंत्रें, आणि यंत्रसामग्री तयार करणारे. .... .... .... | १,७३,५९३ |
| ४० | हत्यारें, व युद्धसामग्री तयार करणारे | ४२,३६५ |
| | एकुण. | ११,५५,२६७ |

## बारावा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| ४१ | लोंकर काम करणारे. .... | ५,८७,७०१ |
| ४२ | रेशीम काम करणारे. .... | ३,१९,३९७ |
| ४३ | कापूस काम करणारे. .... | ८८,२०,४६६ |
| ४४ | ताग, अंबाडी, वगैरेचें काम करणारे. .... .... | ४,६१,१९३ |
| ४५ | पोषाक तयार करणारे. .... | २४,२२,५१० |
| | एकुण. | १,२६,११,२६७ |

## तेरावा वर्ग.

४६ सोनें, रुपें, आणि मौल्यवान दगडाचे काम करणारे, ह्मणजे सोनार, व कोंदण-

| | |
|---|---|
| काम करणारे .... .... | १७,८३,८७४ |
| ४७ तांबट. .... .... .... | ४,०५,६०० |
| ४८ कासार. .... .... .... | ५९,०४८ |
| ४९ लोहार आणि घिसाडी. .... | १५,७२,९११ |
| एकुण | ३८,२१,४३३ |

### चौदावा वर्ग.

| | |
|---|---|
| ५० बिलोरी व चिनी काम करणारे. | १४,४१९ |
| ५१ मातीचें आणि दगडी काम करणारे. | २३,४६,२०४ |
| एकुण | २३,६०,६२३ |

### पंधरावा वर्ग.

| | |
|---|---|
| ५२ लांकुड काम करणारे. .... | २८,६८,४३३ |
| ५३ वेताचें काम करणारे. .... | १४,२४,५७९ |
| एकुण | ४२,९३,०१२ |

### सोळावा वर्ग.

| | |
|---|---|
| ५४ डीक, लाख, कात, इत्यादि तयार करणारे. .... .... | ७६,१८६ |
| ५५ औषधि, रंग, वगैरे करणारे. .... | ३,१५,३८९ |
| एकुण | ३,९१,५७५ |

### सतरावा वर्ग.

| | |
|---|---|
| ५६ चर्मक्रिया, किंवा कातड्याचें काम करणारे. .... .... | ३२,८५,३०७ |

## अठरावा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| ५७ | पैशाची देवघेव करणारे. .... | ११,२८,२८३ |
| ५८ | साधारण व्यापारी. .... .... | ११,८६,८९२ |
| ५९ इतर उलाढाल करणारे. .... | | १९,०७,५५५ |
| ६० | दलाल. .... .... .... | २,५९,७२६ |
| ६१ | मक्तेदार, म्हणजे मक्तयानें कामें करणारे, व इजारदार. .... | २,०३,१२३ |
| | एकुण | ४६,८५,५७९ |

## एकोणीसावा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| ६२ | लोखंडी सडकेकडील कामगार. | २९,१६९ |
| ६३ | तत्संबंधीं नोकर. .... .... | २,३१,०४० |
| ६४ | गाड्या वगैरे कडील नोकर. | ११,२६,८४७ |
| ६५ | ओझेलीं जनावरांवरील नोकर. | ६,७६,३३९ |
| ६६ | गलबतें व मचव्यांचे मालक. .... | ९२,७०१ |
| ६७ | तत्संबंधीं कामकरणार दरजी वगैरे. | ६,९७,०५१ |
| ६८ | टपाल नेणारे नोकर. .... .... | ३,०७,९०३ |
| ६९ | तारायंत्राकडील मजूरदार. .... | १९,१७१ |
| ७० | हमालीनें वखारींत माल साठविणारे | ७,४७,७९४ |
| | एकुण | ३९,५२,९९३ |

## विसावा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| ७१ | धर्माधिकारी, वगैरे. .... .... | १७,२१,४८७ |
| ७२ | धर्मसंबंधीं दुसरें काम करणारे | १४,६३,२७३ |

| | |
|---|---|
| ७३ विद्याजीवी, शास्त्री, पुराणिक, कथेकरी, वगैरे. .... .... .... | ४,८६,४९७ |
| ७४ ग्रंथजीवी. .... .... .... | २,८०,७०५ |
| ७५ वकील, मुखत्यार, इत्यादि. .... | २,२१,१६३ |
| ७६ वैद्य, डाक्तर, हकीम, वगैरे. .... | ४,६०,८९५ |
| ७७ वैद्यकीसंबंधीं इतर काम करणारे. | ४४,१७९ |
| ७८ वास्तुविद्याविशारद, इंजिनीयर, इत्यादि. .... .... .... | २२,२१७ |
| ७९ तत्संबंधीं तपासनीस, व कारकून, म्हणजे सरव्हेयर, ड्राफ्टमेन, वगैरे. .... | ७,२५२ |
| ८० ज्योतिःशास्त्री, उद्भिच्छास्त्रविशारद, इत्यादि. .... .... .... | १,३५४ |
| ८१ ज्योतिषी, वगैरे. .... .... | १,९८,६५६ |
| ८२ चितारी, रंगारी, इत्यादि. .... | ३५,७८८ |
| ८३ गवय्ये, बजवय्ये, नट, नर्तक, वगैरे. .... .... .... | ६,४९,९२६ |
| एकुण | ५६,७२,१९१ |

## एकविसावा वर्ग.

| | |
|---|---|
| ८४ शिकारी. .... .... .... | ४३,९१९ |
| ८५ शिकलेलीं जनावरें बाळगणारे. .... | १२,४४८ |
| ८६ मंत्र टाकणारे, व खुषमस्करे. .... | ३६,४५३ |

| | | |
|---|---|---|
| ८७ | उड्या मारणारे इ. इ. .... .... | ४२,१८४ |
| ८८ | तालीमबाज, इ. इ. .... .... | ६,१७६ |
| | एकुण | १,४१,१८० |

### बाविसावा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| ८९ | तळीं, विहिरी, वगैरे खोदणारे. | १६,४७,७४० |
| ९० | इतर सामान्य मजूरदार. .... | २,३८,२०,२७७ |
| | एकुण | २,५४,६८,०१७ |

### तेविसावा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| ९१ | अन्य बिनवर्गीय व्यवसायी. .... | १३,९५,३४८ |
| ९२ | अविहित म्हणजे अप्रशस्त धंदा करणारे. (रांडा, रामोशी, नायकिणी ). | १,६७,६३३ |
| | एकुण | १५,६३,९८१ |

### चोविसावा वर्ग.

| | | |
|---|---|---|
| ९३ | आपल्या घरच्या संपत्तीवर स्वस्थ बसून खाणारे. .... .... | १,९३,२९१ |
| ९४ | भिक्षा मागून राहणारे. .... | ४१,१५,२४३ |
| ९५ | पेनशनावर उपजीविका करणारे. | ३,६०,२९३ |
| ९६ | बन्दिवान् ( कैदी ). इ. इ. .... | १,०५,१६६ |
| | एकुण | ४७,७३,९९३ |
| | एकुण एकंदर. | २८,७२,२३,४३१ |

# भाग ५० वा.

—:o:—

## भिन्नभिन्न जातींची विद्याभिरुचि.

———***———

आर्य हिंदूंची पूर्वकालीन विद्याभिरुचि.

ज्ञानार्जनाच्या संबंधानें, आमचे आर्य पूर्वज फारच पुढें सरसावलेले असल्याचें दिसतें. कारण, ह्या भूतलावर सुधारलेलीं ह्मणून जीं जीं पुराण राष्ट्रें होऊन गेलीं, त्या सर्वांत आमच्या आर्यहिंदूंची पहिली पाहिरी असून, ग्रंथसंपत्तीच्या संबंधानें देखील, सर्व प्रकारें तेच अग्रेसर आहेत; आणि त्यांची पहिली शेज आहे; असें कोणालाही कबूल करणें भाग पडतें.

त्यांनीं इतर राष्ट्रास घालून दिलेलें वळण.

आतां, प्राचीन काळच्या पुरातन राष्ट्रांत ग्रीस, आणि तदनंतर रोम, यांनीं विद्याभिवृद्धीच्या संबंधानें बरीच हालचाल केली होती खरी. तथापि, या कामांत त्यांजला देखील, प्रथमतः आह्मीच कित्ता घालून दिला होता. इतकेंच नव्हें तर, मागासलेल्या सर्व राष्ट्रांस विद्या-

मृतपान करूं देण्याविषयींचें शुद्ध वळण, आम्हीच त्यांस लावून दिलें होतें. किंबहुना, तद्विषयक गुरुत्व आम्हांपासूनच त्यांनीं संपादन केलें, असेंही ह्मटल्यास, गर्वोक्ति, किंवा अतिशयोक्ति केल्याचा दोष बिलकुल येणार नाहीं, असें आह्मी समजतों. कारण, सर्वांच्या, अगोदर आमचाच जन्म असून, आह्मांपासूनच इतर राष्ट्रांस **ज्ञानप्रसाद** मिळाला आहे; आणि आमच्या **ग्रंथोदधिरत्नांच्या** प्रज्वलित तेजानेंच इतरांसही थोडाबहुत प्रकाश उपलब्ध झाला आहे, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

त्यामुळें इतर राष्ट्रांचा फायदा.

असो. अशा प्रकारची जरी वस्तुस्थिति आहे, तथापि, आमच्या हल्लींच्या पडत्या अवस्थेंतील कालगतिवैचित्र्यानें, व केवळ आमच्या दैवदुर्विपाकामुळें, ही गोष्ट कोणाला देखील खरी म्हणून वाटणार नाहीं. इतकेंच नव्हें तर, आमची आह्मींच थोरवी मिरविण्यासाठीं, अथवा आमच्या लोकांचें नसतेंच पोम व कुतूहल दाखविण्याच्या हेतूनें, कांहीं तरी लांब लांब गप्पा मारून, फक्त वांचकांपुढें हें मोहजाल पसरलें आहे; किंवा आपले पवाडे आपणच गावे अशी मनीषा धरून, हें कांहीं तरी गौडबंगाल आम्हीं वाचकांसमोर मांडिलें आहे; अगर येनकेन प्रकारेण आपल्या पूर्वजांचा

खरी वस्तुस्थिति व तिचा दैवयोगानें विपर्यास.

देव्हारा माजविण्याच्याच इच्छेनें, हें कांहींना कांहीं तरी मभाचें बोट लावण्याचा. आम्हीं प्रयत्न केला आहे; वगैरे अनेक प्रकारचे आक्षेप, आमच्यावर येण्याचा संभव आहे; आणि त्याच कारणासाठीं, आमचें बोलणें खरें वाटेल किंवा नाहीं, याचाही वानवाच दिसतो.

त्याचें कारण.

कारण, सद्यःस्थितींत, **भरतभूमीच्या** राशीला जणु काय सर्वच ग्रह आठवे आणि बारावे आले असून, त्यांतही जे कांहीं थोडेंबहुत साधारण बरे आहेत, ते देखील सर्वच शत्रुस्थानीं पडलेले आहेत. त्यामुळें, आम्हां **भारतीयांचें** कोणत्याही बाजूनें कांहींएक चालतनासें झालें आहे. **परंतु पाश्चात्यांस** सांप्रत काळीं, तेच ग्रह उद्रीचे व अकरावे झाले आहेत. इतकेंच नाहीं तर, ते केवळ स्वगृहीं आणि केन्द्रस्थानीं पडले आहेत. त्या कारणानें, आमच्या ह्मणण्याला अवश्य तो मान किंवा योग्य तें वजन नसून, **पाश्चात्य** मात्र आजकाल ह्मणतील ती पूर्वदिशा होत आहे; आणि त्यांचें बोलणेंही लोकांस रुचूं लागलें आहे.

कालानुरूप वर्तन.

तेव्हां, अशा स्थितींत, आपल्या पडत्या काळास अनुसरून, जसा वारा वाहील तशी पाठ देणें अगदीं अवश्य आहे. या कारणानें, व सोनारानें कान टोंचल्याशिवाय गत्यन्तरच नसल्यामुळें, जरा नमती

आणि पडती बाजू घेऊन, केवळ लोकमताला मान देण्याकरितांच, त्या दिशेचें अवलंबन करतों.

प्राचीन काळची विद्याभिरुचि व संततिशिक्षण.

असो. लोकशिक्षणाच्या इतिकर्तव्यतेला आमचे पूर्वज फार प्राचीन काळापासूनच जागृत होते. आणि त्यामुळेंच, आमच्या लोकांचें तत्कालीन **संततिशिक्षण विशेष प्रशंसेस** पात्र झालें आहे. कारण, तें इतक्या उच्चपदवीप्रत जाऊन पोहोंचलें होतें कीं, आमचा त्यावेळचा स्त्रीजनसमूह देखील **तत्त्वविवेचना**सारख्या महत्वाच्या विषयांचें अवलोकन करून, त्यांचा ऊहापोह व भवति न भवति करी. मग, सामान्य विषयांची तर गोष्टच बोलावयास नको! कारण, ते त्यांस करतलामलवत असून, त्यांत त्यांचा हात खंडाच असे.

त्या संबंधानें पाश्चात्यांचे अभिप्राय.

या संबंधानें, गुणदोषविवेचक असा प्रख्यात पाश्चात्य पंडित **वेबर** हा असें लिहितो कीं,

"We must, at any rate, assume among the Brāhmans of this *period* a very stirring intellectual life, in which *even the women took an active part,* and which accounts still further for the *superiority maintained* by the Brāhmans *over* the *rest* of the *people.*"

* * * *

वेबरचें मत

"Women who with enthusiastic ardour plunge into the mysteries of speculation, *impressing, and astonishing men,* by the depth and loftiness of their

opinions, and who * * * solve the questions proposed to them on sacred subjects."

( History of Indian Literature. P. P. 21/22 )

अमेरिकेंतील हावर्ड बाईचें मत.

भरतखंडांतील आमच्या कित्येक कुलवधू तर, आर्यसमाजोन्नतीचीं केवळ भूषणरत्नेंच होत. इतकेंच नव्हे तर, त्यांची धवलकीर्ति पौरस्त्य देशांत सर्वत्र पसरली जाऊन, तिचा उद्दाम परिमल पाश्चात्य देशाच्याही अगदीं शेवट सरहद्दीपर्यंत, सर्व ठिकाणीं पोहोंचून, दाही दिशांत दुमदुमून राहिला आहे. कारण, अमेरिकाखंडांतील चिकागो येथील मिसेस् चार्लस् हॉवर्ड् नांवाची एक विदुषी बाई, तारीख २५ नवंबर, सन १८९५ च्या पत्रांत असें लिहिते कीं,

" * * * It is the mother who moulds the character. Is it not true that, when India wasa happy and prosperous nation, *the wife was the valued Companion of the husband*, and *intelligent mother* of her children? Surely the educated gentlemen of India are not ashamed of the names of Gàrgi, Maitreye, Damayanti, Lilàvati, and others whose *names and greatness have reached even* to the Western world."

( An American lady on Christianity and Female Education in India. Dated Chi-cago Novr. 25, 1895. Latter to Mr. Virchand R. Gandhi of Bombay ).

आतां, आमची ही **आर्यपरंपरा** किती दूरवर गेली आहे, हें निश्चयात्मक रीतीनें सिद्ध करण्यास आपल्याजवळ, **ऋग्वेदा**शिवाय दुसरें कांहीं-एक साधन नाहीं. तथापि, या बाबतींत कांहीं विद्वान लोकांचें असें मत आहे कीं, ती इ० स० पूर्वी सुमारें तीन चार हजार वर्षांपासून तों चवदा पंधरा हजार वर्षांपूर्वी-च्या कालांतील असावी. आणि प्रसिद्ध **आनी बिझांट्‌बाईचें** तर तद्विषयक असें मत आहे कीं, ती दहा लक्ष वर्षांची पुराण आहे.

बिझांट्बाईचें मत.

अस्तु. तें कसेंही असलें तरी, **आर्यांच्या** पुराणत्वा-विषयीं, आतां कोणासही तिळमात्र देखील शंका राहिली नाहीं. इतकेंच नव्हे तर, ह्या भूगोलावरील अखिल उन्नतीचें **आदिस्थान** केवळ **भरतखंड**च आहे, असेंही कित्येक प्रतिपादन करितात. एक **फ्रेंच** तत्ववेत्ता असें म्हणतो कीं,

क्रुझर नामक फ्रेंच पंडितांचें मत.

" If there is a Country on earth, which can justly claim the honour of having been the *cradle* of the

---

१ भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पुस्तक दुसरें, भाग १०।१३ पहा.

२ The Aryan race on the earth is about a million years old."

( Mrs. Besant on Theosophy and Religion.
A lecture delivered by her on 14/3/94 ).

human race, or at least the scene of a primitive civilization, the successive developments of which, carried into all parts of the ancient world, and even beyond, the blessings of knowledge, which is the second life of man, that country assuredly is India."

थार्नटन् नामक इतिहासकाराचें मत.

हिंदुस्थानचा इतिहास लिहीत असतांना, थार्नटन् यानें देखील अशाच सामर्थ्याचे उद्गार काढून, इजिप्त (मिसरदेश), ग्रीस, आणि रोम, यांच्या पेक्षांही, आर्य लोक हे उन्नतावस्थेच्या संबंधानें श्रेष्ठतरच आहेत, असें ठरविलें. कारण, तो ह्मणतो कीं,

"Ere yet the Pyramids looked down upon the valley of the Nile—when Greece and Italy, those cradles of modern civilization, housed only the tenants of the wilderness, India was the seat of wealth and Grandeur."

लुई जेकलियट्चें मत,

"भरतखंडांतील पवित्रशास्त्र" (La Bible Dans L' Inde) या नांवाचें पुस्तक, कोणी एक लुई जेकलियट्[१] नामक फ्रेंच शोधकानें केलें आहे. त्यांत तो भारतीयांच्या कल्पकतेविषयीं, आणि त्यांनीं अखिल मानवी कुटुंबावर जे उपकार केले आहेत त्यासंबंधानें असें लिहितो कीं,

"India is the world's cradle; thence it is, that the common mother in sending forth her chil-

१ M. Louis Jacolliot.

dren even to the utmost West, has in unfading testimony of our origin bequeathed us th l egacy of her *language*, her *laws*, her *morale*, her *literature*, and her *religion*."

"Traversing Persia, Arabia, Egypt, and even forcing their way to the cold and cloudy North, far from the sunny soil of their birth; invain they may forget their points of departure. * * * But time and ruin united fail to obliterate the ever legible stamp of origin."

( La Bible Dans L' Inde. P. VII. VIII ).

मोक्षमूल्लरचें मत.

आणि हें सर्व इत्थंभूत कळण्याला कोणतें साधन म्हणाल तर, आमचे अतिपुराण, किंबहुना पुराणतम ऋग्वेदच होत. आमची आद्स्फूर्ति, आमचे मनोविकार, आमचा धर्म, आमची तत्वजिज्ञासा, आमच्या स्मृति, आमचीं पुराणें, आमचे कायदे व कानू, आमच्या रीतिभाति, ह्या सर्वांचें भाजन ऋग्वेदच असल्या कारणानें, आमच्या आर्य-समाजाचें खरें व प्राथमिक स्वरूप, अथवा त्याचें सोज्वल प्रतिबिंब, ऋग्वेददर्पणांतच अगदीं हुबेहूब दृष्टिगोचर होतें. त्यामुळें, आमच्या पूर्वकालीन वृत्तान्ताची जणुकाय अमूल्यखाणच आमच्या हातास लागली आहे असें वाटून, तत्प्रीत्यर्थ आमच्या आर्यपूर्वजांनीं जे जे कांहीं भगीरथ प्रयत्न केले, त्या सर्वांचें फारच कवतुक वाटतें. इतकेंच नव्हे तर, त्यावरून त्यांची तत्कालीन विद्याभिरुचि आणि ज्ञानलालसा, हीं उत्तम रीतीनें व्यक्त होतात.

ह्यासंबंधानें पंडित मोक्षमुल्लर हे असें लिहितात कीं,

"The Veda has a two fold interest. It belongs to the history of the world and to the history of India. In the history of the world; the Veda fills a gap which no literary work in any other language could fill. It sarries us back to times of which we have no records any where, and gives us the very words of a generation of men, of whome otherwise, we could form but the vaguest estimate by means of conjectures and inferences. As long as man continues to take an interest in the history of his race, and as long as we collect in libraries and museums the relics of former ages, *the first place in that row of books which* contains the records of the Aryan branch of mankind, *will for ever belong to the Rig-Veda.*"

( Ancient Sanskrit literature ).

"And in that study of the history of the human mind, in that study of ourselves, of our true selves, India occupies a place *second to no other country*. Whatever sphere of the human mind you may select for your special study, whether it be language, or religion, or mythology, or philosophy, whether it be laws or cusotms, primitive art, primitive science, every where, you have to go to India, whether you like it or not, because, some of the most valuable and most instructive materials in the history of man are treasured up in India, and in India only." * * *

——" Older ancestors and benefactors, who thousands of years ago were toiling for us in the sweat of their face, and *without whom we should never be what we are*,—the *ancestors of the whole Aryan race*, the *first formers of our words*, the *first poets of our thoughts*, the *first givers of our laws*, the *first prophets of our gods*, and of Him who *is* God above all Gods. "

( India. What can it teach us?
P. P. 8-16-13-15-117 ).

वेदकालांतील विद्याभिरुचि.

वेदकालांत, म्हणजे हिंदुसमाजाच्या अगदीं बाल्यावस्थेंत देखील, जिज्ञासा आणि ज्ञानकुतूहल, हीं विशेष प्रखर असल्यां कारणानें, तेव्हांही विद्याभिरुचीविषयीं आमची विशेष तीव्रताच होती, असें म्हटलें तरी चालेल. कारण, जीव आणि शिव सृष्टि व तिचा कर्ता, ज्ञान आणि अज्ञान, इत्यादि प्रचंड व गहन प्रश्नांचा देखील त्यांनीं ऊहापोह केल्याचें दिसतें.

कोददर्शप्रथमंजायमानमस्थन्वन्तंयदनस्थाबिभर्ति।
भूम्या असुरसृगात्माक्वस्वित्कोविद्वांसमुपगात्प्रष्टुमेतत् ४
( ऋग्वेद. अ २ अ.३ वं १४ मं.१ अ.२२ सू.१६४ ).

त्या वेळची जिज्ञासा.

खरोखर, तत्कालीन ज्ञानलालसेच्या संबंधानें ही ऋचा फारच महत्वाची आहे. कारण, तींत आमच्या पूर्वजांनीं एक

असा विलक्षण प्रश्न विचारला आहे कीं, जो स्वतः अस्थिमांसविरहित असतांही अस्थिमांसाचे प्राणी उत्पन्न करितो, असा ईश्वर जेव्हां प्रथमतः आविर्भूत झाला, तेव्हां त्याला कोणी पाहिलें? अथवा जगदुत्पत्तीच्या अगोदर, त्या परमात्म्याला कोणीं अवलोकन केलें असेल? अर्थात् कोणी नाहीं. कारण, त्यावेळीं तद्व्यतिरिक्त अन्य द्रष्टाच नव्हता तर मग त्यावेळीं, अखिल विश्वांतील यच्चावत् सृष्टजीवमात्राचा प्राण, रक्त, आणि आत्मा, इत्यादि कोठें होतें? हें सर्व त्या जगन्नियन्त्याशिवाय दुसऱ्या कोणाला देखील ठाऊक नाहीं. आणि म्हणूनच जर ही गोष्ट कोणास विचारावयाची असेल तर, ती त्यालाच विचारली पाहिजे. परंतु, असें कधीं कोणी विचारिलें आहे? आणि तें विचारण्याकरितां कोण कधीं गेलें आहे? अर्थात् कोणीही नाहीं. कारण, त्याच्याजवळ जाऊन, पुनश्च परत कोणी सुद्धां येत नाहीं, व आलाही नाहीं.

ह्या, व अशा प्रकारच्या दुसऱ्या असंख्य बाबतींत उद्भवणाऱ्या तीक्ष्ण जिज्ञासेनें, आमच्या पूर्वजांची विद्याभिरुचि वृद्धिंगत होत चालली. आणि त्या कारणानेंच, तत्वज्ञान किंवा धर्ममीमांसा, शास्त्र अथवा कला, ऐहिक

१ भारतीय साम्राज्य, पूर्वार्ध, पु. चवथें, भाग २०।२१ पहा.

२ भारतीय साम्राज्य पूर्वार्ध, पु. चवथें, भाग २२ ते ३१ पहा.

सुखोपभोग अगर पारमार्थिक आनंद, इत्यादि गोष्टींत फार प्राचीनकाळीं देखील, आमचे पुराण ऋषी अगदीं निष्णात असून, इतर सर्व राष्ट्रांच्या मानानें ते खरोखरच विशेष पुढें सरसावलेले होते.

स्मृतिकालांतील विद्याभिरुचि.

असो. अशा प्रकारची जिज्ञासा, किंवा विद्याभिरुचि, अथवा ज्ञानकुतूहल, हीं वेदकालांत जितकीं प्रखर होतीं, तितकींच स्मृतिकालांतही होतीं. इतकेंच नव्हे तर, ज्ञानाचा फैलाव झाल्यानेंच एकंदर देशाची देखील उन्नति होते, हें महत्तत्व आमच्या पूर्वजांनीं मनांत आणून, वेदाभ्यासाविषयीं अगदीं सक्तीचें नियमन केलें होतें.

वेदमेव सदाभ्यसेत्तपस्तप्स्यन् द्विजोत्तमः ।
वेदाभ्यासोहि विप्रस्यतपः परमिहोच्यते ॥१६६॥
( मनुस्मृति. अ. २. )

वेदाध्ययन व तें करण्याचें कारण.

आतां, ज्ञानार्जनासाठीं, वेदाध्ययनाचीच येवढी सक्ती कां केली, अशी शंका उद्भवण्याचा संभव आहे. परंतु तिचें निरसन तेव्हांच होण्यासारिखें आहे. कारण, वेदाध्ययनांत चाऱ्ही वेद आणि त्यांचीं अंगें, यांचा अन्तर्भाव होत असून, १ ऋग्वेद, २ यजुर्वेद, ३ सामवेद, व ४ अथर्ववेद, यांचें पठण व अवलोकन झाल्यावर, १ शिक्षा, २ छन्दस्, ३ व्याकरण,

४ निरुक्त, ५ ज्योतिष, आणि ६ कल्प, अशीं जीं वेदांगें, त्यांचेंही अध्ययन करावें लागतें. व इतकें झाल्यावर त्याचें वेदाध्ययन पुरें झालें, असें समजावयाचें. तेव्हां, इतकें अध्ययन झाल्यावर पुष्कळ कार्यभाग होऊन, बरेंच ज्ञान प्राप्त होतें; आणि म्हणूनच वेदाध्ययनाविषयीं अशा प्रकारची सक्ती ठेविलेली दिसते.

वेदांतील विषय-वैचित्र्य.

आमच्या वेदांत सर्व कांहीं असल्याविषयीं, मोठमोठ्या पाश्चात्य विद्वानांचें देखील मत आहे

"Sir William Jones ventures to affirm that the whole of Newtons thelogy, and part of his philosophy, may be found in the vedas, which also abound with allusions to a force of universal attraction.[१]"

---

१ ह्या जगांत आकर्षणशक्तीचा प्रभाव सर्वत्र असून, त्यायोगानेंच हें अखिल विश्व चाललें आहे; आणि सर्व चराचर वस्तूंस तीच शक्ति केवळ आधारभूत आहे; अशा विषयींचें दिग्दर्शन ऋग्वेदांत खालीं लिहिलेल्या ऋचेंत झालें असल्याचें दिसून येतें.

तिस्रो मातॄस्त्रीन्पितॄन्बिभ्रदेक ऊर्ध्वस्तस्थौ
नेमवग्लापयन्ति ।
मन्त्रयन्ते दिवो अमुष्य पृष्ठे विश्वविदं वाच-
मविश्वमिन्वाम् ॥ १० ॥ १५ ॥

(अ. २ अ. ३ व मं. १ अ. २२ सू. १६४.)

(पुढें चालू.)

हिंदु लोकांची विद्याभिरुचि जशी वेदकालांत आणि स्मृतिकालांत प्रखर होती, तशीच ती पौराणिक कालांत असून, ती आजपर्यंतही कायमच राहिली आहे, असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. मात्र, इस्लामशाहीचें सत्र चाललें असतांना, बेबंद नगरी आणि झोटिंग पादशाहीचीं जीं असंख्य होमकुंडें पेटत होतीं, त्यांच्या अति कृष्णधूम्रानें ती कांहीं अंशीं जाया झाली होती, इतकें कबूल करणें जरूर आहे.

पौराणिक कालांतील हिंदूंची विद्याभिरुचि.

आमचे धर्मगुरु श्रीमत् शंकराचार्य हे इसवी सनाच्या सातव्या किंवा आठव्या शतकांत उदयास आले असल्य विषयीं विद्वानांचें मत आहे. त्यावेळीं, वृद्धावस्थेंत देखील, ज्ञानार्जनाविषयीं हिंदूंची इतकी कांहीं विलक्षण उत्सुकता असे कीं, व्याकरण आणि न्यायासारख्या त्रिकट विषयांचें सुद्धां ते अहोरात्र अध्ययन करीत. तेव्हां, ही स्थिति पाहून, श्रीमच्छंकराचार्यांस देखील मोठें नवल वाटलें; व साठीच्या आंत बाहेर आलेले छात्रवर्ग

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

ही ऋचा आदित्यरूपी परमेश्वराला अनुलक्षून असून, तिचा भावार्थ असा आहे कीं, हा सूर्य आकाशांतून स्वर्ग, भू, आणि पाताळ, इत्यादि ठिकाणीं असलेल्या लोकांस, व ह्या विश्वावर परिभ्रमण करणाऱ्या सर्व गोलांस आधारभूत होऊन, त्यांचें नियमन करितो.

सुद्धां, जर ऐहिक विद्याव्यासंग सोडीत नाहींत, तर त्यांजला यापुढें पारमार्थिक ज्ञानाची गोडी लागून परमार्थ तो कसा साधणार, अशी आशंका त्यांजला उत्पन्न होऊन, त्यांनीं शेवटीं अखिल हिंदुजनसमूहास आपल्या सुप्रसिद्ध चर्पटपंजरिकेंत असा उपदेश केला कीं,

**भजगोविन्दं भजगोविन्दं भजगोविन्दं मूढमते ।**
**प्राप्ते सन्निहिते मरणे नहि नहि रक्षति डुकृञ् करणे॥**

विद्याभिरुचीच्या संबधानें सांप्रतकाळची स्थिति.

सांप्रतकाळीं, व प्रस्तुतच्या ह्या अवनतीच्या सपाट्यांत, आणि सर्व बाजूंनीं आमची त्राहिभगवन् अशी अवस्था झाली असतांही, आमची विद्याभिरुचि कायमच राहिली आहे. इतकेंच नव्हे तर, तिचा प्रत्यक्ष अनुभव पाश्चात्यांसही येत आहे. ह्यासंबंधानें, प्रख्यात इतिहासकार डा. हंटर हे असें लिहितात कीं,

" At this day, Brâhman Colleges, called *Tols* are carried on without fees on the old model, at Nadiya in Bengal, and elsewhere. The modern visitor to these retreats can testify to the stringent self descipline and to the *devotion to learning* for its own sake, often protracted till past middle-life, and sometimes by grey haired students. "

( Indian Empire. P. P. 96/97. S. Edn. )

इस्लामशाहीचा धुडकूस उत्तरहिंदुस्थानांत फारच मातलेला असल्याकारणानें, तिकडे विद्यावृद्धीच्या संबंधानें, आम्हांला प्रोत्साहन ह्मणून काहींमात्रही मिळालें नव्हतें. त्यामुळें, तिकडे विद्येचें तेज असावें तितकें दृष्टीस पडत नाहीं. परंतु, तेच आपण महाराष्ट्र देशाकडे वळलों, म्हणजे आपल्याला कांहीं निराळीच झांक दृष्टीस पडते, व महदन्तर दिसून येतें.

तिजवर इस्लामशाहीचा झालेला परिणाम.

ह्याचें कारण शोधावयास, आपल्याला फारसें दूर जावयास नलगे तें तेव्हांच ध्यानांत येण्यासारखें आहे. आणि तें हें कीं, महाराष्ट्रीयांचें स्वातंत्र्य जितकें दिवस टिकलें, तितकें भरतखंडांत अन्य कोणाचेंही टिकलें नाहीं. व परकीयांचा पगडा आपल्यावर न बसावा एतदर्थ, महाराष्ट्रीयांनीं जितकें शौर्य दाखवून अटकाव करण्याचें विलक्षण साहस केलें, तितकें दुसऱ्या कोणाकडून देखील झालें नाहीं. त्यामुळें, हा जरठ स्वातंत्र्यवृक्ष परमेश्वर कृपेनें महाराष्ट्रदेशांत पुष्कळ कालपर्यंत टिकला जाऊन, विदेशीयाक्रमणाच्या विध्वंसरूपी झंझावातानें, तो म्हणण्यासारखा जाया झाला नाहीं; आणि म्हणूनच स्वातंत्र्याची व विद्याभिरुचीची इकडे अजून देखील जास्त चळवळ राहिली आहे.

विद्यावृद्धीच्या संबंधानें महाराष्ट्रांत जास्त चळवळ.

ह्या **महाराष्ट्र** मंडळींनीं आपला पराक्रम, प्रत्येक कामांत, व विद्येच्या सर्व अंगांत, अखिल जगास दाखविला असल्याकारणानें, त्यांची कीर्ति दिगंत पसरली; आणि तिचा परिमल **सप्तसमुद्र** वलांडूनही पाश्चात्य देशांत जाऊन थडकला. त्यायोगानें **युरापस्थ** व आमचे **आंग्ल-प्रभु** हे **महाराष्ट्रीयां**विषयीं सदैव गौरवानेंच लिहितात.

**ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य,** आणि **शूद्र,** या वर्गचतुष्ट यांत, **ब्राह्मण** हे सर्व कामांत निपुण असून, अति नीच कामाव्यतिरिक्त ते लागेल तो धंदा करतात. तथापि, विद्याभ्यासंगांत आणि बुद्धिविषयक धंद्यांत, जितकें त्यांचें पाऊल पुढें आहे, तितकें अन्यत्र नाहीं. नोकरीच्या व हुद्यांच्या मोठमोठ्या जाग्यावर बहुतकरून **ब्राह्मण**च जास्त सरसावलेले दिस-तात. ते टापटिपेनें राहून व्यवस्थितपणें वर्ततात. त्या-मुळें, ते आपलीं डोकीं बहुतकरून वरच करून असतात.

ब्राह्मणवर्गाचा धंदा.

प्रत्यक्ष शेतीवरच उदरनिर्वाह करणारे किंवा शेत करून पोट भरणारे **ब्राह्मण, उत्तर हिंदुस्थानां**त फार आढळतात. परंतु **दक्षिण हिंदुस्थानां**त, केवळच तसा प्रकार दिसून येत नाहीं. ह्या बाजूला **ब्राह्मण** हे प्रत्य-क्षच नांगर धरतांना क्वचितच आढळतात. कारण, ते बहुतकरून वरिष्ट धारण करणारे असल्यामुळें, शेतकी-संबंधीं प्रत्यक्ष मजुरी करण्याचें काम ते, आपल्या कुळांस

अगर शेत्यांस सोंपून देतात. **ब्राह्मणांच्या** संबंधानें, खानेसुमारीच्या आहवालांतील एतद्विषयक मजकूर प्रत्येकानें लक्षांत ठेवून, मनन करण्यासारखा आहे.

**बेन्स** म्हणतो,

"In Hindustan the number of Bráhman Cultivators is very large, and on the west coast, both in Malbar and along the Konkan, this caste, in various distinct communities, is prominent amongst the landholders. In the Deccan, again, the Bráhman almost *monopolises the occupations*, barring trade, that require reading and writing. In *law and education, they are every where to the fore.*"

( Baine's Census Report 1891. P. 203 )

हीच **गोष्ट गुजराथ** प्रांतांतील **नागर** जातीच्या व इतर -**ब्राह्मणांस** सर्वांशीं लागू पडते, असें म्हणण्यास काडीमात्रही प्रत्यवाय नाहीं.

क्षत्रिय वर्गाचा धंदा.

**ब्राह्मणांशिवाय** इतर वर्गांत, विद्याभिरुचि जितक्या प्रमाणानें असावी, तितकी नाहीं. सांप्रत काळात क्षात्रधर्माची इतिकर्तव्यता काय आहे, हें **क्षत्रियांनीं** अवश्य समजलें पाहिजे, अशी आमच्या **आंग्ल** प्रभूंची बिलकुल इच्छा नाहीं; आणि त्याच कारणानें शस्त्रास्त्र व संग्रामविद्येचें उघड रीतीनें आणि शास्त्रीयपद्धतीस अनुसरून, **हिंदिजनांस** पाठशाळांत शिक्षण देण्याचें ते आजन्मात नाकारतात. त्यामुळें, आमचा **क्षत्रिय** वर्ग आपली पिढिजात क्षात्रविद्या विसरत चालला, आणि दुसऱ्या

विद्येंत त्यांजला विशेष गम्य नसल्याकारणानें, तीही त्यांजला येतनाशी झाली. मिळून, धड ही थड, ना ती थड, अशी त्यांची अवस्था होऊन गेली आहे. त्यायोगानें, **क्षत्रियांच्या** तरवारींचा उपयोग, पुढेंमागें नांगराच्या फाळा ऐवजींच होणार कीं काय, अशी दिवसानुदिवस साहजीकच भीति वाटत आहे.

वैश्यवर्गाचा धंदा.

**वैश्यवर्ग** मात्र उत्तरोत्तर पुढेंच सरकत चालला आहे. आणि दिवसानुदिवस व्यापाराची वृद्धीच होत जात असल्यानें, ते आपापल्या धंद्यांत अगदीं तरबेत होऊन, त्यांच्या अंगीं विशेष धाडस व साहस येऊं लागलें आहे; व ही खरोखरच मोठ्या आनंदाची गोष्ट होय. आमचे **मारवाडी** व्यापारनिमित्य देशान्तरींही जातात; आणि आमचे सुप्रसिद्ध **भाटे** लोक तर खंडान्तरीं जाऊनही, आपला छाप दुसऱ्यावर बसवितात. **आफ्रिकाखंडांत नेताळ, झांजिबार**, आणि **मादागास्कर**, येथें **भाटे** लोकांचा जंगी व्यापार असून, ते वणिग्धर्मांत फार कुशल आहेत.

शूद्र वर्गाचा धंदा.

**शूद्र** जातींत बहुतकरून शेतीवरच आपला उदरनिर्वाह करणारे पुष्कळ आहेत. हे लोक केवळ अंगमेहनतीनेंच राबरहाट करितात, आणि स्वतः जमीन नांगरून मजुराप्रमाणें खपतात, व शेतें पिकवितात. खरोखर, एकंदर लोकसंख्येंत,

ह्यांचाच भरणा मोठा आहे. तथापि, ह्यांजला विद्येची गोडी ह्मणून मुळींच नाहीं. त्यामुळें, ते बरेच मागासलेले आहेत.

मुसलमानांत व किरिस्तावांत विद्याप्रसार.

विद्याभिरुचीच्या संबंधानें **मुसलमान** लोक, आणि बाटलेले **किरिस्ताव**, असेच मागें राहिलेले आहेत; आणि त्याच कारणानें ते फार आडमुठे असून, त्यांच्यांत सौजन्यही कमी आहे

पारशी लोकांत विद्याभिवृद्धि.

**पारशी** लोक मात्र विद्येच्या कामांत बरेच पुढें सरसावलेले आहेत; आणि त्यांच्या एकंदर लोकसंख्येच्या मानानें, शिक्षितांचें प्रमाण त्यांच्यांत जास्त आहे.

विद्यावृद्धीच्या संबंधानें पौरस्त्य व पाश्चात्य देशांची तुलना.

विद्याभिवृद्धीच्या संबंधानें ह्या देशाची **पाश्चात्य** देशाशीं तुलना करून पाहिली तर, **भरतखंडां**त शिक्षित लोकांचें प्रमाण फारच कमी आहे. म्हणजे **यूरोप** आणि **अमेरिकें**त, शेंकडा बेचाळीस शिकलेले आढळत असून, **हिंदुस्थानां**त शिक्षितांची संख्या फक्त शेंकडा सहाच आहे. यावरून, येथल्यापेक्षां तिकडे सातपटीनें जास्त विद्येचा फैलाव आहे, असेंही म्हणण्यास हरकत नाहीं.

त्यांचा तपशील.

आतां, **हिंदुस्थानां**त आणि इतर **पाश्चात्य** देशांत, प्रत्येक हजारीं किती अशिक्षित आहेत, हें कळण्यासाठीं याखालीं तपशील देतों, त्यावरून स्पष्ट खुलासा करून येईल.

## देशानुक्रमानें प्रत्येक हजारीं अशिक्षितांची संख्या.

| देशाचें नांव. | पुरुष. | स्त्रिया. | शेरा. |
|---|---|---|---|
| १ हिंदुस्थानांत. | ९०९ | ९९६ | इ. स. १८८१ सालीं. |
| | ८९१ | ९९४ | इ. स. १८९१ सालीं. |
| २ पोर्चुगल. | ७५० | ८९२ | |
| ३ संयुक्त संस्थानें (देशी प्रजा.) | ७४६ | ७८३ | |
| ४ सिंव्हलद्वीप. | ७३१ | ९७१ | |
| ५ चिली. | ७१२ | ७७९ | |
| ६ इताली. | ६२३ | ७६४ | |
| ७ हंगारी. | ५९२ | ७१७ | |
| ८ ऑस्ट्रिया | ४७९ | ५३३ | |
| ९ आयर्लंड | ४४६ | ४९९ | |
| १० क्वीन्सलांड. | ३२४ | ३०९ | |
| ११ न्यू सौथ वेलस. | ३१२ | ३३३ | |
| १२ सौथ आस्ट्रेलिया. | २८३ | २८९ | |
| १३ संयुक्त संस्थानें. (गोरकाय.) | २७५ | २९४ | |
| १४ न्यू झीलंड. | २५२ | २७५ | |
| १५ व्हिक्टोरिया. | २४५ | २२५ | |

भारतखंडांतील जातींत अशिक्षितांचें प्रमाण.

सदरच्या कोष्टकांत हिंदुस्थान व युरोप आणि अमेरिका, यांतील उपलब्ध असलेल्या देशांची माहिती देऊन, त्यांच्या

परस्पर तुलनेनें अशिक्षितांचें सामान्य प्रमाण दाखविलें. तथापि, ह्या भरतखंडांतील जातिवैचित्र्यांत, एकंदर अशिक्षितांचें प्रमाण कसें आहे, व ते कसकसे विभागले गेले आहेत, हें दाखविणें जरूर असल्या कारणानें. त्याचेंही दिग्दर्शन करतों.

| जात, अथवा धर्म, किंवा पंथ. | | प्रत्यक हजारीं अशिक्षितांची संख्या. पुरुष. | स्त्रिया. |
|---|---|---|---|
| ब्राह्मणधर्मानुयायी | हिंदु | ८९२ | ९९६ |
| शीख. | हिंदु | ९०४ | ९९६ |
| जैन. | हिंदु | ४६६ | ९८६ |
| बौद्ध. | हिंदु | ५२६ | ९७४ |
| जंगली व पिशाच पूजक. | हिंदु | ९९२ | १,००० |
| पारशी. | | २२३ | ४९९ |
| ज्यू. | | ४८१ | ७८६ |
| मुसलमान. | | ९२९ | ९९७ |
| किरिस्ताव. | | ६५७ | ८६४ |

आतां, हिंदुलोक हे फार प्राचीन काळापासूनही इतके पुढें सरसावलेले असून, त्यांच्यांत आजमित्तीस हवातसा विद्याभिवृद्धीचा फैलाव नाहीं; अथवा, पुराण राष्ट्रांत, सुधारणेच्या प्रत्येक शाखेंत तेच अग्रेसर असल्याविषयीं त्यांची ख्याति असूनही, एकंदर लोकसमूहावर सरस्वतीचा अतुल संस्कार हल्लीं जि-

विद्याप्रसाराची कमतरता व तत्संबंधीं आमची उणीव.

तका जास्त फैलावला असावा तितका नाहीं; ही गोष्ट खरो खरच मोठ्या आश्चर्याची आहे. आणि त्यासंबंधानें आमची उणीव आह्मालां कबूल करणें देखील अगदीं भाग आहे.

हिंदूंत संख्याप्राचुर्यापेक्षां गुणाधिक्य जास्त आहे.

परंतु, ह्या प्रसंगीं इतकें मात्र सांगणें अगदीं अत्यवश्य आहे कीं, संख्याप्राचुर्याकडे विशेष लक्ष्य न पुरवितां गुणाधिक्यावरच जर जास्त नजर पुरविली तर, ह्या गुणाधिक्याचा अपूर्व मासला हिंदूंत, आणि त्यांतही विशेषतः ब्राह्मणांत, अधिक प्रमाणानें दिसून येतो, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. [1]

आनुवंशिकसंस्कारशेष.

कारण, फार प्राचीन काळीं, आमच्या आर्यहिंदूंनीं जो पराक्रम गाजविला, अथवा जें बुद्धिवैभव प्रकट केलें, तें पिढ्यानुपिढ्या, ( समग्र नाहीं तथापि निदान अंशतः तरी, ) खचित अजून देखील मधून मधून दृष्टिगोचर होतें.

ब्राह्मण हे पूर्वींच्या काळीं केवळ तत्वज्ञानांतच नि-

---

१ " The Brâhmans were not only the *priests* and *philosophers*. They were also the *Law Givers*, the *Administrators*, the *Men of Science*, and the *Poets of their race*."

( Dr. Hunter's Inidian Empire P. P. 96-97 )

" इंग्लंडचा विस्तार " या नांवाच्या पुस्तकांत प्रोफेसर सीली हा हिंदुविषयीं असें म्हणतो कीं,

" *Perhaps no* race has shown a greater aptitude for civilization.

( Seeley's Expansion of England ). P. 241.

हिंदूंची गुणसंपन्नता.

पुण होते असें नाहीं. तर, धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष, हे जे चार प्रसिद्ध पुरुषार्थ, त्यांत देखील ते सर्व प्रकारें निष्णात होते. ते राजकार्यकुशल असून, उत्कृष्ट मुत्सद्दी असल्याविषयीं त्यांची ख्याति आहे. तसेंच ते फार शोधक असल्यामुळें, शास्त्रकलाप आणि कलासमूह, ह्यांत सुद्धां त्यांची प्रवीणता असे; किंबहुना अजूनही ती अंशतः आहेच, असें म्हटलें तरी चालेल. ते उत्तम स्मृतिकार, अनुपम कवि, अतुल वैय्याकरणी, आणि नामांकित न्यायशास्त्रज्ञ होते. आणि आर्यधर्माचा व तत्वज्ञानाचा मजबूत पाया घालून, त्याजवरील अतिमनोहर इमारत व टुमदार काम चिरकाल राहण्याविषयीं त्यांनीं जे भगिरथ प्रयत्न केले, आणि त्या कारणानें त्याला

---

१ ह्यासंबंधानें एल्फिन्स्टन् इतिहासकार असें म्हणतात कीं,

" And, from the *early excellence* of the Bráhmans *in all these branches of learning*, it is probable that they had made considerable progress, even when this code ( Manu Smriti )was formed. "

( Elphinstone's India. P. P. 92-94-95 ).

२ " It is in this field ( philosophy ) and that of Grammar that the Indian mind attained the *highest pitch* of its *marvellous fertility* in subtle distinctions. " * *

( History of Indian Literature. By. A Weber. P. 26

एके ठिकाणीं कझन असें म्हणतो कीं;

" The history of Indian Philosophy is the abridged History of the Philosophy of the world. "

जी उन्नतावस्था प्राप्त झाली, ती पाहून पौरस्त्य व पाश्चात्य राष्ट्रें अजूनही सकौतुकाश्चर्य तोंडांत बोटेंच घालतात.

आतां, कोणी कदाचित् असा आक्षेप घेईल कीं, अहो! ह्या सर्व पूर्वींच्या दंतकथा झाल्या. परंतु हल्लीं त्यापैकीं कांहीं तरी शिलक आहे काय? असल्यास सांगा. नाहीं-पेक्षां, रिकामी कर्मकटकट लावून, उगीच कोणाहीना कांहीं तरी लांबच्या लांब चऱ्हाट वळूं नका. होय, ही गोष्ट मला देखील सर्वथैव मान्य असून, ह्या आज्ञेचाही, सादर स्वीकार करण्यास, मी तयार आहें.

हिंदुबुद्धिमत्तेची परंपरा व त्याची ग्लानि.

इतिहासावलोकननें आपल्यास असें खात्रीपूर्वक कळून येतें कीं, प्राचीनकाळापासून चालत आलेली आपली वैभवश्रेणी व ज्ञान परंपरा, हीं कालगतीस अनुसरून, थोड्याबहुत अंशानें पूर्वींप्रमाणेंच अद्यापिही एकसारखीं चालू आहेत. मात्र, दरम्यान कांहीं कालपर्यंत, **इस्लामशाहीनें** आपला प्रचंड खो घातल्यामुळें, आमच्या बुद्धि-सूर्याला ग्रहण लागून, त्याचा प्रकाश जरासा मंदावल्या-सारखा झाला. तथापि, **खग्रास** नसल्याकारणानें, मधून मधून त्याचा चकचकाट भासमान होतच असे; आणि **आर्य हिंदूंचें** जें आनुवंशिक तेज तें कधीं देखील लोपलें नव्हत, ही गोष्ट अनेक प्रमाणांनीं सिद्ध करून देतां येईल.

**इस्लामशाहीपूर्वी** आमचा **प्रतापसूर्य** विशेष प्रखर

इस्लामशाहीच्या पूर्वीची स्थिति, व बुद्धिवैभव.

होता. इतकेंच नव्हें तर, त्याचीं उज्ज्वल किरणें सर्व दिशांनीं फांकलेलीं असत, हेंही आतां निर्विवाद आहे. सबब, तद्विषयक जास्त तपशील देण्याचें कांहीं कारणच नाहीं. परंतु, खुद्द **इस्लामशाहींत**, आणि तदनंतर, व हल्लीं देखील, **हिंदूंचा** बुद्धिप्रकाश चांगल्या प्रकारें भासमान होत असल्याविषयीं, अगदीं प्रत्यक्ष प्रमाणेंच आपल्याला मिळण्यासारखीं आहेत.

१ **भास्कराचार्य**—हा इ० स० १११४ सालीं जन्मला असून, त्यानें केलेला सिद्धान्त शिरोमणि इ० स० ११५० सालीं पुरा झाला; आणि करणकुतूहल इ० स० ११८३ सालीं तयार झालें.

२ **भोजदेव**—अकरावें शतक. ह्यानें सरस्वतिकंठाभरण नांवाचा ग्रंथ केला आहे.

३ **गोवर्धन**—अकरावें शतक. ह्याचा सप्तशतिग्रंथ सुप्रसिद्ध आहे.

४ **श्रीहर्षदास**—तेरावें शतक. ह्यानें सदुक्त कर्णामृत रचलें आहे.

५ **शार्ङ्गधर**—चवदावें शतक. ह्याची शार्ङ्गधर पद्धति सर्वांस महशूर आहे.

६ **नारायण**—चवदावें शतक. ह्यानें हितोपदेश केला असून, त्याची कीर्ति अखिल जगांत पसरली आहे.

७ **जयदेव**—बारावें शतक. ह्यानें केलेलें गीतगोविंद सुप्रसिद्ध आहे.

८ **रामानुज**—सुप्रसिद्ध वैष्णवधर्मप्रतिष्ठापक हा इसवी सनाच्या बाराव्या शतकांत उदयास आला.

९ **रामानन्द**—वैष्णवधर्मप्रतिष्ठापक. तेराव्या किंवा चवदाव्या शतकांत ह्याचा उदयकाळ होय.

१० **कबीर**—हा इ० सनाच्या चवदाव्या किंवा पंधराव्या शतकांत उदयास आला असून, मुसलमान आणि हिंदु धर्मांचें एकीकरण करण्याचा त्यानें प्रयत्न केला. हा मोठा संत होता, व ह्याचीं अनेक पदें आहेत.

११ **चैतन्य**—हा इ० स० १४८६ सालीं जन्मला होता. ह्यानें वैष्णव धर्माचा प्रसार करून, जगन्नाथाच्या पूजेचें महात्म्य वाढविलें.

१२ **वल्लभस्वामी**—हा इ० स० च्या सोळाव्या शतकांत उदयास आला; व त्यानें विलासभक्तीचा प्रसार केला. ह्या पंथांतील प्रेमसागर नामक पुस्तक सुप्रसिद्ध आहे.

१३ **नानकशहा**—हा पंधराव्या शतकांत उदयास आला, व त्यानें शीख धर्माची प्रतिष्ठापना केली.

१४ **मुकुंदराज**—इ० सनाचें अकरावें शतक. परमामृत आणि विवेकसिन्धु हे ह्याचे सुप्रसिद्ध ग्रंथ होत.

१५ **ज्ञानदेव**—इ० स० चें तेरावें शतक. ज्ञानेश्वरी व अमृतानुभव हे ह्याचे सुप्रसिद्ध ग्रंथ आहेत.

१६ **नामदेव**—इ० स० चें चवदावें शतक. हा मो[illegible]मळ भक्त असून, त्यानें कित्येक अभंग केले आहेत.

१७ **एकनाथ**—इ० स० चें सतरावें शतक. एकनाथी भागवत, एकनाथी रामायण, रुक्मिणी स्वयंवर, व स्वात्मसुख, हे ह्याचे ग्रंथ होत.

१८ **तुकाराम**—जन्म इ० स० १५८८, व समाप्ति इ० स० १६२८. ह्याचे स्फूट अभंग पुष्कळ आहेत.

१९ **वामन पंडित**—सतरावें शतक. मरणकाल इ० स० १६७३. निगमसागर हा ह्यांचाच ग्रंथ आहे. (शंके १५९९.)

२० **रामदास**—जन्म इ० स० १६०८. समाधिकाल इ. स. १६८१. दासबोध व मनाचे श्लोक हे यांचे मुख्य ग्रंथ होत.

२१ **मुक्तेश्वर**—जन्म इ०स० १६०९. हा मोठा रसिक कवि होता.

२२ **श्रीधर**—अठरावें शतक. मरणकाल. इ० स० १७२८. हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, शिवलिलामृत, हे ह्याचे मुख्य ग्रंथ आहेत.

२३ **अमृतराव**—अठरावें शतक. मरणकाल सुमारें इ० स० १७५३. ह्याचे कटाव सुप्रसिद्ध आहेत.

२४ **महिपतीबावा**—अठरावें शतक. इ० स० १७७८. [illegible]विजय, संतविजय, भक्तलीलामृत, आणि संतलीलामृत [illegible]मुख्य ग्रंथ होत.

[illegible] **[illegible]रोपंत**—जन्मकाल. इ० स० १७२९. मरण [illegible] स० १७९४. यांच्या आर्या सुप्रसिद्ध आहेत.

२६ **रघुनाथपंडित**—सतरावें शतक. इ०स० १६२२. नलदमयंतिस्वयंवराख्यान नांवाचा ग्रंथ ह्यानेंच रचिला आहे.

२७ **रामजोशी**—जन्मकाल. इ० स० १७६२. मरणकाळ इ०स० १८१२. ह्याच्या बोधपर लावण्या आहेत.

२८ **जगन्नाथ पंडित**—सोळावें शतक. हा अकबरच्या

पदरीं असे. रसगंगाधर, भामिनीविलास, अश्वधाटी, गंगाल-हरी, कुचमर्दिनी, हे याचे मुख्य संस्कृत ग्रंथ होत.

२९ **भट्टोजी दीक्षित**--जन्म शके १५००. ( इ० स० १५७८ ). हा प्रसिद्ध वैय्याकरणी होय.

३० **लोलिंबराज**--सतरावें शतक. हा सुप्रसिद्ध वैद्य होय. वैद्यजीवन व हरिविलास, हे ह्याचे ग्रंथ होत.

३१ **वेंकटाध्वरी**---सतरावें शतक. विश्वगुणादर्श, लक्ष्मीसहस्र, आणि हस्तिगिरिचंपू, हे ह्याचे ग्रंथ होत.

३२ **त्र्यंबकराज वैद्य**--सतरावें शतक. हा सुप्रसिद्ध वैद्य असून त्यानें त्र्यंबकी नांवाचा वैद्यकावर ग्रंथ रचिला आहे.

३३ **ताताचार्य**-सतरावें शतक. हा वैष्णव कवी होता.

३४ **विहारीलाल**--सतरावें शतक. ह्यानें गोवर्धन-कृत सप्तशति नांवाच्या ग्रंथावरून, सत्तसई नांवाचें काव्य वृज भाषेंत रचलें आहे. ह्यांत सातशें दोहोरे आहेत.

३५ **नागोजीभट्ट**—सतरावें शतक. हे सुप्रसिद्ध वैयाकरणी होत. ह्यांचे पुष्कळ ग्रंथ आहेत.

३६ **महेश्वरभट्ट**--एकोणीसावें शतक विश्वप्रकाश, द्वि-रूपकोश, अमरविवेक, सौन्दर्यबोधिनी, वगैरे त्याचे ग्रं परमा-

३७ **राजाराममोहनराय**—जन्मकाल इ० स. ज्ञानेश्व

हा मोठा देशाभिमानी व देशसेवक होता.

३८ **चांगदेव**---बारावें तेरावें शतक. हा सर्वगुण-संपन्न असे.

३९ **रोहिदास**---चवदावें शतक. हा जातीचा चांभार असून, कवीराप्रमाणें, ह्यानें अनेक प्रकारच्या साक्या पदें, व दोहोरे केले आहेत.